म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९०७.

श्री
स–संशोधक–मंडळ, पुणें

# महाराष्ट्रीय सारस्वत

## ग्रन्थ तिसरा

# फुट प्रकरणें

पृष्टांक

(१) निर्याणाचे अभंग ... १
(२) गीतासार, एकनाथकृत १२
(३) गीतासार, पूर्णानंदकृत ४८
(४) उपदेशरत्नाकर ... ७८
(५) राऊळविवरण ... १०९
(६) [illegible] ग्रन्थ ... ११५

[illegible]तक धुळें [illegible] रा. शंकर श्रीकृष्ण देव [illegible] आत्माराम
[illegible]पखान्यांत छापून पुणें येथें रा. खंडेराया श्री[illegible]मण मेहेंदळे
यांनीं भा० इ० सं० मंडळाचे कार्यालयांत प्रसिद्ध केलें.

विजया दशमी शके १८३६

किंमत बारा आणे

श्री

# तुकाराममहाराजांच्या निर्याणाचे अभंग

तुकाराम महाराज आपला जड देह घेऊन वैकुंठास गेले किंवा यांनीं जलसमाधी घेतली, याविषयीं भाविकांत आणि विद्वानांत एक प्रकारचा वाद आहे व त्या वादाचा कधीं काळीं सर्वमान्य निकाल लागेल अशी कोणी हि आशा करूं नये. आपल्या विरुद्ध बाजूच्या मंडळींचें ह्मणणें तरी काय आहे तें नुसतें ऐकण्यास केवळ भाविक जन तयार होतील किंवा नाहीं याची वानवा आहे. तसें च केवळ विद्वान् लोक आपल्या बुद्धीच्या आटोक्याबाहेरील गोष्टी प्रमाण मानण्यास कबूल होतील असें हि वाटत नाहीं. अशा स्थितींत ज्यांच्या ठिकाणीं श्रद्धा आणि सारासार विचार हीं दोन्हीं आहेत अशांनीं च या वादाचा विचार करून तुकाराममहाराजांच्या निर्याणाचा केंव्हां तरी निर्णय केला पाहिजे.

असा निर्णय करण्यास पुढील अभंग फार उपयोगी पडतील अर ...सा आहे. नगर जिल्ह्यांतील शेवगांव येथील श्रीविठ्ठलाचे ...षोत्तम बुवा यांच्या संग्रहीं असलेल्या एका जीर्ण बाडांतील ...ाहेत. अंतर्बाह्य स्वरूपावरून बाड शें दीडशें वर्षांमागचें ...भंग एकंदर २९ आहेत, पैकीं २४ वा अभंग अपूर्ण ...वा आणि २६ वा असे दोन अभंग फाटले आहेत. एकं- ...ैकीं २७, २८ व २९ हे तीन अभंग "विठ्ठल" कृत ...ह विठ्ठल कोण हा प्रश्न आहे, पण महाराजांच्या तिघां ...ांपैकीं ते एक असल्यास या अभंगांचें महत्त्व फार आहे. या अभंगांपैकीं फार च थोडे कोठें कोठें प्रकाशित आहेत, बाकी ...वीन आहेत. जे प्रकाशित आहेत त्यांचे पाठभेद विच... ...ारखे आहेत.

महाराजांच्या निर्याणासंबंधानें जीं दोन मतें आहेत, त्या दोन्ही मतांना पोषक अशीं वचनें या अभंगांत आहेत.

अभंग ८ कुडीसहीत जाला गुप्त तुका ॥
,, १३ विमानाचे घोष वाजवितील घंटा ।
सुरू जाला डंका वैकुंठीचा ॥
,, २३ उभारिल्या ध्वजा उठविलें विमान ॥
,, २४ तुका बैसला विमानीं ॥
,, २९ वीठल ह्मणे तुका भला ।
नेणों देहासहित गेला ॥

हीं वचनें निवडून काढून तुकाराम महाराज सदेह वैकुंठास गेले या मताचे अभिमानी आपल्या मताला आणखी आधार मिळाला असें प्रतिपादन करणार. इतर कित्येक साधुसंतांप्रमाणें महाराजांनीं जलसमाधी घेतली असें ज्यांचे मत आहे, ते यावर असें ह्मणणार कीं, विमानांत बसून कोणते साधु, फक्त कीर्ति मागें ठेवून, सदेह वैकुंठास गेले नाहींत? पण ह्मणजे याचा अर्थ काय, ते आपला जड देह घेऊन खरोखरीच्या विमानांत बसून वैकुंठ ह्मणून एकादें स्थळ आहे तेथें कां गेले! आणखी या मताचे अभिमानी ह्मणणार, तुह्मी जीं वचनें सादर केलीं आहेत त्यांचा लाक्षणिक अर्थ करणें शक्य व इष्ट आहे, पण

अभंग १३ जाला पाठमोरा इंद्रायणीजवळी ॥
,, १३ प्रथम तो पाय घातला पाण्यांत ।
राहिली ती मात तुका ह्मणे ॥
,, १५ जालें परब्रह्म घोट्याखालीं शून्य ॥
,, १६ गुडघ्या इतुका गेला पाण्यांत विरूनी ॥
,, १८ मांड्यावरुतें पाणी जालें हें शरीर ॥
,, १९ कंठ आणि ऊर जालें तें जीवन ॥

स्पष्ट वचनांचा कोण काय निराळा अर्थ करणार?

असो; कोणाचें कसें हि मत असो. सर्वांना च पुढील अभंग मननीय वाटतील यांत शंका नाहीं. त्यांचा अर्थ करण्यास जो तो मुखत्यार आहे.

मार्गशीर्ष वद्य ८ }
१८३५ } रसाळ

॥ श्रीगणेशाय नमः ॥

घरचीं दारचीं तुह्मी सुखी नांदा ।
वडिलांसी सांगा दंडवत ॥ १ ॥
मदाचीये गोडी माशी टाकी उडी ।
गेली प्रात घडी पुन्हां न ये ॥ २ ॥
गंगेचा हा वोघ सागरासी गेला ।
नाहीं मागें आला कदा काळीं ॥ ३ ॥
ऐशीया शब्दाची बरी धरा सोय ।
गेला तुका न ये कदा काळीं ॥ ४ ॥ १

सखे सज्जन हो घ्यारे रामनाम ।
संगें येतां कोण निश्चय सांगा ॥ १ ॥
आमुचे हातीचें जरी रत्न गेलें ।
नाहीं सांगितलें ह्मणाल कोण्ही ॥ २ ॥
ह्मणोनी सकळां केलें असे ठावें ।
न येकले जावें पुण्यें वाटे ॥ ३ ॥
इतुक्यावरी तुह्मी राहाल जरी मागें ।
तुका निरोप सांगे विठोबासीं ॥ ४ ॥ २

पताकाचे भार मृदंगाचे घोष ।
जाती हरीदास पंढरीसी ॥ १ ॥
लोकांची पंढरी आहे भूमीवरी ।
आह्मां जाणें दूरी वैकुंठासीं ॥ २ ॥
कांहीं केल्या तुह्मां उमज न वाटे ।
ह्मणोनी बोभाट करुनी जातो ॥ ३ ॥

मागें तुह्मी राहाल कराल आरोळी ।
तुका कदा काळीं मागें न ये ॥ ४ ॥ ३

ऐसी सवगड आहे आमुची वाट ।
नाहीं घाट वेठ वाटेवरी ॥ १ ॥
जकातींची गुंता नाहीं वाटेवरी ।
मार्ग मोकळे चारी यावें जावें ॥ २ ॥
ऐसें भोगणें असेल ज्यासी सुख ।
तेणें पैं विन्मुख होऊं नये ॥ ३ ॥
पडाल संकटीं भवसागर शोका ।
कोणे जना[1] तुका न सांपडे ॥ ४ ॥ ४

उठा सकळ जन भेटूं तुह्मी आह्मी ।
लक्ष लावा नामीं विठोबाचे ॥ १ ॥
लहान थोर सारे आसीर्वाद घ्या रे ।
बोळवीत या रे इंद्रायणी ॥ २ ॥
येथूनी आमुचा खुंटलासे मार्ग ।
तुह्मी कृपालोभ असों द्यावा ॥ ३ ॥
तुह्मांसाठीं जीव होतो कासावीस ।
कोण्ही हरीदास नीवडेना ॥ ४ ॥
उठे तुक्या आतां सोडी यांची चिंता ।
निरोप द्यावा लोका गांवचीया ॥ ५ ॥ ५

आनंदाच्या गुढ्या हरी वीठल ह्मणा ।
निरोप द्यावा आह्मां जातों आतां ॥ १ ॥
आमुची जे कांता तुमचे पदरीं ।
दया तीजवरी करीत जावी ॥ २ ॥
पसरीतो पदर धरितो दाढी होटी ।
अन्याय घाला पोटीं मजसाठीं ॥ ३ ॥
ठाईंची अचपळ तोंडाची फटकळ ।
मजसाठीं वरद [illegible]सा ईची ॥ ४ ॥

---

१ "ना तु" हीं अक्षरें फाटण्यात गेलीं आहेत.

येवढया शब्दाची बरी सोय धरा ।
उपकार करा तुक्यावरी ॥ ५ ॥ ६
सकळीक माझी बोळवण करा ।
परतूनी घरा जावें तुह्मी ॥ १ ॥
वाढऊनी दिल्हें येकाचींये हातीं ।
सकळ निश्चीती जाली तेथें ॥ २ ॥
कर्म धर्म तुह्मां असावें कल्याण ।
हें माझें वचन आसीर्वाद ॥ ३ ॥
तुका ह्मणे आतां जाली हे चि भेटी ।
उरल्या त्या गोष्टी बोलायाच्या ॥ ४ ॥ ७
करविली तैसी केली कटकट ।
वाकडी कां नीट हारी जाणे ॥ १ ॥
आह्मी येतों आतां कृपा असो द्यावी ।
सकळां सांगावी विनती माझी ॥ २ ॥
वाढ वेळ जाला उभा पांडुरंग ।
वैकुंठीं श्रीरंग बोलावीतो ॥ ३ ॥
अंतकाळीं आह्मां विठोबा पावला ।
कुडीसहीत जाला गुप्त तुका ॥ ४ ॥ ८
सकळांचे पाईं माझें दंडवत ।
आपुलालें चित्त शुद्ध करा ॥ १ ॥
सकळ हि माझी बोळवण करा ।
परतोनी घरा जावें तुह्मी ॥ २ ॥
धर्म अर्थ काम जाला येके ठायीं ।
मेळविले तेही हातोहातीं ॥ ३ ॥
वाढवाल लोभ होईल उशीर ।
अवघा चि स्थीर करा ठाईं ॥ ४ ॥
तुका ह्मणे आतां जाली हे चि भेटी ।
उरल्या त्या गोष्टी बोलावया ॥ ५ ॥ ९
निरोप दिल्ह्यावरी न पहावें मागुतें ।
पुढलीया पंथें उरकावें ॥ १ ॥

थोड्यासाठीं मागें ठेऊं नये घोर ।
आपुले परिहार करावे ते ॥ २ ॥
पोट भरल्यावरी न बोलावी गोष्टी ।
श्रमें अन्न तारीं घेऊं नये ॥ ३ ॥
देव-आज्ञा जालिया मागें ठेऊं नये वासना ।
रांडा पोरे जाणा निरऊं नये ॥ ४ ॥
तुका ह्मणे देवें मार्ग शुद्ध केला ।
वाटा तो आपुला हातां आला ॥ ५ ॥ १०

वैशा रे गडे हो आज्ञा द्यावी आह्मां ।
आमूचिया रामा चित्तीं धरा ॥ १ ॥
उपकार करूनि[1] पतीत उद्धरा ।
वारंवार उच्चारा रामनाम ॥ २ ॥
व्हा रे वारकरी जा वेगीं पंढरी ।
निरोप माहाद्वारीं सांगा येवढा ॥ ३ ॥
तुका आमुचे गांवीं होता येक आपुला ।
कोठें नाहीं गेला पायावीण ॥ ४ ॥ ११

येतों काकूळती अर्थ धरा चित्तीं ।
आमुचिये पंथीं हेत ठेवा ॥ १ ॥
आमुचे पंथीं नाहीं जकातीचें नातें ।
सनद जाली पोते कोण दंडी ॥ २ ॥
ऐसें मी सांगतों खरें धरा मनीं ।
अनहित कोण्ही न सांगे रे ॥ ३ ॥
परिहारासाठीं वैद्य नारायेण ।
सजीव निर्गुण काय करी ॥ ४ ॥
पतीत ताराया केलें तुझें नाम ।
तुका तो पावन जाला सुखी ॥ ५ ॥ १२

विमानाचे घोष वाजवितील घंटा ।
सुरू जाला डंका वैकुंठीचा ॥ १ ॥

---

1 मुळांत " करूनि " शब्द हस्तदोषानें लिहिण्याचा राहिला आहे.

आण्पर्स

शब्दाचा विश्वास जाली आळवण ।
करा बोळवण सज्जन हो ॥ २ ॥
आले विष्णुदास आली विष्णुमूर्ती ।
निज अवसान हातीं सांपडलें ॥ ३ ॥
जाला पाठमोरा इंद्रायणीजवळी ।
नामघोषें टाळी वाजवीली ॥ ४ ॥
प्रथम तो पाय घातला पाण्यांत ।
राहिली ती मात तुका ह्मणे ॥ ५ ॥ १३

रानोवनीं नाम दाटलें अपार ।
प्रळयाचें नीर वोसरले ॥ १ ॥
तेव्हां माझें रूप निजरूपीं मिळालें ।
धन्य धन्य केलें तीहीं लोकीं ॥ २ ॥
तुझीये कीर्तीचा वाढविला डंका ।
येकला चि तुका घालविला ॥ ३ ॥ १४

जालें परब्रह्म घोट्या घाली शून्य ।
राहिलें बोलणें येथुनीया ॥ १ ॥
काय मी बोलीलों परिहारासाठीं ।
नामदेवाची बाकी फेडियेली ॥ २ ॥
बरा मी भाग्याचा होतो देवाचा रुणी ।
वढविली वाणी तेणें माझी ॥ ३ ॥
येव्हडियावरुनी जालें माझें काम ।
आतां भवश्रम हरला देवा ॥ ४ ॥
व्याज मुद्दल सर्व आलें तुझे हातां ।
नाहीं भय चिंता तुका ह्मणे ॥ ५ ॥ १५

इतुक्यामध्यें माळ घातली माळणीनें ।
जवळ देहअवसान आलियावरी ॥ १ ॥
गुढग्या इतुका गेला पाण्यांत विरूनी ।
आपोनारायेण जैसा ठेला ॥ २ ॥

---

१ "खालीं" पाहिजे.

कांतेसी ह्मणे कांहीं उपकार करी ।
जालों सीपाभरी जातां जातां ॥ ३ ।
पदर फाडोनीया देईं तूं चोळीला ।
येवढीया बोला तरी मागो ॥ ४ ॥
पदर फाडोनी दिल्हा माळणीहातीं ।
तेव्हां विजयेमूर्ती संतोषली ॥ ५ ॥
तुका ह्मणे अक्षई पुण्यमान जाला ;
दिवस हा गेला सोनीयाचा ॥ ६ ॥ १६

होसी पुत्रवंती नारायणसुखें ।
पावसी पुत्रमुख आसीर्वचन ॥ १ ॥
जातां हा शेवट गोड तुंवा केला ।
कळस आजी जाला येथुनीया ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां जालें समाधान ।
संमोखिलें मन सेवटीं च ॥ ३ ॥ १७

मांड्यावरुतें पाणी जालें हें शेरीर ।
जाला धुमधुमकार दाही दिशा ॥ १ ॥
वाजती विणे टाळ मृदंगाचे घोष ।
गाती हरीदास नाचताती ॥ २ ॥
नेणों मागें पुढें होती हरीकथा ।
भ्रम जाला लोका गांवीचीया ॥ ३ ॥
हातावरुनी हात मारुनी जातो तुका ।
परी कोण्हा येका उमजेना ॥ ४ ॥ १८

कंठ आणि ऊर जालें तें जीवन ।
परतलें मन मागुतें कीं ॥ १ ॥
जनीं जनार्दन आहे तुह्मांपाशीं ।
उगा च कासावीसी जीव होतो ॥ २ ॥
इतक्यातून येक येतां पाठीवरी !
कीर्ती हो माघारी गाजवीती ॥ ३ ॥
कांहीं केल्या याचें वळेचीना मन ।
केवळ पाषाण होउनी ठेले ॥ ४ ॥

सहस्रांमध्यें एक नीवडतो शूर ।
गाजवी तरवार बरें होतें ॥ ५ ॥
काढोनी डोईचा लावीला शेला ।
असेल आपुला ईल कोण्ही ॥ ६ ॥
तुका ह्मणे किती फोडावा यासी ऊर ।
आपुला परिहार करावेते ॥ ७ ॥ १९

सर्व हेत जाला आहे येक मनीं ।
येव्हडी विनवणी ऐका तुह्मी ॥ १ ॥
आह्मी सत्यलोकीं स्त्री मृत्यलोकीं ।
कोण्ही ईचें चित्तीं धरूं नका ॥ २ ॥
ठाईंची अचपळ तोंडाची फटकळ ।
मजसाठीं वर्दळ सोसा ईची ॥ ३ ॥
ईचा उपकार आह्मावरी जाला ।
पदर हा दिल्हा माळणीसी ॥ ४ ॥
आरे पांडुरंगा फेडी ईचें रीण ।
नको संमधपण ईचें माझें ॥ ५ ॥
साकीबाकी देउनी तुका मार्गस्त जाला ।
पदर हा दिल्हा मागुता कीं ॥ ६ ॥ २०

बैसा सकळ जेन तुह्मी आनंद करा ।
परतोनी मार्ग धरा आपुलाले ॥ १ ॥
आमुचे मार्ग फुटणार नाहीं कोण्हा ।
सद्भाव वासना धरूं नेदी ॥ २ ॥
पेरियेलें बीज विस्तार मागुती ।
मग कराल चितनी कार्याची ॥ ३ ॥
उन्हाळा प्रजेन्य पाडिला सीळाधारी ।
काये आह्मावरी उपकार त्याचा ॥ ४ ॥
समयोचित कोण्ही असतां सावधान ।
होता राजमान्ये तुका ह्मणे ॥ ५ ॥ २१

अहा देवा काय घरबूड जाली ।
नागवण आली माईकाला ॥ १ ॥

चित्त हें चैतन्य परब्रह्मींचा गाभा ।
याजपुढें उभा राहिल कोण्ही ॥ २ ॥
वीठलपाउलें देखीलीं नयनीं ।
आमुची स्मरणी आटोपली ॥ ३ ॥
मन हें रुद्राक्षें जेप जाला पुरा ।
देखुनीया वरा रखुमाईच्या ॥ ४ ॥
तुका ह्मणे मुक्ती जाली पायाजवळीं ।
आतां येक वेळी विश्रांतीची ॥ ५ ॥ २२

तेरा मणियांची माळ येकवट ।
आले वैकुंठ राज सुखीं ॥ १ ॥
स्वरूपीं स्वरूप जालें स्वरूपाकार ।
नलगे वेव्हार लौकीकाचा ॥ २ ॥
उभारिल्या ध्वजा उठविलें विमान ।
राहिले ते जेन जेंथील तेथें ॥ ३ ॥
पूर्णिमेचा चंद्र तुका पूर्ण जाला ।
गुप्त तें क्षणिं केला पायांतळीं ॥ ४ ॥ २३

तुका उतरला तुकीं ।
नवल जालें तिहीं लोकीं ॥ १ ॥
हें चि तयाचें साधन ।
सुखें करावें कीर्तन ॥ २ ॥
तुका बैसला विमानीं ।
संत पाहाती लोचनीं ॥ ३ ॥
+　　+　　। याला भेट + ॥ २४
+　　+　　+　　+　　॥ २५
+[1]　　+　　+　　+　　॥ २६
अवघें गोडींतील गोड ।
तुका लावणीचें झाड ॥ १ ॥

---

+ फाटलेला भाग. १ हा हि अभंग सबंध फाटला आहे. ह्याच्या शेवट चरणांतील " समोखावें " एवढा एक च शब्द दिसतो.

सर्व बोधांतील बोध ।
तुका माझा पांचवा वेद ॥ २ ॥
कैसा ब्रह्मीं गुप्त ठेला ।
नेणों वारा पाणी जाला ॥ ३ ॥
ह्मणे वीठल रुक्मिणी ।
आणुनी द्यावा तरी कोणी ॥ ४ ॥ २७

भक्ति अन्नदानी केली ।
माझी कल्पना निववीली ॥ १ ॥
नेली अंतर खोलोनी ।
प्रेमप्याला तो धुवोनी ॥ २ ॥
फार होतो कासाविसी ।
रूप राहिलें मानसीं ॥ ३ ॥
माझा देहेरंग सोहळा ।
नाहीं गेला कळीकाळा ॥ ४ ॥
वीठल ह्मणे तुका भला ।
नेणों देहासहित गेला ॥ ५ ॥ २८

वाट पाहातां दाही वाटे ।
तुका दिसत नाहीं कोठें ॥ १ ॥
ऐसें कैसें मज केलें ।
दुःख देउनी सुख नेलें ॥ २ ॥
त्या हि सुखें सुखावला ।
मोठा घात माझा केला ॥ ३ ॥
वीठल ह्मणे जातो प्राण ।
द्या रे दुर्बळाचें धन ॥ ४ ॥ २९

श्री

## प्रकरण दुसरें

# श्रीएकनाथकृत गीतासार

श्रीएकनाथमहाराजांच्या या वहुमोल ग्रन्थाची प्रत आह्मांस खंडोबाचे निंबगांव येथें रा. नानासाहेब चंद्रचूड यांच्या हस्तलिखित ग्रन्थसंग्रहांत मिळाली. ग्रन्थरचनेचा काल ग्रन्थांत दिलेला नाहीं, तथापि शके १५०० चे सुमारास तो रचला असावा असा अदमास आहे. आह्मांस मिळालेल्या प्रतीचा लेखनकाल हि दिलेला नाहीं. प्रतीच्या अंतर्बाह्यस्वरूपावरून ती शके १७०० च्या सुमारास केलेली दिसते. प्रत एकनाथकालीन नसल्यामुळें कित्येक अशुद्ध पाठ आहेत त्यास इलाज नाहीं. खुद्द ग्रन्थाविषयीं मी कांहीं लिहावयास पाहिजे असें मला वाटत नाहीं. एकनाथमहाराजांच्या भक्तिज्ञानपर ग्रन्थांची पू[illegible] ओळख असलेल्या महाराष्ट्रास प्रस्तुतचा ग्रन्थ एकनाथमहाराजांच[illegible] आहे, एवढी च शिफारस पुरे आहे. प्रस्तुतचें प्रकरण संपादण्या[illegible] कामीं माझे मित्र रा. पांडुरंग नरसिह पटवर्धन व श्रीमंत तात्यासा[illegible] मेहेंदळे यांनीं मला सर्वस्वीं मदत केली त्याबद्दल मी त्यांचा [illegible] आभारी आहे.

पौष शु. १ } गंगाधर नारायणराव मुजूमदार
१८३५ }

## ॥ श्रीगणेशाय नमः ॥

श्रीगुरुभ्यो नमः ॥ ॐ नमः परमात्मने नमः ॥

प्रथम न (मो) जी गणनाथा । तुझेनि चुके संसारवेथा[1] ।
ज्ञान होय तत्वता । प्रकाशें जयाचेनि ॥ १ ॥

---

१ व्यथा.

वेदा आदि अगोचर । वंदिताति सुरनर ।
तुजपासोनि साकार । सृष्टीरचना ॥ २ ॥

सूर्य औंन्[1] ॐकारा । अर्ध उलेख तिसरा ।
शक्तिचिया विकारा । उल्लेख नावं ॥ ३ ॥

हेत आणि अंतःकरण । अनुक्रमे चीत्त बुद्धि मन ।
ईंद्रियें तुजपासोनि । ब्रंह्मयांचिं ॥ ४ ॥

नवां आखोंचा[2] विस्तारु । आणि मागुता संव्हार ॥
करुनि सर्व व्यापार । वेगळा चि तुं ॥ ५ ॥

सौंसारासि कारण । आज्ञान तेची वीघ्न ॥
हरिसी गजवदन । ह्मणोनि विघ्नहरु ॥ ६ ॥

कामधेनु चींतामणी । कल्पतरु पुरवी आईणी[3] ॥
तुझीया कृपा करुनि । सर्व सिद्धि ॥ ७ ॥

आतां नमन माते शारदे । आकळ तुझीं तिन्हि पदें ॥
तयेचि देहीं मोक्षवृंदें । दाविसी डोळां ॥ ८ ॥

ब्रंह्मपद वीष्णुपद । तीसरें जें रुद्रपद ॥
त्वंपद तत्पद । गौरव जयाचेनि ॥ ९ ॥

तयाचे अनंत अवतार । कुळदेवता कुळाचार ॥
उत्पती स्थीती संव्हार । जयाचा खेळ ॥ १० ॥

ते माया कुंडलणी[5] । जे प्रतक्ष देहीं आसोनी ॥
तयतें देहि नेणोनि । बोलती नाहिं ऐसें ॥ ११ ॥

तवं ह्मणे सारजा । आरे ब्राह्मणा आरर्जा ॥
गीतासार साचे ची वोजा । वीस्तारि पां ॥ १२ ॥

आतां नमु तो श्रीगुरुनाथ । जो अनाथाचा नाथ समर्थ ॥
तुजवांचुनि मुक्तीपंथ । कवण दावी ॥ १३ ॥

फेडावया आज्ञानअंधकारु । जी तुं ज्ञानदिनकरु ।
भवसमुद्रींचें तारुं । कृपानिधी ॥ १४ ॥

स्वामि तुवां कृपा केलीं । ग्रंथ आज्ञा दिधलि ॥
गीतासार म्हाराष्ट्री बोलीं । सांगेन कथा ॥ १५ ॥

---

१ आणि. २ अंकांचा ३ इच्छा ४ ज्ञानघन. ५ कुंडलिनी. ६ श्रेष्ठा.

श्री

प्रकरण दुसरें

# श्रीएकनाथकृत गीतासार

श्रीएकनाथमहाराजांच्या या बहुमोल ग्रन्थाची प्रत आह्मांस खंडोबाचे निंबगांव येथें रा. नानासाहेब चंद्रचूड यांच्या हस्तलिखित ग्रन्थसंग्रहांत मिळाली. ग्रन्थरचनेचा काल ग्रन्थांत दिलेला नाहीं, तथापि शके १५०० चे सुमारास तो रचला असावा असा अदमास आहे. आह्मांस मिळालेल्या प्रतीचा लेखनकाल हि दिलेला नाहीं. प्रतीच्या अंतर्बाह्यस्वरूपावरून ती शके १७०० च्या सुमारास केलेली दिसते. प्रत एकनाथकालीन नसल्यामुळें कित्येक अशुद्ध पाठ आहेत त्यास इलाज नाहीं. खुद्द ग्रन्थाविषयीं मी कांहीं लिहावयास पाहिजे असें मला वाटत नाहीं. एकनाथमहाराजांच्या भक्तिज्ञानपर ग्रन्थांची पू ओळख असलेल्या महाराष्ट्रास प्रस्तुतचा ग्रन्थ एकनाथमहाराजां आहे, एवढी च शिफारस पुरे आहे. प्रस्तुतचें प्रकरण संपादण्या कामीं माझे मित्र रा. पांडुरंग नरसिंह पटवर्धन व श्रीमंत तात्यासाहेब मेहेंदळे यांनीं मला सर्वस्वीं मदत केली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

पौष शु. १ }<br>१८३५ }

गंगाधर नारायणराव मुजूमदार

॥ श्रीगणेशाय नमः ॥

श्रीगुरुभ्यो नमः ॥ ॐ नमः परमात्मने नमः ॥

प्रथम न (मो) जी गणनाथा । तुझेनि चुके संसारवेथा[1] ।<br>ज्ञान होय तत्वता । प्रकाशें जयाचेनि ॥ १ ॥

---

१ व्यथा.

वेदा आदि अगोचर । वंदिताति सुरनर ।
तुजपासोनि साकार । सृष्टीरचना ॥ २ ॥

सूर्य आन् ॐकारा । अर्ध उलेख तिसरा ।
शक्तिचिया विकारा । उल्लेख नावं ॥ ३ ॥

हेत आणि अंतःकरण । अनुक्रमे चीत्त बुद्धि मन ।
इंद्रियें तुजपासोनि । ब्रंह्मयांचिं ॥ ४ ॥

नवां आखोंचा विस्तारु । आणि मागुता संव्हार ॥
करुनि सर्व व्यापार । वेगळा चि तुं ॥ ५ ॥

सौंसारासि कारण । आज्ञान तेची वीघ्न ॥
हरिसी गजवदन । ह्मणोनि विघ्नहरु ॥ ६ ॥

कामधेनु चींतामणी । कल्पतरु पुरवी आईणी ॥
तुझीया कृपा करुनि । सर्व सिद्धि ॥ ७ ॥

आतां नमन माते शारदे । आकळ तुझीं तिन्हि पदें ॥
तयेचि देहीं मोक्षवृंदें । दाविसी डोळां ॥ ८ ॥

ब्रंह्मपद वीष्णुपद । तीसरें जें रुद्रपद ॥
त्वंपद तत्पद । गौरव जयाचेनि ॥ ९ ॥

तयाचे अनंत अवतार । कुळदेवता कुळाचार ॥
उत्पती स्थीती संव्हार । जयाचा खेळ ॥ १० ॥

ते माया कुंडलणी । जे प्रतक्ष देहीं आसोनी ॥
तयतें देहि नेणोनि । बोलती नाहिं ऐसें ॥ ११ ॥

तवं ह्मणे सारजा । आरे ब्राह्मणा आरजां ॥
गीतासार साचे ची वोजा । वीस्तारि पां ॥ १२ ॥

आतां नमु तो श्रीगुरुनाथ । जो अनाथाचा नाथ समर्थ ॥
तुजवांचुनि मुक्तीपंथ । कवण दावी ॥ १३ ॥

फेडावया आज्ञानअंधकारु । जी तुं ज्ञानदिनकरु ।
भवसमुद्रीचें तारुं । कृपानिधी ॥ १४ ॥

स्वामि तुवां कृपा केली । ग्रंथ आज्ञा दिधलि ॥
गीतासार म्हाराष्ट्री बोलीं । सांगेन कथा ॥ १५ ॥

---

१ आणि. २ अंकांचा. ३ इच्छा ४ ज्ञानघन. ५ कुंडलिनी ६ श्रेष्ठ.

आठरा पर्वें माहां भारथ । तयाचें सार भगवत्गीत ।
तया दोहींचें मथित । ते हे गीतासार गहन ॥ १६ ॥
जेथें परमात्मां आपण । सांगतसे विस्तारुन ।
सगुण आणि नीर्गुण । दाविलें समरसें ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥ अर्जुन उवाच ॥

ॐकारस्य च माहात्म्यं । रूपं स्थानं परं तथा ॥
तत्सर्वं श्रोतुमिच्छामि । ब्रूहि मे पुरुषोत्तम ॥ १ ॥

## टीका

परमात्मा जो ॐकार । तीर्हि वेदा होउनी थोर ।
रूप स्थान किं परात्पर । तेथें तैसा चि दिसे ॥ १८ ॥
देवेशा ॐ कार माहांत्म्य । त्याचें रुप त्याचें स्थान आत्योतम ।
रुप स्थानातीत कैसा परम । तें सर्व हि ऐकों इछितसें ॥ १९ ॥
तो मिं जाणावा लक्ष्मीपती । इछा वाढतसे चिति ।
ते कृपापूर्वक मजप्रति । बोलावें पुरुषोत्तमा ॥ २० ॥

॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवाच ॥

साधु पार्थ महाबाहो यन्मा त्वं परिपृच्छसि ॥
विस्तरेण प्रवक्ष्यामि । तन्मे निगदतः शृणु ॥ २ ॥

## टीका

साधु साधु माहाबाहो पार्था । पुसिलें यया तत्वार्था ॥
सविस्तारें हे चि कथा । सांगेन मीं ॥ २१ ॥
तेथें तन्मय होउनी । मन चित्त ठेविं चैतन्यीं ॥
नीजानंद सावधानि । नीवाडें ऐक पां तुं ॥ २२ ॥

॥ श्लोक ॥

पृथिव्यग्निश्च ऋग्वेदो भूरित्येव पितामहः ॥
अकारेतु लयं प्राप्ते प्रथमे प्रणवांशके ॥ ३ ॥

## टीका

पंच भुताचा विस्तारु । रुग्वेदाचा ऊचारु ॥
अग्नि वाचा सर्वस्कारु । होतो जयाचेनि ॥ २३ ॥
ते आग्नि वाचा इश्वराची । ऐसि बोलि वेदांताचि ॥
उत्पती सकळां जीवाची । ब्रह्मां जो करितसे ॥ २४ ॥

पृथ्वी आणी अग्नि । ऋग्वेद आदी करुनि ।
सर्वांचा पिता ह्मणोनि । बोलिजे पीतामहा ॥ २५ ॥
पृथ्वी आकारा आणिलि । ह्मणोनि आकार ऐसी बोली ।
जयाचा ठाईं मावळलि । मागुति होतसे ॥ २६ ॥
तो अकार प्रथम प्रणउ साचे । अविद्या आदि ॐकाराचे ।
तेथें चहुं मात्रासि जें जयाचें । तें साधिजेल ॥ २७ ॥

॥ श्लोक ॥

अन्तरिक्षं यजुर्वेदो भुवो विष्णुः सनातनः ॥
उकारे तु लयं प्राप्ते द्वितीये प्रणवांशके ॥ ४ ॥

टीका

पृथ्वी सर्वांसि आधारि । पृथ्वीहुनि आकाश वरि ।
ब्रंह्मांडाचि भरोवरि । मनाचा ऐक्यांतरि भासतसे ॥ २८ ॥
तयाचे स्थिती यजुर्वेदु । मन तो वीष्णु ब्रंह्मानंदु ।
ॐकाराचा द्वितिय भेदु । दीसतसे जो ॥ २९ ॥
तये रचनेसहित । उकार दुसरा प्रणव विख्यातु ।
तया ॐकाराचा निभ्रांतु । जाणसि तुं ॥ ३० ॥

॥ श्लोक ॥

दिव्यसूर्यः सामवेदः स्वरित्येव महेश्वरः ॥
मकारे तु लयं प्राप्ते तृतीये प्रणवांशके ॥ ५ ॥

टीका

सूर्यप्रकाश दिव्यरुप । सामवेद तया समिप ॥
स्वरित प्रतिपद स्वरुप । अैसे हें महेश्वर ॥ ३१ ॥
तो तिसरा प्रणउ मकारु । जयाचा ठाईं सर्व साकारु ॥
थया तिहिचा विस्तारु । ऐक पां तुं ॥ ३२ ॥

॥ श्लोक ॥

अकारे च उकारे च मकारे च धनंजय ॥
इदमेकं सुनिश्चीतं ओमिति ज्योतिरूपकं ॥ ६ ॥

टीका

अकार उकार मकारु । धनंजया चौथा ॐकारु ॥
तीन्हि मिळोनि येकाक्षरु । क्षरि हीं देखिजे तो ॥ ३३ ॥

पींडिं पदिं रूपातित । नाद बींद कळा ज्योतिरहित ॥
देवाचि उत्पति होत । जयापासाव ॥ ३४ ॥
तयाचा अंश जीवात्म । तो ही चौथा असे वर्म ॥
तीहीं पदाचें देहि मान परम । घडे जयाचेनि ॥ ३५ ॥
गगनि मेघ गर्जत । तयाचा नाद त्वरित ॥
श्रवणि असे प्रकासित । सर्व हि प्राणियांचा ॥ ३६ ॥
मृग अथवा चंदन । वसविति येक स्थान ॥
परी तें अघवे वन । व्यापुनि असे गंधु ॥ ३७ ॥
तैसा देहापासोनि । ज्योतिस्वरुप जो व्यापक सर्व जनि ॥
तयाचि खुण सुजाणीं । देखावि सर्व देहीं ॥ ३८ ॥

॥ श्लोक ॥

अष्टाङ्गं च चतुष्पादं त्रिस्थानं पंचदेवतम् ॥
ओङ्कारं यो न जानाति ब्राह्मणो न स गर्दभः ॥ ७ ॥

टीका

इडा पिंगळा प्रमाण । दोन्ही नेत्र दोन्ही कर्णे ॥
वदन मंत्रु जाण । इयें अष्टांगें ॥ ३९ ॥
देह अवस्था अभिमानी । प्रणउ मात्रा चहुं शून्यीं ॥
तया चहुं वीधातें जाणोनि । ह्मणोनि च्यारि पाय ॥ ४० ॥
तीन्हि देव तीन्हि शून्यीं । मिरविताति तीन शुन्ये तिन्हि ।
ते श्रीगुरु वांचोनि । नातुडती ॥ ४१ ॥
अें पंच महाभुतें । पावलि विस्तारातें ॥
ते च्चि पंचदेवतें । शरिरीं जाणावि गा ॥ ४२ ॥
ॐ नमः सिध । अजपा बिज प्रसिद्ध ।
जयाचें तेचि निबंध । पांच ही वेद ॥ ४३ ॥
जये जपेची स्थिती । प्रत्तक्ष देहि मुक्ती ।
तिथेतें नेणोनि खंडिताति । मुर्ख जन जे ॥ ४४ ॥
यन्हवि चक्र ज्ञान उभवणी । आजपेच्चि जे मांडणी ।
ते ज्ञान मुर्ख जनि । अप्रमाणिजे ॥ ४५ ॥

---

१ प्राप्त होत नाहींत.

ब्रंह्मविद्याचि अजपा अैसी । वस्तु साक्षात्कार परियसि ।
तियतें जे खंडिति ते मुर्खरासि । जाणावे गा ॥ ४६ ॥
असो हे सृष्टिसहित । जो ॐकार सर्वगत ।
तयातें नेणे तो निश्चीत । ब्रांह्मण चि नव्हे ॥ ४७ ॥
अतां आष्टांगाचे आर्थ तिनि । ते हि दाविजेति निवाड करुनि ।
सुचित होउनियां मनि । ऐकें पार्था ॥ ४८ ॥
आष्ट दळ तें चि अष्टांग । त्याचा ऐक विभाग ।
सहस्र दळ जें सांग । तें येक दळ अष्टामधें ॥ ४९ ॥
दोनि दळें उभय श्रवण । ऐसीं दळें जालिं तिन ॥
उभय नयन मीळोन । दळपंचक जाणिजे ॥ ५० ॥
नासापुटिचिं दोनि दळें । ऐसिं सात हिं प्रांजळें ।
अठवे दळ वदन बोलिलें । ऐसें हें अष्टांग जाणावें ॥ ५१ ॥
अष्टपुरात्मक जें लिंगदेह । तें चि गा अष्टांगे पाहें ।
अैसें दुसरें व्याख्यान आहे । अतां तिसरें सांगेन ॥ ५२ ॥
जे बोलिजे अष्टधा प्रकृती । ते चि गा अष्टांगें होति ।
हे जाणावि युक्ति । भगवत्गीतेचि ॥ ५३ ॥
अैसें तिन आर्थ सांगितले । यथामतिने बोलिले ।
तथापि असे उरलें । व्याख्यान यक ॥ ५४ ॥
विराट हिरण्यगर्भ महत्तत्व माया । मूळ प्रकृती च्यारि धनंजया ।
तत्पदिच्या परमात्मया । तैसें चि त्वंपादिं च्यारि असती ॥ ५५ ॥
स्थुळ सुक्ष्म कारण । चौथा देह महाकारण ॥
ऐसे जीवात्मयाचे च्यारि देह जाण ।
हे उभय मिळोन । जाण अष्टांगें ॥ ५६ ॥
च्यारि मातृका ज्या आसती । ते चि च्यारि पाय शोभती ॥
अकार उकार मकार ह्मणति । चौथा पाद अर्ध मात्रुका ॥ ५७ ॥
नेत्र कंठ हृदय स्थान । हे त्वंपदिचें तिन स्थाने ॥
सत्य वैकुंठ कैलास जाण । हें तीन्ही स्थाने तत्पदिचिं ॥ ५८ ॥
विश्व तेजस प्राज्ञु । प्रत्यगात्मा आणि निर्गुण ॥
हे त्वंपादि पंच दैवतें जाण । आतां ऐक तत्पदिचिं ॥ ५९ ॥
ब्रंह्मा विष्णु रुद्र सर्वेश्वरु । पांचवा सदाशिव साचारु ॥
ऐसा दैवत पंचकाचा विचारु । सांगीतला तुज ॥ ६० ॥

अतां कोण मात्रास कोण वर्ण । ऐसें सांगल श्रीकृष्ण ॥
तवं पार्थ जाला सावधान । ऐकावया लागुणि ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥

अकारः पीतवर्णश्च रजोगुणसमुद्भवः ॥
उकारः सात्विकः शुक्लो मकारः कृष्णतामसः ॥ ८ ॥

टीका

अकार जो सात्वीक गुणि । तो रजोगुणेकरुनि ॥
श्रृष्टी करितो ह्मणोनि । ब्रंह्मा रजोगुणी बोलिजे ॥ ६२ ॥
परि तो सत्वगुणि अभंग । शांतिपणे आचरे कर्मयोग ॥
विष्णु तो भोक्ता सर्व भोग । ह्मणोनि रजोगुणि तो ॥ ६३ ॥
पोटिं सत्वस्थ ब्रंह्मा बाळक । ह्मणोनि विष्णु सत्वगुणि देख ।
नेणे ंचि सत्वरुपविवेक । यालागि रजोगुणि ब्रंह्मा ॥ ६४ ॥
... ... ... । ... ... ॥
आकार तो कृष्णवर्ण । तामस अहंकारु ॥ ६५ ॥
तो प्रगटे जये वेळी । दोहोचि करुनि होळि ।
दुष्ट भाव तये काळिं । वर्तति पापरूप ॥ ६६ ॥

॥ श्लोक ॥

आकारे तु भवेद्ब्रह्मा उकारे विष्णुरुच्यते ॥
मकारे तु भवेद्रुद्र ओङ्कारः परमं पदम् ॥ ९ ॥

टीका

आकारु तो ब्रंह्मा जाण । उकारु तो विष्णु सनातन ।
मकारु तो प्रमाण । रुद्रदेवो ॥ ६७ ॥
हे तीन्ही जेथें प्रकाशती । आणि लयातें पावति ।
तो चि ॐकार मिं सुभद्रापति । जाणावें परम पद ॥ ६८ ॥

॥ श्लोक ॥

ओङ्कारो भगवान् विष्णुस्त्रिधामा वचसांपतिः ॥
तस्योच्चारणमात्रेण परब्रह्माधिगच्छति ॥ १० ॥

टीका

जयासि नाम भगवंत । महाविष्णु मायावी निभ्रांत ।
तिन्ही मात्रा प्रवर्तवित । आणि ज्याच्हि वाचा ॥ ६९ ॥

ऱ्हःस्व मात्रा सामान्य होणे । दिर्घ मात्रेचें थोर देखणे ।
दोहिं तें जया सांटवण । ते प्लुतमात्रा ॥ ७० ॥
वैखरिपासुनि ऊच्चारु । मध्यमां करि विचारु ।
पश्यंति होय निर्धारु । जये अर्धमात्रायोगें ॥ ७१ ॥
वैखरि मध्यमां पश्यंती । परा जे जाणति स्वयंज्योती ।
ह्मणोनि तो इयेचा पति । संपती जयाची हे ॥ ७२ ॥
तयाचें उच्चारण अपैसें[1] । शरिरीं मिं चि आसें ॥
हें जाणे तो प्रवेशे । परब्रह्मीं ॥ ७३ ॥
मीं जो वोंकारु वीष्णु भगवानू । श्रीधामाजि व्यापक जगजीवनू ॥
वाचाचा स्वामिं सुलक्षणु । ऐसें किरटी जाण पां तुं ॥ ७४ ॥
तया ॐकाराच्या उच्चारमात्रेंकरुनि । जासिल परब्रह्म स्वरुपिं मिळोनि ।
परि तो उच्चारु श्रीगुरुवांचुनि । कवणासि न कळे ॥ ७५ ॥

॥ श्लोक ॥

ओमित्येव परं रूपं हृत्पद्मे सुव्यवास्थितम् ॥
तस्मात्समभ्यसेदेवं सर्वज्ञं पूरुषोत्तमम् ॥ ११ ॥

टीका

परात्पर निजस्वरुप । हा ॐकारु ज्योतिरूप ॥
हृदयकमळिं ज्ञानदिप । व्यापकु जो ॥ ७६ ॥
जयाचा ठाईं स्फुर्ति अहंकारु । तो अष्टदळ पद्मविचारु ॥
तेथें परंपद श्रीगुरु । दाखवितसे ॥ ७७ ॥
जयाकारणे अभ्यासु । तो चि माहादेव परेशु ॥
सहज देहिं प्रकाशू । सर्वज्ञ पुरुषोत्तम ॥ ७८ ॥

॥ श्लोक ॥

ओंकारप्रभवा वेदा ओंकारप्रभवाः स्वराः ॥
ओङ्कारप्रभवं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ॥ १२ ॥

टीका

पांच ऋषि पांच वेद । पंच प्रजा आवस्था छंद ॥
अग्निचा ठाईं पांच भेद । पांच हि वाचा ॥ ७९ ॥

---

१ आपोआप.

दश देहिं देवता देव। भूतें तत्वें कळा सर्व।
सोमतरणि सोहंभाव। अमित्य तारांगणे ॥ ८० ॥
चौदा पदें मेरु क्षिती। पीठें खंडें दिपावती।
येकविस स्वर्गें दिसताती। जयाचि ठाईं ॥ ८१ ॥
वेद सूत्रें पढती। तर्कशास्त्रं बोलिजति।
बीजमंत्र उपदेसिती। खरें कुडें ॥ ८२ ॥
साहि शास्त्रें पूराणे। कवित्वं व्याकरण।
घडताती अनुमानें। दों दों परी ॥ ८३ ॥
पूरुष येक प्रकृती। जीव शीव संगती।
तीन्हीं पदें जाणती। जयाचेनि ॥ ८४
चहुं खाणिचे जीव। चौऱ्यासि लक्ष सावेव।
ते मजचिपासाव। तयाचें होणे ॥ ८५ ॥
उदात्स्वरि उत्पति। अनुदात करी स्थिती।
स्वरित स्वरि समाती। करितां देखिजे तो ॥ ८६
पांच वेद तीन्हि स्वर। तीन्हि लोक चराचर।
सकळ हे सृष्टी ॐकार। असे विस्तारितु ॥ ८७ ॥
ॐकारिची प्रभवले वेद। रुग्वेद यजुर्वेद सामवेद।
अथर्वणवेद सुक्ष्म वेद। ऐसे पांच हि वेद नीपजले ॥ ८८ ॥
आणी अकारादि शोडष स्वर। प्रसवता जाला ॐकार।
गायनाचे सप्तम स्वर। ते हि जाले ॐकारीं ॥ ८९ ॥
आणीक औठ स्वर आसती। तेहिं ॐकारिच निपजती।
त्याहि वेगळे जे स्वर बोलिजेति। ते हि होती याचिमाजीं ॥ ९० ॥
ॐकारापासोनि सर्व हि जालें। त्रैलोक्यसचराचर उद्भवलें।
यालागि जें असे जेतुलें। ते ते निर्माण ॐकारीं ॥ ९१ ॥
तवं पुसिलें पंडुसुतें। जैं हें सकळ नव्हतें ॥
तैं कवण रूप होतें। कैसियापरी ॥ ९२ ॥
हांसोनि देव बोलीले। सकळ जें विस्तारलें ॥
तें जयापासुनि जालें। तें शुन्यचि होतें ॥ ९३ ॥
परि तयांत हि दोनि होतीं। आदि शीव आदी शक्ति ॥
ऐसें आनुभवें जाणति। ते चि पुर्ण ज्ञानि ॥ ९४ ॥

१ चंद्रसूर्य. २ अमित, अगणित. ३ जेवढें.

आसो हें आतां परि परियसिं । आनादि तुं चि होतासि ॥
आणि आतां हि आससि । तुं चि तो मीं ॥ ९५ ॥

श्लोक

ओङ्कारे च समा संध्या परब्रह्म विचिन्तयेत् ॥
प्रणवेन स्वकं देहमेकीकृत्य समुद्भवम् ॥ १३ ॥

टीका

ॐकारे सर्व सम । तें चि सध्या तु साध्य वर्म ॥
जयाठाईं परब्रह्म । चींतिती योगेश्वर ॥ ९६ ॥
बीजापासोनि ॐकारु । पाने खांदिया विस्तारु ॥
फुलांफळांसहित तरु । जैसी येक चि शोभा ॥ ९७ ॥
तैसें प्रणवेंकरुनी जाणा । आपुला देहीं आर्जुना ॥
सकळ सृष्टिरचना । काय येकाचें हें ॥ ९८ ॥
वटबीज कणिका । अणुमात्र देखा ॥
वटवीस्तारु ऐका । आसे कितियक मध्यें ॥ ९९ ॥
तैसें प्रणवेंसहित । स्वशरिरीं निश्चीत ॥
तें कासयाचें आसे होत । ऐसें जाणावें ॥ १०० ॥
आगा इया प्रणवें करुनी । आपुला देहीं सकळ पाहोनी ॥
सर्व समुद्भवरचना यकत्वें जाणोनी । सुखिया होईं ॥ १ ॥

॥ श्लोक ॥

पादाधस्त्वतलं विद्यात् तत्पादोर्ध्वं तलं भवेत् ॥
वितलं जङ्घदेशे तु जानुदेशे तु सुतलम् ॥ १४ ॥
तलातलमूरुमध्ये गुल्फदेशे रसातलम् ॥
महातलं कटीदेशे सप्तमं च प्रकीर्तितम् ॥ १५ ॥

टीका

पादुकाखालें तळ । पाउलावरि अतळ ॥
जंघदेसीं वीतळ । सुतळ जानुदेसीं ॥ २ ॥
तळातळ पोटरिया । रसातळ गुल्फद्वय जाणाविया ॥
माहातळ पाताळ धनंजया । कटीदेशीं ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥

भूर्लोके नाभिदेशे च भुवर्लोकश्च कुक्षिके ॥
हृदयः स्वर्गलोकश्च महर्लोकस्तु वक्षसि ॥ १६ ॥
जनोलोकः कण्ठदेशे तपोलोको ललाटके ॥
सत्यलोकस्तु मूर्ध्नि स्यादेतदूर्ध्वं तदुच्यते ॥ १७ ॥

टीका

भुर्लोक तो नाभिस्थानि । भुवर्लोक तो कुक्षी दोन्ही ॥
स्वर्गलोक हृदयस्थानि । वृक्षस्थळिं महर्लोक ॥ ४ ॥
जनलोकं आसती कंठीं । तपोलोक ललाटिं ॥
सत्यलोक कीरटी । मुर्ध्नीसी ॥ ५ ॥
तेथें तपे उर्ध्वगती । जेथें ॐ कार बोलती ॥
तयाचा ठाईं आसती । चौदा हि भुवने ॥ ६ ॥

श्लोक

ऱ्हस्वो दहति पापानि दीर्घो मोक्षप्रदायकः ।
आप्यायने प्लुतो वापि त्रिविधोच्चारणेन तु ॥ १८ ॥

टीका

ऱ्हःस्व मात्रा धाकुटी । दीर्घ मात्रा सवें उठि ।
प्लुत मात्रा परिपाठिं । दोहिंचा परि होय ॥ ७ ॥
ऱ्हःस्व मात्रा उच्चारण । पातका करि दहन ।
दीर्घ मात्रा ते प्रमाण । मोक्षदायक ॥ ८ ॥
दीर्घ मात्रा आधोमुख । आसे ब्रंह्मांडि व्यापक ।
ऱ्हःस्व मात्रा उर्ध्वमुख । होय जयाचेनि ॥ ९ ॥
आसो दोहिंचें लक्षण । जेथें मावळलें प्रमाण ।
ते किं जाणावि आर्जुना । प्लूत मात्रा ॥ ११० ॥
येकीचें आभ्यासनें । दुजया रुप करणें ।
दोहितें पाठवणे । आपुला ठाईं ॥ ११ ॥
ऐसें तीहीं मात्राचा ज्ञान । जें त्रीविध उच्चारण ।
जया नित्य प्रमाण । चौथी अर्ध मात्रा ॥ १२ ॥

॥श्लोक॥

तैलाधारामिवाच्छिन्नं दीर्घघण्टानिनादवत् ।
आवाग्जप्रणवस्याग्रं यस्तं वेद स वेदवित् ॥ १९ ॥

## टीका

तैलाचि धार अवछिन्न । तैसा परमात्मा जाण ।
दीर्घ घंटेचा नाद प्रमाण । दिर्घ जैसा ॥ १३ ॥
नव हि नाद मीळोनि । भीतरालियें प्रणवेंकरुनि ।
दाहावा तो चि गगनि । जैसा जैसा मेघनाद ॥ १४ ॥
तैसा प्रणवाचा सेवटिं । जो गर्जतसे त्रीकुटी ।
तयातें जाणे कीरटी । तो चि आत्मज्ञानि ॥ १५ ॥
आधारापासुनि ब्रह्मरंध्रीं । सर्व हि प्राणियाचा शरिरी ॥
व्यापक बाह्य आभ्यांतरि । ब्रंह्म जो नादमुर्ति ॥ १६ ॥
जें पद वाचेनि न बोलवे । प्रणवाचे आग्री असे स्वभावें ॥
त्यासी जो जाणे सद्भावें । तो चि वेदशास्त्रांचा जाणता ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥

त्रिस्थानं च त्रिमात्रं च त्रिब्रह्म च त्रिरक्षरम् ।
त्रिमात्राश्चार्धमात्रेण प्रणवं च विशेषतः ॥ २० ॥

## टीका

घटाकाश मठाकाश । तीसरें तें महदाकाश ॥
सत्यलोक कैळाश । वैकुंठ ते हीं ॥ १८ ॥
नेत्र कंठ हृदय जाण । सकळ त्रीपुटिया त्रीस्थान ।
आतां त्रीमात्राचें परीज्ञान । सांगिजेल ॥ १९ ॥
त्वंपद आणि तत्पद । तीसरें जे आसी पद ॥
शरिरीं तीहिंचे भेद । जाणा हे तीं ठाइं ॥ १२० ॥
स्वर्ग मृत्य पाताळ । तीन्हीं गुण सर्वकाळ ॥
तीन्ही शुन्यें सकळ । सृष्टिरचना ॥ २१ ॥
तीयचिं स्थानकें तीन्हि जेथें । तीन्हीं मात्रा जाण तेथें ॥
अतां जे तीन्ही पंथ । ते ऐक पां तुं ॥ २२ ॥
सौंसारा येणे । तो प्रथम मार्ग जाणणें ॥
दुसरा पंथ भोगणें । जें आयुष्य देहिं ॥ २३ ॥

मग मागुतें सरणें । तो तीसरा पंथ जाणनें ॥
या तिहिं मार्गाचि खुणे । पुसावें श्रीगुरुतें ॥ २४ ॥
आकार उकार मकारिं । तिन्हीं आक्षरें वीचारि ॥
स्थापना इश्वरीं । सृष्टिसहित ॥ २५ ॥
ऐसी या तीन्हीं मात्रा पाहीं । आसती अर्धमात्रेचा ठाईं ॥
तयतें प्रतक्ष जाणे देहीं । तो चि आत्मज्ञानी ॥ २६ ॥
ऐसा जो आत्मज्ञानी । मुक्त होय तीहीं शुन्यीं ।
तो सौंसारापासोनि । तरे क्षणमात्रें ॥ २७ ॥
ब्रह्मां विष्णु महेशु । हे देवत्री ब्रह्मा जाणिजेसु ॥
आतां ऐक विकाशु । तीहीं आक्षरांचा ॥ २८ ॥
येक तें शक्ति आक्षर । यक तै पूरुषाकार ।
थक तें निर्धार । नपुशक आसती ॥ २९ ॥
एवं त्रांमात्रा आर्धमात्रेकरून । विशेष स्वरूप प्रणव पूर्ण ।
आतां ऐक लक्षण । देवत्रयाचें ॥ १३० ॥

॥ श्लोक ॥

**ब्रह्मा हिं पूरको ज्ञेयः कुम्भके विष्णुरुच्यते ।**
**रेचकस्तु तथा रुद्रस्त्रोटकस्तु सदाशिवः ॥ २१ ॥**

**टीका**

पुरक प्रणव उर्ध्व मूख । तो ब्रह्मयाचा ठाईं देख ।
कुंभकु तो आधोमुख । वीष्णुचा ठाईं ॥ ३१ ॥
रेचक तीसरा प्राण । तो रुद्राचा ठाइं जाण ।
त्राहाटकाचि खुण । ॐकारिं देखीजे ॥ ३२ ॥

॥ श्लोक ॥

आत्मानमरणीं कृत्वा प्रणवं चोत्तरारणीम् ।
ध्याननिर्मथनाभ्यासादेवं पश्याऽग्निगूढवत् ॥ २२ ॥

**टीका**

तथा आत्मयाचा ठाइं । आवरण जया दोहीं ॥
तें सम करावें पाहिं । पूरकें करुनी ॥ ३३ ॥
अनु आर्ध आविकारी । रवी शशी ब्रह्मरंध्रीं ॥
मन पवन स्थिर करीं । अंतरिं प्रणवाचा ॥ ३४ ॥

दोहिंचें मथन आभ्यासें । स्वरूप ध्यानि प्रकाशे ।
तो मिं देव प्रणविं दिसे । गुत प्रगट ॥ ३५ ॥
आत्मा ह्मणीजे मनपवन देह । याचि पूर्वारिणी करावि पाहे ॥
प्रणव तो लवलाहिं । उत्तरारणि करावी ॥ ३६ ॥
ऐसीया ज्या उभय आरणी । त्या उभय सामरस्यें पाहोनी ॥
नीर्मथन करावें ध्यानेकरुनी । मथनाभ्यासु तैं ऐसा ॥ ३७ ॥
एवं गूढाग्नि पाहावा । तो मत्स्वरूप जाणावा ।
हा नीश्चय गा पांडवा । स्वदेहीं प्रतक्ष देखिजे ॥ ३८ ॥
ऐसीं खुण दोहींपरी । देवें दाविलि शरीरी ।
तंव पार्थ तया आवश्वरीं । येक आक्षेप केला ॥ ३९ ॥

॥ श्लोक ॥ श्रीभगवानुवाच ॥

अक्षराणि समात्राणि सर्वे विन्दुसमाश्रिताः ।
बिन्दुर्भिद्यति नादेन स नादः केन भिद्यते ॥ २३ ॥

टीका

आक्षरादिक ज्या मात्रुका । शक्ति पुरुष वाचका ॥
बींदुचा ठाइं आश्रीत संचका । दाविसी डोळां ॥ १४० ॥
तो बींदु जया नादातें । भेदितसे निरुतें ॥
तरी तया नादातें । कवण भेदां ॥ ४१ ॥

॥ श्लोक ॥

ओङ्कारध्वनिनादेन वायुः संहरणादिकः ।
निरालंबं समुद्दिश्य तत्र नादो लयं गतः ॥ २४ ॥

टीका

तो ॐ कारु नादध्वनि । प्रकाश दिसे पवनी ॥
आणि प्रवेशे गगनी । होय समाधीस्थित ॥ ४२ ॥
दोहिपरि पन्नास । सृष्टी जेथें समरस ।
तया नादातें परिस । पवनुची भेदी ॥ ४३ ॥
नीरालंबी गगण । शरीरी जें दृष्यमान ।
तेथें समाधिचे ठाइं जाण । नाद लीनू होये ॥ ४४ ॥
ऐसी वोंकाराची खुण । देवें दाविलें मींपण ।
तेथें आर्जुनाचें मन । आनंदलें ॥ १४५ ॥

### श्लोक

निरालंबे पदे प्राप्ते चीत्तं तत्र लयं गते ।
नादानादसमुत्पन्ने मध्यसूत्रप्रवाहिनी ॥ २५ ॥

### टीका

जें निरालंब पद गगण । तें चि ब्रह्म मीं नीरंजन ।
परमपद प्रमाण । जें प्राप्तची आसे ॥ ४६ ॥
तयाचा ठाई चीत्त । स्थीर होय नीश्चीत ।
तरि तत्काळ लयं गत । होय पार्था ॥ ४७ ॥
यालागी नीरालंब पदा आंत । जयाचें चीत्त समरस होत ।
तरि तो चि येक मुक्त । सर्व क्रीया कर्मि ॥ ४८ ॥
करणे न करणे आशा । तृष्णा कल्पना मनसा ।
धर्माधर्म परियसा । हे मनाचे भाव ॥ ४९ ॥
सर्व हि जयाची सत्ता । व्यापारू होय तत्वता ।
करुनी परी अक्रियता । सर्व साक्षी ॥ १५० ॥
ते जें ब्रह्म हें सर्व हि । जेथें पारावार नाहिं ।
अद्वैत सर्व देहीं । देखीजे ज्ञानी ॥ ५१ ॥
जेथुनि नादानाद उत्पन्न । मध्य सुत्र प्रवाहिनि जाण ।
ते चि देहि प्रत्यक्ष खुण । दाखविलि धनुर्धरासी ॥ ५२ ॥

### ॥श्लोक ॥

शून्यभावितभावात्मा पुण्यपापै र्न लिप्यते ।
सर्वशून्यसमभ्यासः समाधिस्तस्य लक्षणम् ॥ २६ ॥

### टीका

तरि शुन्य तें वोळखावें । वोळखोनि ते चि ध्यावें ।
शुन्य शुन्यसें जाणावें । सहज वस्तु ॥ ५३ ॥
शुन्य आकार निराकार । शुन्य आत्मां नीरंतर।
शुन्यापासुनि विस्तार । तीहीं देवाचा ॥ ५४ ॥
ते ब्रह्मादि देवत्रय । जे करिती श्रृष्ट्यादि कार्य ।
ते हि जाणावें शुन्यमय । शरीरीं तीन्हि शुन्यें ॥ ५५ ॥

तें जयाचेनि चेष्टिती । तो चि आत्मां जे जाणती ।
ते अन्नेन भावेन लिंपीती । पुण्यपापिं ॥ ५६ ॥
शुन्य भावित भावात्मां । तो पुन्यपापें न लिंपे धर्मात्मा ।
सर्व शुन्य समाभ्यास परमां । तें चि लक्षण समाधिचें ॥ ५७ ॥
यक पुढें जरि शुन्य । तरि ते दाहा प्रमाण ।
आणिक यक देऊन । होय शत यक ॥ ५८ ॥
हा दशांश सांगों कीति । नवां आंखाचि ऊत्पती ॥
जयाचेनि ते नेणती । दाहावां परमात्मां ॥ ५९ ॥
तया शून्याचा ठाईं । श्रृष्टि तऱ्ही न घडे कहीं ।
परि ते शुन्य चि नाहीं । ऐसें बोलो नये ॥ १६० ॥
शुन्याचिया सत्ताकरुनि । नव हि अंख तोहीं शुन्यी ।
तरि ते शुन्य काहिं नाहिं म्हणौनि । झणती सुख तें ॥ ६१ ॥
जैसी कां वीदुल्लता । गगणि दिसे झळकतां ।
परि प्रभा पृथ्वीवरि यतां । व्यापक देखती ॥ ६२ ॥
तैसा जो आत्मां सर्व शुन्य । तो चि परमात्मां जाण ।
तो चि ॐ ऐसी खुण । समाधीची ॥ ६३ ॥
ऐसी हि समाधी सर्व हि । गुरुमुखें सहज पाहिं ।
जो तयातें वोळखे देहीं । तो तेव्हां चि मुक्त ॥ ६४ ॥

॥ श्लोक ॥

ओमित्येव परं रूपं परब्रह्म प्रकीर्तितम् ।
नादान्तरसमुत्पन्नं तत्र मध्यप्रवाहकम् ॥ २७ ॥

## टीका

हा ॐकारु पररूप परात्पर । तो चि ब्रंह्म निरंतर ।
जो नादाचें अभ्यांतर । दिसे प्रकाशत ॥ ६५ ॥
तया नादाचा आंतरीं । नवां नादाची पारि ।
मातृकांचि भरोवरि । श्रृष्टिसहित ॥ ६६ ॥
मधें दोरा पवनाचा । कुंडलनि च्याऱ्ही वाचा ।
आरंभ तेथें सर्वांचा । ज्ञानदृष्टी ॥ ६७ ॥

---

1 अन्येन.

मुक्ताफळें सहस्रें । वोविलीं येक्या सुत्रें ।
तैसिं हें चराचरें । ब्रह्मसुत्रें वोविलिं ॥ ६८ ॥

॥ श्लोक ॥

उल्लेख परमानन्दं तालुमूर्ध्नि व्यवस्थितम् ।
अत ऊर्ध्वनिरोधेन मंतवं (?) मध्यमध्यकम् ॥ २८ ॥

टीका

मायासंगे ऊल्लेखु । जो आहंकारु मुलेखु ।
तो श्रृष्टिचा विशेषु । परमानंद तो ॥ ६८ ॥
वीशुद्धि तालुका मुळाहुनी । व्यापक असे मूर्द्धनी ।
आध ऊर्ध नीरोधुनि । प्रकाशे मध्यदेशीं ॥ १७० ॥
ह्रुदयापासुनि प्राण । तयाचें मुळ उर्ध्व जाण ।
तेथें पुण्य जें स्मरण । होतसे स्वरूपाचें ॥ ७१ ॥
आपान नाभीकमळ । खालूता जो आधोमुळ ।
तो तवं आसे बिळिल । तें चि पाप ॥ ७२ ॥
पुण्यें स्वर्ग पावावें । पावे निरय भोगावें ।
ज्ञानियां दोहीं पासाव । तो वेगळा चि कीं ॥ ७३ ॥
माया आविद्या ज्ञान अज्ञान । उत्तरायण दक्षणायण ।
ऊर्ध्वगति आधोगति हें खुण । देहीं देखावी ज्ञानियें ॥ ७४ ॥
आधारापासुनि शीखा वरि । सर्व जीवाचा शरिरीं ।
बाहिजे आभ्यांतरि । व्यापक मिं चि जाण ॥ ७५ ॥
प्रथम नाद आधारिं । तेथुनि मातृकाक्षरी ।
व्यापक दाहावा द्वारिं । परा जे उर्ध्वमूख ॥ ७६ ॥
तें त्रीकुट ब्रंह्मरंध्र । प्रसिद्ध तोंडिं उत्तर ।
परि तें दाहावें ब्रंह्मरंध्र । प्रतक्ष ने देखती ॥ ७७ ॥
नाभीस्थानि ॐकारु । तेथें परेचा विस्तारु ।
वैखरिसी उचारू । होतो जयाचेनि ॥ ७८ ॥
तेथें हकार सकार । हृष्य दोनि भ्रमर ।
तेथे ध्यान निरंतर । परवस्तुचें ॥ ७९ ॥
तये सहज समाधिचा ठाईं सर्व संव्हाराचा ।
त्यागु होय भ्रमराचा । जाय उर्ध्व शून्यी ॥ १८० ॥

तेथें ते परा शक्ति । सतरावि गति विगुति ।
ते श्रीकृष्णे आर्जुना प्रति । देहीं दाविता जाला ॥ ८१ ॥

॥ श्लोक ॥

गमागमस्थं गमनादिशून्यं चिद्रूपदीपं तिमिरान्धकारम् ।
पश्यामि ते सर्वजनात्मकस्थं नमामि हंसं परमात्मरूपम् ॥ २९ ॥

आगमिं निगमिं आसोनि । दोहीं मार्गें आदि शुन्यीं ।
× × × । सर्वदा ज्ञानरूप ॥ ८२ ॥
परब्रह्म जें सद्रप । तेथें ते माया चिद्रूप ।
आनंदपद स्वरूप । ईश्वर बोलीजे तें ॥ ८३ ॥
दिपक यक वीवरिं । प्रकाश दिसे मंदिरीं ।
तैसा दाउनि ये शरिरीं । प्रवेश सर्व देहिं ॥ ८४ ॥
आज्ञान रात्रीं तीमिर । ते चि भ्रांति आंधकार ।
निरसे जरि ज्ञानचंद्र । उगवे चतुर्थ शुन्यीं ॥ ८५ ॥
तो सर्वजनाचा आंतरिं । देखोनि भिं नमस्कारिं ।
जो हंस सर्व शरिरीं । परमात्मा स्वरूप ॥ ८६ ॥
हंस आणि परमहंस । समाधिमाजी प्रवेशे ।
तेथुनि मागुता प्रकाश । देहिं देखति ज्ञानिये ॥ ८७ ॥
गम आगम गहन । आणि गमनादि शुन्य ।
चिद्रप दीप प्रमाण । त्रीमिरांधकारु नाशकु ॥ ८८ ॥
अैसा सर्व जनात्मस्थ । ते तु मिं पाहे सुनिश्चीत ।
तया हंसी प्रणिपात । परमात्म स्वरूप तो ॥ ८९ ॥

॥ श्लोक ॥

अनाहतस्य शब्दस्य तस्य शब्दस्य यो ध्वनिः । ।
ध्वनेरन्तर्गतं ज्योति र्ज्योतिरन्तर्गतं मनः ॥ ३० ॥
यस्मिन्नो विलयं याति तद्विष्णोः परमं पदम् । ।
तत्पदं परमं ध्यानं तद्ध्यानं विष्णुरुच्यते ॥ ३१ ॥

टीका

शब्द आनुहातापासोनि । त्याची आदि नाद ध्वनि ।
जो उमटे मध्य शुन्यीं । ब्रह्मांड देहीं ॥ १९० ॥
तया नादाचा आंतरिं ज्योती ज्योतिचा आभ्यांतरि मनाचि गती ।
ऐशीया खुणा दाविती । ते श्रीगुरू स्वामिं ॥ ९१ ॥

तरि तें मन स्वभावें । जये शुन्यीं लयातें पावे ।
तें परमपद जाणावें । माहाविष्णु स्वरूप ॥ ९२ ॥
ते पद परम ध्यान । तें ध्यान विष्णु सनातन ।
स्वः स्वरूप निजानंदघन । ब्रह्म तें तें चि ॥ ९३ ॥
मन पवनाची संधी । देवें दाविली आनादि ।
आर्जुना तिये मोक्षपदिं । लीनु होय ॥ ९४ ॥

॥ श्लोक ॥

नाभिमूले स्थितं पद्मं नालं तस्य दशांगुलम् ।
कोमलं तस्य तन्नालं निर्मलं चाप्यधोमुखम् ॥ ३२ ॥

टीका

श्रीहाट नाभिकमळ । तें आसे जें दशदळ ।
तेहिं यका दशांगुळ । बोलों जं गा ॥ १९५ ॥
तेथुनियां दशांगुळ । खालूतें जें शड्दळ ।
पद्म जें कोमळ । पर्येतु व्यापक जें ॥ ९६ ॥
तये वेदपुरुषीं । सहस्र शीरं जयासी ।
चक्षुपाद तयासि । बोलिजे सहस्र कोटि ॥ ९७ ॥
तो पुरुष सहस्रवदनि । प्रकाशतसे जय स्थानि ।
ते दिसतसे तेथुनी । आंगुळें दाहा ॥ ९८ ॥
नाभिचें आदिमुळ । स्थीत जें पद्मकमळ ।
तेथुनियां दशांगुळ नाळ । आसे कुंडलनी ॥ ९९ ॥
तें चि नाळ सकोमळ नीर्मळ । प्रणवाचें आदिमूळ ।
जयाचेनि सकळ । रचना होतसे ॥ २०० ॥
पवनि नादविकारू । आणि मात्रुकिं हंकारु ।
दाहा देहाचा विस्तारू । होतो जयाचेनि ॥ १ ॥
तयाचा आधोमुखीं । जीव श्टष्टि आसेखीं ।
तयचेनि जे सेखीं । आसे तेथें ॥ २ ॥
नाभीकमळापासुनि । ब्रंह्मयासी जन्म जाण ।
मदनें बाळपण ! मागीतलें ॥ ३ ॥
म्हणोनि तें आधोमुख पद्म जाण । तेथें देहाचें निर्माण ।
तेथें चि हे कुंडलिन । दीसे आधोमुख ॥ ४ ॥

ऐसी हे कुंडलन दुतोंडिं । यक पिंडिं यक ब्रंह्मांडिं ।
नीर्फळु जाला सृष्टीचे आवडि । ठाईं प्रणवाचा ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥

कदलीपुष्पसंकाशं चन्द्रकान्तिसमप्रभम् ।
विशालदलसंपूर्णं चारुहासं सुनिर्मलम् ॥ ३३ ॥

टीका

जैसें कदाळिचें पुष्प । आथवा शंखस्वरूप ।
कर्दळिसारखें रूप । जैसि कांचनप्रभा ॥ ६ ॥
कमळनी पुष्प जळिं दिसे । तप्त हेम शुद्ध जैसें ।
पणवाचा ठाईं तैसें । जयचें उर्ध्व मूख ॥ ७ ॥
तयेचेनि सांगातें । ॐकारू विस्तारातें ।
पावत आसे तया मातें । जाणावें दोहींपरि ॥ ८ ॥
जैसें कदळि पुष्प आसे । तैसें तें पद्म प्रतक्ष दिसे ।
चंद्रकांतिसमान प्रभा भासे । विशाळ दळ संपूर्ण ॥ ९ ॥
चारुहास सुनिर्मळ । शुशोभित सुंदर कमळ ।
गुरूकृपेविण नेत्रयुगुळ । केवीं देखों पावती ॥ २१० ॥

॥ श्लोक ॥

दुर्विज्ञेयो दुराराध्यो दुःप्रगम्यो जनार्दनः
अधोमुखो यथा भूत्वा हृदयं केनं गच्छति ॥ ३४ ॥

टीका

परात्पर जयाचे ज्ञान । दुरागम्य दुराध्यान ।
दुरितर लक्षणं । जयाचें बोलिजे ॥ ११ ॥
दुर्विज्ञेय दुराराध्य । दुःप्रगम्य असाध्य ।
जनार्दनाते जगदाढ्य । बोलति श्रुती शास्त्रें ॥ १२ ॥
तो सकळ प्रपंचाकारें । आधोमूखीं जरि वीस्तारे ।
तरी कवणे प्रकारें । प्रवेशे हृदयाप्रती ॥ १३ ॥

श्लोक

अधोमुखं तु हृत्पद्ममुद्धृत्य प्रणवेन तु ।
पद्मकोशो भव त्वं तु विकासे व्याधिनाशनम् ॥ ३५ ॥

## टीका

मन जे माया आर्ध शुन्यी । आधोमूख तयेचेनी ।
देखीजे तें उर्ध्व शुन्नि । प्रकाशरूप ॥ १४ ॥
तो चि पवने करूनी । पश्चमेसि पूर्व होउनी ।
जातां जया मध्य शुनीं । देखिजेतें ॥ १५ ॥
तेणे चि मार्गे हृदइं । जें व्यापक ब्रंह्म पाहिं ।
मणिपुरावरी देहीं । पद्म जें आष्टदळ ॥ १६ ॥
ते पवनाचिये बाजे । पवनाचिय सुमनसेजे ।
जेथें बेताळिस चक्रं सहजें । आसती समाधीसी ॥ १७ ॥
रविशशीवरि तारांगणे । रचना तिहिं गुणें ।
भमर गुंफे आपण । देखोनि प्रवेशत ॥ १८ ॥
तें पद्म आसतां आधोमुख । प्रणवें उधृत्य करुनि देख ।
हृद्पद्मीं पद्म उर्ध्वमुख । होउनि ठाके ॥ १९ ॥
तो पद्मकोश तुं होय । ऐसें विकाशलियां दृष्टीसी पाहे ।
सकळ व्याधी नासोनि जाय । ते चि क्षणी पार्था ॥ २२० ॥

## ॥ श्लोक ॥

ततः पश्चाद्भवेत्पद्मं सर्वगात्रसुखावहम् ।
अष्टपत्रास्थिता देवा इन्द्राद्या दिशि देवताः ॥ ३६ ॥

## टीका

तथा प्रणवासारिसी । अष्टदळ पद्मकोशी ।
मन इंद्रिये समाधीसी । यउनि होती शांतें ॥ २१ ॥
तथा हृदयापासुनि मागुती । आवघीं वीकासातें पावती ।
आपुलाला व्यापारिं वर्तती । आधारें जयाचेनी ॥ २२ ॥
तो सर्व जनाचा अंतरी । सर्व सखाचा मंदिरीं ।
सर्व गत चराचरीं । दीसतसे नानारूप ॥ २३ ॥
तो चि मीं पद्मापासुनी । देखसी भावेंकरुनि पद्मासनी ।
तरि सुखीया होउनी । आससी तुं ची तुं गा ॥ २४ ॥
त्या उपरि ते पद्म नीर्मळ । सर्वगात्रीं सुखावह होईल ।
अष्टपत्रीं वसती केवळ । ईंद्रादि देव दिशा देवता ॥ २२५ ॥

॥ श्लोक ॥

हृदि स्थितं पङ्कजमष्टपत्रं सुकेसरं केसरमध्यलीनम् ।
अङ्गुष्ठमात्रं मुनयो वदन्ति ध्यानेन विष्णुं पुरुषं पुराणम् ॥ ३७॥

टीका

जया हृदयकमळीं । आष्टवर्ग आष्टदळीं ।
तेथुनि व्यापारीं सकळीं । हे तुझे प्रकाशरूप ॥ २६ ॥
सुकर्णीं शब्द ऐकणें । नेत्रीं रूपातें देखणें ।
घ्राणें परिमळ घेणें । बोलणें वैखरीचें ॥ २७ ॥
केशराचें मूळ ब्रह्मरंध्र । तेथें जागृती निरंतर ।
कंठस्थान तें मंदिर । आसे प्राणाचें ॥ २८ ॥
हृदयामाजी सुषुप्ती । मूर्धनीसी तुर्येची वस्ति ।
त्याऱ्ही आवस्था मिळती । जये उन्मनीसी ॥ २९ ॥
तो आंगुष्ठा यव्हडा प्रमाण । बोलताती मुनीजन ।
हृदयाचा ठाईं जाण । मंदिरीं दीपु जैसा ॥ २३० ॥
तेथ सर्वांगाचा गजरीं । नव ही नादाची परी ।
दाहावां नाद नानापरि । व्यापक जो परमात्मा ॥ ३१ ॥
जैसा रविचंद्राचा ठसा । दीसतो तळहाता यव्हडा जैसा ।
परि तयाचिया प्रकाशा । ब्रह्मांड नु पुरे ॥ ३२ ॥
जेवीं राजा आपुला स्थानीं । परि आज्ञा सर्व ज़नीं ।
ऐसा यक शरीरींहुनी । व्यापक सर्व देहीं ॥ ३३ ॥
अैसा बिष्णु नीरंजनी । तो जाणावा ध्याने करूनी ।
जें बोलती कवि पुराणीं । आदिपुरुष ॥ ३४ ॥
तोचि मी देहापासुनी । आसे ब्रह्मांड व्यापुनी ।
कीं ह्मणती तया मातें नेणोनी । शरिरीं नाहीं ऐसें ॥ ३५ ॥
हृदयस्थित पद्म अष्टपत्र जाण । सुकेशरी केशर मध्य लिन ।
आंगुष्टमात्र बोलती मुनीजन । ध्यानेकरूनी पाहीजे ॥ ३६ ॥
तो मी वीष्णु पुरुष पुराण । ऐसें धनंजया नीरूतें[1] जाण ।
तुज दावितसें कृपेकरून । प्रत्तक्ष ध्यान हेंची माझें ॥ ३७ ॥

---

१ खरें, यथार्थ.

॥ श्लोक ॥

शशिमध्यें स्थिता ध्यात्वा इन्द्राद्या दश देवताः ।
तस्य मध्यगतो भानुर्भानुमध्यगतः शशी ॥ ३८ ॥

टीका

जया चंद्रामध्यें स्थितें । ईंद्रादि दश देवतें ।
तेथें तुं देख सुर्यातें । माजी चंद्र ध्याई ॥ ३८ ॥
गण गंधर्व सुरासुर । नक्षत्रें ग्रहण तिथी वार ।
सकळ हें मायाचक्र । तेथें सूर्य उदयो ॥ ३९ ॥
मन पवनातें चेष्टवी । पवन मनातें खेळवी ।
दोहीची खुण देखावी । तीहीं शून्यीं ॥ २४० ॥
शशी मध्यस्थित ध्याईजे । ईंद्रादि दश देवता सहजे ।
तयामध्यें भानु गेला वोजे । भानुमाजी गेला शशी ॥ ४१ ॥

॥ श्लोक ॥

शशिमध्यगतो वह्निर्वह्निमध्यगता प्रभा ।
प्रभामध्यगतं पीठं नानारत्नप्रवेष्टितम् ॥ ३९ ॥

टीका

तया शशीमध्यगत । वन्हीमार्ग प्रकाशत ।
वन्हीमाजी प्रवेशत । जैसी कां चंद्रप्रभा ॥ ४२ ॥
तरुवरामध्यें बीज । बीजीं तरु आसे नीज ।
तेथें आदि आनादि हें गुज । कवण निवडी पां ॥ ४३ ॥
तैसा चंद्रापासाव सूर्य । सूर्यें चंद्रउदय ।
ऐसा दोहीचा समय । वर्तती ती हिं शून्यीं ॥ ४४ ॥
पुरुषीं शक्तिप्रवेशु । शक्तिपासाव पूरुशु ।
ऐसा दोहिचा प्रकाशु । सीवाचा ठाई ॥ ४५ ॥
प्रभा जें भद्रपिठ । तें औठावें पीठ वरिष्ट ।
प्रणवें होय प्रविष्ट । नाना रत्नीं ॥ ४६ ॥
ऐकें हें पृथ्वीचें चरित्र । ज्ञान जें ईश्वराचें विचित्र ।
तयाचे बोलीजती जे मंत्र । तें ची नाना रत्नें ॥ ४७ ॥

॥ श्लोक ॥

अनेकरत्नसङ्कीर्णं ज्वलनार्कसमुद्भवम् ।
तस्य मध्ये स्थितं देवं नारायणमनामयम् ॥ ४० ॥

### टीका

आनेकरत्नसंकिर्ण । जलनार्क समुद्भव जाण ।
तयामधें आसे देव नारायण । अनामय ॥ ४८ ॥
जैसा अंतरिं कीरळा गाभा । तैसी आनंत रत्नाची शोभा ।
पाहे पां सूर्याची प्रभा । प्रतक्ष ज्वाळासी ॥ ४९ ॥
उर्ध्वमूर्ध्व कळांजन । ज्वाळेसि ज्योती प्रमाण ।
तयामधें नारायण । प्रकाश मनें करूनी ॥ २५० ॥
जें मन लिंगदेह । तो मिं वीष्णु नीःसंदेह ।
ॐकारु जो विदेह । परब्रंह्म मीं ॥ ५१ ॥

॥ श्लोक ॥

श्रीवत्सकौस्तुभोरस्कं पुण्डरीकाक्षमच्युतम् ।
केयूरकटिसूत्रं च हारकुण्डलशोभितम् ॥ ४१ ॥

### टीका

कंठस्थानिं जे पद यक । ते श्रिवछ पद सम्यक ।
इडा पिंगला होती यक । जय सुषुम्नेसिं ॥ ५२ ॥
तेथें असे तिसरा नेत्र । जो ज्ञानकळेचा मंत्र ।
तो कल्पतरु पवित्र । शोभतो अनंत पुष्पि ॥ ५३ ॥
मुकुठ सहस्र किर्णि । माथा मिरवे मुगठमणि ।
त्रिपुंड ललाटस्थानिं । टिळक शोभत जो ॥ ५४ ॥
जयावरि सर्वकाळ । तेथें सद निश्चळ ।
× × × । अच्युत परमहंस ॥ ५५ ॥
चरणि ब्रिदाचा तोडरू । वांकिं नेपुरा झणत्कारु ।
करीं शोभति अळंकार । अनेक रत्नजाडित ॥ ५६ ॥
वैजयति माळा कटिं । ते जाण विज्ञानदृष्टी ।
कटिं सुत्र कर्णपुटिं । कुंडलें झळकताति ॥ ५७ ॥
श्रीवछकौस्तुभोरस्क । पुंडरिकाक्ष अच्युत देख ।
केयुर कठिसुत्र सम्यक । हार कुंडल शोभवत ॥ ५८ ॥

॥ श्लोक ॥

सहस्रफणिसंयुक्तं मध्ये देवः स्थितोऽभवत् ।
शङ्खचक्रगदापद्ममुशलं खड्गमेव च ॥ ४२ ॥

टीका

ऐसा देखोनि प्रसन्नवदन । आर्जुनमानसिं तेचि ध्यान ।
श्रिवत्सपद्म जाण । देखियेलें ॥ ५९ ॥
सहस्त्रफणि संयुक्त । मध्यें देवो स्थित होत ।
यापरि पंडुसुत । डोळां देखे ॥ २६० ॥
शंख चक्र हाति गदा । पद्म मुसल खड्ग सदा ।
वस्त्रें अळकार गोविंदा । देखीलें शीवस्वरूप ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥

धनुष्यबहुबाणं च अष्टबाहुधरं हरिम् ।
शुद्धस्फटिकसंकाशं चंद्रकांतिसमप्रभम् ॥ ४३ ॥

टीका

धनुष्य आणी आमीत्य बाण । आष्ट भुजीं हरी शोभायमान ।
आष्टधा प्रकुती प्रमाण । देखीलें शीवस्वरूप ॥ ६२ ॥
ऐसा राजयोगी अळंकारी । कृष्ण दीसे नानापरी ।
तेथें मुर्ती साकारी । सुंदर देखीला ॥ ६३ ॥
कारिमरी शुद्ध स्फटीक । आंत बाहेरी व्यापक ।
शंखनादासहित देख । नीर्मळ शुभ्र जैसा ॥ ६४ ॥
सोमकांति चंद्रप्रभा । तैसी प्रणवाची शोभा ।
जैसा मळ न लगे नभा । निर्मळपण ॥ ६५ ॥
शुद्धस्फटीकसंकाश । चंद्रकांतिसम प्रभा सुवेश ।
आर्जने ऐसा ऋपीकेश । देखीला नयनकमळिं ॥ ६६ ॥

॥ श्लोक ॥

विशालदलसंपूर्ण चारुहासं सुनिर्मलम् ।
शुद्धं सूक्ष्मं निराकारं निर्विकारं निरञ्जनम् ॥ ४४ ॥

टीका

श्रृष्टी जे महावीशाळ । तें चीं संपूर्ण जयाचें दळ ।
तयाचा ईतिहास निर्मळ । बोलणे ज्याचेनि ॥ ६७ ॥
तो चि मिं प्रणव साकार । शुध्य सुक्ष्म नीराकार ।
शुन्य जें नीरंजन सार । नीर्वीकार तें मीं ॥ ६८ ॥
वीशाळ दळ संपूर्ण । चारुहास सूनिर्मळ गहन ।
शुद्ध सुक्ष्म नीरंजन । नीराकार नीर्विकार मीं ॥ ६९ ॥

॥ श्लोक ॥

अप्रमेयमयं देवं तं विद्यात्पुरुषोत्तमम् ।
तैलाग्निवर्तिसंयोगमधूमज्योतिरूपकम् ॥ ४५ ॥

टीका

जेथ यक हि प्रमेय । नाहीं तो आजिंद्रिय ।
ते परब्रह्म अप्रमेय । जाण मिं पुरुपोत्तम ॥ २७० ॥
आप्रमय मय देवोत्तम । तो जाण मिं पुरुशोत्तम ।
अधूम ज्योतिरूप परम । तैलाग्नी वर्ती सैंयोग जैसा ॥ ७१ ॥
दवळें तेल वाती । मिळोणी दीपक ह्मणती ।
तैसी प्रणवामध्यें उत्तम ज्योती । तो चि मीं शीवस्वरूप ॥ ७२ ॥

॥ श्लोक ॥

तादृशं परमं रूपं स्मरेत् पार्थ अनन्यभाक् ।
यावत्पश्येत् खगाकारं तदाकारं विचिन्तयेत् ॥ ४६ ॥

टीका

पार्था तुज दृश्यमान । जें परम पद प्रमाण ।
ऐसा होसी नानारूपीं लीन । आपुलेनी स्वभाविं ॥ ७३ ॥
नभ जैसें दृष्याकार । तैसा ब्रह्म नीराकार ।
तो प्रणव शुद्ध ॐकार । चींतावा हृदयस्थानी ॥ ७४ ॥
तादृश्य परम रूप देख । पार्था स्मरावें आनन्यभाक ।
जोपर्यंत पाहासी खगाकार सम्यक । तोपर्यंत तदाकार चींतन करावें ॥७५
तद्दप परम पार्था । ते मद्दप आनन्यभाक् तत्वता ।
ऐसें देव सांगतां । खुण कळली आर्जुनासी ॥ ७६ ॥

॥ श्लोक ॥

खमध्ये कुरु चात्मानं आत्ममध्ये च खं कुरु ।
आत्मानं खमयं कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत् ॥ ४७ ॥

टीका

शरिरीं जें आकाश । तेथ आत्मरूपाचा प्रकाश ।
आत्मयांचा ठाइं प्रवेश । आकाशाचा ॥ ७७ ॥
आत्मा आणि आकाश । दोन्हीं जेथें समरस ।
तेथें चींतन वीशेष । करावें गा ॥ ७८ ॥

आकाशामध्यें आत्मां करीं । आत्मयांमध्यें आकाश करी निर्धारीं ।
आत्मा आकाशमय करसी जरी । तरि आणिक कांहीं चींतन नलगे ॥७९॥

॥ श्लोक ॥

भिन्ने कुम्भे यथाकाशं नाकाशं प्रतिपद्यते ।
विभिन्ने प्रकृते देहे तथाऽऽत्मा परमात्मनि ॥ ४८ ॥

टीका

आनंत घटीं नीर्माण । जैसें यकची गगन ।
तैसी शरीरि प्रकृती भीन्न । परि आत्मां यक ॥ २८० ॥
त्वंपद तो जीवात्मा । तत्पद परमात्मां ।
उभयासि तादात्मां । असिपद जया ॥ ८१ ॥
तया दोहीं पदाचा विचारु । खुणें भेदले ज्ञातार ।
बोलीले कवीश्वर । प्रसीध्य वेदशास्त्रीं ॥ ८२ ॥
भीन्न कुंभ आवघे आसती । परि अंतरीं येकाचि गगनाचि व्याप्ती ।
तरी आकाशें बहुधा नसती । प्रती घटिं देखा ॥ ८३ ॥
तेविं प्रकृती देह भीन्न भीन्न । आंतरिं आत्मां यकुचि जाण ।
तोचि परमात्मां संपूर्ण । जाणिजे गा ॥ ८४ ॥

॥ श्लोक ॥

अश्वारूढो गजारूढो सङ्ग्रामे कर्कशे रणे ।
यत्र देवं सदा ध्यायेत्परं ब्रह्माऽधिगच्छति ॥ ४९ ॥

टीका

अश्वीं गजीं आरूढतां । आथवा संग्रामिं प्रवर्ततां ।
संकटारण्य पावतां । करावें स्मरण माझें ॥ ८५ ॥
रथ गज सिंव्हासनि । कर्कष संग्रामिं संकटरणीं ।
व्यापक मीं आसे ह्मणोनी । स्मरावें मातें ॥ ८६ ॥
ऐसें हें ध्यायदेव मीं ची मती । मातें जाणोनि सदा ध्याती ।
ते मज परब्रह्माप्रति ध्याती । भरवसेनी ॥ ८७ ॥

॥ श्लोक ॥

आसने शयने वाऽपि तिष्ठन् गच्छन् सदा शुचिः ।
तस्मात्सर्वप्रयत्नेन योगयुक्तो भवार्जुन ॥ ५० ॥

टीका

आशनी शयनी यतां जातां । सदा सुची मिंची ध्यातां ।
ह्मणोनी सर्वप्रेत्नी पार्था । होय तुं योगारूढ ॥ ८८ ॥
यम नेम प्राणायांम लक्षण । प्रत्यहार धारणा ध्यान् ।
आसन समाधी जाण । पाहीं श्रीगुरूमुखें ॥ ८९ ॥

॥ श्लोक ॥

भ्रान्त्या शक्त्या त्विदं शास्त्रं तमसा दर्शनं यथा ।
सर्वसङ्गनिवृत्तात्मा पश्येदात्मानमात्मनि ॥ ५१ ॥

टीका

शास्त्रा नाहीं गणीत । जवं जवं अभ्यास वहुत ।
तवं तवं होय गर्वीत । भ्रांतीरूप ॥ २९० ॥
धरी जाणव्यचा अहंकारू । तवं तवं पडे आंधकारू ।
सृष्टीमाजी दीनकरू । जैसा अंधासी नाहीं ॥ ९१ ॥
दरुशणें भांडती । पुराणें वेवादती ।
परि तोंडेंची बोलती । ते चि ज्ञान नाहिं ॥ ९२ ॥
ध्याने नींदितांती जैसीं । चोखट होती आपैसीं ।
तैसें निंदकाचे वौंशिं । पातक आस्ति होय ॥ ९३ ॥
जे पाहानार जैसी गती । तयासि स्मरे तैसी मती ।
तेथें आत्मज्ञानस्थिती । कैंवीं घडे ॥ ९४ ॥
वैराग्यापासाव शांती । उपजे तरी युक्ति ।
घडे तयासी मुक्ति । श्रीगुरूप्रसादें ॥ ९५ ॥
जयासी नव अंकाचें । शरिरीं ज्ञान शुन्याचे ।
तो व्याख्यान सर्वशास्त्राचे । स्वदेहीं जाणें ॥ ९६ ॥
दशदेह ज्ञानेविण । जैसें काहिं व्याकरण ।
करतील पठण । ते जाणावे बाहीरमुद्रे[1] ॥ ९७ ॥
म्हणोनि डंबीकें पांडवा । सर्वसंगु त्याग करावा ।
वीवेक देहीं जाणावा । कर्माकर्माचा ॥ ९८ ॥
नीत्य आनीत्य कवण । देखसी आपुली खुण ।
तरि सदा संपन्न । आत्मा चि तुं ॥ ९९ ॥

---

१ दांभिक.

ऐसीया स्वरूपस्थीती । सीद्धेचि आसे मुक्ती ।
म्हणौनि नाहीं म्हणती । ते अत्यंत मुर्ख ॥ २०० ॥
माझाचि भृत्य होई । हें शास्त्र सर्वदा पाहीं ।
माझें दर्शन सदैव घेई । आपुले ची आंतरीं ॥ १ ॥
सर्वसंगनीऊर्त्तात्मा होवावें । आत्मत्वींची आत्मत्व पाहावें ।
आशक्त बुद्धितें त्यागावें । आत्मसुख भोगावें । आत्मत्वं तुवां ॥ २ ॥

॥ श्लोक ॥

कृते पीतं हरिं ध्यायेत् त्रेतायां रक्तवर्णकम् ।
द्वापारे शुक्लवर्णं च नीलवर्णं कलौ युगे ॥ ५२ ॥

टीका

कृतायुगीं श्रीहरिचें ध्यान । शुशोभीत पीतवर्ण ।
त्रेतायुगीं जाण । रक्तवर्ण वीराजे ॥ ३ ॥
द्वापारीं शुक्लवर्ण । दीसतसे शोभायमान ।
नीळवर्ण कळयुगीं जाण । ऐसीं ध्यानें चहुंयुगींचीं ॥ ४ ॥
जो अभ्यास आत्मयाचा । तो धर्म कृतायुगीचा ।
आणि त्रीतायुगीं साचा । धर्म पुजावीधी ॥ ५ ॥
यज्ञधर्म द्वापारीचे । समारंभ येथें तीहींचे ।
धर्म ते कळयुगीचे । तीर्थं वृतें दानें ॥ ६ ॥
ऐसें हें चहुंयुगींचे चतुर्विध । धर्म कळयुगी प्रसीद्ध ।
परि तेथें नातुडे वस्तुबोध । यकें ज्ञानेविण ॥ ७ ॥
चतुर्युग चतुर्वर्ण । चहुं देहाचे प्रमाण ।
चहुं युगीं आदि ध्यान । यका श्रीहरीचें ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥

कृते शुक्लं हरिं विद्यात् त्रेतायां रक्तवर्णकम् ।
द्वापारे शामवर्णं च पीतवर्णं कलौ युगे ॥ ५३ ॥

टीका

वरीं शास्त्रें सांगीतलीं । ते धर्म युगपरत्वें बोलीलिं ।
आतां सांगेन संचलीं । आवताराचीं ध्यानें ॥ ९ ॥
कृतायुगाचा ठाईं । श्वेतवर्ण हरी पाहीं ।
तो चि त्रेतायुगीं लवलाहीं । रक्तवर्ण जाला ॥ २१० ॥

---

१ प्राप्त होत नाहीं.

तो चि द्वापारामाझारिं । शामवर्ण आंगीकारि ।
कळयुगीं श्रीहरी । पीतवर्ण ध्यानयुक्त ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥

एक एव हि भूतात्मा हृदिस्थो जलचन्द्रवत् ।
ध्रुवं पश्यामि गूढं वै सर्वभावे व्यवस्थितम् ॥ ५४ ॥

टीका

एवं आत्मां नीर्धारीतां । तो चि यक सर्वां भुतां ।
जैसा वहुधा जळीं चंद्र भासतां । येकची आनेक रूपें दिसें ॥ १२ ॥
जैसें हृदय माजी रूप । तैसा देहीं गुढरूप ।
सर्वां ठाइ सर्वरूप । दीसतो सर्व भावीं ॥ १३ ॥
ऐसा हा यकुचि निश्चयवशें । सकळ भूतीं भुतात्मां आसे ।
गुरू भक्तां यकरूप दिसे । भ्रांता भासे बहुवीध ॥ १४ ॥
जैसें बहुता घटा भीतरि । जळ भरलें पृथुकाकारिं ।
तेथें चंद्रबींब दिसे वेगळापरी । नीर्धारें यक चि आसे ॥ १५ ॥
तैसा आत्मां नीश्चयेंसीं । यक ची आसे सर्वत्रांसी ।
तो पाहावा गुढरूप हृदयनीवासी । सर्व भाव वेवास्थित जो ॥ १६ ॥
पार्था ये चि देहीं आपुला नयनी । आत्मा देखें भर्वसेनी ।
त्यासी देवतारूपें मि मानी । दास होउनी त्याचा राहें ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥

गवामनेकवर्णानां क्षीरस्याप्येकवर्णता ।
क्षीरवत्पश्यति ज्ञानी लिङ्गं चापि गवां यथा ॥ ५५ ॥

टीका

गाई आसती आनेक वर्ण । परि दुध तें यकरुप पूर्ण ।
तैसें देहिं भीन्नभिन्न । परि येक आत्मां ॥ १८ ॥
नाना यौनीं स्थुळ शरिरें । ज्ञानियाचेनि वीचारें ।
लींगदेह नीर्धारें । दीसतें यकरूप ॥ १९ ॥
आचार लिंग गुरू लिंग । सीवलिंग जंगमलींग ।
प्रसाद लींग ज्योती लींग । माहा लींग सातवें ॥ २० ॥
ईष्ट लींग प्राण लींग । दाहावें तें नाद लींग ।
तो परमात्मां नीसंग । देखावा सर्व शरीरीं ॥ २१ ॥

॥ श्लोक ॥

कल्पकोटिसहस्रेषु कल्पकोटियुगेषु च ।
एकाङ्गुष्ठतपश्चर्या यत्फलं लभते नरः ॥ ५६ ॥

टीका

कल्पकोटी च सहस्र । आनंत युगें माहां थोर ।
येक अंगुष्ट नीरंतर । तप जें आचरावें ॥ २२ ॥
तयाचें फळ आर्जुना । तेंचि मीं तुज लभ्य जाणा ।
जरी या प्रणवाचें ज्ञान । सहजें जाणसी तुं ॥ २३ ॥

॥ श्लोक ॥

वाजपेयसहस्राणि राजसूयशतानि च ।
एकस्य ज्ञानयोगस्य कलां नार्हन्ति षोडशीं ॥ ५७ ॥

टीका

राजसू यज्ञ सहस्राविध । साधीतां थोर कष्टें साध्य ।
शत यक आश्वमेध । तुळा पूरूषीं प्रसिद्ध ॥ २४ ॥
तरि उद्देशें नीर्मळें । यक ज्ञानयोग मेळें ।
सतराविये्चेनि मूळें । पावले मातें ॥ २५
आस्वमेधाचे सहस्र । वाजपेय आपार ।
राजशु यज्ञाचे संभार । शतानुशतें ॥ २६ ॥
ऐसें ते केलें होतीं । तऱ्ही ते ज्ञानकळे न तुकती[1] ।
सोळावे कळे हि न पावती । योग्य नव्ह ती ज्ञानमार्गिं ॥ २७ ॥
यके ज्ञानयोगें करुन । तात्काळ मातें पाविजे जाण ।
मनामाजी सांपडे मन । क्षण यक न लगतां ॥ २८ ॥

॥ श्लोक ॥

ब्रह्महत्यासहस्राणि अगम्यगमनानि च ।
एक प्रणवध्यानेन सर्वस्य तु लयः क्षणात् ॥ ५८ ॥

टीका

सहस्र विकल्पी मन । तें ब्राह्मण ऐसें जाण ।
तरि तयाचें हनन । करावें गा ॥ २९ ॥
ईद्रियें मात्रागमनी । तयें प्रणवाचा ध्यानी ।
लीन होतीं ततक्षणी । पातकासहित ॥ २३० ॥

---

1 सम होत नाहींत.

ब्रंह्महत्या असंख्यात । अगम्य गमनें आगणित ।
घडलीं तें होती भस्मभूत । ऐक प्रणवध्यानें करुनी ॥ ३१ ॥
देहादि इंद्रियें सर्व ही । तल्लक्षणोक्त होति पाहीं ।
पार्था यथें संदेह नाहीं । यथार्थ वचन हें माझें ॥ ३२ ॥

॥ श्लोक ॥

प्रणवोच्चारणेनापि शूद्रः स्याद्द्विजसत्तमः ।
एवं भवेद्धि सज्जिव्ह दहत्यंहः कृतान्तवत् ॥ ५९ ॥

टीका

प्रणवाचया उच्चारणा । नीर्धारीतां अर्जुना ।
चहुं वर्णाश्रमिं स्मरणा । सहज होतसे ॥ ३३ ॥
परि ते नेणती ज्ञान पांडवा । शुद्ध होय जयाची जीव्हा ।
तो पातका लावि वोणवा । जैसा तृण काष्टीं ॥ ३४ ॥
प्रणवाचे उचारें करून । शुद्र आथवा द्विजोत्तम जाण ।
नीश्चयें होती पावन । जाणीजे गा ॥ ३५ ॥
हा प्रणव आति समर्थ । शुद्राचा हि द्विज करूं शकत ।
गुरुमुखें होतां प्राप्त । शुद्र तोची ब्राम्हण होय ॥ ३६ ॥
यवं भव अस जीव्हा । कृतांतवत्त पातकें दहती पांडवा ।
हा प्रणवौचार जाणावा । निरुता करुनी ॥ ३७ ॥

॥ श्लोक ॥

प्रणवोधनुः शरोह्यात्मा ब्रह्म तल्लक्ष्यमुच्यते ।
अप्रमत्तेन बोद्धव्यं सर्वतस्तन्मयो भवेत् ॥ ६० ॥

टीका

प्रणवाचा ठाई आनें । अतिसुक्ष्म तया होउन ।
तो परमात्मा अवर्धन । वीकार दाहावां जो ॥ ३८ ॥
तया सर्वशुन्याचें ध्यान । जया आत्मयाचा ठाईं जाण ।
तेंचि ब्रह्मलक्षण । बोलिजेतें ॥ ३९ ॥
अप्रमित अबाधित । अनुपम्य सुखभरित ।
सर्व ही दृष्टीसहित । आसे सदा रत ॥ ३४० ॥

---

1 अन्य.

ऐसें ज्ञान धेडफुडे । जो शरिरीं देखों पवाडें ।
गुरुकृपेचेनी सुरवाडे । तो ब्रंह्म चि होय ॥ ४१ ॥
प्रणव करावा धनु । शरु आत्मां ह्मणीजे मन ।
ब्रंह्म तें लक्ष धरून । वींधावें गा ॥ ४२ ॥
ब्रंह्म तल्लक्ष बोलिजे । भेदावया मनें जाइजे ।
तव तेथें चि राहिजे । नीमग्नपणें ॥ ४३ ॥
अप्रमत्तें करुनि बोधव्य पाहे । सर्वत्र तन्मय होय ।
पार्था हे जाणावि सोय । सद्गुरुमुखें ॥ ४४ ॥
ऐसें अंतःकर्ण वस्तुसी मिळालें । तन्मय होउनि बोधलें ।
अप्रमीत होउनि ठेले । वस्तुरूपची ॥ ४५ ॥

॥ श्लोक ॥

गीतासारमिदं शास्त्रं गीतासारसमुच्चयम् ।
तत्र स्थितं ब्रह्मज्ञानं वेदशास्त्रसुनिश्चितम् ॥ ६१ ॥

टीका

ऐसा शास्त्रिं निश्चयो । जो सर्व शास्त्रिं समुच्चयो ।
तया ज्ञानाचा उदया । दाविला गीतासारीं ॥ ४६ ॥
ह्मणोनि हे गीतासार । पार्था जाण सर्व शास्त्र ।
जेथें आसे शुन्याकार । सद्दश ब्रंह्मज्ञान ॥ ४७ ॥
हें गीतासार शास्त्र । गीतासार बोलिजे पवित्र ।
तत्र स्थित ब्रंह्मज्ञान सर्वत्र । वेदशास्त्र सुनिश्चित ॥ ४८ ॥

॥ श्लोक ॥

इदं शास्त्रं मया ह्युक्तं गुह्यवेदानुविस्तरम् ।
यः पठेत्परया भक्त्या स गच्छेद्विष्णुसाम्यताम् ॥ ६२ ॥

टीका

मां हें बोलिलों शास्त्र । जें वेदगुह्य अगोचर ।
तें विस्तारें परिकर । प्रणवज्ञान सांगीतलें ॥ ४९ ॥
हें गीतासार संपूर्ण । जो पुजीक × ।
तो होय वीष्णुसमान । जाउनी देवलोकीं ॥ ३५० ॥
हें शास्त्र मया युक्त । गुह्यवेदानुविस्तरे आद्भुत ।
हे मयाभक्तया जे पठण करीत । ते भाग्यवंत मद्भाग्यें ॥ ५१ ॥

---

१ प्रत्यक्ष, खरें. २ अनुग्रहानें.

स गच्छे वीष्णुसाम्यता । त्यासी वीष्णुसायुज्य प्राप्त तत्वता ।
वीष्णुसाम्यतेसी मिळतां । स्वये विष्णु ते चि होती ॥ ५२ ॥

॥ श्लोक ॥

**एवमित्येव पापौघः याति शीघ्रं प्रणाशनम् ।**
**पठतां शृण्वतां चैव विष्णुमाहात्म्यमुत्तमम् ॥ ६३ ॥**

टीका

ह्मणोनि हे सद्यरुप । सर्वदृष्ट हरे पाप ।
जन्म मरण तीन्ही ताप । नाशती जयाचेनी ॥ ५३ ॥
तें हें वीष्णुमाहात्म्य । सकळवेदशास्त्रोत्तम ।
जेथें माया परब्रह्म । दाविलें सामरस्यें ॥ ५४ ॥
ह्मणोनि हें वाचात्रें पढावें । श्रवणीं अैकावें ।
तवं तेथें चि पांडवें । देवातें देखीलें ॥ ३५५ ॥
एवं हें शास्त्र अैसें । अध्यात्मदीप स्वप्रकाशें ।
जेणे पापौघ सकळ नाशे । ते हें गीतासार ॥ ५६ ॥
पठतां ऐकतां परम । हें विष्णुमहात्म्य उत्तम ।
सकळ पापरासी भस्म । होती क्षणमात्रें ॥ ५७ ॥

॥ श्लोक ॥

**अष्टादशपुराणानि नवव्याकरणानि च ।**
**निर्मथ्य चतुरो वेदान् मुनिना भारतं कृतम् ॥ ६४ ॥**

टीका

अष्टादश पुराणें । आणी नव हि व्याकरणें ।
च्यान्ही वेद मथन । श्रीव्यासदेवें ॥ ५८ ॥
आगम निगम संपूर्ण । च्यारि वेद मथन ।
मुनींनें भारथ करून । चराचर उद्धरिलें ॥ ५९ ॥

॥ श्लोक ॥

**भारतोदधिपकस्य गीतानिर्मथनस्य च ।**
**सारमुद्धृत्य कृष्णेन अर्जुनस्य मुखे हुतम् ॥ ६५ ॥**

टीका

तें चि हें माहाभारत । पक्क दधी सुनीत ।
तयातें हीं गुसळित । मथीत काढावया ॥ ३६० ॥

भारत सकळाचें मथित । तयाचें वचन नीभ्रांत ।
करुनी गीतेचे आर्थ । पूर्वी नीवडिलें ॥ ६१ ॥
तया गीतेचें मथन केलें । सारांत हि सार नीवडिलें ।
जें गीतासार काढिलें । ज्ञान प्रणवाचें ॥ ६२ ॥
तया लोणियांचे कवळ । शृष्टी सहीत नीर्मळ ।
कृष्णें होमिले सकळ । मुखीं आर्जुनाचे ॥ ६३ ॥

॥ श्लोक ॥

**मलनिर्मोचनं पुंसां जलस्नाने दिने दिने ।**
**सकृद्गीताम्भसि स्नानं संसारमलनाशनम् ॥ ६६ ॥**

## टीका

जय प्रत्यहीं पुरुषीं । जळस्नानें सरसीं ।
मृतिकेचा त्याग परियसीं । दीवसें दिवस होय बाहिजें करी ॥ ६४ ॥
परि तयाचें अंतर । ध्यानेविण नव्हे पवित्र ।
ह्मणोनि हें गीतासार । प्रत्यही अभ्यासावें ॥ ६५ ॥
पार्था जळस्नानेंसीं । देहमळनिर्मोचन पुरुषासी ।
होतसे दिवस दीवसीं । परि तेणें स्नानें अभ्यांतरासी ।
चोखाळता नव्हें ॥ ६६ ॥
यालागी गीत स्नानें परियसीं । जोडती पुण्याचिया रासी ।
मळ न लगे तयासी । सौंसाराचा ॥ ६७ ॥
सकृद्गीतांभसि स्नान । तेणें मळाचें नाशन ।
होतसे तत्काळ जाण । अंतःकरण शुद्ध होय ॥ ६८ ॥

॥ श्लोक ॥

**अभ्यंतरस्य शुद्धयर्थं गीता नाम हरीतकी ।**
**भो जनाः किं न सेवध्वं कलिकल्मशरेचनी ॥ ६७ ॥**

## टीका

आभ्यंतर करावया शुध्यर्थ । गीता नांम हरित्तकी वीख्यात ।
आगा जन हो सुनिश्चित्त । कां हें सेवाना तुह्मीं ॥ ६९ ॥
जेविं हरीत्तकी दुर्मळनाशिनीं । तेवि हे गीता कळिकल्मशरेचनीं ।
शुद्ध करीं अंतःकर्णि । खुंटवी येणें जाणें ॥ १७० ॥
लिंगदेह येतें जातें । मागुतें तें ची ऊगवतें ।
हें धरुनि राहिलें ते । गुंतले सौंसारीं ॥ ७१ ॥

नीघतें देहाबाहेरी । रीघते आणिका शरीरीं ।
हें काय पुसतां परी । शुद्धि नाहीं ॥ ७२ ॥
आपणातें वाढवणें । अन्यत्राचि निंदा करणें ।
हे उपाय पोटाकारणें । करीता हाती गा ॥ ७३ ॥
संसार होतो कोणासी । जेणें भ्रांती फेडिली ऐसी ।
तयाचिया उपकारासी । उत्तिर्ण कैसेनि व्हावें ॥ ७४ ॥
आसो हे जन्मलेनि मुहूर्तें । जरि तुं पावलासी मातें ।
तरि भावें यका चित्तें । भक्ति माझी करी ॥ ७५ ॥
ऐसें बोलिले श्रीकृष्णनाथ । तेथें सुखीया जाला पार्थ ।
ते गीतासार निजमतितार्थ । बोलिला व्यासमुनी ॥ ७६ ॥
ते प्रसादें गुरुचेनि । मी बोलिलों मर्‍हाष्ट्र वाणी ।
प्रीती पावो चक्रपाणि । यका जनार्दनीं नीजबोध ॥ ७७ ॥
ऐसा गीतासार संपूर्ण । यका जनार्दनी नीजध्यान ।
वाणी मर्‍हाष्ट्र केलें कथन । परब्रंह्म ब्रंह्मज्ञान पैं ॥ ७८ ॥
लींगदेहाची ग्रंथी भेदुनी । जनार्दनु चि प्रगटला जनीं वनीं ।
यका शरण जनार्दनीं । अनुसंधानि लागुनियां ॥ ७९ ॥
ईती श्रीगीतासारे । श्रीकृष्णार्जुनसंवादे ।
प्रणवज्ञानसिद्धांतकथनं । समाप्तीमीती ॥
संपुर्णमस्तु । श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ छ ॥ ॥ ॥

श्लोक ॥ ६८ ॥ छ ॥ वोवी ॥ ३८२ ॥ ऐवं संख्याप्रमाण ॥ ४५०

श्री

## प्रकरण तिसरें

# श्रीपूर्णानंदकृत गीतासार

श्रीमद्भगवद्गीतेचा एकोणीसावा ह्मणून निराळा अध्याय मानून त्यांत श्रीकृष्णांनीं अर्जुनास सर्वगीतेचें सार सांगितलें असा समज आहे; व त्या अध्यायाचें कांहीं श्लोक हि आहेत. त्याच श्लोकांवर श्रीपूर्णानंद यांनीं ही टीका केलेली आहे. ही पोथी मुल्हेरीस मिळाली. हिचीं पृष्ठें १५ आहेत. नक्कल केलेली आहे; अस्सल नाहीं. नकलकाराचें नांव नरहरी अग्निहोत्री असून नकलकाल " शालिवाहन शके १६९९ हेमलंबनाम संवश्चरे दक्षिणायणे वर्षारुतौ भाद्रपदमासे शुद्ध पक्षे तीथौ ८ भोमवासरे ज्येष्टा नक्षत्रे " असा दिला आहे. असो.

पूर्णानंद हे शिवरामस्वामींचे गुरु व रंगनाथस्वामींचे परमगुरु होत. अवधूतगीतेवर हि पूर्णानंदांनीं टीका केली आहे. तिच्यामध्यें त्यांनीं आपली गुरुपरंपरा दिली आहे; ती अशी:—" श्री आदिनाथ—दत्त ( अवधूत )—सदानंद—रामानंद—गंभीरानंद—ब्रह्मानंद—सहजानंद—पूर्णानंद. " यावरून त्यांचे गुरु सहजानंद होत हें दिसतें. या गीतासार टीकेंत त्यांनीं गुरुपरंपरा दिलेली नाहीं. गुरूला नमन करतांना हि त्याचें नांव घेतलें नाहीं; फक्त ग्रंथाच्या शेवटीं—" श्रीगुरुस्वरूपानंद : शीष्य बोल ( ला ) पूर्णानंद : श्रीगुरूचा प्रसाद : ग्रंथ पूर्ण जाला ॥"—इतका च नामनिर्देश केला आहे. तेवढ्यानें कां होईना पण त्यांच्या गुरूचें नांव श्रीस्वरूपानंद होय असें ठरतें. तेव्हां सहजानंदाचे पूर्णानंद व हे स्वरूपानंदाचे पूर्णानंद येक च कां निराळे ?

अवधूतगीताटीकेंत बहुतेक मनासच त्यांनीं बोध केला आहे. त्याप्रमाणे येथें नाहीं ह्मटलें तरी चालेल. एके ठिकाणीं मात्र " मनची सर्वांगत ॥ मनची देहातीत : मनची व्यवस्छित मन सर्वस्व जीव ॥

मनेंची समाधान : मनें मन अवलोकन : मन जाणे योगीजन : गुरुकृपे करुणी ॥" असा ओघानेंच उल्लेख आलेला आहे. अवधूतगीता-टीकेप्रमाणेंच मूळ श्लोक व त्यावर टीका असा क्रम या गीतासारटीकेंत हि आहे. यामध्यें दरएक श्लोकास एक ओंवी असा साधारण क्रम आहे. कांहीं ठिकाणीं मात्र ( जेथें एका ओंवींत विवरण होणें शक्य नसेल तेथें ) एका श्लोकावर २।२ अथवा ४।४ हि-क्वचित् पांच हि-ओंव्या दिल्या आहेत. मात्र त्या देतांना ज्या श्लोकावर त्या दिल्या आहेत, त्याचाच अनुक्रमांक त्यांना दिला आहे. उदाहरणार्थ ७१ वा श्लोक पहा; त्याच्यावर पांच ओंव्या आहेत व त्या सगळ्यांना अनुक्रमांक हि ७१ च दिला आहे. यामुळें अर्थात च ओंव्यांच्या अनुक्रमांकांत फेर पडला आहे. पोथींत ९९ श्लोक लिहिले आहेत. ६१ व्या श्लोकानंतर व ६२ व्या पूर्वीं एका श्लोकाचा फक्त अर्धाच चरण आहे; तसें च ८७ श्लोकानंतर व ८८ च्या पूर्वीं हि असाच अर्धा चरण आहे. हे दोन चरण मिळून एक श्लोक धरल्यास एकूण १०० श्लोक आहेत. आतां या १०० श्लोकांवर १०० च ओंव्या असतील असें विधान—एका श्लोकास एक ओंवी या प्रमाणावरून—केल्यास तें अर्थात च चुकणार, हें वरील विवेचनावरून लक्षांत येईल. असो. एकंदर ओंव्या १५२ आहेत. कांहीं ठिकाणीं ओंवीचा एकाद दुसरा चरण लिहून खोडला आहे. एके ठिकाणीं–९० व्या श्लोकावर–तर एक सबंध ओंवी लिहून खोडली आहे. अवधूतगीताटीकेप्रमाणें इच्या ओंव्या लहान आहेत–साडेतीन चरणी–खऱ्या; पण कांहीं ठिकाणीं त्या फार मोठ्या—साडेचार चरणी—आहेत; ( उदाहरणार्थ १६, ९७ पहा ) व कांहीं तर पांच चरणी आहेत; ( उ० ३५ वी ओंवी पहा ). अवधूतगीताटीका सोपी–अद्वैतपर असून हि—सुबोध व आनंददायक आहे; तसें इचें नाहीं; ही हि अद्वैतपर असून सोपी आहे खरी, पण इचा प्रवाह एकसारखा नसून तुटक तुटक असल्यामुळें सुबोध नाहीं.

अवधूतगीता सह्याद्रीच्या पाठारांत असलेल्या नाटले ग्रामीं शके १५३२ साधारण संवत्सर माघ शुद्ध पंचमी सोमवारीं लिहली असा तिच्यांत च उल्लेख केलेला आहे. या टीकेचा प्रारंभ अगर समाप्त कालापैकीं कोणताच काल दिलेला नाहीं. गांव हि दिलेलें नाहीं. अवधूतगीताटीका आपला शिष्य चिदानंद यासाठीं केली असें स्वामी तिच्यांत च ह्मणतात; ही– "गीतासाराची टीका: अन्वयसंस्कृतश्लोका : प्राकृत कळाव्या लोका :" केली आहे. असो. या दोन्ही टीकांची तुलना करण्याचें येथें च संपवून प्रस्तुतच्या टीकेकडे आपण वळूं. श्रीमद्भगवद्गीता सांगितल्यावर सारगीता सांगण्याचें कारण स्वामी ह्मणतात :–" गीतेस सांगीतलें : अर्जुनास मानलें : गीतासारीं अति उर्लें : विचार श्रीकृष्ण सांगे ॥ " हा उरलेला विचार ह्मणजे ॐकारमहात्म्य होय, व तें अर्जुनानें—" अर्जुन ह्मणे कृष्णासी : ॐकाराची च्छिति कैंसी : स्वरूपस्थान आह्मासी : कृपा करुणि सांगा—विचारल्यावरून भगवंतांनीं—श्रीकृष्ण ह्मणे अर्जुना : ॐकार पुरुषासी जाणा : आइकाव्रा सावधाना : मनें स्वच्छ करोणी–जें सांगितलें तेंच या टीकेचें सार होय. याप्रमाणें ग्रंथास आरंभ करून स्वामींनीं त्यांत खालील विषय गोंवले आहेत.

ॐकार अथवा प्रणव तीन आहेत. हीं सर्व भूतें–सृष्टी–प्रणवापासून—त्यांत हि त्याच्या ३॥ मात्रांपैकीं प्रत्येकीपासून भिन्न भिन्न कशी निर्माण जालीं तें प्रथमत: सांगितलें आहे. त्याचा थोडक्यांत सारांश असा:-

**अकारापासून**—ब्रह्मदेव, पृथ्वी, अग्नि, ऋग्वेद निर्माण जाला; अकार हें अग्नीचें रूप होय; त्याचा वर्ण पीत असून, गुण रजोगुण होय व त्यास " स्वरु बोलिजे ".

**उकारापासून**—अंतरीक्ष, वायू, यजुर्वेद, विष्णु निर्माण झाले; उकार हें वायूचें रूप होय; त्याचा वर्ण शुभ्र असून, गुण सत्वगुण होय व त्याच्या पासून 'देवप्रकार जाला'.

---

१ नातेंपुतें ?

[stamp]

**मकारापासून**—सूर्य, सामवेद, स्वर्ग, महेश्वर निर्माण जाले; मकार हें आकाशरूप होय व "त्यासीच स्वरूप बोलिजें" त्याचा वर्ण कृष्ण असून, गुण तमोगुण होय व त्याच्यापासून 'विस्तारु उद्भव जाला.'

**तुरीया**—ही अर्धमात्रा होय.

ह्मणजे ही एकंदर सर्व सृष्टी 'ॐकारी देव वेद जाले : गण-गंधर्व निपजले : दैत्यराक्षस अवतरले : तयापासुनि' ची होय. ॐका-रांत नादलय होतो, ध्वनि होतात, तेलाची धार जशी अखंड असते, अगर घंटेचा स्वर जसा अखंड असतो तसा तो नाद असतो. तसा सतत आपल्या हृदयांत होत[1] आहे. असा ॐकार 'हें परमरूपः हृदईं ध्यावें स्वरूप : याचा करी साक्षेप : अनुभवविचार गुरुखुने ॥' श्रीसद्गुरूंच्याकडून समजून घ्यावा. आत्मानुभव आला ह्मणजे—निरालं-बाची प्राप्ति जाली : क्रियाकर्म तेव्हां औघी हारपलि : योगिया योग-दशा साधली : तोचि महाराज परमयोगी जान ॥ याप्रमाणें जें साधा-वयाचें तें साधलें.

यापुढें प्रत्येकाच्या शरीरांत चतुर्दशभुवनें कशीं आहेत तें सांगितलें आहे. (१)[2] वितल-पाउलें (२) सुतल-जानू (३) तलातल-मांड्या (४) रसातल गुददेश (५) पाताल-कटि (६) भूलोक-नाभी (७) भुवर्लोक—कुक्षी (८) स्वर्गलोक—हृदय (९) महर्लोक-वक्षस्थल (१०) जनलोक—कंठदेश (११) तपलोक—ललाट (१२) सत्यलोक-मूर्ध्नीं.

नंतर आत्म्याचें स्थान व परिमाण सांगितलें आहे तें:—'अगा हृदयाकाशींचि कर्णिकां : तेथें आत्मा पहावा दीपासारिकां : अंगुष्ठमात्र प्रमान वोळखां :' असून त्याचा प्रकाश सर्व ब्रह्मांडभर आहे व तोहि

---

१ या नादबिंदूलयाबद्दल जास्त स्पष्टीकरण पाहिजे असल्यास सत्कार्योत्ते-जक सभेनें छापलेल्या 'बालबोधा' च्या प्रस्तावनेंत पहावें. २ पोथींत 'अतल' व 'महातल' हीं नाहींत, तसें च श्लोकांत हि नाहींत. त्यामुळें १२ च संख्येंत भरलीं.

अचल आहे. येथून पुढें प्राणायामाचें महत्व वर्णिलें आहे. ब्रह्माविष्णु महेश्वर हे प्रणवाचे उद्गार असून ब्रह्मा हाच १२ ॐकारा ( मात्रां ) चा पूरक, विष्णू हाच षोडश (१६) स्वरांचा कुंभक आणि शंकर हा च १२ ॐकारांचा रेचक होय. अशा त्या प्रणवाचें स्थान मुख व नासिक यांच्या मधील भागांत आहे. जेथें अनुहत स्थान आहे तेथें ' अहमास्मि ' असा ध्वनि सतत होतो, त्या ध्वनीच्या अंतर्गत ज्योती असून तिच्या अंतर्गत मन आहे; त्या मनामध्यें भाव, ' भावामध्यें तोचि देव ' असा देवाच्या ठिकाणाचा शोध सांगितला आहे. नाभीस्थानीं " दशांगुळ, कोमल, अधोमुख, कर्दळीच्या पुष्पाऐसें, चंद्री प्रभा आहे तैसें, उदकांत कमळ जैसें, कां तापलें सुवर्ण " असें पद्मनाळ आहे. हृदयांत हि अष्टपत्री, विकसल्यावर व्याधी हरण करणारें, सुख उपजविणारें, अंगुष्टमात्र असें कमल आहे. तेंच ब्रह्मांड असून त्यांत असंख्य रत्नांपेक्षां व कोटि सूर्यांपेक्षां तेजस्वी महाविष्णु हंस देव नारायण आहेत. त्यांच्या हातांत शंखचक्रगदापद्मधनुष्यबाण वगैरे आयुधें आहेत. भगवंतांच्या कानीं 'कुंडलें झळकती' पिंवळा पीतांबर परिधान केला असून हृदयास श्रीवत्सलांछन शोभा देत आहे. स्वामी ह्मणतात, असलें भगवंतांचें ' तें स्वरूप निहाळी आतां, तेची लागे अखंडता, ' त्याला कधीं हि खंड पडूं देऊं नको. भगवंतांच्या ध्यानमूर्तीचा रंग प्रत्येक युगांत कोणकोणता होता तो यापुढें दिला आहे.

यात्रमाणें योगशास्त्रावर जरी स्वामींचा बरा च भर आहे तरी योग, तीर्थ, व्रतें, मूर्तिपूजा वगैरेपेक्षां आत्मज्ञान अधिक श्रेष्ठ आहे व तें साधुसमागमानें प्राप्त होतें असें च त्यांनीं शेवटीं सांगितलें आहे.

याप्रमाणें ' कृष्ण म्हणे पार्थासी, त्वा पुशिलें होतें ॐकारासी, तो ॐकार समुळासी, निरोपिला तुज ' शेवट केला आहे; म्हणजे सारगीता हें फक्त ॐकारमहात्म्य च होय.

---

१ बालबोधाच्या प्रस्तावनेंत ' पूर्वकालीन संतांचे दोन भिन्न भिन्न ( सगुणोपासक व निर्गुणोपासक ) प्रवाह होते ' असें मत आहे, त्यास यावरून पुष्टी येते.

पूर्णानंदांचा काल स्थूलमानानें १५००–१५४० धरण्यास हरकत नाहीं. यांचें पूर्वाश्रमींचें नांव नारायण होतें. त्याचें प्रपंचपरमार्थेंकरून पुत्र जे शिवरामस्वामी त्यांनीं व पूर्णानंदांनीं तसेंच पूर्णानंदांचे गुरु सहजानंद या तिन्ही आनंदसांप्रदायिकांनीं बहुतेक गीतांवर टीका केलेल्या आहेत. सासवडमठांत सहजानंदांचा एक ग्रंथ आहे, त्यावर ' सिद्ध कपिल ऋषीसंवाद ' असें लिहिलेलें आहे. वेळ नसल्यामुळें सबंध पहाण्यास सवड नव्हती; पण वाटतें कीं, ती कपिलगीतेवर टीका असावी, यांची ही एक सोडून दिल्यास, पूर्णानंदांच्या (१) अवधूतगीताटीका ( २ ) सारगीताटीका व शिवरामस्वामींच्या ( कल्याणीच्या मठांत असलेल्या ) ( १ ) गीताचंद्रिकाटीका ( २ ) कपिलगीतेवरची श्लोकबद्ध टीका ( ३ ) गर्भगीताटीका ( ४ ) उत्तरगीताटीका ( ५ ) अष्टावक्रगीताटीका ( ६ ) गुरुगीताटीका ( ७ ) लघुगीताटीका ( ८ ) विरहगुरुगीताटीका; अशा एकंदर दोघांच्या १० गीताटीका सध्यां तरी उपलब्ध आहेत. या छापण्याचा केव्हां सुयोग येईल तो येवो, सध्यां श्रीपूर्णानंदांची ही श्रीगीतासारटीका लोकांपुढें येत आहे खरी !!

श्रीज्ञानेश्वरार्पणमस्तु.

माघ वद्य ८<br>१८३५

गोविंद का. चांदोरकर.

॥ श्रीगणेशायनमः ॥ श्रीगुरुपरब्रह्मणेनमः ॥

ॐ नमो परमपुरुषा । परात्पर निवासा ।<br>
परब्रह्म सकळ भाषा । आदिरूपा तु ॥ १ ॥<br>
मग नमिले गणेश । सकळ विद्यासौरस ।<br>
जो कविमतिप्रकाश । कृपाजीवनदानीं ॥ २ ॥<br>
मग नमिली सारजा । तनया ब्रह्मआत्मजा ।<br>
पदलालित्य सहजा । आदिशक्ति तुं ॥ ३ ॥<br>
आता नमुं गुरुरावो । मतिप्रकाशउद्भवो ।<br>
अर्थ करीत प्रवाहो । जैसा गंगेचा चाले ॥ ४ ॥

गीतेस सांगीतलें । अर्जुनास मानलें ।
गीतासारीं अति उलें । विचार श्रीकृष्ण सांगे ॥ ६ ॥
गीतासाराची टीका । प्राकृतवचनीं आइका ।
अन्वय लाउं श्लोका । अर्थ नेटका बोलिजे ॥ ७ ॥

॥ श्लोक ॥

अर्जुन उवाच ॥ ॐकारस्य च माहात्म्यं रूपं स्थानं परं तथा ।
तत्सर्वं श्रोतुमिच्छामि ब्रूहि मे पुरुषोत्तम ॥ १ ॥

टीका

अर्जुन ह्मणे कृष्णासी । ॐकाराची स्थिति कैसी ।
स्वरूपस्थान आह्मांसि । कृपा करुनि सांगा ॥ १ ॥

॥ श्लोक ॥

श्रीकृष्ण उवाच ॥ साधु पार्थ महाबाहो यन्मां त्वं परिपृच्छसि ।
विस्तरेण प्रवक्ष्यामि तन्मे निगदितः श्रुणु ॥ २ ॥

टीका

श्रीकृष्ण ह्मणे अर्जुना । ॐकार पुरुषासी जाणा ।
आइकावा सावधाना । मने स्वस्छ करोनी ॥ २ ॥

॥ श्लोक ॥

पृथिव्याग्निश्च ऋग्वेदो भूरित्येव पितामहः ।
अकारेतु लयं प्राप्ते प्रथमे प्रणवांशके ॥३॥

टीका

ब्रह्मा ऐसे बोलिला । पृथ्वीअग्नीऋग्वेद जाला ।
अकार लयो पावला । पहिला प्रणव हा ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥

अंतरिक्षं यजुर्वेदो भूवो विष्णुः सनातनः ।
उकारे तु लयं प्राप्ते द्वितीये प्रणवांशके ॥ ४ ॥

टीका

अंतरिक्ष आणि वायो । यजुर्वेद विष्णु उद्भवो[1] ।
उकार पावला लयो । हा प्रणव दुसरा ॥ ४ ॥

---

१ ‘ उद्भला विष्णु ’ असा पाठ होता. त्यांत ‘ ला विष्णु ’ खोडून वरील पाठ केला आहे.

॥ श्लोक ॥

दिविसूर्यः सामवेदः स्वरित्येवं महेश्वरः ।
मकारेतु लयं प्राप्ते तृतीये प्रणवांतके ॥ ५ ॥

टीका

सूर्य सामवेद जाण । स्वर्गी महेश्वर नेमुन ।
मकारलयो संपूर्ण । हा प्रणव तिसरा ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥

अकारे च उकारे च मकारे च धनंजय ।
इदमेकं सुनिष्पन्नं ॐमिति ज्योतिरूपकम् ॥ ६ ॥

टीका

कृष्ण म्हणे धनंजया । तुजप्रति सांगितलें म्यां निश्चयीं ।
आईक पांडवराया । सावधानचित्तें ॥ ६ ॥

॥ श्लोक ॥

अकारे तु भवेद् ब्रह्मा उकारे विष्णुरुच्यते ।
मकारेतु भवेद्रुद्र अर्द्धमात्रा तुरीयकम् ॥ ७ ॥

टीका

अकारीं ब्रम्हा जाला । उकारीं विष्णु उद्भवला ।
मकारीं रुद्र संचला । अर्धमात्रा ते तुरीया ॥ ७ ॥

॥ श्लोक ॥

अकारो वन्हिसंयुक्त उकारो वायुगोचरः ।
मकारो युक्तमाकाशं ॐकारः परमं पदम् ॥ ८ ॥

॥ टीका ॥

अकार वन्हीचें रूप । उकार वायुस्वरुप ।
आकाश मकाराचें रूप । त्यासी स्वरूप बोलिजे ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥

अकारः पीतवर्णश्च रजोगुणसमुद्भवः ।
उकारः सात्विकः शुक्लो मकारः कृष्णतामसः ॥ ९ ॥

॥ टीका ॥

अकाराचा पीतवर्ण । त्यासी ह्मणावें रजोगुण ।
उकार शुभ्र सत्व जाण । मकार कृष्ण तामस ॥ ९ ॥

---

१ यापुढें ' पिता ' शब्द लिहून खोडला आहे, २ ' छ ' अथवा ' श्च ' ?

॥ श्लोक ॥

अष्टांगं तु चतुष्पादं त्रिस्थानं पंचदेवतम् ।
ॐकारं नैव जानाति ब्राह्मणो न भविष्यति ॥ १० ॥

टीका

देह अष्टांग तत्वता । च्यान्ही चरण पां ह्मणता ।
त्रिस्छान पंचदेवता । स्छापितातीं ॥ १० ॥

॥ श्लोक ॥

ॐकारप्रभवा वेदा ॐकारप्रभवाः स्वराः ।
ॐकारप्रभवं सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ॥ ११ ॥

टीका

उकारापासुनि देवप्रकारु । अकारापासुनि बोलिजे स्वरु ।
मकारापासुनि विस्तारु । उद्भव जाला ॥ ११ ॥

॥ श्लोक ॥

ॐमित्येकाक्षरं ब्रह्म परब्रह्म विचिंतयेत् ।
परब्रह्म प्रतिष्ठाहं प्रभावं प्रणवं तथा ॥ १२ ॥

टीका

ॐकारी देव वेद जाले । गणगंधर्व निपजले ।
दैत्यराक्षस अवतरले । तयापासुनि ॥ १२ ॥

॥ श्लोक ॥

ॐकारप्रभवो विष्णुस्त्रिधामा वचसांपतिः ।
तस्योच्चारणमात्रेण परब्रह्माधिगच्छति ॥ १३ ॥

टीका

श्रीकृष्ण ह्मणे गा अर्जुना । मूळमात्रा अजपा जाणा ।
तुटे संसारबंधना । परब्रह्मातें पावे ॥ १३ ॥

॥ श्लोक ॥

ॐमित्येव परं रूपं हृत्पद्मे चैव संस्थितम् ।
तस्मात्तदभ्यसेदेवं सर्वज्ञं परमेश्वरम् ॥ १४ ॥

टीका

पार्था हें परमरूप । हृदईं ध्यावें स्वरूप ।
याचा करी साक्षेप । अनुभवविचार गुरुखुणें ॥ १४ ॥

॥ श्लोक ॥

ॐकारध्वनिनादेन वायुः संहरणादिकः ।
निरालंबं समुद्दिश्य तत्र नादोलयं गतः ॥ १५ ॥

टीका

ॐकारीं ध्वनीचे नाद । वायुस्वरूप प्रसिद्ध ।
निरालंब अभेद । तेथें नादलयो जाणा ॥ १५ ॥

॥ श्लोक ॥

निरालंबगतिप्राप्तश्चिंतितं याति तां गतिम् ।
निवर्त्तते क्रियाः सर्वाः यस्मिन्दृष्टे परावरे ॥ १६ ॥

टीका

निरालंबाची प्राप्ति जाली । क्रियाकर्मे तेव्हां औघीं हारपलीं ।
योगिया योगदशा साधली । तो चि महाराज परमयोगी जाण ॥१६॥

॥ श्लोक ॥

ॐमित्येव परं रूपं परब्रह्मप्रकीर्तितम् ।
नासांतरे समुत्पन्नं मध्यसूत्रप्रवाहिनम् ॥ १७ ॥

टीका

ते नासिके उत्पवन । मध्येसूत्री लक्ष धरून ।
ते चि लक्षासी कारण । मग सहजसमाधी ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥

त्रिस्थानं च त्रिमात्रं च त्रयब्रह्म त्रिरक्षरम् ।
त्रिमात्रस्त्वर्धमात्रस्तु यस्तं वेद स वेदवित् ॥ १८ ॥

टीका

तेथें चि त्रिमात्रा अक्षर । आणि स्थान त्रिप्रकार ।
ब्रह्म चि त्रिमात्रस्त्वर्धमातर । नासिका मध्यसूत्री ॥ १८ ॥

॥ श्लोक ॥

प्रणवेन त्रयंदेवमेकीकृत्त्वा समभ्यसेत् ।
आद्यः पदतलं विंद्यात्पदोर्ध्वं त्वतलं भवेत् ॥ १९ ॥

टीका

ॐसिया लक्षीं असावें । लक्षीं ब्रह्म वोळखावें ।
ब्रह्मीं ब्रह्मरूप व्हावें । सर्व सदोदित ॥ १९ ॥

---

१ या पुढें काकपद देऊन समासांत ' परम ' हीं अक्षरें लिहलीं आहेत.

॥ श्लोक ॥

वितलं जंघदेशेतु सुतलं जानुदेशकम् ।
तलातलं तु ऊरुभ्यां गुह्यदेशे रसातलम् ॥ २० ॥

टीका

आतां सांगेन चतुर्दश भुवनें । त्यांचीं सांगेन या स्थानें ।
पिंडब्रह्मांडीं ऐक्य जाणणें । श्रीगुरुकृपेकरुनी ॥ २० ॥
पाउलें जाण ईतळें । घोटस्थान किं त्वतळें ।
पोटरियाठाईं वितळें । सुतळ जानुचा ठाईं ॥ २० ॥

॥ श्लोक ॥

पातालं कटिदेशे तु सप्तमं परिकीर्त्तितम् ।
भूर्लोकं तु नाभिस्थं स्वर्लोकं तु कुक्षिके ॥ २१ ॥

टीका

मांडियांचा ठाईं तळातळ । गुददेशीं रसातळ ।
कटिं बोलिजे पाताळ । ऐसिं हे सप्तपाताळें ॥ २१ ॥

॥ श्लोक ॥

हृदये स्वर्गलोकस्तु महर्लोकस्तु वक्षसि ।
जनलोकः कंठदेशे च तपोलोको ललाकटे ॥ २२ ॥

टीका

आतां सप्तलोकांचें स्थान । भूर्लोक नाभिस्थान जाण ।
भुवर्लोक कुक्षीं निर्माण । हृदय स्वर्गलोक असे ॥ २२ ॥

॥ श्लोक ॥

सत्यलोकस्तु मूर्द्धनिस्याद्भुवनानि चतुर्दश ।
एवं ब्रह्मांडनिलयो अस्मिन्देह प्रतिष्ठितः ॥ २३ ॥

टीका

वक्षस्थळ महर्लोक । कंठदेशीं जनलोक ।
ललाटीं तपोलोक । सत्यलोक मूर्ध्नीं ॥ २३ ॥
ऐसीं भुवनें चतुर्दशें । श्रीकृष्ण सांगे उपदेशें ।
अर्जुन आयकोन संतोषे । परमसुख मानिलें ॥ २३ ॥

---

१ 'भू' पासून 'स्थं' पर्यंतचीं अक्षरें काकपद करून समासांत लिहिलीं आहेत. २ द्+ध्+न्

॥ श्लोक ॥

ऱ्हस्वो दहति पापानि दीर्घं मोक्षप्रदायक: ।
आप्यायनं प्लुतश्चैव त्रिविधोच्चारणेन स: ॥ २४ ॥

टीका

आतां ब्रह्मांडलक्षण । तेथें अनीळ वायु जाण ।
तेणं पातकें होतीं क्षीण । दीर्घ मोक्ष पावती ॥ २४ ॥

॥ श्लोक ॥

तैलधारमविच्छिन्नं दीर्घघंटानिनादवत् ।
अवाच्यं प्रणवस्याग्रं यस्तं वेद स वेदवित् ॥ २५ ॥

टीका

जैसी तेलाची धार । सोडितां नव्हे वितळ ।
कां थोर घंटाचा स्वर । अखंड जैसा ॥ २५ ॥

॥ श्लोक ॥

आत्मानमरणिं कृत्वा प्रणवं चोत्तरारणिम् ।
ध्याननिर्मथनाभ्यासादेवं पश्येन्निगूढवत् ॥ २६ ॥

टीका

वाचेविण तो विचार । प्रणवे करुनी उद्गार ।
वेदीं बोलिला प्रकार । उपनिषद्भागीचा ॥ २६ ॥

॥ श्लोक ॥

हृत्पद्मकर्णिकामध्ये शुद्धदीपशिखाकृतिम् ।
अंगुष्ठमात्रमचलं ध्यायन्नोंकारमीश्वरम् ॥ २७ ॥

टीका

हा अलक्षलक्ष जो जाणे । मुर्ख अथवा सज्ञानें ।
ध्यानअभ्यास करणें । श्रीगुरुकृपा जालिया ॥ २७ ॥
अगा हृदयाकाशीची कर्णिका । तेथें आत्मा पहावा दीपासारिखा ।
अंगुष्टमात्र प्रमाण वोळखा । जैसें जाणावें ॥ २७ ॥
आतां ब्रह्मांडाचा ठाईं । मध्यें शुद्ध दीप पाहीं ।
प्रमाण अंगुष्ठमात्र ही । अचळ प्रकाश ॥ २७ ॥

॥ श्लोक ॥

प्राणायामपरो ब्रह्मा प्राणायामपरो हरि: ।
प्राणायामपर: शंभू परब्रह्मस्वरूपकम् ॥ २८ ॥

टीका।

ब्रह्माविष्णुमहेश्वर । हे प्रणवाचे उद्गार ।
ते चि परब्रह्म साकार । जाणावे गुरुकृपें ॥ २८ ॥

॥ श्लोक ॥

ब्रह्मा तु पूरको ज्ञेयः कुंभको विष्णुरुच्यते ।
रेचकः शंकरः प्रोक्तः क्षराक्षरपरः शिवः ॥ २९ ॥

टीका

आतां ब्रह्मा तो पूरक । आणी विष्णु तो कुंभक ।
शंकर तो रेचक । शिव तो क्षराक्षर ॥ २९ ॥

॥ श्लोक ॥

पूरको द्वादशश्चैव कुंभकः षोडशो भवेत् ।
रेचकः द्वादशोंकारः प्राणायाम स उच्चते ॥ ३० ॥

टीका

पूरकीं द्वादश ॐकार । कुंभकीं शोडश स्वर ।
रेचकीं द्वादश ॐकार । प्राणायाम मत चि ऐसें ॥ ३० ॥

॥ श्लोक ॥

मुखनासिकयोर्मध्ये प्राणसंचरगोचरात् ।
तस्मात्सर्वेषु कार्येषु ज्ञानध्यानपरो भवेत् ॥ ३१ ॥

टीका

मुख नासिका मध्य तें । प्रणवसंचार तेथें ।
ज्ञानध्यानलक्ष जेथें । हा प्रणव श्रेष्ठ पैं ॥ ३१ ॥

॥ श्लोक ॥

अक्षराणि च मात्राश्च सर्वे बिंदुस्समाश्रिताः ।
बिंदुर्भिद्यति नादेन स नादः केन भिद्यते ॥ ३२ ॥

टीका

अक्षर आणि मात्रुका । हें आघवें सर्व बिंदुसमाश्रिता ।
बिंदु नादातें भेदिता । नाद[1] ते भेदु न सके ॥ ३२ ॥

॥ श्लोक ॥

हृदयस्थो परानंदः तालुमूर्द्धनिव्यवस्थितः ।
अधऊर्ध्वनिरोधेन मध्यंदिन स मध्यमम् ॥ ३३ ॥

---

१ 'ना' वर अनुस्वार आहे.

टीका

हृदयस्थानीं परम दत्त । तालुमूर्द्धनीं व्यवस्थित ।
अधऊर्ध्वनिरोधित । तें मध्यम स्थान ॥ ३३ ॥

॥ श्लोक ॥

उच्चारयेत्परां शक्तिं ब्रह्मरंध्रनिवासिनीम् ।
यदा वा ब्रह्मसृष्टिं स्यात्संहारं भ्रमयंति या ॥ ३४ ॥

टीका

पराशक्ति उच्चारुनि । ब्रह्मरंध्रनिवासिनी ।
ब्रह्मसृष्टिसंह्रारिणी । संभ्रम जाणावा ॥ ३४ ॥

॥ श्लोक ॥

गमागमस्तं गमनादि शून्यं चिद्रूपदीपं तिमिरांधकारम् ।
पश्यामि तं सर्वजनांतरस्थं नमामि हंसं परमात्मरूपम् ॥३५॥

टीका

गमागमन अर्जुना । शून्य चिद्रूप दे जाना ।
ते श्रवणांतरे स्थाना । पावली हंसरूप ॥ ३५ ॥
[1]गमागमन मनशून्य । चिद्रूप परमदीप लावण्य ।
प्रकाशल्या तिमिरांध नाशत । अगा सर्व जनांतरि पा+[2]त । ते हंसरूप॥

॥ श्लोक ॥

अनाहतस्य शब्दस्य तस्य शब्दस्य योध्वनिः ।
ध्वनिरंतर्गतं ज्योतिर्ज्योतिरंतर्गतं मनः ॥ ३६ ॥

टीका

अनुहाताचा स्थानीं । तेथें शब्द अहमास्मि ऐसी ध्वनी ।
ध्वनिरंतर्गत ज्योती । ज्योतिचा ठाईं मन ॥ ३६ ॥

॥ श्लोक ॥

मनोमध्यगतो भावो भावमध्यगतः शिवः ।
तन्मनो विलयं याति तद्विष्णोः परमं पदम् ॥ ३७ ॥

टीका

मनामध्यें जया भाव । भावामध्यें तो चि देव ।
लयातें पावे स्वभाव । विष्णुचें परमदत्त ॥ ३७ ॥

---

१ समासांत ही ओवी लिहिली आहे; हिचे ५ चरण आहेत. २ अक्षर फाटलें आहे; बहुधा ‘ द्व ’ असावा.

॥ श्लोक ॥

नाभिमध्यस्थितं पद्मं नालं तस्य दशांगुलम् ।
कोमलं तस्य तन्नालं नीलपद्ममधोमुखम् ॥ ३८ ॥

टीका

नाभिमध्यें पद्मनाळ । तें आहे दशांगुळ ।
नाळ तें आहे कोमळ । अधोमुख पद्म तें ॥ ३८ ॥

॥ श्लोक ॥

कदलीपुष्पसंकाशं चंद्रकांतिसमप्रभम् ।
पद्मकिंजल्कसदृशं तप्तकांचनसन्निभम् ॥ ३९ ॥

टीका

कर्दळीच्या पुष्पाऐसें । चंद्रीं प्रभा आहे तैसें ।
उदकांत कमळ जैसें । कां पातलें सुवर्ण ॥ ३९ ॥

॥ श्लोक ॥

अर्जुन उवाच ॥ दुर्विज्ञेयो दुराराध्यो दुःप्रगम्यो जनार्दनः ।
अधोमुखो यथा भूत्वा हृदयं केन गच्छति ॥ ४० ॥

टीका

अर्जुन ह्मणे जनार्दना । दुरंत दूरी गमना ।
अधोमुख त्याचे स्थाना । हृदयीं कैसें आहे ॥ ४० ॥

॥ श्लोक ॥

श्रीभगवानुवाच ॥ अधोमुखं तु यत्पद्ममूर्ध्वं तत्प्रणवेन तु ।
अष्टपत्रेणसंयुक्तं द्वात्रिंशत्कुसुमं तथा ॥ ४१ ॥

टीका

कृष्ण ह्मणे धनंजया । पद्मपत्र प्रवेशे हृदया ।
कमळीं अष्टपत्रया । पंकुळिका त्याची ॥ ४१ ॥

॥ श्लोक ॥

गत्वातु पद्मकोशांतं विकासे व्याधिनाशनम् ।
हृदि पश्यं तु यत्पद्मं सर्वगात्रसुखावहम् ॥ ४२ ॥

टीका

कमळ विकासल्यावरी । व्याधी नाशती अंतरीं ।
हृदईं प्रवेश सर्वगात्रीं । सुखातें पावे ॥ ४२ ॥

॥ श्लोक ॥

हृदि स्थितं पंकजमष्टपत्रं सकर्णिकं केसरचारुनीलम् ।
अंगुष्ठमात्रं मुनयो वदंति स्थानं हि विष्णोः पुरुषः पुराणः ॥४३॥

टीका

हृदयस्थानीचें कमळ । तें चि ब्रम्हांडीं केवळ ।
मध्यस्थान अचळ । अंगुष्ठप्रमाण ॥ ४३ ॥

॥ श्लोक ॥

तस्य मध्यस्थितं ध्यात्वा इंद्राद्याः दशदेवताः ।
तस्य मध्यस्थितो भानुस्तस्य मध्यस्थितः शशी ॥ ४४ ॥

टीका

ऐसें सिद्धांती बोलती । ज्योतीप्रकाश देखती ।
विष्णूची स्वरूपस्थिती । अखंडता कां जे ॥ ४४ ॥

॥ श्लोक ॥

शशिमध्यस्थितो वन्हिर्वन्हिमध्यगता प्रभा ।
प्रभामध्यगतं पीठं नाना रत्नप्रतिष्ठितम् ॥ ४५ ॥

टीका

शशीमध्यें अग्नि देखती । अग्निमध्यें प्रभेची उत्पत्ति ।
प्रभेमध्ये रत्नाची प्राप्ति । सकळा अभ्यांतरीं दिसे ॥ ४५ ॥

॥ श्लोक ॥

अनेक रत्नसंकीर्णं ज्वलनार्कसमप्रभम् ।
तन्मध्यस्थितं देवं नारायणमनाश्रयम् ॥ ४६ ॥

टीका

अनेक रत्नप्रकाश । कोटिसूर्यांचा नाश ।
मध्यें विष्णुरूप हंस । देव नारायण ॥ ४६ ॥

॥ श्लोक ॥

श्रीवत्सभूषितोरस्कं पुंडरीकाक्षमच्युतम् ।
केयूरमुद्रिकामुंजं कटिसूत्रं सकुंडलम् ॥ ४७ ॥

टीका

स्वरूप पाहतां कैसें । शंखचक्रगदापद्म ऐसें ।
प्रसन्न भूषण असे । कुंडलें झळकती ॥ ४७ ॥

॥ श्लोक ॥

प्रसन्नवदनं ध्यानं पीतांबरधरं हरिम् ।
शंखचक्रगदापद्ममुशलं खड्गमेव च ॥ ४८ ॥

टीका

पीतांबर परिधान । हृदईं श्रीवछलांछन ।
धनुष्यबाण सुदर्शन । ऐसा अष्टबाहो ॥ ४८ ॥

॥ श्लोक ॥

धनुर्बाणधरं देवमष्टबाहुधरं हरिम् ।
शुद्धस्फटिकसंकाशं सूर्यकोटिसमप्रभम् ॥ ४९ ॥

टीका

अर्जुना शुद्ध प्रकाश । स्फटिक जैसा शुभ्रस्वरूपेश ।
तेज कोटी दिनेश । ऐसी प्रभा ज्याची ॥ ४९ ॥

॥ श्लोक ॥

विशालदलसंपूर्णं चारुहासं सुनिर्मलम् ।
शुद्धसूक्ष्मनिराकारं निर्विकारं निरंजनम् ॥ ५० ॥

टीका

तेल अग्नी आणि वाती । याच्या संयोगें होय ज्योती ।
तैसी पहावी आत्मत्वीं । स्वरूपप्रकाश ॥ ५० ॥

॥ श्लोक ॥

विधुमग्निनिभं देवमश्वादितं तु निर्मलम् ।
तैलाग्निवर्त्तिसंयोगान्मध्ये ज्योतिःस्वरूपकम् ॥ ५१ ॥

टीका

कृष्ण ह्मणे गा पार्था । तें स्वरूप निहाळीं आतां ।
तेची लागे अखंडता । ते कदा खंडेना ॥ ५१ ॥

॥ श्लोक ॥

तादृशं परमं रूपं स्मरेत्पार्थ अनन्यधी ।
तादृशं परमं पार्थ स्मरेद्रूपमनन्यभाक् ॥ ५२ ॥

टीका

प्रत्यक्ष रूप परम । दाखविलें पुरुषोत्तमें ।
स्वरूपाची महिमा सीमा । परमभाग्य पावले ॥ ५२ ॥

॥ श्लोक ॥

अप्रमेयमयं देवं तं विद्यात्पुरुषोत्तमम् ।
यत्पश्येत्खगाकारं तदाकारं विचिंतयेत् ॥ ५३ ॥

टीका

घटाकाश मठाकाश । बोलिजे महदाकाश ।
तैसा आत्मा स्वप्रकाश । आत्मा चि खगाकारी ॥ ५३ ॥

॥ श्लोक ॥

स्वमध्ये कुरुचात्मानं आत्ममध्ये खगं कुरु ।
सर्वत्र खमयं कृत्वा न किंचिदपि विद्यते ॥ ५४ ॥

टीका

सर्व आकाश बोलावें । तैसें आत्मत्वीं पहावें ।
कुंभ फुटलिया मिळावें । मठ आकाशीं मिळे ॥ ५४ ॥

॥ श्लोक ॥

भिन्ने कुंभे यथाकाशं आकाशं प्रतिपद्यते ।
विभिन्ने प्रकृतौ देहे तथात्मा परमात्मनि ॥ ५५ ॥

टीका

तैसें स्थूळ निमालें । तें सूक्ष्मीं लीन जालें ।
तें चि कारणीं प्रवेशलें । महाकारणप्राप्ति ॥ ५५ ॥

॥ श्लोक ॥

प्रणवोप्ररसोह्यात्मा ब्रह्मलक्षसमुच्यते ।
कृते श्वेतं हरिं ध्यायेत् त्रेतायां रक्तवर्णकम् ॥ ५६ ॥

टीका

या कारणें लक्ष ज्योती । योगी अखंड ध्याती ।
तें चि ते पद पावती । तेथें संशयो नाहीं ॥ ५६ ॥

॥ श्लोक ॥

द्वापारे पीतवर्णं तु नीलवर्णं कलौयुगे ।
देहं देवालयं प्रोक्तं जीवो एवं सदाशिवः ॥ ५७ ॥

टीका

कृतयुगीं वर्ण श्वेत । त्रेतायुगीं वर्ण आरक्त ।
द्वापारीं वर्ण असे पीत । कलयुगीं नीलवर्ण तो ॥ ५७ ॥

॥ श्लोक ॥

तेजो ज्ञानं च निर्माल्यं सोहंभावेन पूजयेत् ।
बाह्यभूमतिय:कष्टि त्यक्त्वा देहस्थमीश्वरम् ॥ ५८ ॥

टीका

देह देवालय जाणावें । तेथें हृत्पद्मीं देवातें वोळखावें ।
त्या सदाशिवातें ध्यावें । सोहंभावें करूनिया ॥ ५८ ॥

॥ श्लोक ॥

स्वगृहे पायसं त्यक्त्वा भिक्षामटति दुर्मतिः ।
अकल्पितं स्वयंज्योतिरात्मान्या देवताश्च किम् ॥ ५९ ॥

टीका

देहीचा देव टाकुनी । येक भ्रमती भ्रमणीं ।
घरींचें पय सांडुनि । परगृहीं भिक्षा मागती कांजी ॥ ५९ ॥

॥ श्लोक ॥

तीर्थाणि तोयरूपाणि देवाः पाषाणमृण्मयाः ।
योगिनो हि प्रपद्यंते आत्मज्ञानपरायणाः ॥ ६० ॥

टीका

तीर्थ[1] पाहूं जातां । सवें च तें उदकचि सर्वथा ।
देवाचें कवतुक पहातां । पाषाण मृत्तिका ॥ १ ॥
धातूमय देवस्वरूपाची स्थिति । पाणी पवित्र ह्मणविती ।
ते बहुतां काळीं पुनीत करिती । सद्य पवित्र व्हावें साधुदर्शनें ॥ २ ॥
कृष्ण ह्मणे पार्था । साधूसी शरण व्हावें तत्वता ।
तऱ्हीं च आत्मज्ञान ये हाता । तेणें परमसुख पाविजे ॥ ३ ॥
कर्मठ स्थापिती तांत्रिक देवाचें पूजन । योगी स्थापिती आत्मज्ञान ।
तो आत्मा कैसा जाण । देवाचा देव जो कां ॥ ४ ॥
तो कां मंत्ररहित । स्वरव्यंजनवर्जित ।
नादबिंदुकळातीत । वेदाचा तो वेत्ता ॥ १ ॥ (॥५॥)
अकल्पित प्रत्यक्ष देव । ज्योतिप्रकाश स्वयमेव ।
तीर्थ हिंडावया हांव । पाषाण पूजावयाची ॥ ६० ॥

---

१ येथून पुढील ५ ओव्या समासांत साठाव्या श्लोकावर काकपद देऊन लिहिल्या आहेत. त्यांचे अनुक्रमांक हि ६१-६२ असें नसून १-२ असे आहेत.

॥ श्लोक ॥

अमंत्रं शब्दरहितं स्वरव्यंजनवर्जितम् ।
नादबिंदुकलातीतं यस्तं वेद स वेदवित् ॥ ६१ ॥

टीका

योगी होत्साता जाण । नेणती आत्मज्ञान ।
सीणती करितां भ्रमण । युगानियुगें ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥

अष्टांगयोगमभ्यासमयं नियममुच्यते ।

टीका

अष्टांगयोग साधिती । यमनेम धरिती ।
वस्तूतें प्राप्त नव्हती । गुरुकृपेवांचुनी ॥ ६१ ॥

॥ श्लोक ॥

अर्जुन उवाच ॥ अदृश्य भावना नास्ति दृश्यमान विनश्यति ।
अद्भुतं तु स्वयं ब्रह्म कथं ध्यायंति योगिनः ॥ ६२ ॥

टीका

अर्जुन ह्मणे गा कृष्णा । भाव नुपजे मना ।
दृश्य तें नाशे जाणा । विचारणा कैसी पैं ॥ ६२ ॥

॥ श्लोक ॥

श्रीभगवान् उवाच ॥ अव्यक्त पराभक्तिर्नियमः संप्रकीर्तितः ।
सर्ववस्तून्युदासीनभाव आसनमुच्यते ॥ ६३ ॥

टीका

स्वयंप्रकाश अद्भुत । आदि ब्रह्म सदोदित ।
स्वरूपस्थिति अतित । ते योगी कैसे ध्यावे ॥ ६३ ॥

॥ श्लोक ॥

हंसोऽहं चिन्मयोऽव्यक्तश्चिन्मयोध्यात्ममुच्यते ।
चित्तस्य निष्कलाभावो धारणा सा निगद्यते ॥ ६४ ॥

टीका

कृष्ण ह्मणे गा अर्जुना । अव्यक्तीं लक्ष लावी मना ।
वस्तूच्या ठाईं उदासीना । भाव लक्षीं लक्षावा ॥ ६४ ॥

॥ श्लोक ॥

जगत्सर्वमिदं मिथ्या पतंति प्राणसंगमे ।
चित्तस्य तु सुखाभावः प्रत्याहारः स उच्यते ॥ ६५ ॥

टीका

अव्यक्त तें कैसें । हंसोहंसमये जैसें ।
मध्ये अध्यात्म असे । तो चि स्वप्रकाश ॥ ६५ ॥

॥ श्लोक ॥

धारणा विस्मृतः संम्यक्समाधिरभिधीयते ।
अंतः पूर्णो बहिः पूर्णो मध्यः पूर्णस्समास्थितः ॥ ६७ ॥

टीका

धारणा विस्मृति पडली । भावाशी विसरली ।
समाधी कैंसी लागली । निजात्मदेशीं ॥ ६६ ॥

॥ श्लोक ॥

सर्वपूर्णं स्वमात्मानं समाधिस्थस्यलक्षणम् ।
यथा विशुद्धमाकाशं सोहं सौभाग्यमंडले ॥ ६७ ॥

टीका

अंतरीं जो पूर्ण । बाह्यस्वरूपीं संपूर्ण ।
नाहि अंतरबाह्यलक्षण । समाधी तोऽस्तं ॥ ६७ ॥

॥ श्लोक ॥

भूत्वा प्रलीयते तद्वदात्मा नित्योऽखिलं जगत् ।
दूरस्थोऽपि न दूरस्थः पिंडस्थः पिंडवर्जितः ॥ ६८ ॥

टीका

सर्वपूर्ण स्वलक्षण । आत्मसमाधीस्त जाण ।
अनुभवावें संपूर्ण । सोहंभावें लक्षावें ॥ ६८ ॥

॥ श्लोक ॥

कायस्थोपि नवैजातः कायस्थोपि न लिप्यते ।
तिलमध्य यथा तैलं क्षीरमध्य यथा घृतम् ॥ ६९ ॥

टीका

देहासी प्रळयो जाला । आत्मा अखंड राहिला ।
जगा अखीळ जो बोलिला । अविनाश तो ॥ ६९ ॥

॥ श्लोक ॥

पुष्पमध्य यथा गंधः फलमध्य यथा रसः ।
काष्टाग्निश्चंद्रमाकाशोऽऽकाशे वायुस्सगोचरः ॥ ७० ॥

---

१ 'तो समाधिस्थ' याचा पदविपर्यय करून 'समाधि तोऽस्त' असें येथें वाक्य केलें आहे. निरंकुशाः कवयः" याहून काय बोलावयाचें ?

टीका

बहु दूरी जो कां आहे । तो समीपचि पाहे ।
असोनि दुरी राहे । पिंडामाझारीं ॥ ७० ॥

॥ श्लोक ॥

यस्य सर्वगतो देहो देहमध्यव्यवस्थितम् ।
मनस्थं मनमध्यस्थं मनस्थं मनवर्जितम् ॥ ७१ ॥

टीका

जो कां काये विवर्जित । तो चि आहे कायेआंत ।
कायेसीं असतां न लिप्त । तो परमात्मा जाण ॥ ७१ ॥
तीळामध्यें जैसें तेल । क्षीरांत घृत केवळ ।
पुष्पीं जैसा परिमळ । तैसा परमात्मा देहीं ॥ ७१ ॥
फळामध्यें जैसा रस । काष्ठीं अग्नि विशेष ।
चंद्रमा स्थान आकाश । आकाशीं पवन तो ॥ ७१ ॥
ऐसें चि देहाचा ठाईं । अंसे[1] सर्व देहांत पाहिं ।
हें अनुभवीं हृदईं । मग राहुनी अचळ ॥ ७१ ॥
मन चि सर्वांगत । मन चि देहातीत ।
मन चि व्यवस्थित । मन सर्वस्व जीव ॥ ७१[2] ॥

॥ श्लोक ॥

मनसा मनमालोक्य स्वयं सिद्धंति योगिनाः ।
अवकाशे नैवाकाशं आकाशस्याप्यनाशयेत् ॥ ७२ ॥

टीका

मनें चि समाधान । मनें मन अवलोकन ।
मन जाणे योगीजन । गुरुकृपें करुनी ॥ ७२ ॥
आकाशीं आवकाश[3] । सर्व त्या नाहीं नाश ।
तैसा देहीं आत्मास्पर्श । परि देहावेगळा ॥ ७२ ॥

॥ श्लोक ॥

आकाशस्य गुणः शब्दो शब्दब्रह्म स उच्यते ।
एकस्थलेषु भूतात्मा दृश्यते जलचंद्रवत् ॥ ७३ ॥

---

१ 'असें' हें समासांत लिहिलें आहे. २ या पांच हि ओव्यांना ७१ हा च अनुक्रमांक पोथींत दिला आहे. ३ हा शब्द समासांत आहे.

## टीका

आकाशाचा गुण । शब्द तेथूनि निर्माण ।
शाब्दीं ब्रह्म जाण । ब्रह्मीं ब्रह्म पूर्ण पैं ॥ ७३ ॥
तैसा पंचभूतीं आत्मा । जळीं देखती चंद्रमा ।
सर्वभूतीं परमात्मा । संपूर्ण असे ॥ ७३ ॥

॥ श्लोक ॥

**गावामनेक वर्णाश्च क्षीरं त्वैकवर्णतः ।**
**स्वकर्म कर्म शौचं च जपयज्ञस्तथैव च ॥ ७४ ॥**

## टीका

नानावर्ण गाई असती । परि दूध शुभ्रवर्ण येक दिसती ।
गाई भिन्न तैसे ते नसती । तैसा आत्मा सर्वदेहीं ॥ ७४ ॥
स्वकर्म आचरतां । शौचविधी करितां ।
जप याज्ञीक वर्त्तता । गुरुविण प्राप्त नव्हे ॥ ७४ ॥

॥ श्लोक ॥

**वेदा ध्यायन्ति वेत्ताथ शिवतत्त्वं न विद्यति ।**
**नस्तरेद्दुर्गसंसारं न तस्य ब्रह्म तद्भवेत् ॥ ७५ ॥**

## टीका

वेदअभ्यास करितां । शिवतत्त्व न ये ज्ञातां ।
वेद पढतां अभिमानतां । मग अधोगति होये ॥ ७५ ॥
अभिमानें तरती । जड ऐसें बोलती ।
अभिमानें अधोगति । न पावती गुरुकृपा ॥ ७५ ॥
पावती दुर्घट संसार । न पावती साक्षात्कार ।
गुरुचरणीं निर्धार । जाणुनी करिती ॥ ७५ ॥
ज्यासी श्रीगुरुकृपा पूर्ण । तो चि तोडी संसारबंधन ।
श्रीसद्गुरूचें महिमान । जाणती महावाक्यें ॥ ७५ ॥

॥ श्लोक ॥

**पूजाकोटिसमं स्तोत्रं स्तोत्रकोटिसमो जपः ।**
**जपकोटिसमं ध्यानं ध्यानकोटिसमो लयः ॥ ७६ ॥**

## टीका

पूजा कोटि केलिया । स्तोत्र येक समान तया ।
कोटि स्तोत्र जपलिया । मंत्र येक समान ॥ ७६ ॥

मंत्र कोटि जप असी । जप कोटी येका ध्यानासी ।
ध्यान कोटी येक लक्षासी । लक्षा परतें नाहीं ॥ ७६ ॥

॥ श्लोक ॥

लयात्परतरं नाऽस्ति न भूतो न भविष्यति ।
स्नानं मनोमलत्यागः शौचमिंद्रियनिग्रहः ॥ ७७ ॥

टीका

नाहीं लक्षापरतें । नसे जालें मागुतें ।
पुढें नव्हे मागुतें । अधीक लय लक्ष ॥ ७७ ॥
जळस्नानें मळत्याग कर्णें । शौच्यें शुचिर्भूत होणें ।
नेम इंद्रियें असणें । लय लक्ष अधीक ॥ ७७ ॥

॥ श्लोक ॥

अभेदस्पर्शनं ज्ञानं ध्यानं निर्विषयं मनः ।
ब्रह्मण्यः प्राप्य लोकेऽस्मिन्न मूको बधिरो भवेत् ॥ ७८ ॥

टीका

अभेद दरुशनें पाहीं । ज्ञान आणि ध्यान हृदईं ।
निर्विषईं चित्त मन[1] करुनी ठाईं । लक्षीं परिपूर्ण तो ॥ ७८ ॥
लक्ष लागे पुरुषासी । भेद न करावा वर्णासी ।
मुकें अथवा बधिरासी । जड तो हि उद्धरे ॥ ७८ ॥

॥ श्लोक ॥

अंतः पूर्णो बहिः शून्यो अंतर्बोधो बहिर्जडः ।
अंतर्मुक्तो बहिर्बद्धो जीवन्मुक्तस्य लक्षणम् ॥ ७९ ॥

टीका

अंतरीं जो ज्ञानपूर्ण । बाह्यात्कारीं जड जाण ।
अंतरीं बोध निर्गुण । ब्रह्मपावेनी[2] तो चि ॥ ७९ ॥
मुक्त जो का अंतरीं । बाह्य वर्त्ते व्येव्हारीं ।
अैसी लक्षणाची परि । संसारीं धन्य तो प्राणी ॥ ७९ ॥
अैसें ज्याचें लक्षण । तो बोलिलों गुरुखुण ।
हें परिसोनि अर्जुन । समाधान जालें ॥ ७९ ॥

---

१ या ऐवजीं दुसरा आणखी एक पाठ 'सर्वदेही' असा समासांत लिहिला आहे. २ 'ज्ञा' होता तो खोडून समासांत 'पाव' केलें आहे.

॥ श्लोक ॥

अश्वारूढो गजारूढः संग्रामे संकटे रणे ।
एतध्यानसमाध्यानं परं ब्रह्माधिगच्छति ॥ ८० ॥

टीका

स्वरूपीं जो लीन जाला । तो चि अश्वावरि बैसला ।
गजावरि आरूढला । अखंडता खंडेना ॥ ८० ॥

आणीक संग्राम करितां । ध्यान असे अखंडता ।
तऱ्ही खंडेना सर्वथा । ते ब्रह्मत्वे पावती ॥ ८० ॥

॥ श्लोक ॥

आसने शयने वाऽपि तिष्ठन्गच्छन्सदा भुवि ।
तस्मात्सर्व प्रयत्नेन योगयुक्तो भवार्जुन ॥ ८१ ॥

टीका

तो आसनीं बैसला । अथवा शयनीं निजला ।
मार्गीं चालता जाला । परी लक्ष न चुके ॥ ८१ ॥

कृष्ण ह्मणे गा पार्था । योगावेगळे नाहीं सर्वथा ।
मी बोलिलों यथार्था । तुझीये प्रीतीस्तव ॥ ८१ ॥

॥ श्लोक ॥

कल्पकोटि सहस्राणि नाना तीर्थाधिगच्छति ।
एकांगुष्ठेन तपसा यत्फलं लभते नरः ॥ ८२ ॥

टीका

तप केलें सहस्रकोटि । याग तीर्थं[१] कोट्यांनकोटी ।
त्यासी नव्हे माझी भेटी । सत्य जाण अर्जुना ॥ ८२ ॥

येकअंगुष्ठावरी राहिले । देव पूजिते जाले ।
ते तैसी च फळ पावले । मागुती[२] येउनी फळभोग भोगिले ।
जे जे इछिली ते ॥ ८२ ॥

॥ श्लोक ॥

अश्वमेध सहस्राणि वाजपेय शतानि च ।
विना ध्यानयोगेन कलां नार्हंति षोडशीम् ॥ ८३ ॥

---

१ समासांत हा शब्द आहे. २ हा सबंध चरण समासांत लिहिला आहे.

टीका

सहस्र केले अश्वमेध । वाजपेय शतविध ।
न पावती लक्षप्रसाद । षोडशी कळा ॥ ८३ ॥
लक्षकळा अधिक । संत पावती अलोलिक ।
नाहीं याहुनी आणीक । हा निश्चयो जाण पार्था ॥ ८३ ॥

॥ श्लोक ॥

ब्रह्महत्या सहस्राणि अगम्य गमनानि च ।
येकेन ध्यानयोगेन सवे नश्यंति तत्क्षणात् ॥ ८४ ॥

टीका

ब्रम्हहत्यादि नाना पातकें घडलीं । अगम्यागमन कुकर्मे जोडलीं[1] ।
तीं सर्व नाशातें पावलीं । ध्यानलक्ष धरिलिया[2] ॥ ८४ ॥

॥ श्लोक ॥

गीतासारमिदं स्तोत्रं गीतासारसमुच्चयम् ।
यत्रस्थं ब्रह्मविज्ञानं वेदशास्त्रार्थनिर्णयः ॥ ८५ ॥

टीका

हें बोलिलों गीतासार । ज्ञान चि अर्थ अपार ।
परिसा ज्ञाते चतुर । वेदशास्त्रनिर्णयो हा ॥ ८५ ॥

॥ श्लोक ॥

अनभ्यासे विषं शास्त्रं अंधस्य दर्पणं यथा ।
सर्वसंगनिवृत्तात्मा पश्येदात्मानमात्मनि ॥ ८६ ॥

टीका

गीतासार विवरण । न जाणती मूढ जनें[3] ।
आंधळ्यापुढें दर्पण । काय कारण तया ॥ ८६ ॥
सर्व शास्त्र जाणे ज्ञाता । आत्मज्ञानीं जो पुरता ।
त्यासी आवडे अखंडता । खंडेना कदाकाळीं ॥ ८६ ॥
सर्वसंग आहे ज्यासी । असोनि अलिप्त त्यासी ।
रंग स्फटिकशिळेसी । लिप्त परि तो नव्हे ॥ ८६ ॥
तैसा तो आत्मज्ञानी । लिप्त नव्हे अंतःकरणीं ।
प्रपंच हा निरसुनी । पावे परब्रम्हातें ॥ ८६ ॥

---

१ ‘ घ ’ चा च ‘ जो ’ केला आहे. २ ‘ के ’ खोडून समासांत ‘ धर ’ केलें आहे. ३ यापुढें ‘ लक्षण ’ शब्द लिहून खोडला आहे.

॥ श्लोक ॥

इदं शास्त्रं मया प्रोक्तं गुह्यं वेदांतविस्तरम् ।
यः पठेत्परमा भक्त्या स गच्छेद्वैष्णवं पदम् ॥ ८७ ॥

टीका

शास्त्र हें गीतासार । वेदाचें गुह्य विस्तार ।
श्रवण पठण करिती[1] चतुर । ते ध्यानलक्षातें पावती ॥ ८७ ॥
सप्रेमें करूनि पढतां । प्रतिदिनीं श्रवण करितां ।
त्याच्या पुण्यासी नेमितां । मज श्रीमुखें संख्या न होये ॥ ८७ ॥

॥ श्लोक ॥

यः पठेत् श्रुणुयाद्वापी विष्णुमाहात्म्यमुत्तमम् ॥[2]

टीका

महात्म हें विष्णूचें । श्रेष्ठ बोलतां वाचे ।
श्रवण करितां याचें । विश्रांती पावेल ॥ ८८ ॥

॥ श्लोक ॥

अष्टादश पुराणानि नव व्याकरणानि च ।
निर्मथ्य चतुरो वेदान्मुनिना भारतं कृतम् ॥ ८९ ॥

टीका

गीतासार महिमान । पुराणासी मा न्यून ।
नव वाक्यें करून । याचें मत्त करुनी ॥ ८९ ॥
आणीक च्यान्ह वेद । भाव उपनिषद ।
त्याचें सार काढूनि भेद । केली भारती कथा ॥ ८९ ॥

॥ श्लोक ॥

भारतोदधि मंथस्य गीता निर्मथनस्य च ।
सारमुद्धृत्य कृष्णेन अर्जुनस्य मुखे हुतम् ॥ ९० ॥

टीका

भारथीं मथन करितां । काढिली भगवद्गीता ।
कृष्ण अर्जुन संवादतां । निवडितां सारांशसार ॥ ९०[3] ॥

---

१ यापुढें ' श्रोते ' शब्द लिहून खोडला आहे. २ या श्लोकाचा पुढील अर्धा चरण लिहिलेला नाहीं; फक्त काकपद करून ठेविलें आहे. ३ यापुढें पोथींत खालील ओंवी लिहून खोडली आहे ॥ टीका ॥ संस्कृत समश्लोक पढतां। अविद्यामन नासे तत्वता । श्रवण करितां गीता । कलिमल नाशती ॥९०॥ ज्यासी असे सद्भाव ।

॥ श्लोक ॥

गीतार्थमननं येन तत्त्वं मनविनाशनम् ।
सकृद्गीतांभसि स्नानं संसारमलनाशनम् ॥ ९१ ॥

टीका

संस्कृत समश्लोक टीका पढतां । अविद्यामन नासे तत्त्वता ।
श्रवण करितां गीता । संसार कलिमल नाशती ॥ ९१ ॥

॥ श्लोक ॥

गीता नामसहस्राणि स्तवराज मनुस्मृतः ।
यस्य कुक्षौ स्थितं तेन नारायणमनुस्मृतः ॥ ९२ ॥

टीका

गीता विष्णुनामसहस्र । स्तवराज मनुस्मृति गजेंद्र ।
ज्याच्या कुक्षीं तिष्ठति निरंतर । ते धन्य होती ॥ ९२ ॥[1]
ज्यासी असे सद्भाव । हृदईं प्रकाशे नारायणदेव ।
यदर्थीं नाहीं संदेह । भगवद्वाक्य असे ॥ ९२ ॥

॥ श्लोक ॥

पादं वा पादमर्द्धं वा श्लोकं श्लोकार्द्धमेव च ।
इदं तु पठ्यते येन स मोक्षमधिगच्छति ॥ ९३ ॥

टीका

येक चरण श्लोकाचा । पूर्ण वर्णवेना वाचा ।
दुसरा बोलिलों त्याचा । तरी अगाध पुण्या ॥ ९३ ॥
वाचेसी येक श्लोक । तो मोक्ष पावे अधिक ।
भगवंत बोले वाक्य । अर्जुनाप्रति ॥ ९३ ॥

॥ श्लोक ॥

कृष्णवृक्षसमुद्भूता गीतानाम हरीतकी ।
रेचना किमुस्वार्थेत कलौमलविरेचनी ॥ ९४ ॥

टीका

कृष्णनाम येक ऐसे । जपें नित्य सावकाशे ।
तुटे संसारपिसें । होय ज्ञानसीळ ॥ ९४ ॥

---

१ हा पहिला श्लोकार्ध समासांत लिहिलेला आहे.

श्रीकृष्णवृक्ष उद्भूता । मुखापासून प्रसवली हरीतकी गीता ।
जे भजन करिती तत्वता । जे कलिमलविरेचनी ॥ ९४ ॥

॥ श्लोक ॥

गीतासुगीता कर्त्तव्या किमन्यैः शास्त्रसंग्रहैः ।
अत्यंत नरकान्घोरान् गीताध्यायी न पश्यति ॥ ९५ ॥

टीका

सर्व शास्त्रांचें सार हे गीता । तिचे सारांश सारगीता ।
ग्रंथ केलासे सुगमता । कृष्ण जाला सांगता पार्थासी ॥ ९४ ॥
गीतेचा संग्रह केला । अन्यशास्त्रीं नाहीं विचार केला ।
अघोर नरकापासूनि चुकला । परमानंद पावला जन्मातें न पावे ॥९४॥

॥ श्लोक ॥

गंगा गीता च गायत्री गोविंदो हृदि संस्थितः ।
चतुर्गकारसंयुक्तः पुनर्जन्मो न विद्यते ॥ ९६ ॥

टीका

गंगा आणि गीता । गायत्री हृदईं जपतां । गोविंद हृदईं ध्यातां ।
चतुर्गकारयुक्त जो लीनतां । त्यातें पुनर्जन्म नाहीं ॥ ९६ ॥

॥ श्लोक ॥

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ।
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ९७ ॥

टीका

सर्व उपनिषद गोरूप । दुग्ध जाणावें कृष्णरूप ।
पार्थ जाला वत्सरूप । भोक्ता गीतामृत तत्परः ॥ ९७ ॥

॥ श्लोक ॥

अंतःसंग बहिःसंग दुःसंग परिवर्जयेत् ।
सर्वसंगनिवृत्तात्मा जडोन्मत्त पिशाच्चवत् ॥ ९८ ॥

टीका

अंतःसंग ह्मणिजे अंतरीं लयलक्ष । जे ध्याती योग गुरुकृपें आलक्ष ।
बाह्यदृष्टीं पाह्यतां विश्वरूप । दुःसंग अज्ञानमूढजनसमागम वर्जावा ॥९८॥
ऐसा जो दुःसंगरहित । सर्वसंग तो चि निवृत्त ।
योगदशा होतां देहातीत । तो चि योगी पूर्ण ॥ ९८ ॥

श्री. श्री.

योगदशा त्रिविध । बाळरूप प्रसिद्ध ।
मद्यपी जैसा विशुद्ध । पिशाच्चासारिखे ॥ ९८ ॥

॥ श्लोक ॥

ॐकारस्य त्रिरूपं च ब्रह्मा विष्णु महेश्वरः ।
परब्रह्म निराकारं प्रणवं च तथा स्वयम् ॥ ९९ ॥

टीका

श्रीकृष्ण ह्मणे अर्जुना । ॐकाररूप त्रिविध जना ।
ब्रह्मा विष्णु महेश्वर सगुणा । परब्रह्म निराकार ते प्रणव स्वयं ॥ ९९ ॥

कृष्ण ह्मणे पार्थासी । त्वां पुशिलें होतें ॐकारासी ।
तो ॐकार समूळासी । निरोपिला तुज ॥ ९९ ॥
नादबिंदुकळातीत । तुज म्यां सांगितलें गुह्य वेदांत ।
ते गुरुकृपें अनुभवावे सिद्धांत । तस्य रूप जाण अर्जुना ॥ ९९ ॥
ऐसी हे सारगीता । अर्जुनासी कृष्ण सांगतां ।
पार्थ बोधे अखंडता । संतोषातें पावला ॥ १०० ॥
अर्जुनें कर जोडुनी । नमस्कार केला कृष्णचरणीं ।
कृष्णें आलिंगन देउनी । समाधानें राहिला ॥ १०१ ॥
श्रीगुरु स्वरूपानंद । शिष्य बोले पूर्णानंद ।
श्रीगुरूचा प्रसाद । ग्रंथ पूर्ण जाला ॥ १०२ ॥
गीतासाराची टीका । अन्वय संस्कृत श्लोका ।
प्राकृत कळाव्या लोकां । पूर्णानंद विनवी ॥ १०३ ॥

इति श्री गीतासारेषूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गीतासारयोगो नाम एकोनविंशोऽध्यायः ॥ १९ ॥

संवत् ॥१८३३॥ तथा शालिवाहन शके १६९९ हेमलंबनाम संवत्सरे दक्षिणायने वर्षारुतौ भाद्रपदमासे शुद्धपक्षे तीथौ ८ भोमवासरे ज्येष्ठा नक्षत्रे तद्दिने पुस्तकं संपूर्णम् ॥ हस्ताक्षर नरहरी अग्निहोत्री येन लिखितं परोपकारार्थम् ॥ मूळ श्लोक ॥९८॥ प्राकुत वोवीया ॥ १४७ ॥

समाप्त

॥ श्रीरामसमर्थ ॥

## प्रकरण चवथें

# श्रीउपदेशरत्नाकर

सदरहु ग्रंथ श्रीरत्नाकरांचा आहे. हा ग्रंथ ज्या बाडांत आहे, तें बऱ्हाणपुरास असलेल्या श्रीरत्नाकरांच्या च मठांत मिळालें. तेथें च असलेले त्यांचे आणखी पुष्कळसे ग्रंथ मिळाले. हे बहुतेक सर्व ग्रंथ खुद्द श्रीरत्नाकरांच्या च हातचे आहेत. उपदेशरत्नाकर हा ग्रंथ ज्या बाडांत आहे तें बाड हि त्यांनीं च लिहिलेलें आहे. मात्र एवढें च प्रकरण त्यांच्या हातचें नाहीं. तें बाडांत मध्यें च लिहिलेलें आहे. तत्पूर्वीं व तत्पश्चात् असलेल्या अभंगांचें व भिक्षुगीताचें लेखन खुद्द रत्नाकरांच्या हातचें निःसंशय आहे. कदाचित् रत्नाकरांच्या आज्ञेवरून कोणीतरी त्यांच्या शिष्यानें हें प्रकरण लिहिलें असावें. कसें हि असो, प्रस्तुतची प्रत ही च या प्रकरणाची मूळ प्रत होय यांत शंका नाहीं.

याशिवाय उपदेशरत्नाकराच्या आणखी दोन प्रति मिळाल्या; त्यांपैकीं **रा** ही प्रत मूळ प्रतीवरून च नकल केलेली दिसते. मात्र मूळ प्रत पुन्हा एकदां तपासली गेली आहे (व ती खुद्द रत्नाकरांनीं च तपासली आहे असें त्या शोधांच्या अक्षरांवरून दिसतें). त्यापूर्वीं **रा** प्रत केलेली आहे, कारण तींत शोध आलेले नाहींत. प्रत शुद्ध आहे; ती **भटंभट्ट अग्निहोत्रि** यांची आहे. तिचा शेवट असा आहे ' शके १७०० विलंब नामाब्दे मार्गशीर्ष वद्य पक्षेति २ भानुवारे तद्दिने समापितं " ही प्रत **मुल्हेर** येथें मिळाली.

दुसरी **म** प्रत ही फार च अशुद्ध आहे. ही कोणीं कधीं लिहिली त्याचा कांहीं च उल्लेख इच्यांत नाहीं. शेवटीं " श्रीसद्गुरु आर्पन ॥ वोवी संख्या ॥ तीनसे चऱ्हेताळीस ॥ आक्षरी ३४४ ॥" एवढाच उल्लेख आहे. ही प्रत पिंपळनेरास मिळाली.

रत्नाकरांनीं पिंपळनेर जवळील **पानखेडें** येथें समाधी घेतली. तसें च पानखेडें **मुल्हेरच्या** जवळच आहे. वरील दोन्ही प्रति पिंपळनेर व मुल्हेर येथें च मिळाल्या आहेत. मूळ ग्रंथ रत्नाकरांनीं कोणत्या वर्षी लिहिला त्याचा उल्लेख त्यांत नाहीं. मात्र या च बाडांत या उपदेशरत्नाकराच्या पुढें **भिक्षुगीत** ह्मणून जो १६९६ दोहऱ्यांचा ग्रंथ आहे, त्यांत 'संवत् १७३० चैत्र वद्य ७ रवीवारीं स्तंभतीर्थीं (खंबायत?) ग्रंथ संपूर्ण जाला ' असें स्वतः रत्नाकरांनीं च लिहिलें आहे. त्यावरून उपदेशरत्नाकर संवत् १७३० अगर शके १५९६ च्या पूर्वींचा आहे असें गृहित धरल्यास कांहीं प्रत्यवाय येईल असें वाटत नाहीं. दुसरें, शके १५९६ च्या पूर्वी रत्नाकर हयात होते हें हि ठरतें. असो.

श्रीरत्नाकरांबद्दल साधारण टांचण भा. इ. सं. मंडळाच्या १८३४ च्या पहिल्या सहामाहीच्या अहवालांत दिलें आहे तें पहावें, त्यांत असें एक विधान आहे:—

' स्वामी अनुग्रहापूर्वीं सन्यस्त नव्हते; परंतु तपोबलानें **श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा** साक्षात्कार होऊन त्यांच्या अनुज्ञेनें रामानंदांचा उपदेश घेतलेला होता '

वरील विधानास बळकटी देणारा पुरावा उपदेशरत्नाकरांत दोन ठिकाणीं आला आहे, व त्यावरून श्रीज्ञानेश्वरमहाराजांची त्यांच्यावर खरोखर च कृपा होती असें ठरत आहे; तो पुरावा हा:—

रत्नाकरांस त्यांचे गुरु रामानंद म्हणतात, तुझ्या विनंतीवरून मी तुला सर्व गुह्याचें गुह्य, साराचें सार सांगतों; कां म्हणशील तर ' तुज प्रसन्न ज्ञानेश्वर ह्मणोनिया ' ॥ ६४ ॥

तसें च आणखी एका ठिकाणीं म्हटलें आहे कीं—

जें गुह्याचें गुह्य सार । तें म्यां तुज सांगितलें साचार ।
कां जे तुज ज्ञानेश्वराचा वर । म्हणौनियां ॥

असो.

पोथीचा विषय वेदांत होय हें सांगावयास नको च. तिच्यांत प्रतिपादलेल्या विषयाचें सामान्य स्वरूप खालीलप्रमाणें आहे:—

पहिल्या ७।८ ओव्यांत ग्रंथाचें कारण दिलें आहे. त्यांत रत्नाकरांनीं जे आपले स्वतःचे ह्मणून दोष दाखविले आहेत, ते, एकांतांत बसून स्वगुणपरीक्षा केल्यास, आपल्या सारख्यांच्या आंगीं कसे चिकटून बसले आहेत, हें तत्काळ लक्षांत येतें व तितका वेळ तरी मनास वाईट वाटतें.

वेदशास्त्रपुराणअभ्यासानें ब्रह्मज्ञान न होतां ‘ विद्येची अहंता ’ येऊन मनुष्य वादविवादास उभा राहतो व शेवटीं गर्वानें नरकास जातो.

शिष्य अनन्यशरण होऊन त्यानें विचारल्याशिवाय, त्या श्रद्धाहीनास ज्ञान सांगणें ह्मणजे ‘ क्षुधेविण भोजन करण्यास सांगण्यासारखें ’ आहे. असल्या मनुष्याची स्थिति, आंधळ्यापुढें आरसा ठेवणें, मर्कटास रत्नभूषणें लेवविणें, बहिऱ्यापुढें कीर्तन करणें अथवा विधवेस काजळ कुंकु लावणें, असल्या हास्यास्पद क्रियेसारखी होते. आंगीं खरी मुमुक्षुता आल्याशिवाय ज्ञानोपदेश केल्यास मनुष्यावर अहंतेचा पगडा जास्त बसून तो शब्दब्रह्माचा नुसता ‘ बकवा ’ करतो. ’ अधोपतनाचें कारण हा देहाभिमान आहे. स्थूळ देहाचा च अभिमान तेवढा लक्षांत न घेतां चारी देहांचा अभिमान लक्षांत घेऊन त्याचा विचार करून त्या चौघांचा निरास करून, त्यांचा साक्षी होऊन रहावें. ( येथें प्रत्येक देहाची सविस्तर फोड करून, म्हणजे त्याचे परिमाण, रंग, दैवत, गुण, मात्रा, अवस्था, इत्यादि सांगितली आहे. तसें च पांचांचीं पंचवीस तत्वें कशीं झालीं तें हि सांगितलें आहे ). तसेंच मन; ‘ बंधमुक्तता मनें चि होये, ’ असल्या त्या मनानें जरी थोर थोर ऋषींना ठकविलें आहे तरी, अभ्यासानें व सद्गुरुकृपेनें त्याला

---

१ येथें जातां जातां एवढेंच सुचवून ठेवतों कीं रत्नाकरांनीं महाराष्ट्रभाषेंत जसा ग्रंथसंग्रह निर्माण केला आहे, तसा च ब्रिजभाषेंत हि केला आहे. त्यामुळें त्यांच्या मऱ्हाटी ग्रंथांत हि ब्रिज शब्द पुष्कळ आले आहेत. तसे च ते या ग्रंथांत हि आहेत.

मारून त्याचा साक्षी होऊन रहावें. खालील शब्दांच्या व्याख्या किती आटपशीर आहेत तें पहा:—

निर्विकल्प **अंत:करण;** संकल्पविकल्पात्मक **मन;** निश्चये करी ते **बुद्धि;** जो बुद्धीनें निश्चये केला असे, त्याचें चिंतन करणारें तें **चित्त;** चित्तें चिंतला त्याचा जो येतुसे तो **अहंकार;** हें सर्व खरें, पण त्यांत एक गोम आहे, ती हीः—

तूं या सर्वांतें जाणसी । ह्मणवोनियां त्यांचा साक्षी होसी ॥

अंत:करण, प्राण, विषय, ज्ञानेंद्रिय, कर्मेंद्रिय हीं पांच पंचकें, त्या प्रत्येकाचीं पांच पांच मिळून पंचवीस व सवीसावी जीवाची ( हीं पंचवीस जीवामुळें चालतात ह्मणून ) जीवनकळा, अशीं २६ तत्वें लिंगदेहाचीं आहेत, पण आपण तेवढ्यांचे हि साक्षी आहोंत.

चार देहानंतर **ज्ञानदेह** ह्मणून एक पांचवा देह आहे. तो " च्यार देह च्यार अवस्ता जाण । च्यारी वाचा च्यारी वेद मान ।" याचा प्रकाशक आहे. हा आब्रह्मस्तंभपारियंत येक असून त्याला आदि-मध्यअवसान कांहीं नाहीं; मात्र हा ज्याचा तो चि जाणे.

यापमाणें जाणून निष्काम कर्म करावें. अहं कर्ता मानल्यास दु:ख व नाहं कर्ता असें मानून कर्म केल्यास सुखाची प्राप्ति आहे. तूं कर्मेंद्रियाहून अलिप्त आहेस. ह्मणून कोणत्या हि क्रियेचा अभिमान धरूं नकोस.

यावर शिष्यास एक शंका आली. तो ह्मणतो, महाराज, आपण ह्मणतां कीं तूं नि:कर्म आहेस आणि मी तर सर्व कर्में करतों; कशीं तीं पहा; डोळ्यांनीं पाहतों, वाचेनें बोलतों, हातानें देतों, पायानें जातों, इत्यादि. आपल्या पूर्वीच्या ह्मणण्याप्रमाणें मी चारी देहाच्या पलीकडचा आहे खरा, पण हीं " इंद्रियकर्में माझेनि चि होये, तेंव्हां कर्तुत्व मज पाहें आलें कीं स्वामी " ! आपल्या ह्मणण्याप्रमाणें मी नि:काम होण्यास माझीं सर्व इंद्रियें कर्महीन झालीं पाहिजेत !

ही शंका ऐकून सद्गुरु हांसले. थोडक्यांत त्यांनीं शिष्याचें समा-

धान केलें. इंद्रियांचा प्रवर्तक आत्मा नसून प्रत्येक इंद्रियाची एक एक देवता असते, ती च त्याची प्रवर्तक होय; आत्मा अलिप्त आहे. ज्याप्रमाणें आकाशांत सूर्य व सृष्टि दोन्ही असून, सृष्टीचें कर्म सूर्यप्रकाशानें होतें, आकाशानें होत नाहीं. मात्र त्या सूर्यास व सृष्टीस दोघांस हि आकाशाचा च आधार असून हि तें अलिप्त आहे, त्याप्रमाणें इंद्रियांचीं प्रवर्तक अशीं चौदा दैवतें असून त्या देवतांना व इंद्रियांना आत्मा आधार-साक्षी असून अलिप्त आहे. तीं दैवतें व त्यांचे विषय जीं इंद्रियें त्यांचीं नांवें याप्रमाणें दिलीं आहेत:—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | देवत | चंद्र | विषय | मन |
| २ | ,, | ब्रह्मा | ,, | बुद्धि |
| ३ | ,, | नारायण | ,, | चित्त |
| ४ | ,, | शंकर | ,, | अहंकार |
| ५ | ,, | सूर्य | ,, | नेत्र |
| ६ | ,, | दिशा | ,, | कान |
| ७ | ,, | अग्नि | ,, | वाचा |
| ८ | ,, | वायू | ,, | स्पर्श |
| ९ | ,, | अश्विनीकुमार | ,, | घ्राण |
| १० | ,, | वरुण | ,, | जिव्हा |
| ११ | ,, | इंद्र | ,, | हात |
| १२ | ,, | उपेंद्र | ,, | पाय |
| १३ | ,, | प्रजापति | ,, | शिस्न |
| १४ | ,, | यम | ,, | गुद |

सद्गुरु ह्मणतात, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें जर आत्मा च इंद्रियांचा प्रवर्तक असता तर मनुष्य आंधळा, बहिरा, मुका, झाला नसता. ह्मणून इंद्रियांचा प्रवर्तक आत्मा नसून हीं दैवतें आहेत असें मानून व शरीरभोगास प्रारब्ध प्रमाण मानून, अशनवसनाची चिंता न करितां निरहेत होऊन, अंतरीं अखंड हरि हरि स्मरत जावा.

यावर शिष्यानें पुन्हा एक प्रश्न विचारला कीं—महाराज, आपण जर मला निःकर्मी ह्मणतां, तर मग मला कर्में करावयाची गरज काय?

सद्गुरूंनीं पुन्हा मंद स्मित केलें. त्यांनीं शिष्यास विचारिलें, बापा! तूं कोण ? कर्में कोणाचीं ? करणारा कोण ? याचा कधीं विचार केला आहेस काय ? ब्रह्माविष्णुशूळपाणी, सनकसनंदनादि ब्रह्मर्षि, व्यासशुकनारदादि देवर्षि, जनकादि राजर्षि, एवढेंच काय, पण श्रीरामश्रीकृष्णादि अवतारादिकांनीं हि कर्म केलें. जोंपर्यंत शरीर आहे तोंपर्यंत कर्म कोणास हि सुटलें नाहीं. ह्मणून सर्व आत्मवत जाणोन, निंदा द्वेष सोडून, शत्रु मित्र समान मानोन, भक्तिज्ञानवैराग्य हें च अनुभवप्राप्तीचें भाग्य आहे असें ठाम ठरवून आवडीनें श्रीरंग स्मरावा.

पुन्हा एकदा शिष्यानें शंका घेतली; महाराज, मी जर पूर्ण ब्रह्म झालों, एकीं एक होऊन ठेलों, तर मग जेथें देवभक्तासी ठाव नाहीं, मग तेथें मी कोणाची व कशी भक्ति करूं? मला मी पाहूं जातां, माझा मला च ठाव नाहीं; मग भक्ति कोणाची करावयाची? स्वामी तर ह्मणतात कीं, ‘ भक्ति करावी निर्वाणी ’. पण भक्ति जर करावयाची तर तेथें भक्त, देव असें द्वैत येत नाहीं कां ? तरी महाराजांनीं कृपेनें याचा उलगडा करावा.

श्रीगुरु ह्मणतात, भक्ति करावयाची हें च खरें, पण ती अशी करावयाची; “ भक्ति करावी तद्रुप होऊन, आब्रह्मस्तंभपरियंत जाणोन, भक्ति कीजे ”. ज्याप्रमाणें जळाची लहरी जळावर च क्रीडा करते अथवा अळंकार सुवर्णाला भजतो, अगर कापूर परिमळास, प्रकाश दीपास, ऊष्णता अग्नीस, गूळ गोडीस, अवयवानें शरीरास, शरीरानें प्राणास, फार काय, प्राणानें जीवास अभेदभावानें भजावें. त्याप्रमाणें देव भक्त, पूज्य पूजक, ध्येय ध्याता इत्यादि सर्व आपण चि होऊनि, प्रेमेकरोनि अभेदभावें भक्तीसी करावें. मागे जे जे ब्रह्मज्ञानी होऊन गेले त्यांनीं, फार काय पण शिव विरंची यांनीं, तसें च उद्धव, प्रल्हाद, जनक, व्यास, यांनीं हि भक्ति केली आहे. मी च माझा श्रोता वक्ता, देव भक्त, इत्यादि सर्व आपण च होऊन भक्तीची गोडी चाख. अहंता

दूर सांडून निर्लज्य होऊन कीर्तनांत प्रेमानें नाच. दीनाहूनि दीन होऊन, सर्व जन ब्रह्मरूप मानून, सुखदुःख प्रारब्धप्रमाण समजून, जीवजातीस आपला प्राण मानून, अहं ब्रह्मास्मि जाणोन, अणुमात्र अनुमान न धरितां भक्ति करावी.

सर्व आत्मवत जाणावें हें **ज्ञान** । लीन होऊन असावें हें **भजन** ।
विषवत् विषये मनीं मान । हें चि **वैराग्य** ॥
यैसिया प्रकारीं तूं राहें । जोंवरी शरीरीं प्राण आहे ।
हें **जीवन्मुक्ती**चें लक्षण पाहें । विचारोनि ॥

येथून बोलणें राहिलें. कारण पुढें अनुर्वाच्य; त्याचें मनेंविण मनन करावें, नेत्रेंविण अवलोकावें, त्याला सर्वां ठायीं जाणलियाविण जाणावें, तें असें तसें ह्मणतां न ये, तें स्वप्रकाश स्वसंवेद्य आहे, हें ज्याचा तो च जाणतो, येरा टगमग. ज्याप्रमाणें मुक्यानें साकर खाल्ली, पण तिची गोडी कांहीं त्याला सांगतां येणार नाहीं; तरी पण, त्याचें अंतर निवालें ही गोष्ट मात्र खरी. " तैसें सुख असे " यैसें जें कांहीं आहे, रत्नाकरा तूं तद्रूप होये, पुढें उपदेशाची राहिली सोये, **अनुभवें** चि जाणावें ". असो, येथपर्यंत यांतील विषयाचें सामान्य विवेचन केलें. याची फलश्रुति काय आहे ती श्रीरत्नाकरांच्या च शब्दांत देऊन प्रस्तावना पुरी करूं.

हा **उपदेशरत्नाकर** ग्रंथ । जेणें वस्तु होये हस्तगत ।
पावे **जीवन्मुक्ति** त्वरित । संदेह नाहीं ॥
याचें श्रवणमनन करितां । पाविजे आपुली पूर्णता ।
हा अज्ञानरयेनीचा सविता । जाला असे ॥
याचे प्रकाशेकरोनि । संसार करी तो न पडे पतनीं ।
जीवन्मुक्त होऊनि । राहें बापा ॥
सर्व संदेहातें तजोनि । हा ग्रंथ चि गुरु ह्मणोनि ।
वाचावा प्रतिदिनीं । भावबळें ॥

याचा अनुभव श्रीरामकृपेनें आपल्याला लाभेल तो सुदिन !

धुळें,
अक्षयतृतिया १८३६

श्रीरामार्पणमस्तु.

## ॥ श्रीनाथपरब्रह्मणेनमः ॥

## ॥ श्रीगुरवेनमः ॥

ॐ नमो सद्गुरुरामा । पूर्णात्पूर्ण निजधामा ।
अनाथ जनाचिया विश्रामा । सद्गुरुराया ॥ १ ॥
मी अनाथ असे अपराधी । माझी मज नाहीं शुधी[1] ।
विशयेसंगें जालिसे बुधी । मळीन माझी ॥ २ ॥
तेणें कोनें[2] मज कांहीं । स्वामी सुचत नाहीं ।
बुडालों ममताडोहीं[3] । मायामोहें ॥ ३ ॥
स्त्रीपुत्रधनासी जाणं । मन वेधलेंसे प्रमाणं ।
बुधी[4] पावे विशयेध्यानें[5] । आतां काये करूं ॥ ४ ॥
परमार्थी तों चित्त नाहीं । फळाशा वसे देहीं ।
परि नामाची सुचना कांहीं । नसे मज ॥ ५ ॥
न भावे चि संतसंगति । द्वेश तों अपार असे चित्तीं ।
कथाकिर्तनप्रीति[7] । न बैसे चि ॥ ६ ॥
येतो देहाचा अभिमान । न रुचे चि पुराणश्रवण ।
कामक्रोधलोभें जाण । वेष्टियेलें ॥ ७ ॥
शुभ अशुभ न कळे कांहीं । पडलों वासनेचे प्रवाहीं ।
बुडालों चिंतेचे डोहीं । सद्गुरुराया ॥ ८ ॥
यैसा मी पतित पतित । स्थिर नव्हे चि माझें चित्त ।
जेणें कोण होये हित । तें चि उपदेशं[9] ॥ ९ ॥
तुह्मी ह्मणाल तूं वेदशास्त्रें[8] पाहे । तेणं कोणें[10] तुझें हित होये ।
मज पुसतोसी काये । कांटाळवाणें ॥ १० ॥
तरी स्वामी म्यां वेदशास्त्रें पाहिलीं । तेणें कोण विद्येची अहंता आली ।
चित्तवृति असे भांबावली । विषयेसुखासी ॥ ११ ॥

---

१ 'रा' प्रतींत–'गा शुद्धी' आहे. २ म–करोन. ३ रा–महा. ४ म–तेणें-करोन. ५ रा, म–बुद्धि. ६ म–विषयासमान. ७ म–चित्तीं. ८ रा–वेदशास्त्र. ९ रा–उपदेशावें. १० म–करोनी.

कोण्ही स्तुत माझी करी । तेव्हां संतोश लागे अंतरीं ।
अनादरें जालियावरी । जीव जावो पाहे ॥ १२ ॥
विद्येचे अभिमानें कांहीं । वादवेवाद केले पाही ।
निश्चळता तों चित्तीं नाहीं । अणुमात्र ॥ १३ ॥
मान्यताकारणें घरोघरीं । मी फिरलों स्वानापरी ।
परी निवृति न ये चि अंतरीं । कांहीं केल्या ॥ १४ ॥
[1]ह्मणवोनि तुम्हां आलों शरण । अंगिकारें[2] करा दीन जाणोन ।
सांगा अनुभवाची खूण । स्वामिराजा ॥ १५ ॥
ज्यासी ब्रम्हा विष्णु ध्याती । जें व्यापक सर्वांभूतीं ।
तें सांगावें मजप्रति । कृपा करोनि ॥ १६ ॥
ज्यासी आदिमध्यअवसान नाहीं । जेथें दिवसरात्रीचा अभाव पाँहीं[3] ।
जे सर्वपणें चि सर्वांठायीं । तें सांगिजे ॥ १७ ॥
यैसें ह्मणोनियां सत्वर । केला साष्टांग नमस्कार ।
पतित जाणोनि अंगिकार । कीजे स्वामी ॥ १८ ॥
यैसी आयेकोनि विनंती । प्रसन्न जाली गुरुमूर्ति ।
उचलोनि दोहीं हातीं । आलिंगन दिल्हें ॥ १९ ॥
ह्मणे धन्य धन्य रे तूं आतां । अपूर्व प्रश्न झालासी रे पुसता ।
तूं सावध होऊनियां चित्ता । आयेकें कथा[4] ॥ २० ॥
त्वां जें पुसिलें निजगुज । तें मी सांगतों रे तुज ।
तूं हें मनीं धरोनि काज । करीं आपुलें ॥ २१ ॥
पुसलियावेगळें कांहीं । ब्रह्मज्ञान सांगों नये पाहीं ।
उपावो न सांगतां नाहीं । बोध होत ॥ २२ ॥
ह्मणवोनि ज्ञानासी कारण । सिष्यश्रद्धा[5] चि प्रमाण ।
जैसे क्षुधेविण भोजन । न भावे चि[6] ॥ २३ ॥
सर्व प्रपंच मिथ्या जाणोनि । श्रद्धा होये आत्मज्ञानीं ।
त्यासी सांगतां ततक्षणीं । बोध होये ॥ २४ ॥
पुसिलियाविना सांगतां ज्ञान । त्यासी ये [7]ज्यादा अभिमान ।
मग तो शब्दब्रह्म चि जाण । बकवा करी ॥ २५ ॥

---

१ रा-ह्मणवोनी स्वामी. २ रा-अंगिकारले. ३ म-नाहीं. ४ रा-उपदेशा.
५ रा-शिष्य असावा श्रद्धायुक्त जाण. ६ म-रुचे पैं. ७ रा-देह, म-अधिक.

जैसें[3] मर्कटासी रत्नभूशण । कीं खरासी अरगजालेपन ।
तैसें अज्ञानासी सांगतां ज्ञान । कोण उपयोग ॥ २६ ॥
काजळकुंकू विध्वेसी । किंवा पयेपान ज्वरिताशी ।
तैसें ज्ञान सांगतां अज्ञानासी । उपयोगासी न ये ॥ २७ ॥
जैसें आंधळियापुढें दर्पण । किंवा बहिरियापुढें कीर्तन ।
तैसें श्रधाहीनासी ज्ञान । सांगतां होये ॥ २८ ॥
तरी तुझी श्रधा देखोनि । मज आनंद वाटला रे मनीं ।
तूं बैस येकाग्र चित्त करोनि । सावधान ॥ २९ ॥
श्रवण करोनि मनन करी । देहबुधी सांडोनि दुरी ।
तेणें तुज निर्धारीं । स्वहित होये ॥ ३० ॥
तेवं रत्नाकर करी विनंती । हे देहबुधी कैसी गुरुमूर्ति ।
सांडावी ते निगुती । सांगावी मज ॥ ३१ ॥
सांगितल्यावेगळें कांहीं । मज उमजणार नाहीं ।
ह्मणयोनि कृपा करोनि लवलाही । सांगा मज ॥ ३२ ॥
तुह्मी जें सांगाल कृपा करोन । तें मी मनीं धरीन आपण ।
तेणें देहबुद्धी सांडीन । तात्काळ चि ॥ ३३ ॥
तवं गुरु ह्मणती सावधान । च्यार्‍ही देहांतें निरसेन ।
तूं राहें साक्षी होऊन । तेणें तरसील ॥ ३४ ॥
तूं तों देहावेगळा चि आहेसी । आत्माभ्रमें मी देह मानसी ।
तेणें चि अधोपतन पावसी । सत्य मानी ॥ ३५ ॥
अधोपतनाचें कारण । तो हा देहाभिमान ।
ह्मणवोनि याचें निरशन । करोनि साक्षी राहें ॥ ३६ ॥
तवं रत्नाकर ह्मणे स्वामी । च्यार्‍ही देहांसी जाणत नाहीं मी ।
वेगळें करोनियां तुह्मी । सांगा मज ॥ ३७ ॥
मी तों अज्ञान मंदमति । अणुमात्र नसे भावभक्ति ।
जैसें असेल तैसें येथास्थिति । सांगिजे जी ॥ ३८ ॥
च्यार्‍ही देह ते कोण कोण । सांगावे ते वेगळे करोन ।
आपुला अंकित जाणोन । कृपादृष्टीं ॥ ३९ ॥
चर्मदृष्टि दूर करोनि । ज्ञानदृष्टि देयीं मजलागोनि ।
येसें ह्मणोनियां चरणीं । घातली मिठी ॥ ४० ॥

---

१ ही संबंध ओंवी रा प्रतीत नाहीं. २ म–मग. ३ रा–कृपादृष्टी करावी.

सद्गुरु ह्मणती ऊठ रे आतां। सावध होऊनि बैसे चित्ता।
तुझें समाधान होये ताता। तें मी सांगतुसे ॥ ४१ ॥
हें सिधांतपक्षीचें ज्ञान। न मिळे पाहातां शास्त्रपुराण।
जें जपतपें जाण। प्राप्त नोहे चि ॥ ४२ ॥
तीर्थव्रतअनुष्ठाना। ज्याच्या न कळेति चि खुणा।
ज्यासी नातुडे ध्यानधारणा। तें सांगतुसे ॥ ४३ ॥
जें न सांपडे नानामतीं। ज्यासाठीं वेदशास्त्रें वेवादती।
तें मी तुज येथास्थितीं। सांगतुसे ॥ ४४ ॥
जें तीर्थव्रतें करितां जाण। प्राप्त नोहे ये चि मौन।
तें मी सांगतों तुजलागोन। सावध होयीं ॥ ४५ ॥
जें परा वाचा पर आहे। जें वैखरीमाजीं न ये।
तें मी सांगतों तुज पाहें। विचारोनि ॥ ४६ ॥
संकल्प विकल्प तजोनि। मी सांगतों तें धरीं रे मनीं।
तेणें तुझी चुकेल² हानी। संसारभयाची ॥ ४७ ॥
हें गुह्य सर्वां लागोनि। प्राप्त नाहीं सत्य मानीं।
तें मी तुझी श्रद्धा देखोनि। सांगतु असे ॥ ४८ ॥
जें नातुडे नाना सायास करितां। तें मी सांगतों रे तुज सुता।
तूं सावध होऊनियां रे आतां। आयकें बापा ॥ ४९ ॥
स्थूळ देह आऊट हात आहे। रक्तवर्ण ब्रह्मा दैवत पाहें।
रजोगुण अकारमात्रा होये। जाग्रुति अवस्ता ॥ ५० ॥
वैखरी वाचा त्रिकुटिस्थान। अर्धशून्य ऱ्हस्व मात्रका जाण।
रुग्वेद श्रुजैनाक्रिया मान। पृथ्वीतत्व ॥ ५१ ॥
खेचरी मुद्रा पिपीलिका मार्ग जाण। घटाकाश नेत्रस्थान।
सत्यलोक विश्व अभिमानी मान। गायत्री प्रथम पाद ॥ ५२ ॥
क्षर निर्णय वडवाग्नी। विषयानंद अहं अहंकार मानी।
हे स्थूळ देहीं निर्वाणीं। नांदताती ॥ ५३ ॥
या सर्वांचा आत्मा जाणतां। असे या सर्वांहोन परता।
हें तूं जाणोनि चित्ता। साक्षी होये ॥ ५४ ॥

---

१ म-निधान. २ रा-यातायात हानी. ३ सृजन=जनन क्रिया. ४ म-ही ओवी पुढें दिली आहे.

यांहोनि तूं वेगळा आहेसि । ह्मणवोनि यां सर्वांसी जाणसी ।
परी तूं अज्ञानें भ्रमलासी । ह्मणवोनि नेणसी च ॥ ५५ ॥
तूं ह्मणसी मी च देहे । ह्मणवोनि मोहिलासी मायामोहें ।
आतां तूं सावध होये । विवेक ऐकोनि ॥ ५६ ॥
देह तों पंचभूतात्मक आहे । यामाजीं नाना विकार पाहें ।
तूं तों निर्विकार काये । भुलसी बापा ॥ ५७ ॥
तूं जरी देह असतासी । तरी देहाचे कर्मातें न जाणतासी ।
तूं देहावेगळा आहेसि । रत्नाकर ॥ ५८ ॥
तुज देहासी नातें नाहीं । परि तूं भ्रमें चि मानिसी पाहीं ।
जैसा रज्जुचे ठायीं । साप भासे ॥ ५९ ॥
रज्जु चि आयिती आहे । परि अंधकारें भ्रांति होये ।
हें तूं विचारोनि पाहें । ज्ञानदृष्टीं ॥ ६० ॥
तवं रत्नाकर करी विनंती । सांगा पंचभूतांची स्थिति ।
पांचांचे पंचवीस गुण होती । कोणें प्रकारें ॥ ६१ ॥
याचा विचार करोनि[1] । मज सांगावें ततक्षणीं ।
ह्मणवोनि माथा चरणीं । ठेवियला ॥ ६२ ॥
सद्गुरु ह्मणती ऊठ उठी । सर्व विकार धरोनियां मुठीं ।
माझी आयेकोन गोष्टी । तैसा चि राहें ॥ ६३ ॥
जें गुह्याचें गुह्य सार । तें मी सांगतों साचार ।
कां जे तुज[2] प्रसन्न ज्ञानेश्वर । ह्मणोनिया ॥ ६४ ॥
साधुसंतांची कृपा तुजवर । ह्मणवोनि मी गुह्य सांगतों साचार[3] ।
तूं याचा करोनियां विचार । हृदयीं धरावें ॥ ६५ ॥
हृदयीं धरोनियां आतां । तजावी मायाममता[4] ।
तेणें तुझ्या भववेथा । चुकतील ॥ ६६ ॥
आकाश वायु तेज आप पृथ्वी जाण । हे पंचभूतें आयेके ज्ञान ।
याचा तूं जाणता यांहोन । वेगळा चि ॥ ६७ ॥
हें पंचभूतें तुझे ठायीं । जैसी आकाशीं अभ्रें पाहीं ।
तूं आकाशवत् राहीं । निर्विकार ॥ ६८ ॥

---

१ म-करोनि. २ रा-ज्ञानेश्वराचा वर. ३ रा-ज्ञानविचार. ४ रा-मोहमाया ममता.

पांचांचे जाले पंचीस गुण । ते मी सांगतों वेगळे करोन ।
तूं आयेकें देवोनि[1] कान । भावबळें ॥ ६९ ॥
काम क्रोध लोभ मोहो भय जाण । हे आकाशापासाव निर्माण ।
तूं तों यांचा जाणता यांहोन । वेगळा चि ॥ ७० ॥
प्रसरण चांचल्य गमन । भ्रमण आणि आकुंचन ।
हे वायुपासाव निर्माण । होती बापा ॥ ७१ ॥
तूं यांचा जाणता आहेसी । ह्मणवोनियां यांतें जाणसी ।
यैसें जाणोनि मानसीं । सुखी राहें ॥ ७२ ॥
निद्रा भोग त्रुशा क्षुधा आळस । हे तेजाचे गुण सर्वस्व ।
तरी चित्तासी आणोनि अंश[2] । साक्षी होऊनि राहें ॥ ७३ ॥
श्लेष्म शुक्र रक्त मुत्र मेद जाण । हे जळापासाव जालीं निर्माण ।
तूं तों यांचा प्रकाशक यांहोन । वेगळा चि ॥ ७४ ॥
रोम त्वचा नाडी अस्थी मांश जाण । हे पृथ्वीपासाव निर्माण ।
तुसीं यासीं नातें नाहीं ह्मूण । धरावी मनीं ॥ ७५ ॥
यैसे पांचांचे पंचवीस जाले । ते सविस्तरें सांगितले ।
हे तूं मनीं धरोनि आपुले । हित करीं ॥ ७६ ॥
यांपासोनि तूं आपणासी । वेगळें मानीं निश्चयेंसीं ।
स्थूळ देहासी आणि तुजसी । नातें नाहीं ॥ ७७ ॥
जैसा गृहामाजीं दीपक राहे । परी दीपक कांहीं घर नोहे ।
तैसा तूं आपणासी पाहें । स्थूळामाजीं ॥ ७८ ॥
किंवा वृक्षातळीं पंथिक । बैसला आहे देख ।
तैसा तूं आपणासी लेख । स्थूळामाजीं ॥ ७९ ॥
स्थूळ आपणाहोनि भिन्न मानीं । यासी च्यार वर्ण च्यार आश्रम जाणीं ।
स्थूळ महादुःखाची खाणी । जाण बापा ॥ ८० ॥
स्त्रीपुत्रघरधनादिक । हें स्थूळाचें[3] वैभव देख ।
तीर्थयात्रा जप तप सम्यक । स्थूळासी च ॥ ८१ ॥
नाना प्रकारीचे भोगविळास । स्थूळायोगें होती जीवास ।
वेदशास्त्रपुराण सर्वस[4] । स्थूळाचे योगें ॥ ८२ ॥

---

१ म–चित्त देवोन. २ म–अनुभवास. ३ म–स्थूळ देहाचें. ४ म–इतिहास. रा–सर्वस्व.

नाना प्रकारींचीं अनुष्ठानें । हें स्थूळाचे यौगें[1] जाणणें ।
त्वां स्थूळाहोनि मानणें । वेगळें आपणा ॥ ८३ ॥
तूं स्थूळ आणि स्थुळींच्या कर्मासी । साक्षीरूपें कोण जाणसी ।
ह्मणवोनि तूं स्थूळ नव्हसी । साच मानीं ॥ ८४ ॥
जे जे स्थूळ भास होये । तें तें अवघें मिथ्या पाहे ।
जैसें अभ्र नाना वर्ण आहे । परि ते मिथ्या ॥ ८५ ॥
तैसें स्थुळाचें वैभव जाण । जैसें गंधर्वनगर मृगतृष्णा[2] मान ।
तूं याचा जाणता याहोन । वेगळा चि ॥ ८६ ॥
ह्मणवोनि स्थुळापासाव चित्ता । वेगीं काढीं रे तूं आतां ।
जैसा पायेपोस सांडोनि सुता । गृहामाजीं जावें ॥ ८७ ॥
जैसा कांत सांडोनि सर्प जाण । प्रवेशे बिळीं जावोन ।
तैसा तूं स्थूळ देह सोडोन । श्रवण करीं ॥ ८८ ॥
जैसें शव जाळोनि स्मशानीं । जन प्रवेश करी सदनीं ।
तैसा तूं स्थूळातें सांडोनि । कथा आयेकें ॥ ८९ ॥
जैसें महाराचें घर दुरोनि । नेत्रीं पहावें सत्य मानीं ।
परि त्यामाजीं जावोनि । वस्ति न करावी ॥ ९० ॥
पाहिल्यानें विटाळ नाहीं होत । वस्ति केल्यानें होये फजित ।
तैसें स्थूळासी मानोनि चित्त । सावध करीं ॥ ९१ ॥
जें जें जागृत अवस्थेतें[3] जाणवलें । तें तूं मिथ्या सांडीं वहिलें ।
साक्षी जाणोनिया आपुलें । हित करीं ॥ ९२ ॥
तूं जागृत अवस्था नव्हसी । जागृतीचा जाणता आहेसी ।
ह्मणवोनि जागृतिहोनि आपणासी । वेगळें मानीं ॥ ९३ ॥
वेदशास्त्रपुराणश्रवण । जपतप नाना अनुष्ठान ।
तीर्थयात्रा होमहवन । जागृतीसी[4] ॥ ९४ ॥
पिंडब्रह्मांड आदिकरोन । भूतभविष्यवर्तमान ।
चौदा विद्या चौसट कळा जाण । जागृति जाणे ॥ ९५ ॥
जें कांहीं आकार आलें असे । त्यातें जागृति जाणतु असे ।
ते जागृति नेत्रस्थानीं वसे । साच मानीं ॥ ९६ ॥

---

१ रा-आंगें. २ रा-जल. ३ रा-अवस्थेंत. ४ रा-हें सकळ जागृतीमाजी होये ॥

नाना आकृति नाना रंग जाण । च्यार वाणी च्यार खाणी आदिकरोन
सप्त पाताळें येकवीस स्वर्गे जाण । जागृति जाणे ॥ ९७ ॥
जें जें जागृतीमार्जी आलें । तें वमनप्राये सांडीं वहिलें ।
पुढें लिंगदेहाचें कथन आरंभिलें । तें आयेकावें ॥ ९८ ॥
यैसी आयिकतां सद्गुरुवाणी । रत्नाकरें मिठी घातली चरणीं ।
स्थूळ देहाचें बंधन तोडोनि । केलें वेगळें ॥ ९९ ॥
मी तों माझा वेगळा चि आहे । परि भ्रमें चि भुललों होतों पाहें ।
आतां स्वामींचे धरितां पाये । सुखी जालों ॥ १०० ॥
मीं आपणासी स्थूळ चि मानोनि । याचें सुखदुःख मानीत होतों मनीं
संसाराचा अभिमान धरोनि । करित[1] होतों ॥ १ ॥
स्थूळाची प्रतिष्ठा होतां । संतोश लागे फार चित्ता ।
कांहीं अभिमान होतां । दुःख लागे ॥ २ ॥
उत्तम वस्त्रें परिधान । उत्तम अन्न भोजनालागोन ।
स्थूळासी रहावया जाण । घरें केलीं[2] ॥ ३ ॥
स्त्रीसी अळंकारभूशणें घातलीं । पोरांची अत्यंत निगा केली ।
वतनें मोठालीं साधिलीं । स्थूळायोगें ॥ ४ ॥
अश्वरथादिक वाहान । लक्षेमी मेळविली ह्य्यासें करोन ।
कर्णमुद्रिका हस्तमुद्रिका जाण । लेवविल्यां[3] ॥ ५ ॥
उदंड ज्ञातीचा केला अभिमान । वादवेवाद केले[4] जाण ।
सा दर्शनें आदिकरोन । स्थुळीं जालीं ॥ ६ ॥
सा दर्शनें छत्तीस पाखांडें । याचीं स्थूळायोगें चालिलीं बंडें ।
येहीं केलीं बहुतांचीं काळें तोंडें । साच मानीं ॥ ७ ॥
त्या स्थूळाचें निरशन । स्वामी केलें अनुभवें करोन ।
आतां मी स्थूळ नोहे ह्मणवोन । भासलेंसे[5] ॥ ८ ॥
ज्यां स्थूळ सत्य मानिलें होतें । तें विवेकविचारें झालें परतें ।
मी भ्रमें चि मृगजळातें । पीत होतों ॥ ९ ॥
आतां लिंगदेहाची स्थिति । मज सांगावी गुरुमूर्ति ।
स्थूळापासाव तों निवृत्ति । जाली माझी ॥ ११० ॥

---

१ रा-वर्त्तत. म-भ्रमित. २ रा-नाना कौतुकाची. ३ रा-आंगीं. ४ रा-वितंड. ५ रा-मज.

तवं सद्गुरु ह्मणती सावधान । आयेकें लिंगदेहाचें निरशन ।
जें कल्पनेचें अधिष्ठान । तें आयिकावें ॥ ११ ॥
लिंगदेहाचें निरशन जालें नाहीं । तवंवरी सुखाची प्राप्ति ना होये काहीं ।
ह्मणवोनि सावध होऊनि पाहीं । आपणासी ॥ १२ ॥
लिंगदेह अंगुष्टप्रमाण । उकार मात्रुका श्वेतवर्ण ।
विष्णु दैवत असे जाण । सिष्यवत्सा ॥ १३ ॥
स्वप्न अवस्था श्रीहट स्थान । मध्यमा वाचा उर्ध शून्य ।
दीर्घ मात्रुका येजुर्वेद मान । तये देहीं ॥ १४ ॥
पाळण क्रिया आप तत्त्व जाण । भूचरी मुद्रा विहंगम मार्ग मान ।
वैकुंठ लोक कंठ स्थान । द्वितीय पाद गायत्री ॥ १५ ॥
अक्षर निर्णय मंदाग्नी । कोहं अहंकार सत्य मानी ।
समीपता मुक्ति मानीं । काकविष्टासमान ॥ १६ ॥
तुज म्यां जें सांगितलें निरोपण । तें सांडावयासी लागोन ।
तूं याचा साक्षी याहोन । वेगळा आहेसि ॥ १७ ॥
लिंगदेहाचे ठायीं पाहें । सुक्षम पंचभूतें आहे ।
त्याचा विचार सांगतों होये । सावधान[1] ॥ १८ ॥
आकाश वायू तेज जाण । आप आणि पृथ्वी मान ।
या पांचापासोन पंचीस गुण । लिंगदेहीं होती ॥ १९ ॥
अंतःकरण मन बुद्धि चित्त अहंकार । हे आकाशापासाव जाले साचार ।
तूं याचा साक्षी याहोनि पर । असशी बापा ॥ २० ॥
तूं मन असतासि जाण । तरी मनकल्पनेचे तुज नसतें ज्ञान ।
तूं मनासी जाणसी ह्मणवोन । वेगळा चि ॥ २१ ॥
मन जे जे संकल्प विकल्प करी । त्याचा तूं द्रष्टा निर्धारीं ।
ह्मणवोनि मन सांडोनि दुरी । स्वहित कीजे ॥ २२ ॥
जें जें मनामाजीं आलें । तें तूं सांडोनियां वहिलें ।
स्वहित करीं रे आपुलें । लागवेगें ॥ २३ ॥
बंधमुक्तता मनें चि होये । मनें नाना योनि पाहे ।
तूं तों मनाचा साक्षी होऊन राहे । निर्विकल्प ॥ २४ ॥

---

1 रा–सावधान असावें.

ध्यान धारणा करितां परियेसी । मन नाटोपे बहुत सायासीं ।
मनें ठकिले थोर थोर रुषी । साच मानी ॥ २५ ॥
तरी तूं मनाचें केलें साच न मानीं । राहें मनाचा साक्षी होऊनि ।
तूं बुधीचा हि निर्वाणीं । साक्षी बापा ॥ २६ ॥
जरी तूं बुधी चि असतासि । तरी बुधीनिश्चया न जाणतासि ।
तूं बुधीचे निश्चया जांणसी । ह्मणोनि वेगळा ॥ २७ ॥
तूं चित्ताचा साक्षी आहेसि । ह्मणवोनि चित्ताचें चिंतिलें जाणसी ।
तूं अहंकाराचा साक्षी होसि । सत्य मानीं[1] ॥ २८ ॥
निर्विकल्प अंतःकरण । संकल्पविकल्पात्मक मन ।
निश्चय करीं ते बुधी जाण । आपुले मनीं ॥ २९ ॥
जो बुधीनें निश्चये केला असे । त्याचें चित्त चिंतन करीतसे ।
चित्तें चिंतिला त्याचा येतुसे । अहंकार ॥ ३० ॥
तूं या सर्वांतें जाणसी । ह्मणवोनिया साक्षी होसी ।
हे खुण धरोनि मानसीं । हित करीं ॥ ३१ ॥
तूं आकाश आणि आकाशाचे जवितें[2] ।
साक्षीरूपें अससी जाणत । यैसें जाणोनियां हित । करीं आपुलें ॥ ३२ ॥
व्यान समान उदान । प्राण आणि[3] अपान जाण ।
हे वायोपासोनि निर्माण । जालीं बापा ॥ ३३ ॥
तूं त्यांचा साक्षी आहेसी । ह्मणवोनि यांचिया कर्मा जाणसी ।
जतन करीं तूं या ज्ञानासी । भावबळें ॥ ३४ ॥
श्रोत्र त्वचा चक्षु जिव्हा जाण । आणिक पांचवें इंद्रिय घ्राण ।
हे तेजापासाव जालीं निर्माण । तूं वेगळा चि ॥ ३५ ॥
वाचा पाणी पाद सिस्न । पांचवें गुद तूं साच मान ।
हे जालीं जळापासोन । तूं तो साक्षी यांचा ॥ ३६ ॥
शब्द स्पर्श रूप रस गंध जाण । हे पृथ्वीपासोन जाले निर्माण ।
तूं यांचा साक्षी याहोन । वेगळा चि ॥ ३७ ॥
यैसें हें लिंगदेहाचें विवरण । सांगितलें म्यां तुजलागोन ।
तूं यातें विशप्राये मानोन । त्याग करीं[4] ॥ ३८ ॥

---

१ रा–मानी पुत्रा. २ म–जनिता. ३ म–आणि पांचवा. ४ रा–करी सत्छिष्या.

वितंड. ५ रा–भ.

सवीस कळांचे लिंगदेहे आहे । तूं याचा साक्षी विचारोनि पाहें ।
निर्विकार होऊनि राहें । सहजीं सहज ॥ ३९ ॥
अंतःकरण प्राणपंचक । विशयेपंचक ज्ञानइंद्रिये देख ।
कर्मइंद्रियें आणिक । यैसीं पंचवीस जाली ॥ ४० ॥
हे इतकीं हि जड आहेति । जीवाच्यायोगें चैतन्य होती ।
ह्मणवोनि जीवासी ह्मणती । सविसावी कळा ॥ ४१ ॥
तूं तों जीवाचा हि साक्षी आहेसि । ह्मणवोनि जीवाचे कर्म जाणसी।
तरी कल्पना सांडोनि स्वहितासी । करोनि घेयीं ॥ ४२ ॥
तूं जरी लिंगदेह असतासी । तरी लिंगदेहातें न जाणतासी ।
वेगळेंपणें चि तूं जाणसी । साक्षीरूप ॥ ४३ ॥
यातायातीचें कारण आहे । तो हा लिंगदेह तूं पाहें ।
याचें निरशन करोनि राहें । निर्द्वंद बापा ॥ ४४ ॥
तूं आत्मा भ्रमें मी च मानिसी । ह्मणवोनि कासाविसी होसी ।
आतां वेगळें चि होतां चि पावसी । सुखासी बापा ॥ ४५ ॥
लिंगदेह कंठस्थान । स्वप्नअवस्था तेथें जाण ।
हें सर्व हि मिथ्या जाणोन । विसरोनि जाये ॥ ४६ ॥
जैसें अभ्र नानाप्रकारिचें दिसे । परि ते कांहीं सत्य नसे ।
जाणोनियां तूं यैसें । सुखी होये ॥ ४७ ॥
जाग्रत अवस्ता स्वप्न अवस्ता । यांचा तूं आहेसी जाणता ।
यैसें जाणोनि या सांडिता । होयीं बापा ॥ ४८ ॥
जैसें स्वप्न देखोनि जागृतीसी । मिथ्या मानावें मानसीं ।
तैसें या देहद्वयासी । मानावें गा ॥ ४९ ॥
तूं द्वयदेहाचा प्रकाशकर्ता । अससी यांहोनि यांपरता ।
यैसें जाणोनियां आतां । निरहेत राहे ॥ ५० ॥
आतां कारणदेहाचा विचार । सांगतों मी तुज साचार ।
होऊनियां सादर । आयेकावें ॥ ५१ ॥
यैसें आयेकोनि वचन । बोले रत्नाकर कर जोडुन ।
देहद्वयाचें बंधन । तोडिलें स्वामी ॥ ५२ ॥
म्यां या देहद्वयाचे अभिमानेकरोन । संसार सत्य मानिला जाण ।
तेणें कोण अभिमान । येत होता ॥ ५३ ॥

तेणें केलें बहोत फजित । नामरूपात्मक वांटे सत्य ।
यैसा बुडत होतों मी पतित । तों तारिलों ॥ ५४ ॥
जैसा राजा स्वप्नीं मजुर होये । नाना विपत्ति भोगिताहे ।
तैसें देहद्वयाचे संगें पाहें । मज होत होतें ॥ ५५ ॥
मी माझा होतों अंतरलों । ह्मणवोनि बंधमुक्तता मानिता जालों ।
तुमचे कृपाकटाक्षें तरलों । हेळामात्रें ॥ ५६ ॥
आतां कारणदेहाचा विचार । स्वामी सांगिजो जी साचार ।
आपला जाणोनियां पामर । तारा स्वामी ॥ ५७ ॥
तंव सद्गुरु ह्मणती सावधान । आयेकें कारणदेहाचें निरोपण ।
देहद्वयाचें सांडोनियां भानें । सावध होये ॥ ५८ ॥
कारणदेह अर्धपर्व स्यामवर्ण । मकार मात्रुका गोल्हाटस्थान ।
परयंति वाचा मध्य शून्य । साच मानीं ॥ ५९ ॥
तमोगुण सामवेद आहे । चाचरीमुद्रा कपिमार्ग होये ।
महदाकाश हृदयेस्थान पाहे । प्राज्ञ अभिमानी ॥ ६० ॥
कूटस्थनिर्णये उदराग्नि । त्रुतीये पाद गायेत्री मानीं ।
अद्वैतानंद होये निर्वाणीं । इच्छाशक्ति ॥ ६१ ॥
यितकेन कारणदेह जाण । तूं याचा साक्षी वेगळा याहोन ।
सुषुप्तिअवस्थेचें तुज ज्ञान । आहे बापा ॥ ६२ ॥
ह्मणवोनि तूं सुपुप्तिअवस्था नव्हसी । वेगळें जाणोनि आपणासी ।
निरहेत होऊन मानसीं । राहें आतां ॥ ६३ ॥
स्थूळ सुक्षम कारणदेह जाण । तूं याचा जाणता वेगळा याहोन ।
आतां महाकारणाचें निरोपण । सांगतों तुज ॥ ६४ ॥
महाकारणदेह मसुराप्रमाण । यिकार मात्रुका नीळवर्ण ।
ईश्वरदैवत औठ पीठ स्थान । परा वाचा ॥ ६५ ॥
महासून्य अर्धमात्रुका आहे । अथर्वण वेद वायुतत्व पाहे ।
यैसें जाणोनियां उगा राहे । अनुभवेंसीं ॥ ६६ ॥
अगोचरी मुद्रा ज्वाळाकळा जाण । मीनमार्ग चिदाकाश मान ।
अश्रये लोक मूर्धनि स्थान । आयेकावें ॥ ६७ ॥

---

१ रा-वाढलें. २ म-निर्वाण. ३ रा-अद्वैतहोम. ४ रा-तयाचा. ५ म-आकार.

प्रत्यगात्मा अभिमानी पाहें। चतुर्थपाद गायत्री तेथें आहे।
आदिशक्ति विदेहानंद होये। सिवोऽहं अहंकार ॥ ६८ ॥
तुर्या अवस्था जे प्रकाशक। तूं तों तुर्याचा हि साक्षी देख।
हें महाकारणदेह सम्यक। जाणावे सिष्या ॥ ६९ ॥
तूं महाकारणाचा साक्षी आहेसि। ह्मणवोनि महाकारणातें जाणसी।
यैसें जाणोनि कल्पनेसी। सांडीं बापा ॥ ७० ॥
स्थूळ सुक्षम कारण। चौथा देह महाकारण जाण।
याचा साक्षी ज्ञानदेह ह्मणवोन। पांचवा असे ॥ ७१ ॥
पांचवा देह चौदेहांचा प्रकाशक जाण। तेथें सुक्षम वेदाचें आहे स्थान।
उन्मनी अवस्था मान। भ्रमरगुंफा ॥ ७२ ॥
सदासीवदेव पुण्यगिरी। अनुचये मात्रुका असे निर्धारीं।
पूर्णबोध असे साचारी। कळातीत कळा ॥ ७३ ॥
शेषमार्ग निराकाश पाहे। शिखास्थान निराश्रये लोक आहे।
निरंजन अभिमानी होये। ज्ञानदेहीं ॥ ७४ ॥
पंचम परमार्थपाद जाण। ज्ञाननिर्णये ब्रह्माग्नि मान।
ब्रह्मानंद अहं अहंकार ज्ञान। मनीं धरीं जें ॥ ७५ ॥
मी अरूप रूपातीत असे। यैसा अहंकार ज्ञानदेहीं होतुसे।
तूं जाणोनियां यैसें। सावध होयीं ॥ ७६ ॥
च्यार देह च्यार अवस्था जाण। च्यारी वाचा च्यारी वेद मान।
याचा प्रकाशक ज्ञानदेह ह्मणवोन। जाणिजे बापा ॥ ७७ ॥
च्यार वाचा च्यार मुक्ति पाहीं। हे असती च्यार देहाचे ठायीं।
ज्ञानदेहीं नसे चि कांहीं। साच मौनीं ॥ ७८ ॥
ज्ञानदेह स्वप्रकाशक आहे। विरळा कोण्ही जाणो त्याची सोये।
ज्यासी सद्गुरुकृपा होये। तो चि जाणे ॥ ७९ ॥
ज्ञानदेह जोतिस्वरूप जाण। जेथें नाहीं भेदाभेदवर्ण।
याची अनुभवी जाणती खूण। अनुभवें चि ॥ ८० ॥
जें यैसें तैसें ह्मणतां न ये। आणि सर्वांचें आयेतन होये।
यैसें ज्ञानदेह आहे। तें ज्याचा तो चि जाणे ॥ ८१ ॥

---

१ म–पांचवा साक्षी. २ म–अतिकारण असे. ३ रा–अनुचर्यं. ४ रा–मानी शिष्या. ५ रा– जाणे रत्नकरा. ६ म–अंतरी.

रूप वर्ण कांहीं नाहीं । असे तो सर्वां ठायीं ।
जैशी तैसें चि पाहीं । कोंदोन राहिला ॥ ८२ ॥
जो आब्रह्मस्तंभपरियंत येक । ज्यासी आदि मध्य अवसान देख ।
कांहीं नसेते सम्यक । ज्ञानदेहे ॥ ८३ ॥
तो तूं ज्ञानदेह आहेसी । निर्द्वंद निर्विकार परियेसी ।
नाहं कर्ता न भोक्ता मानसी । धरीं खूण ॥ ८४ ॥
अहं कर्ता येसें मानितां । दुःख पाविजे रे सुता ।
नाहं कर्ता येसें भावितां । सुखी असावें ॥ ८५ ॥
बध मुक्तभावनाप्रमाणें । हें तूं निश्चयेंसीं जाण ।
ह्मणवोनि अहं मुक्त मी मानोनि । सुखी सुखासी यावें ॥ ८६ ॥
तूं तों मुळींचा चि मुक्त आहेसि । परि देहसंगें भ्रमला होतासी ।
आतां सावध होऊनि मानसीं । विचार करीं ॥ ८७ ॥
जैसें केळीचें दळ उकलितां । सर्व टरपी च रे सुता ।
तैसे च्यारी देह तूं चित्तां । जाण बापा ॥ ८८ ॥
स्थूळ सुक्षम कारण महाकारण । यांचे सांगितलें तुज निरशन ।
तूं आपणासी वेगळें जाणोन । साक्षी राहें ॥ ८९ ॥
तुज कर्तुत्व नसे कांहीं । तूं अकर्ता वससी देहीं ।
येसें जाणोनियां राहीं । निर्द्वंद बापा ॥ ९० ॥
जरी कांहीं आशंका असेल मनीं । तरी बोलावें रे वचनीं ।
आपुलें स्वहित करोनि । घेयीं आतां ॥ ९१ ॥
जरी न पुसोनि उगा राहसी । तरी तुझा तूं चि अंतरसी ।
ह्मणवोन पुसावें वेगेंसीं । रत्नाकरा ॥ ९२ ॥
सद्गुरुवचन आयेकोनि । बोले रत्नाकर कर जोडुनी ।
स्वामी माझी विनवणी । आयेकावी ॥ ९३ ॥
तुह्मी ह्मणता निःकर्म आहेसि । आणि मी तों करितों सर्व कर्मासी ।
नेत्रें पाहूनि वाचेसी । वदतों स्वामी ॥ ९४ ॥
हातेंकरोन घेतों देतों । पायें करोन येतों जातों ।
मनेंकरोन कल्पितों । कल्पो नये तें ॥ ९५ ॥

---

१ रा-जैश्यास तैसें. २ म-ज्ञानदेही. ३ रा-टरपीचे, अर्थ काय ? ४ म-चित्तत्रवा. ५ रा-सत्वर आतां. ६ रा-मध्यें ही ओवी च नाहीं.

मी देहातीत तों आहे । परि इंद्रियकर्म माझेनि चि होये ।
तेव्हां कर्तुत्व मज आहे । आलें कीं स्वामी ॥ ९६ ॥
ज्ञानइंद्रियें कर्मइंद्रियें । आणि अंतःकरणपंचक पाहें ।
याचा कर्मकर्ता मी च आहे । असें भासतें मज ॥ ९७ ॥
च्यार देहापासोनि मज वेगळें केलें । परि शरिराचें कर्तुत्व तों नाहीं गेलें ।
तेव्हां कर्तुत्व मज असें जडलें । यैसें वाटे मज ॥ ९८ ॥
कां जे हे सर्व जड आहेति । माझेनि हे सर्व वर्तती ।
तेव्हां कर्तुत्व गुरुमूर्ति । मज जडलें गा ॥ ९९ ॥
मी तों कांहीं करीत नाहीं । परि मी इंद्रियें वर्तवितों पाहीं ।
जैसा राजा सेवकाचे हातें कांहीं । कार्य करवी ॥ २०० ॥
शुभ अशुभ कर्म करी सेवक । तें राजयाचे चि माथां देख ।
तैसें इंद्रियांचें कर्म सम्यक । माझे माथां ॥ १ ॥
सेवकाचे कर्में राजयासी । सुख नाहीं निश्चयेसीं ।
तैसा इंद्रियांचे कर्में कासाविसी । होतु असे स्वामी ॥ २ ॥
मी ज्ञानें वेगळा आहें । परि देहकर्म मजविना न होये ।
आणि स्वामी तों ह्मणताहे । जें तूं निःकर्म ॥ ३ ॥
निःकर्म तेव्हां मी होयीन । जेव्हां इंद्रियें होती कर्महीन ।
तेव्हां चि मी सत्य मानीन । मनामाजीं ॥ ४ ॥
यैसें आयेकोनि वचन । सद्गुरु बोलिलेति हांसोन ।
भला भला ह्मणोन । अश्वासिलें ॥ ५ ॥
बरवा प्रश्न केला विचारोन । जेणें तुटे कर्माचें बंधन ।
आतां सावध होऊन । आयेकें कथा ॥ ६ ॥
रत्नाकर इंद्रियांचा प्रवर्तक । तूं नव्हसी च रे देख ।
परि देवतांचें ज्ञान सम्यक । नाहीं तुज ॥ ७ ॥
चौदा दैवतें कोण पाहे । [1]शरीरीं कर्म होत आहे ।
तूं त्या देवतांचा साक्षी काये । भुललासी ॥ ८ ॥
तुज त्या देवतांचें ज्ञान नाहीं । ह्मणवोनि मी च कर्ता ह्मणसी पाहीं ।
तूं कर्ता नोहेसि कांहीं । संदेह न करीं ॥ ९ ॥

---

1 रा–शारिरी इंद्रियें कर्म करिती त्यायोगें पाही ।

जैसें आकाश व्यापक असे । त्यामाजीं सूर्य आणि सृष्टि वसे ।
सूर्य तेजें सृष्टीचें कर्म होतुसे । आकाश अलिप्त ॥ १० ॥
आकाश सूर्य आणि जनासी । व्यापक असे निश्चयेसीं ।
तैसा तूं देवता आणि इंद्रियांसी । आपणामाजीं मानी ॥ ११ ॥
देवता इंद्रियें तुजमाझारीं । तूं अससी त्यांचे सबाह्य अंतरीं ।
तुज कर्तुत्व तिळभरी । नसे बापा ॥ १२ ॥
जैसे तिन्ही काळ येती जाती । परि आकाशाची न पालटे स्थिति ।
तैसे त्रिगुण तुझे ठायीं वर्तती । सत्य मानीं ॥ १३ ॥
यैसें आयेकोनि सद्गुरुवचन । रत्नाकर बोले कर जोडून ।
देवतांचें नाहीं मज ज्ञान । सद्गुरुस्वामी ॥ १४ ॥
कोण इंद्रियाची कोण देवता । तें कृपा करोन सांगावें आतां ।
मग मी होयीन मानिता । आपणा वेगळें ॥ १५ ॥
तवं सद्गुरु ह्मणती सावधान । आयेके देवतांचे निरोपण ।
चौदा देवतें करोन । शरीर चाले ॥ १६ ॥
मन अध्यात्म जाण । मंतव्य आधिभूत मान ।
चंद्रमा आदिदैवत ह्मणवोन । जाण सिष्या ॥ १७ ॥
चंद्रमाचे योगें करोन । मन कल्पना करीतसे जाण ।
तूं तों चंद्रमा आणि मनाचा आपण । साक्षी होसी ॥ १८ ॥
दैवत जेव्हां मंद होये । तेव्हां तें इंद्रिय सुन्य होऊन राहे ।
याची सद्य प्रतीत आहे । सर्व जगासी ॥ १९ ॥
इंद्रिय सुन्य जालें पाहीं । तरी काये आत्मा तेथें नाहीं ।
आत्म्यासी तों येणें जाणें नाहीं । असे सबाह्य स्वतसिध ॥ २० ॥
जैसा सूर्य अस्तमानीं जाये । मग जगाची क्रिया सर्व हि राहे ।
तरी आकाश गेलें काये । जाणिजे मनीं ॥ २१ ॥
आकाश जैसें तैसें व्यापक असे । तूं आपणासी जाण तैसें ।
इंद्रियें आणि देवतास नसे । नातें कांहीं ॥ २२ ॥
मनाचें दैवत चंद्रमा जाण । त्याचे सत्यें करी ते कल्पना मान ।
तूं मन आणि चंद्रम्यातें आपण । व्यापक असती ॥ २३ ॥

---

१ रा-मानीं शिष्या. २ रा-तरी आकाश गेलें काये । परि आकाश जैसें तैसें होय ।. ३ सत्तेनें.

ह्मणवोनि मनाचा चाळक नव्हसी । साक्षी जाणोनि आपणासी ।
अमन होऊनि अहेर्निर्शी । राहे उगा ॥ २४ ॥
बुधीचें दैवत ब्रह्मा आहे । तेणें बुधी निश्चये करिताहे ।
तूं तों बुधी आणि ब्रह्मयातें पाहें । व्यापक असती ॥ २५ ॥
चित्ताचें दैवत नारायेण । तेणें चित्त करितों चिंतन ।
येथें तुझें कर्तुत्व जाण । कांहीं नसे ॥ २६ ॥
अहंकाराचें दैवत शंकर । तेणें शोभा पावे अहंकार ।
तूं शंकर आणि अहंकाराचा सार । साक्षी असती ॥ २७ ॥
यैसी अंतःकरणाचीं दैवतें । म्यां सांगितलीं रे तूतें ।
तूं साक्षी आपणातें । आतां मानीं ॥ २८ ॥
नेत्राचें दैवत सूर्य आहे । तेणें करोन नेत्रासी दिसे पाहें ।
सूर्याविण नेत्र होये । मंद बापा ॥ २९ ॥
देखावें नाना पदार्थासी । हें सामर्थ्य नाहीं नेत्रासी ।
असतें तरी रात्रीसी । देखतें गा ॥ ३० ॥
अंधारीमाजी तो[1] देखत नाहीं । तेव्हां येथें तेज चि प्रधान पाहीं ।
तूं व्यापक नेत्र सूर्याचें ठायीं । वेगळा चि ॥ ३१ ॥
श्रोत्राचें दैवत दिशा आहे । तेणें शब्द श्रवण होये ।
तूं तों कर्ण आणि दिशासी पाहे । व्यापक असती ॥ ३२
वाचेचें दैवत अग्नि जाण । तेणें करोन वाचा बोले मान ।
दैवत हीन जाल्या करोन । मुकें चि होये ॥ ३३ ॥
मुक्याचिये ठायीं काये । आत्मा व्यापक नसे पाहें ।
आत्मा तों जैसा तैसा आहे । परि दैवत चि नाहीं ॥ ३४ ॥
स्पर्शाचें दैवत वायु जाण । तेणें त्वचेसी स्पर्शाचें ज्ञान ।
तूं त्वचा आणि वायोपासोन । वेगळा चि ॥ ३५ ॥
अश्विनीकुमार घ्राणाचें दैवत । तेणें करोन घ्राण सुवास असे घेत ।
तूं अश्विनीकुमार घ्राणातें जाणत । असती बापा ॥ ३६ ॥
वरुण जिव्हेचें दैवत जाण । तेणें करोन होये रसाचें ज्ञान ।
तूं वरुण आणि जिव्हेचा आपण । साक्षी असती ॥ ३७ ॥

---

१ रा–दृष्टीतें दिसत नाहीं. २ म–दशदिशा.

इंद्र हाताचें दैवत । तेणें करोन हात देत घेत ।
तूं तों साक्षीपणें[1] असशी जाणत । दोघांतें हि ॥ ३८ ॥
पायांचें दैवत उपेंद्र जाण । तेणें करिती गमनागमन ।
तूं पाद आणि उपेंद्राहोन । वेगळा चि ॥ ३९ ॥
प्रजापति सिस्णाचें दैवत । तेणें करोन मुत्र भोग करित ।
तूं दोघांतें हि असशी जाणत । साक्षी रूपें ॥ ४० ॥
गुदाचें दैवत येम जाण । तेणें गुदाचें होये क्षरण ।
तूं तों साक्षीरूपें वेगळा आपण । असशी बापा ॥ ४१ ॥
याप्रकारें करोन इंद्रियांसी । देवतायोगें कर्म होयें परियेसी ।
तुसी आणि इंद्रियेकर्मासी । नातें नाहीं ॥ ४२ ॥
ज्या इंद्रियाचें दैवत मंद होये । तें सुन्य होऊनियां जाये ।
जैसें धन्यावेगळें गृह पाहें । सुनें चि गा ॥ ४३ ॥
घर तों जड अचेतन जाण । त्यातें चेतनात्मक धनी माने ।
त्यासी घराचें असे ज्ञान । घर कांहीं नेणे ॥ ४४ ॥
तैसें इंद्रियांचें ठायीं । देवतायौगें कर्म पाहीं ।
तेथें तुझें कर्तुत्व कायी । आहे बापा ॥ ४५ ॥
इंद्रियें चाळावीं कांहीं । हा आत्मयाचा धर्म नाहीं ।
आत्मधर्म असतां तरी पाहीं आंधळे बहिरे[2] न होते ॥ ४६ ।
आत्मयासी येणें जाणें नाहीं । स्वसंवेद्य[3] स्वप्रकाश पाहीं ।
यैसें जाणोनियां राहीं । निर्द्वंद बापा ॥ ४७ ॥
तूं अलख अगोचर आहेसी । जैसा तैसाचि भाससी ।
अलिप्तपणें राहसी । आकाशवत ॥ ४८ ॥
जैसें घटमठाचे ठायीं । आकाश व्यापक असे पाहीं ।
घटमठ भंगतां कांहीं । आकाश न भंगे ॥ ४९ ॥
तैसा आत्मा सर्वा ठायीं । असोनि अलिप्त पाहीं ।
संदेह असेल तरी कांहीं । बोल आतां ॥ ५० ॥
यैसें आयेकोनि सद्गुरुवचन । बोले रत्नाकर कर जोडुन ।
मी ब्रह्म जालों असे पूर्ण । सहजीं सहज ॥ ५१ ॥

---

१ म-असशी साक्षीभूत ।. २ रा-बहिरे मुके. ३ रा-स्वसंवेद्य स्वयंज्योति स्वप्रकाशक.

आतां मी निसंदेह जालों मनीं । भेदबुधीची जाली हानी ।
मी अलख अगोचर व्यापोनि । सर्वत्र असे ॥ ५२ ॥
मी अजात अप्रमाण । नांमरूपासी अतीत जाण ।
मी आदि मधे अवसान । तिन्ही नाहीं ॥ ५३ ॥
मी जन्ममरणासी अतीत । व्यापक असे सदोदित ।
तुमचे कृपेनें यैसी मति । जाली माझी ॥ ५४ ॥
आतां माझ्या ठांयीं । कर्तुत्व नसे चि कांहीं ।
मी देहविदेही पाहीं । जालों असे ॥ ५५ ॥
तवं सद्गुरु ह्मणती भला भला । तुज पूर्ण अनुभव असे जाला ।
आतां संतोश जालासे मला । सिष्य वच्छा ॥ ५६ ॥
रक्तस्वेतस्यामवर्ण । निळे असे मसुराप्रमाण ।
त्यामाजीं जोत जाण । प्रकाशली असे ॥ ५७ ॥
ज्याचेनि सर्व विश्व प्रकाशे । साक्षीपणें विश्वीं असे ।
यैसें जाणोनि अनयासें । तद्रप राहें ॥ ५८ ॥
जैसें मीठ जळीं विरोनि । राहे जळरूप चि होऊनि ।
तैसा देहबुधी सांडोनि । तद्रूप होयें ॥ ५९ ॥
सर्व विश्व ब्रह्म मानोनि । राहें अवकाशरूप होऊनि ।
जें जें दिसे तें तें मानीं । स्वप्नवत आतां ॥ ६० ॥
करणें न करणें सांडोनि । अखंड असावें अनुसंधानीं ।
शरीरभोगा लागोनि । प्रारब्ध प्रमाण ॥ ६१ ॥
जें जें प्रारब्धीं असेल कांहीं । तें तें अनयासें होईल पाहीं ।
ह्मणवोनि तूं तद्रूप राहीं । अइक्यबोधें ॥ ६२ ॥
अशनवसनाची[1] चिंता न करीं । अखंड स्मरावा हरि हरि ।
निरहेत होऊनि अंतरीं । राहे बापा ॥ ६३ ॥
तुज तों कांहीं कर्तुत्व नाहीं । परि शरीरसंगें कर्म आहे पाहीं ।
कर्माविना शरीरासी कांहीं । शोभा नसे ॥ ६४ ॥
ह्मणवोनि विधियुक्त प्रमाणें । स्वकर्म करीं साक्षी होऊन ।
अहंकर्तेपण तजोन । निर्द्वंद राहे ॥ ६५ ॥
जैसा बहुरूपी सोंग घेऊनि । तैसी च संपादणी करी जनीं ।
परि तो जाणतो मनीं । मी हें नोहे ॥ ६६ ॥

१ म–अन्नाच्छादनाची.

ज्या जातीचें सोंग धरी । तैसी च बोली बोले निर्धारीं ।
तैसें शरीरधर्म जाणोनि करीं । स्वकर्म आपुलें ॥ ६७ ॥
गुणाधारें कर्म होये जाण । तूं आपणासी साक्षी मान ।
अहंकर्तेपण तजोनि आपण । कर्मे करावीं ॥ ६८ ॥
कर्म शरीराचा धर्म असे । कांहीं आत्म्याचा धर्म नसे ।
तूं जाणोनियां यैसें । कर्मे करीं ॥ ६९ ॥
फळाशा सर्व तजोनि । स्वकर्म करीं येकनिष्ठा धरोनि ।
मार्गी लेगे बाळ्यांभोळ्यांलागोनि । यैसें करीं ॥ ७० ॥
साक्षी होऊनि कर्मे करी । तो चि ज्ञाता चराचरीं ।
यैसें जाणोनि अंतरीं । कर्मे करीं ॥ ७१ ॥
यैसें सद्गुरुवचन आयेकोनि । बोले रत्नाकर कर जोडोनि ।
मी तों निःकर्म कर्मे करोनि । काये काज ॥ ७२ ॥
तवं सद्गुरु बोलिले हांसोनि । तूं कोण कर्मे कोणाचीं पाहें विचारोनि ।
कर्म ब्रह्मा विष्णु शूळपाणी । करतुसे ॥ ७३ ॥
सनकसनंदन रुषी । व्यास शुक नारद परियेसीं ।
जनक विदेही कर्मासी । करितु असे ॥ ७४ ॥
वसिष्ठ याज्ञवल्की जाण । दुर्वासा आदिकरोन ।
अवतारादिक कर्मे करोन । शोभा पावले ॥ ७५ ॥
ह्मणवोनि जोंवरी शरीर असे कांहीं । तोंवरी कर्म करावें पाहीं ।
हें चि आपणासी उचित नाहीं । आणीक धर्म ॥ ७६ ॥
सर्व आत्मवत जाणोनि । निंदा द्वेष द्यावा सोडोनि ।
शत्रु मित्र समान दोन्हीं । मानावे पैं ॥ ७७ ॥
भक्ति ज्ञान आणि वैराग्य । हें अनुभवप्राप्तीचें भाग्य ।
ह्मणवोनि आवडीनें श्रीरंग । स्मरावा वेगीं ॥ ७८ ॥
नारद तुंबर आदिकरोनि । भक्ति करिताती सत्य मानीं ।
तवं रत्नाकर बोले कर जोडुनी । आयेका स्वामी ॥ ७९ ॥
देवभक्तासी ठाव नाहीं । तरी मी भक्ति करो कोणाची कायी ।
जैसा प्रळयांबुचा सागर पाहीं । तैसें जालें असे ॥ ८० ॥

---

१ रा–हा कांहीं. २ रा–होये. ३ म–अज्ञानालागोनि. ४ रा–करीं आलिप्तत्वें। म–करी तूं ५ रा–म–मी तो निष्कर्म ह्मणवोनि । कर्मे करोनि काये काज ।. ६ रा–पावती. ७ रा–ही ओंवी च नाहीं.

मज मी पाहों जातां जाण । तों मज चि ठाव नाहीं मान ।
पुढें लक्षितां द्वैतभान । दिसोन येतें ॥ ८१ ॥
स्वामी ह्मणती भक्ति करावी निर्वाणी । येणें करोन आशंका जाली मनीं ।
सांगा कृपा करोनि । असेल तैसें ॥ ८२ ॥
तवं सद्गुरु ह्मणती आयेकें वचन । भक्ति करावी तद्रुप होऊन ।
आब्रह्मस्तंभपरियंत जाणोन । भक्ति कीजे ॥ ८३ ॥
जैसी कांहीं जळाची लहरी । क्रीडे त्याची त्यावरी ।
तैसा तद्रुप होऊनि करीं । भक्ति बापा ॥ ८४ ॥
किंवा अळंकार भजती सुवर्णासी । किंवा कापूर भजे परिमळासी ।
प्रकाश भजे दीपासी । तैसें भजन करीं ॥ ८५ ॥
ऊष्णता भजे अग्नीसी । जैसा गूळ भजे गोडीसी ।
पट भजे सूतासी । अद्वैतभावें ॥ ८६ ॥
किंवा घट भजे पृथ्वीसी । कीं पृथ्वी भजे गंधासी ।
तैसें अभेदभावें भक्तीसी । करावें पैं ॥ ८७ ॥
किंवा अवयेवें भजिजे शरीरासी । किंवा शरीरें भजिजे प्राणासी ।
प्राणानें पुजावें जीवासी । तैसी भक्ति करीं ॥ ८८ ॥
सर्व आपण चि होऊनि । भक्ति करावी प्रेमेंकरोनि ।
यैसें वेदशास्त्रीं पुराणीं । सांगितलें आहे ॥ ८९ ॥
शिव विरंची आदिकरोनि । उध्धव प्रल्हाद सत्य मानीं ।
अभेदभावेंकरोनि । भक्ति करिती ॥ ९० ॥
जे जे कोण्ही जाले ब्रह्मज्ञानी । तेहीं भक्ति केली आदरेंकरोनि ।
ह्मणवोनि मी तुजलागोनि । सांगतु असे ॥ ९१ ॥
तूं हें मनीं धरोनि । भक्ति करीं रे प्रेमेंकरोनि ।
आपणासी अलख अगोचर मानीं । ज्ञानदृष्टीनें ॥ ९२ ॥
मी च माझा श्रोता वक्ता जाण । आणि देव भक्त आदिकरोन ।
सर्व आपण चि होऊन । भक्ति कीजे ॥ ९३ ॥
सहस्त्रनामाचा उच्चार करोनि । अहंता दुरी सांडोनि ।
नाचावें निर्लज्ज होऊनि । कीर्तनामाझारीं ॥ ९४ ॥
दीनाहोनि व्हावें दीन । ब्रह्मरूप सर्व मानावे जन ।
सुखदुःख प्रारब्धप्रमाणें । भोगीत जावें ॥ ९५ ॥

परस्त्री मानीं मातेसमान । परधन जैसें पाशाण ।
जीवजातीसी मानावें प्राण । जैसा आपुला ॥ ९६ ॥
अहं ब्रह्मास्मि जाणोन । भक्ति करावी आपण ।
येथें अणुमात्र अनुमान । न करीं कांहीं ॥ ९७ ॥
सर्व आत्मवत जाणावें हें ज्ञान । लीन होऊनि असावें हें भजन ।
विशवत् विशये मनीं मान । हें चि वैराग्य ॥ ९८ ॥
यैसिया प्रकारीं तूं राहें । जोंवरी शरीरीं प्राग आहे ।
हें जीवन्मुक्तीचें लक्षण पाहें । विचारोनि ॥ ९९ ॥
आपण आपणांसी मुक्त मानावें । कर्म त्रिगुणात्मक जाणावें ।
सबाह्य अंतर पाहावें । ब्रह्म येक ॥२००॥
जैसें जळचर जळामाझारीं । तैसें अनंत ब्रह्मांडें ब्रह्माभीतरीं ।
यैसें जाणोनियां निर्धारीं । नाहीं होये ॥ १ ॥
नाहीं होतां सर्व सुख लाहिजे । कांहीं असतां दुःखानें पाविजे ।
जळीं लवणापरी तद्रुप होयिजे । स्वानुभवसुखें ॥ २ ॥
मी मन बुद्धिचित्त अहंकार नाहीं । यांचीं दैवतें मी नसे पाहीं ।
हे असती माझ्या ठायीं । जळचरवत ॥ ३ ॥
ज्ञानइंद्रियें मी नसे जाण । त्यांचीं दैवतें नाहीं मान ।
मी याचा साक्षी याहोन । वेगळा चि ॥ ४ ॥
मी कर्मइंद्रियें हि नाहीं । त्यांचीं दैवतें नसे चि पाहीं ।
हे भासती माझ्या ठायीं । स्वप्नापरी ॥ ५ ॥
मी प्राणपंचक नसे जाण । मी विशयेपंचकाचा साक्षी मान ।
मी पिंडब्रह्मांडाहोन । वेगळा चि ॥ ६ ॥
मी माझा येक असे । आणि माझा मी मजमाजीं वसे ।
माझ्या तेजें मी प्रकाशे । माझा मज[२] ॥ ७ ॥
मी आदिअवसानातीत । माझ्या अभावें मज हें भासत ।
जैसें निद्रेमाजीं दिसत । स्वप्न पैं गा ॥ ८ ॥
पिंडब्रह्मांड आदिकरोनि । च्यार वर्ण च्यार खाणी ।
सर्व सृष्टीची मांडणी । स्वप्न चि दिसे ॥ ९ ॥
येकवीस स्वर्गें सप्त पाताळें । चंद्रसूर्यग्रहगणाचे मेळे ।
हें देहनिद्रेचे बळें । स्वप्न चि दिसे ॥ १० ॥

१ मूळपाठ–वेगळा. रा– वेगळा. २ रा– मी चि.

पुण्यपाप जीवशिवाची मांडणी । प्रकृतिपुरुष क्षरअक्षर सत्य मानी ।
वेदशास्त्रें आदिकरोनि । स्वप्न चि दिसे ॥ ११ ॥
यैसें अनुभवज्ञानेंकरोन । मानावें हें सर्व हि जाण ।
मन करोनियां अमन । राहें बापा ॥ १२ ॥
जैसें जोंवरी निद्रा तोंचवरी । स्वप्न भासतें निर्धारीं ।
जागृत जाला तरी । सर्व चि खोटें ॥ १३ ॥
तैसें जोंवरी मन आहे । तोंवरी हें सत्य च पाहें ।
मनाची करितां लये । कांहीं च नसे ॥ १४ ॥
मनाचा लये आत्मानुभवें करोन । जैसें जळामाजीं विरे लवण ।
तेव्हां प्रळयांबुच्या सागरापरी जाण । सहजीं सहज असे ॥ १५ ॥
यैसा तूं होऊनि राहे । स्वप्नवत सर्व मिथ्या पाहें ।
आपण आपणासी जाये । विसरोनि ॥ १६ ॥
जैसें आकाश येणें जाणें नाहीं । आकाशामाजीं होये सर्व पाहीं ।
तैसा तूं आपणासी सर्वां ठायीं । व्यापक जाण ॥ १७ ॥
अहं सोहं सांडोनि देयीं । तदाकार होऊनि राहीं ।
प्रकृतीकर्म मिथ्या कांहीं । घेवों नको ॥ १८ ॥
जें जें मनबुद्धीसी आलें । अथवा नेत्रीं देखिलें ।
आणि शब्द बोलवलें । तें प्रकृतीकर्म ॥ १९ ॥
हें सर्व गुणमयी जाणोनि । तूं राहें साक्षी होऊनि ।
बोलणें राहिलें येथोनि । पुढें अनुर्वाच्य ॥ २० ॥
मनेंविना मनन करावें । नेत्रेंविणा अवलोकावें ।
जाणिलियाविणा जाणावें । सर्वां ठायीं ॥ २१ ॥
जें यैसें तैसें ह्मणतां न ये । जें स्वप्रकाश स्वसंवेद्य आहे ।
हे ज्याचा तो चि जाणता आहे । येरा टगमग ॥ २२ ॥
जैसें रतिसंभोगीचें सुख पाहीं । सांगतां न ये चि कांहीं ।
जाणावें ज्याचे तेहीं । निरहेतें ॥ २३ ॥
जैसी मुक्यानें खादली साकर । तें सांगतां न ये चि साचार ।
परी निवालें त्याचें अंतर । तैसें सुख असे ॥ २४ ॥

---

१ रा-दोनी । याचा विचार पाहिला गुणीं । असें सत्य मानीं ॥ २ रा-तैसें तूं जाण आत्मानुभवें करून । ३ रा- शाब्दिक. ४ म-स्वतसिध. ५ म-टकमक.

येसें जें कांहीं आहे । रत्नाकरा तूं तद्रूप होये ।
पुढें उपदेशाची राहिली सोये । अनुभवें चि जाणावें ॥ २५ ॥
हा उपदेशरत्नाकर ग्रंथ । जेणें वस्तु होये हस्तगत ।
पावे जीवन्मुक्ति त्वरित । संदेह नाहीं ॥ २६ ॥
जैसें तुझें आर्त जाणोनि । म्यां उपदेसिलें नाना वचनीं ।
तूं हे शब्द कंठीं धरोनि । स्वहित करीं ॥ २७ ॥
हे सिधांतपक्षीची वाणी । हे सिध चि सिधा[1]ची जाणती मनीं ।
आणिक तें आयेकोन कानीं । सुख पावती ॥ २८ ॥
जें गुह्याचें गुह्य सार । तें म्यां तुज सांगितलें साचार ।
कां जे तुज ज्ञानेश्वराचा वर । ह्मणोनियां ॥ २९ ॥
जैसें आरंभापासोनि सांगितलें । तें मनीं पाहिजे सर्व धरिलें ।
तेणें करोन हित आपुलें । होये बापा ॥ ३० ॥
येसें आयेकोनि वचन । रत्नाकरें धरिले दोन्ही चरण ।
मनाचें उडालें मनपण । जाली तटस्थअवस्था ॥ ३१ ॥
नेत्रीं चालिलिया अश्रुधारा । शरीर कांपें थरथरा ।
स्वेदकणिका रोमांकुरा । आलियाती ॥ ३२ ॥
तवं सद्गुरूनें धरोनियां करीं । पोटेसीं धरिलें निर्धारीं ।
कर ठेवोनि मस्तकावरी । सुखी केलें ॥ ३३ ॥
ह्मणती बापा सावध होये । सहजीं सहज होऊनि राहें ।
ग्रंथासी पूर्णता जाली पाहें । येथोनियां ॥ ३४ ॥
याचें श्रवण मनन करितां । पाविजे आपुली पूर्णता ।
हा अज्ञानरयेनी[2]चा सविता । जा[3]ला असे ॥ ३६ ॥
याचे प्रकाशेंकरोनि । संसार करी तो न पडे पतनीं ।
जीवन्मुक्त होऊनि । [4]राहें बापा ॥ ३६ ॥
अज्ञानासी होये ज्ञान । ज्ञानियांचें करीं समाधान ।
भक्ति वैराग्य निर्माण । होये येणें ॥ ३७ ॥
सर्व संदेहातें तजोनि । हा ग्रंथ चि गुरु ह्मणोनि ।
वाचावा प्रतिदिनीं । भावबळें ॥ ३८ ॥

---

१ रा-सिद्धांत. म-सिद्धांतातें. २ रयेनी-रजनी; रात्र. ३ रा- जाण शिष्या. ४ म-राहे जनीं जनार्दना.

श्रीसिद्धानंदाचे प्रसादें । बोले रामानंद पदे ।
रत्नाकराचे संवादें । ग्रंथ जाला ॥ ३९ ॥
हा गुरुसिष्याचा संवाद आहे । संसारसागरींची नाव पाहें ।
येणें रत्नाकर तरला काये । बहु बोलों ॥ ४० ॥
हे शब्दरत्नांची माळा । शोभे रत्नकराचिया गळां ।
सद्गुरुकृपें अवलीळां । तरला तो ॥ ४१ ॥
इति श्रीउपदेशरत्नाकर ग्रंथ । चिदादित्य प्रकाशे ।
गुरुशिष्यसंवादे । शुभं भवतु * ॥ ६९ ॥

---

श्री

## प्रकरण पांचवें

# राऊळपुराण

शके १७०३ तील हें लहानसें परंतु ऐतिहासिक महत्त्वाचें प्रकरण रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांना खानदेशाबाहेर मिळालें. खानदेशाबाहेर राऊळ कोठें आहेत कीं काय, ठाऊक नाहीं. परंतु खानदेशांत मात्र हल्लीं साडे बारा राऊळ आहेत. हे सारे रजपूत असून मराठी अंमलाच्या पूर्वीपासून त्यांचा अंमल खानदेशांत असे. हल्लीं हि या सर्वांना थोडें फार उत्पन्न आहे. हे साडे बारा राऊळ खानदेशांत पुढील गांवीं आहेत.

( १ ) धुळें तालुक्यांत लांबकाणी, ( २ ) सिंदखेड तालुक्यांत खुद्द सिंदखेडें, ( ३ ) दोंडाईचे, ( ४ ) रंजाणें ( ५ ) चऊगांव व (६) मालपूर, ( ७ ) नंदुरबार तालुक्यांत मोहिदे व ( ८ ) मांजरे

---

* यापुढें रा प्रतींत पुढील मजकूर आहे. “ शके १७०० विलंबनामाद्बे मार्गशीर्ष वद्य पक्षेति २ भानुवारे तद्दिने समापितं ॥ छ ॥

म प्रतींत–श्रीसद्गुरु अर्पण । वोवी संख्या । तीनसें च्वेहेताळीस । आक्षरी । ३४४ ॥ छ ॥ छ ॥

( ९ ) शहादे तालुक्यांत लांबोळे ( १० ) सारंगखेडे व ( ११ ) तोरखेडें आणि ( १२ ) शिरपूर तालुक्यांत वनावल व १२$\frac{1}{2}$ करवंद.

या सर्व राऊळांना त्यांच्या उत्पत्तीचें हें पुराण उपयुक्त व बोधपर होणार आहे. राऊळांनीं आपला आचार कसा शुद्ध ठेवावा हें यांत सांगितलें आहे.

राऊळ जेणें ह्मणावें । तेणें या रीती आचरावें ।
अखंड ध्यान धरावें । शिवस्वरूपाचें ॥

ह्मणजे त्यांत च त्यांचें कल्याण आहे.

धुळें,<br>ज्येष्ठ व. ११ शके १८३६

शंकर श्रीकृष्ण देव.

---

॥ श्रीनाथप्रसन्न ॥

॥ श्रीगणेशायनमा ॥

॥ श्रीनाथायनमा ॥

नमो आव्यक्तरूपा आविनाशा । गुणातिता परमपुरुशा ।
निर्विकारा निराभाशा । निसंगा नमो तुज ॥ १ ॥
जय जयाजी सद्गुरुनाथा । तुज नमो अवेक्ता ।
आभये कर ठेउनि माथा । अद्वैत कथा वदवावी ॥ २ ॥
तुं परम पुरुष विश्वाभरु । तुझा न कळे चि अंतपारु ।
दयाब्धि तूं दयासागरु । करि पारु भवसिंधूचा ॥ ३ ॥
आतां नमो संतसज्जनासी । परिसावे ग्रंथ निरोपणासी ।
राऊळ पुराण निश्चयेसी । चित देऊनी परिसावे ॥ ४ ॥
राऊळ कोठोनि जाला निर्माण । कोण तयाचे जन्मस्थान ।
ते ऐकावे एकाग्र मन । करितो नमन श्रोतैयासी ॥ ५ ॥
नव्हते आदि मध्ये कांहीं । बिंबाबिंब प्रकाश नाहीं ।
प्रथ्वि आप तेज नाहीं । सांगावयासी ॥ ६ ॥

नव्हती पंचमहाभूतें । वर्णावर्ण कैच तेथें ।
आवघा निराकार वर्तत । आप्रमय जो ॥ ७ ॥
ऐसा अपरमित आनिळ । निरसुन्नि खेळे निश्चळ ।
निगम रूपे निखिळ । निद्रा करी ॥ ८ ॥
सुख शेयनी निद्रा करि । एकलाचि निराकारी ।
निर्विकल्प निराहारी । कल्पना करि अनिवार ॥ ९ ॥
कल्पिता जाला कल्पवृक्षे । अनंत फळें येति त्यास ।
जें जे कल्पिलें जगदीशें । ते तें अपैसे होतसे ॥ १० ॥
मुळि आपणचि बिंब । बिंबासि उगवला कोंब ।
एका पासाव आनेक श्वयेंभ । विस्तार पैं जाला ॥ ११ ॥
तो विस्तार ऐकतां श्रवणीं । माहा पापाची होय धुनी ।
कवाडे उघडति काणी । जाये मिळोनि एकरूपा ॥ १२ ॥
तो आदि पुरुष भगवान । प्रथम रचिले निरशुन्यें ।
तया पासोनिया शुन्यें विस्तार जाला ॥ १३ ॥
निरालंब जाले तेथुनि । आधार ऐकावे श्रवणी ।
।सिव लिंग त्या पासोनि । निर्माण जालें ॥ १४ ॥
त्या सिवे कल्पणा केली । सेक्ति तेथे प्रगट जाहालि ।
ते शक्ति प्रशवली । पुरुष आपण ॥ १५ ॥
त्या पुरुषा पासाव जाण । सदाशिव जाला निर्माण ।
तेचि वायूरूप आपण । प्रगटला पैं ॥ १६ ॥
ऐका तयापासुन । आदगुरुनाथ निरंजेण ।
आनाद शेक्ति त्याला जाण । वोंकार जाला पैं ॥ १७ ॥
आले खानार तयासि । नररूप जाला तिसी ।
निरमये नार निश्चयेसी । शोभली पाही ॥ १८ ॥
तिसि जाहाला बुदबुदाकार । सहजा शेक्ति निर्धारें ।
सून्यें देव माहाविर । जाला तिसी ॥ १९ ॥
त्या सून्यें देवाचि कांता । शेक्ति जिवणा नाम सर्वथा ।
हे सुन्य आवेक्ता । जाहाला तिसी ॥ २० ॥
शेक्ति वेडावती सुंदरी । सद्बोध पुत्र अवधारी ।
लिळावती शेक्ती शेरिरी । मिरवत असे ॥ २१ ॥

तय पासोनि जाण । आध्यानिळ पुरुष आपण ।
नारनिछेळ प्रमाण । शास्त्र श्रवण ऐकावे ॥ २२ ॥
त्रिपुन्य पुरुष तियेसी । शेक्ति अमरागंद विशेसि ।
दिवटे शेन जाला तिसी । शेक्ती रगधाबेरा ॥ २३ ॥
तय पासोनि प्रसिध । जाहाला लिळितंबध ।
लळ नाशेक्ती आनाद । शोभली दिस ॥ २४ ॥
पितकाम प्रितर्थ । वौसि जाला समर्थ ।
निज तेजे तेज्यार्थ । पत्नी आसना त्यासवे ॥ २५ ॥
पित्र सिंधु अवधारी । विसावा जाला धरित्री ।
जेष्टादेवी सुंदरी । जेष्टरूप जेष्ट ॥ २६ ॥
ऐसा जाहाला विसावा । माहादेव तो एकविसावा ।
येकि येकपणे सेवा । करिति जाली पर्वति ॥ २७ ॥
ऐसा सिवंजोगि औतार । जो निर्विकल्प निराधार ।
जो निजाचें माहेर । निघोटरूप ॥ २८ ॥
ब्रह्मसामें औतार । ब्रह्मादिका नकळे पार ।
तो चि पार्वति शंकर । शिवशेक्ति सिवरूप ॥ २९ ॥
त्या शिवें प्रथम जाण । आधि च्यारि योगें रचिलि पुर्ण ।
परिसा नावें भिन्न भिन्न । येकचित्तें करूनि ॥ ३० ॥
प्रथम जालें कृतायौग । दुसरें त्रितायौग चांग ।
द्वापार तिसरें यौग । कळि चौथि चालि ॥ ३१ ॥
आतां यांचें प्रमाण । वेगळालें सांगेन ।
परसावें श्रोतेजण । सावधान ऐकावें ॥ ३२ ॥
कृता सतरा लक्ष आठरा हजार १७१८००० ॥
त्रिता बारा लक्ष शहाणव हजार १२९६००० ॥
द्वापार आठ लक्ष चवसष्ट हजार ८६४००० ॥
कळि साचार ऐका पुढे ॥ ३३ ॥
कळि च्यार लक्ष जाणा । बत्तिस हजार परिमाण ।
हे च्यार यौग संख्या पूर्ण । जाहालि असे ॥ ३४ ॥
हा चि च्यार खुंट सचळ । जालें प्रुथ्विमंडळ ।
तें आदिमेहेशे केवळ । काय करिता जाला ॥ ३५ ॥

ब्रह्मसिखारि ब्रह्मत्व । सांगता जाला एकत्व ।
जेणे जिवाचें जिवत्व । निरसुनि जाये ॥ ३६ ॥
तयेसि प्रबोध सांगता । निद्रिस्त जाली पतिव्रता ।
हुंकार नये सर्वथा । सिव पाहे चहुंकडे ॥ ३७ ॥
शिव अनंद निर्भर । समाधिस्त सर्वेश्वर ।
विछा वाढलि अपार । समाधिसुख सांगावया ॥ ३८ ॥
तये विछेपासाव जाला । माहाविर प्रगटला ।
सन्मुख उभा ठेला । कर जोडोनिया ॥ ३९ ॥
करि साष्टांग नमन । सिव दिधलें वरदान ।
मस्तकि हात ठेउन । केला पुर्ण यौगिराज ॥ ४० ॥
ज्ञानविभुति चर्चुनि अंगि । केला शुध वैरागि ।
आलक्षमुद्रा दोही भागि । लेवविल्या श्वकर्णि ॥ ४१ ॥
आडबंद कौपिनि कटप्रदेसि । शोभिन्नलि तेजोरासि ।
दंडकमंडलु वेगेसि । सिवें आपण दिधला ॥ ४२ ॥
झोळि पावडि देउनि । माळा मेखळा ते चि क्षणि ।
सेलि गळा लेवउनि । सिंगि आयोध दिधलें ॥ ४३ ॥
बिजमंत्र सांगोनि कर्णि । ब्रह्मबोध ते चि क्षणि ।
करिता जाला मुगुटमणि । सिधयौगि आपण ॥ ४४ ॥
आलक्षमुद्रा आलक्षमंत्र । दरसन धरित्री पवित्र ।
रुगवेद वेद स्वतंत्र । देउनियां स्थापिला ॥ ४५ ॥
नाम सिवजोगि राउळ । पुज्यमान पुन्यसिळ ।
समस्ताहुनि आगळ । पुज्यमान धरित्रि ॥ ४६ ॥
अजपामंत्र गाइत्रि । जपावा आहोरात्रि ।
त्रिकाळ स्नान पवित्रि । विधियुक्त करावें ॥ ४७ ॥
भ्रष्टाकार न करावा । अनाचार न आचरावा ।
आदिनाथ तो चि ह्मणावा । यौगिराज ॥ ४८ ॥
शुचिर्भुत श्नान करुणि । विभुति उठि घेउनि ।
सिवस्मरण प्रतिदिनि । करोनि भोजन करावें ॥ ४९ ॥
मछाहार न करावा । विधियुक्त सिव पुजावा ।
पक्वानि भोजनि तोशवावा । मग करावा आहार आपण ॥ ५० ॥

सोमवार व्रत करावें । साहंबीज सोहंभावें ।
आसनि बैसोनि आठवावें । सिवरूप ॥ ५१ ॥
ऐसा सिवे उपदेश केला । नाम राउळ ठेविला ।
विछेपासुनि जन्म जाला । यास्तव नाम राउळ ॥ ५२ ॥
राउळ जेणे ह्मणावें । तेणे यारिति आचरावें ।
आखंड ध्यान धरावें । सिवस्वरूपाचें ॥ ५३ ॥
विभुति उठि घ्यावि । भगवि प्रावर्णें करावि ।
शुधक्रिया धरावि । सर्वभावें ॥ ५४ ॥
यृा रिति जो आचरेल । तयासि सिव क्रुपा करिल ।
मोक्षपदा पाठविल । दिव्यदेहे करुणि ॥ ५५ ॥
जो हा ग्रंथ पठण करि । त्यासि दुख नाहि संसारि ।
आथवा आदरे श्रवण रंध्रि । ऐकतिल येक भावें ॥ ५६ ॥
विश्वास धरोनि ग्रंथि । पठण करितिल आहोरात्रि ।
अविश्वासिया धरित्रि । ठाव नेदि सर्वथा ॥ ५७ ॥
लिंगपुराणामाजि जाण । सिल्पशास्त्रि प्रमाण ।
राउळकथेचें प्रमाण । समुळ पुर्ण जालें असे ॥ ५८ ॥
हे यौग जो नाचरेल । तो राउळ नव्हैल ।
तेणे पुर्वज बुडविलें । बेताळिस ॥ ५९ ॥
हे नाईकोनि तत्वता । नाना अघोर कर्म करितां ।
तो महद्वेखनि पडे अवचिता । अन्न अन्न करूं लागे ॥ ६० ॥
ह्मणोनिया आदिसिवा । ऐक्यभावें भजावा ।
तो चि भक्त ह्मणावा । राउळ जोगि ॥ ६१ ॥
ऐसें राऊळपुराण । जे एकति भावेंपूर्ण ।
तयासि सिव आपण । क्रुपा करिल निर्धारें ॥ ६२ ॥
या ग्रंथाचा मथितार्थ मथितार्थ । श्रवण करिता होति मुक्त ।
क्रुष्णनाथ वदे परमार्थ । आनादि माळिका ॥ ६३ ॥
हे राउळपुराण । ज्ञानपासष्टि प्रमाण ।
औदुंबारि क्षेत्र जाण । क्रुष्णातिरि पुर्णत्व ॥ ६४ ॥
सके सत्रासे तिन । पलव सवत्छर जाण ।
कार्तिक शुध द्वितिया पुर्ण । श्वातिनक्षत्र पै जाणा ॥ ६५ ॥
इतिश्रि राउळपुराण संपुर्णनमस्तु ॥ छ ॥ छ ॥

श्रीराम

## प्रकरण सहावें

# जनीजनार्दनांचा निर्विकल्प ग्रन्थ

जनीजनार्दनांचीं कांहीं थोडीशीं पदें आजवर प्रसिद्ध होतीं किंवा ऐकून ठाऊक होतीं. हल्लीं त्यांचा एक लहानसा स्वतंत्र ग्रन्थ आमचे मित्र रा. गोपाळराव गोगटे यांचे मार्फत नवीन उपलब्ध झाला आहे. त्याचें नांव " निर्विकल्पग्रन्थ " असें आहे. त्याचे एकंदर पंधरा अध्याय असून ओवीसंख्या अवघी ७१६ आहे. ग्रन्थ निःसंशय महत्वाचा आहे. जनीजनार्दनांची वाणी ठसठसीत आहे, तींत गोडी आहे. प्रस्तुतचा ग्रन्थ लिहिण्यास त्यांनीं सकाळीं आरंभ केला तों तिसरा प्रहरीं ग्रन्थ संपविला, असा ग्रन्थांत उल्लेख आहे. ग्रन्थारंभीं नमनाच्या वगैरे ओव्या नाहींत, याचें मला नवल वाटतें.

कोणे येके अवसरीं । उद्धव आणि श्रीहरी ।
बैसले होते यमुनेतीरीं । स्नान संध्या करीत ॥ १×१

असा च ग्रन्थाला एकदम आरंभ केला आहे. ग्रंथ अध्यात्मपर असून उद्धवांनीं अनेक शंका विचारल्या आहेत व श्रीकृष्णांनीं त्यांचीं उत्तरें दिलीं आहेत. ग्रन्थाचें स्वरूप व महत्व लक्ष्यांत यावें ह्मणून कांहीं शंका मात्र येथें दर्शवितो, उत्तरांसाठीं वाचकांनीं ग्रन्थ च वाचला पाहिजे.

( १ ) उद्धव आणि श्रीहरी यमुनेच्या तीरीं स्नानसंध्या करीत असतां तेथें एका कावळ्यानें येऊन एक बेडुक धरून नेलें. तें पाहून उद्धवांना वाईट वाटलें आणि त्यांनीं प्रश्न विचारावयास आरंभ केला.

शरीरें शरीराचें केलें भक्षण । तरी हें केल्याचें काय पुण्य ।
तुझें कर्तृत्वीं माझें मन । कंटाळलें श्रीहरी ॥ १×५

२ पुढें मग भक्तीचा प्रश्न निघाला आहे.

थावरी बोले उद्धव । भक्तीनें आकळिला देव ।
साच कीं हें वाव । सांग तें वा ॥ १×१३

त्यावर सकाम आणि निष्काम भक्तीचें फार हृदयंगम विवेचन आहे.

(३) तुह्मी जो सांगितला विचारु । तो मायिक अवघा चराचरु ।
तरी कोणें प्रकारें करूं । भक्ती तुह्मी ॥ १×७२

असा उद्धवांनीं प्रश्न विचारल्यावरून आत्मज्ञान सांगण्यास भगवंतांनीं सुरवात केली आहे.

(४) देवा येक हेत उपजला । तेणें संदेहो पडला ।
तो फेडी वहिला । मनींचा माझ्या ॥ ३×५१
यमदूत नेती धरूनी । नानाप्रकारें करिती जाचणी ।
हें ऐकियलें कर्णीं । पूर्वापर ॥ ५२ ॥
तरी याचा कैसा भावो । फेडी माझा संदेहो ।
हें सत्य कीं वावो । कृष्णनाथा ॥ ५३ ॥

असा एक सहज च प्रश्न करण्यांत आला आहे.

(५) थोवरी उद्धव बोलिला । देवा माझा संदेह सर्व गेला ।
जो जो वृत्तांत सांगितला । तो तो सत्य स्वामिया ॥ ५×१७
आतां येक पुसतों आपणातें । स्वल्प चि सांगिजे मातें ।
जेणें माझिया चित्तातें । समाधान होय ॥ १८ ॥
देवा अवघा तूं आहेस येक । तरी कां जालासी अनेक ।
अनेक होऊनि लोप । धरितां कां ॥ १९ ॥

हा प्रश्न विचारल्यावरून भगवंतांनीं सृष्टीच्या उपत्तीस्थितिलयाचें निरूपण केलें आहे.

(६) उद्धव देवासी बोलिला । सर्व विस्तारु पाहिजे सांगितला ।
प्रेमपान्हा देईं वहिला । श्रीकृष्णनाथा ॥ ६×१
कृष्णा तूं माझी माउली जरी । तरी स्तन दे प्रेमलहरीं ।
क्षुधा न गेली निर्धारी । अद्यापि माझी ॥ ६×२
तुवां ब्रह्मरस पाजिलें दुग्ध । तेणें जालों मी सद्गद ।
ऐसें बोले उद्धव भक्तप्रसिद्ध । देवाप्रती ॥ ६×३
देवासी जडली प्रीति । ब्रह्मबोध करी उद्धवाप्रती ।
प्रेमपान्हा देत प्रीतीं । जैसी माउली बाळका ॥ ६×४

अशा लडिवाळपणानें उद्धवांनीं प्रश्न विचारले आहेत व तितक्या च प्रेमभरानें भगवंतांनीं त्यांचीं उत्तरें दिलीं आहेत.

(७) सर्व जग तूं जालासी हरी । परी माया उपजली कोणे प्रकारीं ।
तें सांग गा मुरारी । श्रीकृष्णनाथा ॥ ७×१२

असा मायोद्भवाचा प्रश्न विचारला आहे.

(८) भगवंताच्या उत्तरांनीं उद्धवाचें पूर्ण समाधान झालें, तें सांगतांना प्रस्तुतच्या ग्रन्थाचा महिमा सहज च वर्णिला आहे.

यावरी उद्धव बोलिला । देवें जो जो पदार्थ सांगितला ।
तो तो ऐकोनि संतोष जाला । माझिया मनीं ॥ ८×२७
आतां ऐसें वाटतें मनीं । तूं अकर्ता सर्व करूनी ।
फेडिला पृच्छेची शिराणी । माझी स्वामिया ॥ २८ ॥
यावरी बोले वनमाळी । तुवां पुसिलें मंजुळी ।
ह्मणोनि निजज्ञानाची खोली । दाविली तुज ॥ ३० ॥
हें ज्ञानाचें हि निजज्ञान । बुद्धीसीं हा बोध जाण ।
चित्त अहंकार हरपोन । जाती येणें ॥ ३१ ॥
चांडाळासी होय बोध । येणें नासती भेदाभेद ।
ज्ञानियासी उपजे प्रबोध । ऐसें सांगितलें उद्धवा ॥ ३२ ॥
ज्याचे गांठीं पूर्व पुण्य । त्यासी च हा ग्रंथ होय श्रवण ।
चांडाळ ते हि तरोन । जातील येणें ॥ ३३ ॥

अशा रीतीनें उद्धवांचें पूर्ण समाधान होऊन ते तटस्थ झाले असतां आणखी प्रश्न विचारण्याविषयीं भगवंतांनीं च त्यांना प्रवृत्त केलें.

मग उद्धवें केली पुसी । देवा प्रळयीं कोठें होतासी ।
तें सांगिजे हृषीकेशी । कृपा करोनी दातारा ॥ ९×१८

या प्रश्नाचें उत्तर देत असतां सहज एका ठिकाणीं भगवंतांनीं आचाराचा महिमा वर्णिला आहे.

करावा बुद्धीचा प्रकाशु । अवघा देव हा उपदेशु ।
परंतु वर्णावर्णकर्माचा नाशु । करों नये ॥ ९×५२
ज्या ज्या कर्मासी यावें । तैसें आचारें विचारें वर्तावें ।
तेणें मुक्त व्हावें । सर्व काळ ॥ ५४ ॥
जो आचार विचारा भंगला । तो कर्मचांडाळ जाला ।
तो रौरवीं पडला । चंद्रार्कवरी ॥ ५५ ॥
आत्मवत् सर्व जाणावें । परंतु आचारातें न भंगावें ।
आचार वर्तणुकीं पावावें । परम पद ॥ ५६ ॥

जो आचारासी भंगला । तो चांडाळांत बोलिला ।
यमपुरीचा जाला । भोक्ता अकर्म ॥ ५७ ॥

( ९ ) भगवंतांनीं आचाराचें इतकें महत्व सांगितलेलें पाहून पुढें मागें कोणाला तरी यावर शंका येणार च ह्मणून उद्धवांनीं च विचारलें.

सर्वां घटीं भगवान । नांदताहे परिपूर्ण ।
तयासीं द्वैतपण । कैसें धरावें ॥ १०×२

अवघा चि देव जाला । तेथें विटाळ कोणासी लागला ।
आचार तरी वहिला । कोणासी धरावा ॥ ३ ॥

उद्धवाचा हा येकंकारभ्रष्टाकाराचा प्रश्न ऐकून भगवंतांच्या मनाला वीट आला.

ऐकतां उद्धवाचें वचन । कंटाळले श्रीभगवान ।
ऐसें बोलों नको रे वचन । उद्धव अज्ञाना ॥ १०×४

अशा प्रकारें उद्धवाच्या प्रश्नाविषयीं तिटकारा दाखवून हि भगवंतांनीं जें उत्तर दिलें आहे, तें मननीय असणार हें उघड आहे.

( १० ) हे सारे प्रज्ञावंतांचे प्रश्न झाले, परंतु जे अज्ञानी आहेत त्यांनीं आपलें हित कसें करून घ्यावें ह्मणून त्यांच्या वतीनें हि उद्धव विचारतात:—

यावरी बोले उद्धव भक्त । देवा सांगितलें तें सत्य ।
उमजु नये तयाचें हित । कवणिया प्रकारें होय पै ॥ १२×४४

( ११ ) शेवटीं पुन्हा एकदां सामान्यपणें प्रश्न विचारला आहे कीं, मजसारख्यानें हा भवसागर कसा तरून जावा ?

यावरी बोले उद्धव । देवा कैसा तरावा भव ।
त्याचा मज उपाव । कृपा करोनी सांगिजे ॥ १३×२१

अशा कित्येक शंका, उपशंका या ग्रन्थांत आहेत व तितक्यांचीं समाधानकारक उत्तरें दिलीं आहेत. पंधराव्या अध्यायांत

नित्य स्नानसंध्या करी । हा ग्रन्थ हृदयीं धरी ।
तयासी श्रीहरी । भेटेल निर्धारी सत्य जाणा ॥ १५×२१

हा ग्रंथ वाचितां । येकांतीं मनन करितां ।
समाधान तयाचे चित्ता । होतसे जाण ॥ २२ ॥

इत्यादि रीतीनें ग्रन्थाचें स्तवन करून जनीजनार्दन ग्रन्थाचा शेवट करितातः—

हा निर्विकार ग्रन्थ । असे गीतेचा मथितार्थ ।
जनीजनार्दन येकनाथ । बोलिले असे ॥ १५×२७
कार्तिक शुक्ल येकादशी । स्नान केलें यमुनेसी ।
ग्रन्थ पावला अभंगासी । तृतीय प्रहरीं ॥ २८ ॥
भावें करिती श्रवण । ते जीवन्मुक्त होतील जाण ।
त्यांचे वृत्तीचें समाधान । करील देव ॥ २९ ॥
श्रीकृष्ण ह्मणे उद्धवराया । तुज जें सांगितलें रे सखया ।
हें ज्ञान भक्तराया । दुर्जन श्रवणी न पडो ॥ ३० ॥
जनीजनार्दन ह्मणे । हें श्रीकृष्णाचें बोलणें ।
तें परिसावें संतजनें । निर्मळ चित्तें करोनियां ॥ ३१ ॥
इति श्रीनिर्विकल्प ग्रन्थ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासी ॥ ३२ ॥

पहिल्या चवदा हि अध्यायांचा शेवट करतांना वरील ३१ आणि ३२ या च दोन ओव्या आल्या आहेत. पंधराव्या अध्यायाच्या शेवटीं हि त्या आहेत, परंतु वरील २७ व्या ओवींत " जनीजनार्दन येकनाथ " असें ह्मटलें आहे, त्याचा अर्थ काय? जनीजनार्दन आणि एकनाथ यांचा संबंध काय? जनीजनार्दन कोण? केव्हां होऊन गेले? एकनाथ जसें आपणांस " एकाजनार्दन " ह्मणवीत, तद्वत् हे आपणांस जनीजनार्दन ह्मणवीत असून उभयता हि जनार्दन स्वामींचे शिष्य होते कीं काय? का जनीजनार्दन हे च जनार्दन स्वामी होत? अथवा जनीजनार्दन हे एकनाथांचे शिष्य तर नव्हत? इत्यादि अनेक प्रश्न साहजिक उद्भवतात.

रा. राजवाडे यांनीं जनीजनार्दनाविषयीं पूर्वी ग्रंथमाला मासिकांत एक टांचण लिहिलें होतें, तें, प्रो. विजापूरकर यांनीं रा. राजवाड्यांच्या लेखांचें " संकीर्ण लेख संग्रह " ह्मणून जें पुस्तक

प्रसिद्ध केलें आहे, त्यांत आलें आहे. जनीजनार्दन हे बीडचे राहणारे होते, त्यांची वंशपरंपरा अजून बीड येथें आहे, त्यांचें उपास्य दैवत गणपति असून त्यांनीं गणपतीची स्थापना पैठणाजवळ गंगामसलें येथें केली व ते शक १५२३ च्या श्रावण वद्य ७ स समाधिस्त झाले, अशी माहिती देऊन त्यांचीं तीन पदें दिलीं आहेत व आपणाजवळ त्यांचीं शें दीडशें पदें आहेत, असें रा. राजवाडे यांनीं त्या टांचणांत ह्मटलें आहे.

जनीजनार्दन हे परमार्थांतले मोठे अधिकारी होते, हें त्यांच्या प्रस्तुतच्या ग्रन्थावरून उघड होत आहे. असें असून मला मोठें नवल वाटतें कीं, साधुसंतांचीं चरित्रें गाण्याचा ज्यांना मोठा छंद त्या महिपतिबावांनीं जनीजनार्दनांचा कोठें च उल्लेख केला नसावा, हें काय ? वास्तविक असें होऊं नये. आपल्या च समजुतींत कांहीं तरी चूक तर होत नाहीं ना, अशी मला शंका येते. "एकनाथस्वामींचे गुरु जे जनार्दनस्वामी त्यांच्याहून हे जनीजनार्दन निराळे आहेत, हें प्रसिद्ध आहे" असें रा. राजवाडे आपल्या टांचणांत ह्मणतात, पण मला त्याविषयीं शंका येते. जनीजनार्दनांचा उल्लेख महिपतींनीं केला नाहीं व माझ्या पाहण्यांत ज्या प्रकाशित आणि अप्रकाशित संतमालिका आल्या आहेत, त्यांत हि त्यांचा कोठें निर्देश नाहीं. हें असें कसें व्हावें ?

या सर्व शंकांचें समाधान कोणी तरी आणि केव्हां तरी केलें पाहिजे.

धुळें }
ज्येष्ठ व. १३।१८३६ }

शंकर श्रीकृष्ण देव

# ॥ अथ निर्विकल्प ग्रन्थ ॥

## अध्याय पहिला

॥ श्रीगणेशाय नमः ॥

कोणे येके अवसरीं । उद्धव आणि श्रीहरी ।
बैसले होते यमुनेतिरीं । स्नान संध्या करीत ॥ १ ॥
स्नान संध्या करितां । तंव कावळा आला अवचिता ।
बेडुकी धरूनि चंचुपुटा । उडाला तो ॥ २ ॥
उडोनी गेला वृक्षावरी । तेथें तो तीसीं क्रीडा करी ।
क्रीडा करितां चि मारी । हे निर्धारी देखती ॥ ३ ॥
ऐसें देखती देव उद्धव । मग बोलता जाला भक्तराव ।
देवा तुझें कर्तृत्व माव । वाईट दिसे ॥ ४ ॥
शरीरें शरीराचें केलें भक्षण । तरी हें केल्याचें काय पुण्य ।
तुझे कर्तृत्वीं माझें मन । कंटाळलें श्रीहरी ॥ ५ ॥
तूं दिससी बहुत उत्तम जाण । परी कर्तृत्व तुझें हीन ।
या कर्तृत्वानें मन । कंटाळलें ॥ ६ ॥
ऐकोनी उद्धवाचें वचन । बोले श्रीहरी हांसोन ।
उद्धवा कर्तृत्व माझें जाण । नाहीं कळलें तुजसी ॥ ७ ॥
माझें कर्तृत्व अढळ । त्याचें कोणासी न कळे मूळ ।
कर्तृत्वाचा गोळ । तो मी च जाणे ॥ ८ ॥
माझा मी च विस्तारलों । माझा मी च खेळकर जालों ।
खेळ करूनि साक्षी राहिलों । मी च जाण ॥ ९ ॥
उद्धवा दिसे हें सगुण । तें हि मी च जाण ।
परि हें माझें निजज्ञान । कोणासी कळलें नाहीं ॥ १० ॥
अर्जुनासी दाविलें विश्वरूप । तरी तें हि मी माया अलोप ।
दाखवूनि लोप । केला त्याचा ॥ ११ ॥
जो जो आकार विस्तारला । मज पासोनी तो जाला ।
तो आकार मज कळला । मी कळलों नाहीं तया ॥ १२ ।

यावरी बोले उद्धव । भक्तीनें आकळिला देव ।
साच कीं हें वाव । सांग तें बा ॥ १३ ॥
श्रीकृष्ण ह्मणे उद्धवा । तूंवा पुसिलें साच कीं जीवा ।
तरी आतां तो हि भावा । सांगूं तुज ॥ १४ ॥
भक्त ऐसें माया स्वरुप । मायेनें भजती अमूप ।
मी हि मायारूप । होऊनि भेटे ॥ १५ ॥
उद्धवा भक्त जाले कोट्यानकोटी । संख्या न पुरे लिहितां सृष्टी
ते हि जाले हिंपुटी । तया नाहीं कळला देव ॥ १६ ॥
जे जे प्रकार धरिती पोटीं । तया प्रकारें तयांसी भेटी ।
जें जें मागती मुखसंपुटी । तें तें देतो तया ॥ १७ ॥
जे मागती वैकुंठपूर । तें तया देतो साचार ।
परी तें वैकुंठ निर्धार । माया चि असे ॥ १८ ॥
कैळास ते हि माया । ब्रह्मलोक तो हि भक्तराया ।
जे जे आकारा आलिया । माया चि दिसे ॥ १९ ॥
नाम रूप हे माया पाहे । नाहीं तें ब्रह्म आहे ।
मायेनें च माया पाहे । भोगीत असे ॥ २० ॥
राम कृष्ण हे माया जाण । रूपरेखा ते हि मान ।
याकारणें जाण । मायारूप ॥ २१ ॥
स्वर्ग मृत्य पाताळ । चौदा भुवनें सकळ ।
वसुंधरा येवढें ढीसाळ । ते हि माया ॥ २२ ॥
जे जे भक्त उद्धवले । तेणें मायिक चि ध्यान केलें ।
शेवटीं जें मागितलें । तें मायिक चि ॥ २३ ॥
भक्त ह्मणती देवाचरणीं । ठाव दे मज लागुनी ।
ते हि माया साच मानी । भक्तराया ॥ २४ ॥
उद्धवा चरणीं मागितला ठाव । तरी तें हि मायेचे लाघव ।
स्वरूपीं चि चरणीं ठाव । ऐक उद्धवा ॥ २५ ॥
उद्धवा जेथें नाहीं रूपरेखा । तें कांहीं न मागे देखा ।
मागितलें तें अवघें वोखा । मायीक जाण ॥ २६ ॥
स्वरूपीं जेव्हां येईन । तेव्हां चरणीं ठाव देईन ।
शेंवटीं तें हि जाण । नासेल उद्धवा ॥ २७ ॥

ऐसे भक्त जाले कोट्यानकोटी । उद्धवा किती सांगावी चावटी ।
तरी तयाशीं हि शेवटीं । नाहीं कळलों मी ॥ २८ ॥
जरी मज वोळखते । तरी कांहीं च न मागते ।
ह्मणोनी नाहीं मातें । वोळखिलें कवणें ॥ २९ ॥
भक्ती करिती वारंवार । दिवसरात्रीं निर्धार ।
शेवटीं नाशवंत विचार । मागताती ॥ ३० ॥
जें नाशवंत तें मागती । अविनाश कोणी हि न जाणती ।
ह्मणोनी जन्ममरणा येती । येणें गुणें ॥ ३१ ॥
येणें गुणें रे उद्धवा । न पावती मद्भावा ।
न मागती तरी जीवा । भक्ति च आहे ॥ ३२ ॥
ऐसें देवाचें ऐकोनी वचन । उद्धवासी पडलें मौन ।
मग पुसों आरंभिलें जाण । जगज्जीवनासी ॥ ३३ ॥
देव ह्मणे उद्धवासी । मौन कां धरिलें मानसीं ।
प्रतिवचन कां न देसी । उध्दवा मज ॥ ३४ ॥
कां रुसलासी भक्तराजा । न बोलसी कवणिया काजा ।
कीं राग माझा । आलासे ॥ ३५ ॥
यावरी बोले भक्तराव । देवा हे आवघी सांगितली माव
तरी भक्ती न करावी ऐसा भाव । दिसों येतो ॥ ३६ ॥
भक्ती करितां कष्टावें । शेवटीं कष्ट चि पावावें ।
तरी देह कां शिणवावें । व्यर्थ चि पै ॥ ३७ ॥
उध्दव ह्मणे देवासी । भक्तीनें तूं न पावसी ।
तरी सांग गा हृषिकेशी । आणिक ज्ञान ॥ ३८ ॥
वेदशास्त्रीं पुराणीं । बोललीसे ऐसी करणी ।
जे भक्ती करोनी । तरिजे संसारु ॥ ३९ ॥
तरी देवा तूं आपुलेनी मुखें जाण । अर्जुनासी नाना वचन ।
बोललासी प्रमाण । मज चि ध्यावें ॥ ४० ॥
मज ध्यावें मज भजावें । मज अर्पण करावें ।
मजवांचूनि दुसरें जीवें । भजों नको ॥ ४१ ॥
ये गोष्टीचा संदेहो । पडला असे भ्रांतीनें वावो ।
तरी देवा हा कैसा भावो । मज सांग ॥ ४२ ॥

येणें प्रकारें भजती । ते मज पावन होती ।
ऐसीयाची उपपत्ती । माझें मन ॥ ४३ ॥
तरी देवा ऐसी । भ्रांती पडली हृषिकेशी ।
तरी येणें बोले शुकविसी । माझें मन पै ॥ ४४ ॥
ह्मणोनी देवा मज पडलें टक । याकारणें जालें टकमक ।
देवा निःशंक । मज सांग ॥ ४५ ॥
मग ह्मणे चक्रपाणी । प्रश्न केला विचारूनि ।
फार संतोष जाला मनीं । भक्तराया ॥ ४६ ॥
भक्त जाले कोटी गुणी । ऐसा प्रश्न न पुसे कोणी ।
तरी हे अगाध करणी । सांगों तुज ॥ ४७ ॥
अर्जुनासी बोध केला । तो हि सगुण वहिला ।
चित्त देवोनी माझिया बोला । सावध होई ॥ ४८ ॥
तरी याचि दृष्टांतें करूनी । तुंवा पुसिले मधुरवचनीं ।
ऐक आतां चित्त देउनी भक्तराया ॥ ४९ ॥
अर्जुनासी बोध केला । तो हि सगुण वहिला ।
मज भजतां गोपाळा । तारीन मी ॥ ५० ॥
मज चि ध्यावें मज अर्पावें । ऐसें बोलिलों लाघवें ।
तयाचें संसारवोझें अघवें । मजवरी पडे ॥ ५१ ॥
हें सांगावयासी काय कारण । हातीं न घे धनुष्यबाण ।
ह्मणोनी मायालाघवेंकरून । संबोखिला ॥ ५२ ॥
संबोखीलें नाना वचनीं । विश्वरूप दाविलें लोचनीं ।
शेवटीं ते हि जाण मनीं । मायारूप ॥ ५३ ॥
जे विश्वरूपीं मिनले । त्यांचे देह निरसले ।
निरसून मिळाले । स्वस्थ चित्त ॥ ५४ ॥
जोंवरी शरीरीं प्राण असे । तोंवरी सगुण चि दिसे ।
शरीर गेलिया विलयास । देव चि आवघा ॥ ५५ ॥
शरीरासारिसा विमानीं बैसला । शरीरासारिसा वैकुंठीं गेला ।
ध्रुवासारिखा राहिला । अढळ पदीं ॥ ५६ ॥
उपमन्या दिधला क्षीरसिंधु । रुक्मांगदाचा राखिला पुत्रवधु ।
हरिश्चंद्र पाणी वाहत प्रसिद्ध । डोमाघरीं ॥ ५७ ॥

जें जें जेणें मागितलें । तें तें तयासी दिधलें ।
तरी तें नाशवंत वहिले । जाण ऐसें ॥ ५८ ॥
ह्मणोनी जितका हा विस्तारु । तितका नाशवंत साचारु
येणें गुणें माझा पारु । न कळे कोणासी ॥ ५९ ॥
माझा पारु जरी पावते भक्त । तरी ते न मागते व्यक्त ।
व्यक्त आणि अव्यक्त । अंतर असे ॥ ६० ॥
व्यक्त ऐसें जाण माया । चित्त देईं भक्तराया ।
अव्यक्त तें ब्रह्म सदया । ऐसें जाणी ॥ ६१ ॥
अर्जुनासी सांगितलें । तें अनायासें मिळालें ।
अथवा शुभाशुभ कर्म केलें । देहसंगें ॥ ६२ ॥
स्थूळसूक्ष्माचे योगें । कर्माकर्म करावें लागे ।
तें हि लागवेगें । करावें ब्रह्मार्पण ॥ ६३ ॥
उत्तम अथवा मध्यम जाण । तें हि करावें ब्रह्मार्पण
या नांवें खूण । ब्रह्मानुभवाची ॥ ६४ ॥
ब्रह्मार्पण केलिया । तो हि ब्रह्मीं मिळाला भक्तराया ।
फळाशा जाय विलया । देहसंगें ॥ ६५ ॥
माझी भक्ती नवविध । ते हि मायीक प्रसिद्ध ।
या ज्ञानाचा प्रबोध । ऐक भक्तराया ॥ ६६ ॥
अर्चन वंदन श्रवण । सख्यत्व दास्यत्व स्मरण ।
भूतदया आत्मनिवेदन । शुद्ध मती हे नवविधा ॥ ६७
हे नवविधा जालिया । नव प्रकारें भक्तराया ।
इतकें करूनिया । माया चि भेटे ॥ ६८ ॥
ब्रह्मार्पण हे दहावी भक्ती । येणें ब्रह्मीं च मिळती ।
ये बोलीची खंती । न कळे कवणासी ॥ ६९ ॥
उद्धवा हें ज्ञान । सांगों नये जाण ।
येणें उडे भक्तीभान । ह्मणोनिया ॥ ७० ॥
हें ज्ञान ऐसें आहे । येणें भक्तीभाव राहे ।
ह्मणोनी करीं नये । प्रगट हें ॥ ७१ ॥
उद्धव ह्मणे देवासी । ऐक गा हृषिकेशी ।
येक संदेह मजसी । पडला असे ॥ ७२ ॥

तुह्मी जो सांगितला विचारु । तो मायिक अवघा चराचरु ।
तरी कोणे प्रकारें करूं । भक्ती तुझी ॥ ७३ ॥
तुझी हे सर्व माया । तरी हे पाववी लया ॥
ह्मणोनी हे माया । मिथ्या वाटे ॥ ७४ ॥
तरी तुझें कोणे प्रकारीं । ध्यान करावें नरहरी ।
भक्ती तरी मुरारी । कैसी कीजे ॥ ७५ ॥
तरी मायेहूनि परती । ते कोण भक्ती गा श्रीपती ।
ऐसी माझी भ्रांती । निरसावी । स्वामिया ॥ ७६ ॥
कोणे भक्तीनें पैलपारु । पाविजे गा दातारु ॥
तो मजप्रति विचारु । सांगा कृपा करोनिया ॥ ७७ ॥
जेणें पाविजे समाधान । जें मायेचें मूळ स्थान ॥
जेथुनी माईक उत्पन्न । जालें असे ॥ ७८ ॥
ऐसी उद्धवाची वाणी । देवें ऐकोनी श्रवणीं ।
बोलतां जाला चक्रपाणी । ऐक आतां सावधान ॥ ७९ ॥
जनीजनार्दन ह्मणे । ऐसें श्रीकृष्णाचें बोलणें ।
तें परिसावें सज्जनें । निर्मळ चित्तें करोनिया ॥ ८० ॥
इति श्रीनिर्विकल्पग्रंथ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
संतांचा विनोद अद्भूत । अर्पण त्यांसी ॥ ८१ ॥

---

## अध्याय ॥ २ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥

कृष्ण ह्मणे हें ज्ञान कोणासी न सांगितलें । तें तुवा पुसों आरंभिलें ।
तरी हें सांगों नये वहिलें । गुह्य गोष्टी ॥ १ ॥
गुह्य गोष्टी ते गोप्य करावी । सांगाया योग्य ते सांगावी ।
तरी उद्धवा हे बोली बोलावी । बोलिले वेदविरहित ॥ २ ॥
उद्धवा तुंवा पुसियली । ते चि माझे मनीं आली ।
सांगतो तें चित्त देईं ये वेळीं । निर्विकल्प हा ॥ ३ ॥

हा ग्रंथ निर्विकल्प । सांगतां मायेचा होय लोप ।
हे जन सहज चिद्रूप । आहे उद्धवा ॥ ४ ॥
ते तद्रूप याचें ज्ञान । कोणा सांगितलें नाहीं वर्म जाण ।
तुंवा पुशिले ह्मणोन । सांगणें आलें ॥ ५ ॥
तें सांगता भ्रांतिमोचन । जें ज्ञानाचें निजज्ञान ।
जेणें होय तुझें मन । समाधान पै ॥ ६ ॥
ते एक मुद्रा उघडे ज्ञान । तेथें नाहीं ध्यान धारण ।
हें सांगतों तुजलागून । गौप्य करी ॥ ७ ॥
जप जाप्य कांहीं नाहीं । ऐसें चराचर पाही ।
तेथें विकार तो हि । मावळला असे ॥ ८ ॥
जेथें नाहीं भेदाभेद । ते ठायीं अभेद ।
भेद लावितां दोष सिद्ध । होतो उद्धवा ॥ ९ ॥
जेथें नाहीं जाती वर्ण । कुल नाहीं तया लागून ।
मीतूंपण हारपून । गेलें तेथें ॥ १० ॥
तेथें देव भक्त ते हि । कोणाची भक्ती कोणी करावी ।
गुरु शिष्य ते दोघे हि । नाहीं तेथें ॥ ११ ॥
तेथें चारी वेद खुंटले । शास्त्रें ते हि विसर्जिले ।
मग पुराणें इतुले । काय बोलों ॥ १२ ॥
तेथें वर्णावर्ण कर्मपण । तें हि हारपलें जाण ।
मनाचें अमन। जालें असे ॥ १३ ॥
तेथें मनबुद्धीसी ठाव नाहीं । चित्त अहंकार कैचा पाही ।
चारी मुक्ती त्या नाहीं । भक्तराया ॥ १४ ॥
तुवा पुसिले मजप्रति । कैसी करावी भक्ती ।
भक्तीनें तयाची स्थिति । न कळे उद्धवा ॥ १५ ॥
जेथें भक्ती आणि भाव । दोघातें हि नाहीं ठाव ।
देव भक्त हे वाव । जाती विलया ॥ १६ ॥
ऐशा गोष्टी सांगों किती । उद्धवा ये बोलीची गुंती ।
सांगों नये कवणाप्रती । गुह्य गोष्टी ॥ १७ ॥
पृथ्वी विस्तारली छपन्न कोटी । त्यावरी अठरा जाती ।
तरी तेणें वसुमती । विटाळली काय ॥ १८ ॥

अठरा जाती येती जाती । नाना कर्मं करिती ।
ते भान तियाचें चित्तीं । नाहीं रे भक्तराया ॥ १९ ॥
वायु सर्वांसी लागला । तेणें काय तो विटाळला ।
ऐसा सर्वांघटीं कोंदला । निर्हेतु ॥ २० ॥
वायु वर्ते सर्वांघटी । परी विटाळ नाहीं तया शेवटीं ।
निर्मळ असे हे तद्दष्टी । सर्वांघटीं ॥ २१ ॥
ऐसें हे निर्विकल्प बोलणें । येणें मावळे द्वैतपण ।
येकी येका देखणें । नाहीं तेथें ॥ २२ ॥
जेथें दुजासी ठाव नाहीं । दुजेपण माया पाही ।
दुजे नासलिया कांहीं । राहत असे ॥ २३ ॥
कीं रात्रीं देखियलें स्वप्न । करित आहे नाना कर्म ।
तीर्थ यात्रा आणि दान । कीं पापाचरण अन्योन्य ॥ २४ ॥
जें जें स्वप्नीं कर्म केलें । तें जागृतीसी पाहिलें ।
जागृतीनें खोटें केलें । स्वप्नकर्म ॥ २५ ॥
तैसे देहकर्म पाहे । नाना प्रकारें होय ।
आत्मस्वरूपीं लय । होईल सहज चि ॥ २६ ॥
किं युद्ध मांडिलें दोघा जणा । शाश्वत्व नाहीं दोघांच्या मना ।
यश अपेश गणणा । नेमलें नाहीं ॥ २७ ॥
परी अहंकार दोघांच्या मनीं । येक ह्मणतो मारीन रणीं ।
दुसरा ह्मणे शिराणी । फेडीन याची ॥ २८ ॥
परी अहंकार दोघांचे मनीं । जाला अंतःकरणापासुनि ।
ऐसें तये क्षणीं । वर्तलें असे ॥ २९ ॥
ऐसें दोघांचें बोलणें । येरयेराचा प्राण घेणें ।
ऐसें युद्ध करणें । रणांगणीं ॥ ३० ॥
उद्धवा ऐसा नेम केला । शेवटीं दोघा जयो आला ।
बोल तो वहिला । व्यर्थ ची गेला भक्तराया ॥ ३१ ॥
ऐसें प्रकृतीकर्म पाहे । नाना प्रकारें करिताहे ।
शेवटीं सर्व मिथ्या पाहे । भक्तराया ॥ ३२ ॥
जें स्थूल देहानें कर्म केलें । अथवा मनीं इच्छिलें ।
तेणें नासोनि गेलें । स्वरूपीं सहज ॥ ३३ ॥

जैसा कां मेघ वर्षला । तेणें भिन्न भाव नाहीं राखिला ।
सर्वां ठायीं वर्षाव केला । निर्हेतु ॥ ३४ ॥
उदका आंगीं निर्मळपण । पृथ्वी आंगीं अमंगळपण ।
तें हि केलें उत्तम जाण । उत्तमत्वें ह्मणोनिया ॥ ३५ ॥
जितका मल सृष्टीस होता । तो सर्व गेला आपें तत्वता ।
आप तें हि निर्मळता । होऊनि गेलें ॥ ३६ ॥
हा दृष्टांत द्यावया काय कारण । स्वरूपीं नासे अमंगळपण ।
स्थूळ देहाचें कर्म जाण । येणें प्रकारें नासती ॥ ३७ ॥
उद्धव ह्मणे देवराया । येणें प्रकारें संबोखिलिया ।
स्थूळाचें कर्म न बाधे ह्मणोनिया । बोलिले तुह्मी ॥ ३८ ॥
तरी याची उत्पत्ती कैसी । मज सांगावी हृषीकेशी ।
जेणें माझिया मनासी । संतोष वाटे ॥ ३९ ॥
कैसें उत्पन्न केलें । कोणें प्रकारें सामावले ।
पाप पुण्य निराळें । कोणें प्रकारें ॥ ४० ॥
जनीजनार्दन ह्मणे । हें श्रीकृष्णाचें बोलणें ।
तें परिसावें सज्जनें । निर्मळ चित्तें करोनिया ॥ ४१ ॥
इति श्रीनिर्विकल्पग्रंथ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भूत । अर्पण त्यासी ॥ ४२ ॥

## अध्याय ॥ ३ ॥

### ॥ श्रीगणेशाय नमः ॥

कृष्ण ह्मणे उद्धवासी । बहुरूपी सोंग घे परीयेसी ।
परी तो सोंगकर्मासी । अलिप्त असे ॥ १ ॥
जें जें सोंग धरी । तैसी च बोली बोले कुसरी ।
संपादणी तरी । करी तेणें चि प्रकारें ॥ २ ॥
त्या सोंगाचेनि योगें । बरें वाईट करणें लागे ।
करूं नये तें लागवेगें । करितु असे ॥ ३ ॥
सोंग घेतले ह्मणोनी । भंड उभंड बोले जनीं ।
तेणें संतोष वाटे मनीं । देखत्यासी ॥ ४ ॥

दाविला सोंगाचा जमाव। दाऊनी केला विसर्जन।
मग संपादनीचा भाव। सामावला तेथें चि ॥ ५ ॥
सोंग उतरोनी ठेविलें। तेणें कर्तृत्व बुडालें।
या प्रकारें नटलें। मायास्वरूप ॥ ६ ॥
सोंगाच्या कर्तृत्वानें कांहीं। तयासी बंध मोक्ष नाहीं।
याकारणें तूं पाही। देहकर्म ॥ ७ ॥
उद्धवा तूं भक्तशिरोमणी। म्हणोनी दावितो कर्तृत्व करोनी।
येणें प्रकारें जाण मनीं। मुक्त आहे ॥ ८ ॥
ऐसें हें माझें ज्ञान। याची कोणी न जाणती खूण।
तें मी तुजलागून। सांगतु असे ॥ ९ ॥
जें जें तूंतें सांगितलें। तें तूं गुप्त करी वहिलें।
या ज्ञानाचे बोल। प्रगट करूं नको ॥ १० ॥
माया ते अचेतन। तिचा चालक मी जाण।
सोंग न्यायेंकरून। दाविलें तुज ॥ ११ ॥
हरिदाता हरिभोक्ता। ऐसें जाणे निजभक्ता।
भक्तिविचारु हा अरुता। सोंगरूपी ॥ १२ ॥
आतां या स्थूल देहाचें मूळ। तें ऐका गा सकळ।
जेणें होय निर्मळ। मन तुझें ॥ १३ ॥
बीजापासोनि वृक्ष विस्तारला। शाखापत्रीं बहू दाटला।
शेवटीं बीजीं सामावला। वृक्ष जैसा ॥ १४ ॥
बीजीं वृक्ष सामावला। तेथें शाखापत्ररहित जाला।
याप्रकारें उद्धवाला। सांगे देव ॥ १५ ॥
स्थूळ देह पंचभूतात्मक आहे। त्यामाजी नाना विकार पाहे।
तूं तो निर्विकार आहे। काय भुली पडलीसे ॥ १६ ॥
जैसी चंद्रीं कळा। किंवा जैसी गोडी गुळा।
तैसा परब्रह्मावेगळा। कैसा होशील ॥ १७ ॥
आप तेज वायो पृथ्वी आकाश। येणें स्थूल देहाचा प्रकाश।
हें मायीक याचा नाश। विलया जाता ॥ १८ ॥
हा पंच भूतांचा व्याप। अवघा नासला साक्षेप।
मग होऊनी निर्विकल्प। ठाके जैसा ॥ १९ ॥

निर्विकल्प बीज । तेथें माया आटली सहज ।
मग विस्ताराचें चोज । कवण सांगे ॥ २० ॥
तेथें देखणेंपण हारपलें । मग काय सांगे वहिलें ।
सांगणेंपण मावळलें । तये स्थानीं ॥ २१ ॥
तेथें हारपला विस्तारु । तो सांगतां नये प्रकारु ।
सांगतां विस्तारु । कुंठित जाला ॥ २२ ॥
जैसी कुलालाची करणी । दुरोनी मृत्तिका आणी ।
परी तो ह्मणत नाहीं मनीं । नाना बोळकी करीन ॥ २३ ॥
मृत्तिका आणोनी घरीं । मग तिचे शोधन करी ।
खडे कंटक निवारी । निवडोनीया ॥ २४ ॥
मृत्तिका हे निर्विकार । तिचा च होईल विस्तार ।
निरहेत विचार । आहे तेथें ॥ २५ ॥
मग उदकासी प्रोकशुनि । गोळा केला एकेपाणीं ।
तेथें विटाळाची मांडणी । कायसी बोलें ॥ २६ ॥
जोंवरी आकार नाहीं । तोंवरी निर्विकार पाही ।
तयासी विटाळ तो हि । मानूं नये ॥ २७ ॥
ऐसा पंचभूतांचा मेळु । कुह्लाळें केला एक गोळु ।
मग तयाचा आकारु सकळु । केला तेणें ॥ २८ ॥
मृत्तिकेनें काय तया सांगितलें । माझें कर्तृत्व करी वहिले
परी तो आपल्या चाडें भले । करूं लागे ॥ २९ ॥
या प्रकारें उद्धवा । विवेक मनीं आणावा ।
विवेक आणोनी धरावा । मौनभाव पै ॥ ३० ॥
कीं राजा बैसे भद्रीं । सेवकाचे हातीं कर्तृत्व करी ।
वाईट बरें तरी । राजमाथा ॥ ३१ ॥
पंचभूतें ते जड अचेतन । त्यांत चेतनात्मक मी जाण ।
चैतन्य मजवीण । होणार नाहीं ॥ ३२ ॥
बरें वाईट करी सेवक । तें राजाचे माथा देख ।
ऐसी हे पंचभूतें चोख । वर्तावितसे उद्धवा ॥ ३३ ॥
कुह्लाळें अनेक मडकीं केलीं । वायोतेजें वाळविलीं ।
अग्नीदग्धें उत्तम जाली । अवाभाजनी ॥ ३४ ॥

मग ते अग्नीतून काढलीं । अठरा जाती हि नेली ।
तरी काय प्राक्तनाची बोली । तेथें आहे ॥ ३५ ॥
तरी काय कुल्लाळें तयाचे प्राक्तनीं । लिहीलीसे नाना करणी ।
हे विचारूनी मनीं । जाण ऐसें ॥ ३६ ॥
कुल्लाळानें नाहीं लिहीलें । अठरा जाती घरीं नेले ।
जें जें जया भावले । तें तें नेलें तयानें ॥ ३७ ॥
अठरा न्याती घेवोनि गेले । मग कर्तृत्व करूं लागले ।
नाना विचारें वहीलें । आपलें इच्छेनें ॥ ३८ ॥
नाना इच्छा करुनी । वर्तविती मडक्यालागुनि ।
जैसें जैसें वर्तविती जनीं । तैसें तैसें ते वर्ते ॥ ३९ ॥
काय मडकें बोलीलें तयासी । मला ये रीती वर्तविसी ।
हें भान तयासी । नाहीं रे उद्धवा ॥ ४० ॥
परी वर्तविलें जनीं ऐसें । तैसें तें वर्ते अनायासें ।
तें तें नांव आपैसें । जालें तया ॥ ४१ ॥
जें जें वर्तणुकींत घातलें । तें ते नांव तया जालें ।
येणें प्रकारें विस्तारलें । मायास्वरूप ॥ ४२ ॥
या प्रकारें तूं पाहे । मायाविस्तारु जालाहे ।
हें विवेकें पाहे । ज्ञानदृष्टीं ॥ ४३ ॥
उद्धवा ऐसें मडकें वर्तवितां । भंगलें कोणें काळें रे भक्ता ।
चांगलें ह्मणोनी चित्ता । शोक करिती ॥ ४४ ॥
जेणें वर्तविलें मडकें । तेणें दुसरें स्थापिले निकें ।
तें हि तैसेंच वर्ते देखे । शरीरसंगें ॥ ४५ ॥
जें मडकें भंगले । तें मृत्तिकेंत मिळालें ।
पंचभूतानें शोषीलें । अंश आपुले ॥ ४६ ॥
पंचभूतांचें अंश जाण । शोषीले जेणें चि तेणें ।
मडकें नांव पालटणें । जालें सहज चि ॥ ४७ ॥
मृत्तिकेचा विस्तारु । मृत्तिकीं सामावला साचारु ।
मग तेथें आपपरु । नाहीं रे भक्तराया ॥ ४८ ॥
उद्धवा येणें चि प्रकारें । माया वर्तवित शरीरें ।
तिचे इच्छे प्रकारें । वर्तवीत बापा ॥ ४९ ॥

यावरी उद्धव बोलीला । दृष्टांतें तो दाविला ।
संदेहो तो फेडिला । कृपाळुवा ॥ ५० ॥
देवा येक हेत उपजला । तेणें संदेहो पडला ।
तो फेडी वहिला । मनींचा माझ्या ॥ ५१ ॥
यमदूत नेती धरुनी । नानाप्रकारें करिती जाचणी ।
हें ऐकीयलें कर्णी । पूर्वापार ॥ ५२ ॥
तरी याचा कैसा भावो । फेडी माझा संदेहो ।
हें सत्य की वावो । कृष्णनाथा ॥ ५३ ॥
जनीजनार्दन ह्मणे । हें श्रीकृष्णाचें बोलणें ।
तें परिसावें सज्जनें । निर्मळ चित्तें करोनी ॥ ५४ ॥
इति श्रीनिर्विकल्पग्रंथ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासी ॥ ५५ ॥

---

## अध्याय चवथा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

मग बोलिले जगज्जीवन । उद्धवा हे सांगों नये जाण ।
हें अहंतेचें लक्षण । पुसिलें तुवा ॥ १ ॥
हें ज्ञान सांगता । आचारु नाश होईल रे भक्ता ।
मर्यादेचा तत्वता । फुटेल भंड ॥ २ ॥
जन नेसण्यांत नागवे आहे । ऐसें सर्वी वदताहे ।
परि वस्त्रानें च पाहे । शोभा तयासि ॥ ३ ॥
वस्त्रें फेडिल्यानें काहिं । जन बरें न ह्मणे पाहि ।
तैसि बोलि हे ही । सांगों नये रे उद्धवा ॥ ४ ॥
जेवि रतिभोगिचें सुख पाहे । विचारित्यासि सांगतां नये ।
तेणें प्रकारें आहे । हें हि उद्धवा ॥ ५ ॥
जेवि मुक्यानें खादली साकर । सांगतां नये तिचा विस्तार ।
परि निवाले त्याचें अंतर । तो चि जाणे ॥ ६ ॥
ऐसि ज्ञानाचि बोली । सांगों नये गुह्य खोली ।
बाजिगिरानें केली । माव जैसी ॥ ७ ॥

बाजिगिरें बाग केला । फाळिं पुष्पीं तो दाटला ।
दिसे सर्व सभेला । नाना फळजाती ॥ ८ ॥
कापिसाचे केले पारावे । ते सर्व जनीं पाहावे ।
कां रज्जूचे सर्प केले बरवे । मंत्रशक्ति ॥ ९ ॥
कां मृत्तिकेची केली साकर । खापरिचा रुपया मोहर ।
मग तयासि द्रव्याचा विचार । स्वल्प चि असे ॥ १० ॥
या प्रकारें लाघवि । येक मोडि येक दाखवी ।
परि तयाचि गोवी । न कळे कोणा ॥ ११ ॥
लाघवि करितो लाघवपण । परंतु मंत्राचें बळ जाण ।
मंत्रबळें लाघव जाण । केलें तेणें ॥ १२ ॥
या प्रमाणें उद्धवा जाण मनीं । हें केलें जैसे ज्यानिं ।
हें सर्व हि मिथ्या जाणोनी । मंत्र चि खरा ॥ १३ ॥
ऐसिया मंत्रबळें । लाघवी नाना लाघव खेळे ।
तैसें माझेनि बळें । वर्ते माया ॥ १४ ॥
तुवा यमाचा विचार पुसिला । तो साच कीं लटिका केला ।
हें गुह्य सांगों तुजला । सावध होईं ॥ १५ ॥
यम तो मि च जाण । येविषयिचें ऐक कथन ।
सांगों आतां पुरातन । तुजलागी ॥ १६ ॥
सांगतों मूळ उत्पत्ति । जेणें फिटे तुझी भ्रांति ।
हें ज्ञान कोणाप्रति । सांगितलें नाहीं ॥ १७ ॥
निरंजन निर्विकारु । कांहिं च नव्हतां आकारु ।
तेंचा विचारु । ऐक आतां ॥ १८ ॥
प्रथम इछा उपजली । तीन पत्रीं विस्तारली ।
ते कारिति जाली । विस्तारु हा ॥ १९ ॥
रज तम सत्व गुण । हे तिघाचे जाण ।
हे त्रिवर्ग मिळून । विस्तार जाला ॥ २० ॥
तीन पत्रांचीं नावें जाण । अकार उकार मकार मान ।
मग कर्तृत्व लक्षण । करिते जाले ॥ २१ ॥
रजोगुणें ब्रह्मा उपजला । सत्वगुणें विष्णु जाला ।
तमोगुणें शोभला । महारुद्र ॥ २२ ॥

रजोगुणें विस्तार केला । सात्विकें प्रतिपाळिला ।
तमोगुणें संहारिला । भक्तराया ॥ २३ ॥
अकार उकार मकाराचें लक्षण । हें सांगतों तुजलगुन ।
सावध करीं अंतःकर्ण । भक्तराया ॥ २४ ॥
अकार रजोगुणें ब्रह्मा जाला । पंचगुणें प्रकाशला ।
मग करितां जाला । सृष्टीकर्म ॥ २५ ॥
विचारें उपजविलें सृष्टिप्रति । आचारें स्थापिल्या ज्याति ।
धर्म लाविला स्वस्ति । ह्मणोनिया ॥ २६ ॥
चौथा वेद पठण । पांचवा तो उत्पन्न ।
ऐसें रजोगुणें जाण । विस्तारिलें ॥ २७ ॥
या प्रकारें भक्तशिरोमणी । चित्त देईं माझे वचनीं ।
जेणें होय धुनि । महापापाचि ॥ २८ ॥
पापासि च ठाव नाहीं । बळें पाप लाविति पाही ।
जे निर्विकल्प पाही । कल्पना चि नसे ॥ २९ ॥
चौऱ्यासिचें येक मूळ । कल्पनेनें केलें निराळें ।
ते कल्पना सकळ । अभ्र जैसें ॥ ३० ॥
आकाशासि अभ्र आलें । तेणें रविबिंब झाकोळलें ।
परि तें अभ्रावेगळें । असे बिंब ॥ ३१ ॥
कल्पनेचा पडदा जाणावा । तेणें भ्रांति पडे जीवा ।
परंतु निर्मळ गा उद्धवा । सूर्यन्यायें ॥ ३२ ॥
जैसा सूर्य गगनिं मिळाला । हा भाव सर्वांसि दिसों आला ।
परि तो असे निराळा । गगनाहूनी ॥ ३३ ॥
या प्रकारें भ्रांतिपडळ । हें रजोगुणें केलें सकळ ।
तेणें हा विमल । विस्तारु जाला ॥ ३४ ॥

॥ श्लोक ॥

असंख्य ब्रह्म जानामि कोटिविष्णुप्रळयंगतम् ।
गंगाकणसमोहीन्द्रः किंचिद्ध्याने महेश्वरः ॥ १ ॥

॥ टीका ॥

ध्यान सारुनि पाहे त्रिपुरारी । तव अनंत ब्रह्मा जाला शरीरीं ।
विष्णुने तरि या प्रकारी । अवतार घेतले ॥ ३५ ॥

जे जे ब्रह्मा उत्पन्न करी । ते ते प्रतिपाळि श्रीहरी ।
रुद्र तो संहार करी । सकळाचा ॥ ३६ ॥
उद्धवा मायेचे आधिन । तिन्हि देव आहे जाण ।
माया चि मान । श्रेष्ठ सकळ ॥ ३७ ॥
आतां मायेचीं नांवें । ते ऐक उद्धवा भावें ।
जेणें मन निवे । श्रोतियाचे ॥ ३८ ॥
माया संजीवनी उन्मनी । सत्रावी भुवनेश्वरी निरंजनी ।
गुणसाम्य अर्धमात्रा जाणि । इच्छा ब्रह्मस्वरूपी ॥ ३९ ॥
परात्पर ब्रह्म पावे । तरि हे हि मायेचे चि नांवें ।
ऐसें ऐक मनोभावें । चित्त देवोनिया ॥ ४० ॥
तेणें तुझें चित्त निवेल । माया भास कळों येईल ।
तेणें मन स्थिरावेल । ठायिंचे ठायीं ॥ ४१ ॥
ब्रह्म निरूपि माया । ते वेगळि रे भक्तराया ।
आतां सावध आणी हृदया । पुढिल गोष्टी ॥ ४२ ॥
त्रिगुण हे माया । पंचभूतें ते हि भक्तराया ।
नाना कल्पना त्याचि सखया । जाण मनीं ॥ ४३ ॥
ब्रह्म तें हि ह्मणिजे माया । या प्रकारें जाण उद्धवराया ।
आतां निर्गुणाचा ठेवा सखया । गवसला तुज ॥ ४४ ॥
बाहिर पसरली ह्मणोनि माया । आंत कोंदलें तें ब्रह्म सखया ।
या दृष्टांत उपाया । सांगों तुज ॥ ४५ ॥
बीजापासोनि वृक्ष विस्तारला । सेवटिं बीजीं सामावला ।
या बोलाचा खोला । सांगों तुज ॥ ४६ ॥
चित्त देईं माझे वचनीं । सर्व जग ब्रह्म जाणोनी ।
तेव्हां तुज स्वरूपकरणी । कळों येईल ॥ ४७ ॥
या प्रकारें तूं पाहे । सर्वव्यापक ब्रह्म आहे ।
हे खुण जया लाहे । तो चि जाण जीवन्मुक्त ॥ ४८ ॥
जीवन्मुक्ताचें लक्षण । तें तूं ऐक सावधान ।
मन करोनि अमन । राहे जो का ॥ ४९ ॥
जैसे पद्मिनिपत्र पाहे । उदकीं च होत आहे ।
परि उदकाचि नोहे । लिप्त जैसें ॥ ५० ॥

उदकावाचोनि कमळणी । होणार नाहीं सत्य मानी ।
परि ते जाण मनीं । अलिप्त जैसि ॥ ५१ ॥
तैसें हें विश्वजन । यामध्यें मि जनार्दन ।
पद्मिनिपत्रन्यायेंकरून । असें गा उद्धवा ॥ ५२ ॥
किं जैसें अनायासें । आठरा ज्याति समरसें ।
येर येरासि असे । भिन्नपण ॥ ५३ ॥
भिन्नपण हे ज्याति । इने केलि वेगळाली रिति ।
स्वाद घेतां चित्तिं । वेगळाला असे ॥ ५४ ॥
स्वाद वेगळा गा उद्धवा । तयासि पंचभूतांचा मेळावा ।
परंतु ज्यातिचा रुवा । भिन्न स्वादु ॥ ५५ ॥
तरि हे उत्पन्न जाले । पंचभूतें विकाशले ।
मजवीण वहिले । होणार नाहीं ॥ ५६ ॥
पंचभूतें ते जड । मजविण नाहीं वाड ।
परंतु ज्यातिचें गूढ । वेगळालें ॥ ५७ ॥
आतां किति सांगों ह्मा गोष्टी । सांगतां लिहितां न पुरे सृष्टी ।
विस्तारें वटिती । होईल येणें ॥ ५८ ॥
फार सांगतां विस्तारु । तेणें मनासि होईल विकारु ।
सांगितलेला प्रकारु । जाईल विलया ॥ ५९ ॥
उद्धव वदे वाणि । देवा जें जें सांगाल कृपाकरूनि ।
तें तें धरिन मनीं । बोल तुमचे ॥ ६० ॥
जैसा वेल गेला उंचिचा । तितुका विस्तार फुलाफळाचा ।
ह्मणोनि तुमच्या बोलाचा । विस्तारु व्हावा ॥ ६१ ॥
जनीजनार्दन ह्मणे । हें श्रीकृष्णाचें बोलणें ।
तें परिसावें सज्जनें । निर्मळ चित्तें करोनिया ॥ ६२ ॥
इति श्रीनिर्विकल्प ग्रंथ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भुत । अर्पण तयासि ॥ ६३ ॥

---

## अध्याय पांचवा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

मग बोलिले कृपानिधि । उद्धवा दृढ तुझि बुद्धि ।
विस्ताराचा निधि । ऐकोनि भ्रांत होऊं नको ॥ १ ॥

अन्न जेवि सगळें असे । तयासि आदरा ज्याति स्पर्शे ।
येणें विचारें कैसें । विटाळलें ह्मणिजे ॥ २ ॥
सगळें असता न विटाळे । उदकअग्निनें सोहळे केले ।
पिष्टी उदक मिळाले । अग्नि स्पर्शे ॥ ३ ॥
त्या अन्नाचें केलें पक्कान्न । ह्मणोनि विटाळ तयालागून ।
बाहेर असतां जन । न मानिति विटाळ त्यासि ॥ ४ ॥
अन्नाचें जालें पक्कान्न । विटाळ ह्मणति तयासि जन ।
मग करिति भक्षण । सोहळे ह्मणोनि ॥ ५ ॥
उद्धवा अन्न तें जातां चि पोटीं । विटाळाचि राहिली गोष्टी ।
ऐसि देहकर्मांचि पुटी । ऐक चित्त देवोनिया ॥ ६ ॥
कीं दीप मंदिरीं लाविला । तयापासोनि उजेड पडला ।
ऐसि माया आणि स्वरूपाला । अलिप्त जेवी ॥ ७ ॥
कीं लोह अग्नितुन काढिलें । तें घनघायें पिटिले ।
अग्निबळें जालें । लांबित जेवी ॥ ८ ॥
लोह अग्निसि मिनले । पदार्थ कर्त्या सुलभ जाले ।
जाणोनि दृष्टांति योजिले । ऐक उद्धवा ॥ ९ ॥
जैसें अग्निवाचून । लोह न पिटवे जाण ।
परि लोहासि अग्नी मान । अलिप्त चि ॥ १० ॥
किं फुलाचा परिमळु जैसा । फुलिं समावे आपैसा ।
अलिप्तपणें जैसा । पुष्पीं वसतसे ॥ ११ ॥
पुष्पामाजि परिमळु । तैसा जगामाजि मि गोपाळु ।
ऐसा सर्व भूगोळु । अलिप्तपणें रचियेला ॥ १२ ॥
जेवि अक्षरामाझारी । अर्थ जैसा निर्धारीं ।
ऐसा जाण मि मुरारी । चराचरीं व्यापकत्वें ॥ १३ ॥
अक्षराचा करितां शोध । अर्थ जैसा स्वतसिद्ध ।
ऐसा महाविवेकें भेद । सांपडे जाण पै ॥ १४ ॥
अक्षरें पुसितां पाहि । अर्थ जैसा गेला नाहीं ।
ऐसा मि देहि विदेही । व्यापक असे ॥ १५ ॥
व्यापक मि आहे । परि सर्वांसि अदेखणा पाहे ।
देखणेपण विलया जाय । सहज चि ॥ १६ ॥

यावरि उद्धव बोलिला । देवा माझा संदेह सर्व गेला ।
जो जो वृतांत सांगितला । तो तो सत्य स्वामिया ॥ १७ ॥
आतां येक पुसतो आपणाते । स्वल्प चि सांगिजे माते ।
जेणें माझिया चित्ताते । समाधान होय ॥ १८ ॥
देवा अवघा तूं आहेस येक । तरि कां जालासि अनेक ।
अनेक होऊनि लोप । धरिला कां ॥ १९ ॥
चराचर तू चि होसि । ऐसें भासविलें मानसिं ।
असोनि चारिसि । रूप तुझें कोण्या गुणें ॥ २० ॥
सर्व जग तूं जालासी । सर्वपणें तू शोभलासि ।
तरि भेद कां धारिलासी । अलिप्तपणें ॥ २१ ॥
ऐसा भेद कां धरिला हरी । तो सांगावा जि मुरारी ।
तेणें माझे अंतरीं । समाधान होय ॥ २२ ॥
यावरि बोले जगज्जीवन । उद्धवा ऐक सावधान ।
जेणेंकरून तुझें मन । संतोष पावे ॥ २३ ॥
उद्धवा तूं जाण गुज । मि निराभास निर्गुण सहज ।
मि अलिप्तपणें मौज । केलि असे ॥ २४ ॥
मि कोठें हि लिप्त नसे । सर्वांत असोनि वेगळा वसे ।
तें ऐक गा अनायासे । सांगों पुढें ॥ २५ ॥
उद्धवा उत्पत्तिकारणें । भेद केला नाना गुणें ।
भेदें सृष्टि आरंभणें । जालें असे ॥ २६ ॥
देवापासोनि भेद जाला । भेदीं देव सामावला ।
ह्मणोनि हा शोभला । भूगोल सर्व ॥ २७ ॥
आतां या भूगोलाची करणि । ते ऐक सावधपाणिं ।
जेणें होय धुनि । महत्पातकाचि ॥ २८ ॥
अर्धनारिनटेश्वर । तो मि च गा साचार ।
याकारणें भेदाकार । लाविला जनीं ॥ २९ ॥
प्रथम निरंजन निर्विकारु । त्यापासोनि अर्धमात्रेचा विचारु ।
तिजपासोनि तीन प्रकारु । त्रिगुण जाले ॥ ३० ॥
त्या गुणें भोगिली मात्रा । याचि ऐक कळासूत्रा ।
ते ऐक गा पवित्रा । आनारिसे असे ॥ ३१ ॥

तामसगुणें भोग केला । रजोगुण तो आकारिता जाला ।
सात्विकें प्रतिपाळिला । कर्म त्रिगुण जालें हें ॥ ३२ ॥
जेथोनि गुण उत्पन्न जाले । तियेसि च भोगूं लागले ।
हें बोलणें वहिलें । गौप्य करि ॥ ३३ ॥
मायापासोनि विस्तार जाला । विस्तारु माया भोगूं लागला ।
तेणें हा विस्तार जाला । जनसृष्टी ॥ ३४ ॥
ऐसे जन हे मात्रागमनी । सांगतां न ये उद्धवा वचनीं ।
उघडे करितां विस्तारु मांडणि । नासों पाहे ॥ ३५ ॥
याकारणें भेद लाविला मायेनें । तेणें सृष्टि चालो लागलि जाण ।
भेदामाजि सामावणें । जालें येक ॥ ३६ ॥
येक तें अनेक जालें । तेणें सर्व शोभले ।
ह्मणोनि भेद वहिले । जनाचारु जालासे ॥ ३७ ॥
याकारणें भक्तराया । अवतार घेतले रे सखया ।
भोगिता जालो माया । अर्धमात्रेसि ॥ ३८ ॥
यावरि उद्धव बोलिला । देवा येक संदेह पडला ।
तो पाहिजे फेडिला । माझिया चित्ताचा ॥ ३९ ॥
जियेपासोनि उत्पन्न व्हावें । सेवटिं तियेसि च भोगावें ।
या पापानें उद्धरावें । कैसिया परि ॥ ४० ॥
देवा तुह्मि सांगितले । मायेपासोनि गुण जाले ।
तिसि भोग करूं लागले । हें अनुचित ॥ ४१ ॥
येणें मि कंटाळलों । मनिं पाप आणितां जालों ।
येणें बोलणें खोचलों । मनि माझ्या ॥ ४२ ॥
मग बोलिले भगवान । जो जगाचे जीवन ।
तो उद्धवाप्रति जाण । बोलतां जाला ॥ ४३ ॥
उद्धवा गुण ते मि च जाण । नामरूपें मि भगवान ।
भोगितसे जाण । अर्धमात्रेसि ॥ ४४ ॥
धन्य धन्य तूं भक्तराज । जें पुसिलें तें नवल चोज ।
धन्य तूं या जगिं सहज । जगदात्मया वोळखिलें ॥ ४५ ॥
उद्धवा तुवा पृछा केली । तेणे ज्ञानखोलि उघडली ।
पुढें कथा चालिलि । भागिरथिसमान ॥ ४६ ॥

गंगाभागिरथिसि जातां । पापाचा क्षय होय तत्वता ।
ये कथनें उद्धवभक्ता । प्रकृतिदोष भस्म होति ॥ ४७ ॥
जो नृदेहीं आला । तेणें हा ग्रंथ पाहावा वहिला ।
तो जीवन्मुक्त जाला । ऐसें भगवान वदलासे ॥ ४८ ॥
या पुढें कथा उत्तम जाण । देवें बोधिलें आत्मज्ञान ।
माध्यान्ह समयो पूर्ण । जाला असे तेधवा ॥ ४९ ॥
प्रातःकालापासोनि । देव सांगे नाना वचनीं ।
माध्यान्हा आला तरणी । यमुनेतीरीं ॥ ५० ॥
दोन प्रहर जाले । दोन प्रहर शेष राहिले ।
पुढें कैसें वर्तलें । तये स्छळिं ॥ ५१ ॥
जनिजनार्दन ह्मणे । हें श्रीकृष्णाचें बोलणें ।
तें परिसावें संतजनें । निर्मळ चित्तें करोनिया ॥ ५२ ॥
इति श्री निर्विकल्प ग्रन्थ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासि ॥ ५३ ॥

## अध्याय साहावा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

उद्धव देवासि बोलिला । सर्व विस्तारु पाहिजे सांगितला ।
प्रेमपान्हा देई वहिला । श्रीकृष्णनाथा ॥ १ ॥
कृष्णा तू माझि माउली जरि । स्तन दे प्रेमलहरी ।
क्षुधा न गोलि निर्धारी । अद्यापि माझी ॥ २ ॥
तुवा ब्रह्मरस पाजिले दुग्ध । तेणे जालो मि सद्गद ।
ऐसे बोले उद्धव भक्तप्रसिद्ध । देवाप्रति ॥ ३ ॥
देवासि जडली प्रिति । ब्रह्मबोध करि उद्धवाप्रति ।
प्रेमपान्हा देत प्रिति । जैसि माउलि बाळका ॥ ४ ॥
उद्धवा अर्धमात्रा ते जाण । निरंजनि माया ह्मण ।
ते नारि अर्धांगि मान । स्वरुपि आसे ॥ ५ ॥
अर्धांगि ह्मणोन । अर्धमात्रा नाव जाण ।
प्रितिने ऐके वचन । भांबाउ नको ॥ ६ ॥

अर्धमात्रेचा विस्तारु । तो जाणिजे भागाकारु ।
लिंगाकारु हा विचारु । स्वरूप माझे ॥ ७ ॥
या दोघाचेनि विचारे । जन विस्तारिले सारे ।
या दोघावाचुनि तिसरे । कवण ते सांग ॥ ८ ॥
क्षिति स्थावर पक्षि कुळ । अथवा पक्षि अनंतकुळ ।
या दोघाचि आळमाळ । जाणे ऐसि ॥ ९ ॥
जेथे तेथे स्त्रिपुरुष । त्यापासोनि विस्तारे वंश ।
प्रकृतिपुरुष समरस । जाण ऐसे ॥ १० ॥
जैसे वृक्षि बीज समावले । की बीजे वृक्ष विस्तारले ।
ऐसे माया आणि रुपासि वहिले । जाणावे मनी ॥ ११ ॥
ज्या कारणे उद्धवा पुससि निवाडा । तो सांगता नय पवाडा ।
सांगितल्या लागे कुडा । जनाकारणे ॥ १२ ॥
मि च आत्माराम निधान । मायेमाजि समावोन ।
मायेसि च क्रिडतो जाण । सर्वकाळ जाणी ऐसे ॥ १३ ॥
मि च भोक्ता आणि समाविता । मि च कर्तृत्व करोनि अकर्ता ।
ऐसे जाणि भक्तनाथा । उद्धवा तू ॥ १४ ॥
यमुनानदिचे तिरि । उद्धवा बोधित श्रीहरि ।
आनंदाचि प्रेमलहरि । जालि तेथे ॥ १५ ॥
त्या आनंदाचा सुकाळु । सांगता लागे जिव्हा लोळु ।
येणे उद्धव जाला निर्मळु । किति वर्णु हरिभक्ता ॥ १६ ॥
या ज्ञाने जो पोट भरी । तो जेविला संसारसागरी ।
आंचवले भेदविकारी । संसाराच्या ॥ १७ ॥
देह असोनि विदेहपण । या ज्ञाने करोनि होय जाण ।
हे जीवन्मुक्ताचे लक्षण । बोलिला देव ॥ १८ ॥
हा देवभक्ताचा संवाद आहे । भवसागराचि नौका पाहे ।
येणे ज्ञाता तो तरोनि जाय । पैलपारु ॥ १९ ॥
हा ग्रन्थ जो श्रवण करि । तो चि ज्ञाता चराचरी ।
चतुरपणे संसार करि । भक्ति करी निरहेते ॥ २० ॥
हरिदाता हरिभोक्ता । हरिव्यक्ता अव्यक्ता ।
व्यक्तपणे जाला वर्तता । सृष्टिचारु ॥ २१ ॥

ऐसे देव बोलिला । तेणे उद्धव संतोषला ।
बहुप्रकारे सुखि केला । जनार्दने ॥ २२ ॥
इति श्रीनिर्विकल्प ग्रन्थ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भूत । अर्पण त्यासि ॥ २३ ॥

## अध्याय सातवा

### ॥ श्रीगणेशाय नमः ॥

श्रीकृष्ण ह्मणे उद्धव भक्ता । जेणे सौख्य होय तुझिया चित्ता ।
ते च सांगतो कथा । सावधान परियेसि ॥ १ ॥
जैसा स्त्रिसि ऋतु आला । पुरुष मैथुन करु लागला ।
ते मैथुनि राहिला । गर्भ जैसा ॥ २ ॥
होता पुरुषाचे ब्रह्मांडी । तो घातला तियेचे पींडि ।
आपण विसरोनि सेवटि । राहिला वेगळा ॥ ३ ॥
आपण वेगळा जाला । गर्भ उदरि समावला ।
परंतु नाहि कळला । दोघातेहि ॥ ४ ॥
त्यासि पक्षमास भरले । मग साक्षि येते जाले ।
या प्रकारे रचिले । देहातेही ॥ ५ ॥
जेव्हा उदरि समावले । तेव्हा प्रेमे वोसंडिले ।
बाहेर निघता कष्ट वाटले । शरिरासि ॥ ६ ॥
गर्भ पडिला ज्यावेळि । तेव्हा ममता संचरली ।
मग मानिति जालि । संतोष जैसा ॥ ७ ॥
परि तो गर्भ दोघांचा । ऐसा विचारु वाटला साचा ।
तो सांगतो तुज वाचा । सावध होई ॥ ८ ॥
पुरुष आणि स्त्री । दोघे समावले उदरी ।
ते शोधिति जालि शरिरी । कष्ट यातना ॥ ९ ॥
पुरुष तो स्त्रि पोटि समावला । आता विचारि उद्धवा वहिला ।
उद्धव देवासि बोलिला । शब्द खुंटला स्वामिया ॥ १० ॥
हे दृष्टांति बोलणे ऐकोन । उडाले पृथ्विचे भान ।
उद्धव ह्मणे धन्य धन्य । जगजिवन तुचि देवा ॥ ११ ॥

सर्व जग तु जालासि हरि । परी माया उपजली कोणे प्रकारी
ते सांग गा मुरारि । श्रीकृष्णनाथा ॥ १२ ॥
मग ह्मणे जगजिवन । उद्धवा तूं फार विचक्षण ।
तरि पुसिला जो प्रश्न । तो सावधान परियेसी ॥ १३ ॥
जैसे परजन्यकाळी अभ्र आले । ते विस्तारे विस्तीर्ण जाले ।
तैसे मायीक उद्भवले । मजपासोनि ॥ १४ ॥
अभ्र आले घनघोर । वर्षाव केला पृथ्विवर ।
अलिप्तपणे निरभ्र । होउनि गेले ॥ १५ ॥
उत्पन्नजाले पाकळ । व्यापिते जाले रविमंडळ ।
मायेने व्यापिले सकळ । भूमंडळा तेवि ॥ १६ ॥
ऐसे किति सांगो तुज । माया ते ब्रह्मबीज ।
या ज्ञानाचा पैज । कोणे घेतली नाही ॥ १७ ॥
तु विचारिसी वारंवार । तरि मि सांगतो साचार ।
ग्रन्थासि होईल विस्तार । येणे बोले ॥ १८ ॥
तुवा पुसिले प्रितिने । तरि माया ते मन जाणने ।
कर्म केले त्रिगुणे । मनापासोनि ॥ १९ ॥
मनापासोनि त्रिगुण । मनापासोनि चौदाभुवन ।
मने केले उत्पन्न । चराचर हे ॥ २० ॥
उद्धव तुझा तु चि पाहे । मन कैसे धावताहे ।
मनावाचोनि कार्य होय । ऐसा पदार्थ नाही च की ॥ २१ ॥
मनापासोनि ईछा जालि । मने जे जे कल्पना केली ।
तेथे बुद्धि संचरली केले कार्य ॥ २२ ॥
मन बुद्धि चित्त अहंकार । हे हि मायाचि साचार ।
यापासोनि विस्तार । जाला असे उद्धवा ॥ २३ ॥
अंतःकर्ण ऐसा कोंब ह्मणिजे । कोंबाचा विस्तार जाणिजे ।
शाखापत्रि विस्तारिजे । ऐसी हे मनमाया ॥ २४ ॥
ऐसि हे मनमाया । जाणिजे भक्तराया ।
निजज्ञान हे सखया । गौप्य करी ॥ २५ ॥
सर्व जन हे व्यापिले । मनबुद्धिने वेष्टिले ।
चित्त अहंकारे भांबावले । शुद्धि नाहि अज्ञानिया ॥ २६ ॥

मन ते मज पासोनि जाणने । सृष्टि रचिलि हे मनाने ।
भगवंत तो जाणने । निरहेत आसे ॥ २७ ॥
हा एवढा विस्तारु जाला । साक्षिपणे येथे समावला ।
परंतु कर्तृत्वानिराळा । ऐसे जाणिजे ॥ २८ ॥
देव युगायुगि निर्मळ । जयासि नाहि डळमळ ।
तो सर्वकाळ अखिल । ऐसे जाणिजे ॥ २९ ॥
कोण उपमा त्यासि । तुज दावितो दृष्टांतासि ।
कल्पवृक्ष ऐसियासि । ह्मणिजे गा ॥ ३० ॥
कल्पवृक्ष हा कैसा ह्मणसि । तेहि सांगतो तुजसि ।
निर्मळ चित्ते परियसि । उद्धवा आता ॥ ३१ ॥
कल्पवृक्ष हा दृष्टांत ऐसा । जो प्रसवला आपैसा ।
ह्मणोनि कल्पवृक्ष ऐसा । दृष्टांतासि आले ॥ ३२ ॥
जैसा उर्णनाभिचा तंतु । पसरि ग्रासि क्षणा आतु ।
ऐसा लिलावीवर्तु । जाण मनी ॥ ३३ ॥
हा दृष्टांत तुज दाविला । परि तयासि नाहि शोभला ।
परंतु न्याये ऐसा कळो आला । कल्पवृक्ष पै ॥ ३४ ॥
कल्पि कल्पना पुरवेल । त्या विरहित जाणिजेल ।
कल्पनातीत ह्मणिजेल । तया पुरुषासि ॥ ३५ ॥
ऐसा कल्पनाविरहित । तो चि जाण निज ज्योत ।
त्याचे सत्तेने वर्तत । सत्तानिरहेत आसे तो ॥ ३६ ॥
तयासि नाहि वेष गुण । जो निर्गुण निरंजन ।
ते न मिळे कल्पिता जाण । ते चि ब्रह्म जाणिजे ॥ ३७ ॥
ऐसे जे काहि आहे । तयासि विचारे पाहे ।
विवेके तयाचि सोये । येईल अपैसि ॥ ॥ ३८ ॥
वेद पुराणाचा वक्ता । तयाचे अंगि आलि अहंता ।
तयासि स्वरुपाचा रस्ता । ठाउक नसे ॥ ३९ ॥
वेद सगुणस्तुतिचे कर्ते । कर्मधर्म जाले स्थापिते ।
तेहि मायेचे मते । पारखि धरि ॥ ४० ॥
वेद भगवंते बोलिला । सगुण पदार्थ उभारिला ।
जैसी जलाब्धिला । मर्यादा आसे ॥ ४१ ॥

वेदे केले बंधन । तेणे बांधले चौकडुन ।
येणे चि जन्ममरण । लाविले जनासि ।। ४२ ।।
यावरि उद्धव बोलिला । देवा हा शब्द नाहि चित्ति आला ।
वेदे जन्म मृत्यु लाविला । कैसिया परि ।। ४३ ।।
देव बोलिले उद्धवासि । चित्त देइ शब्दासि ।
सावधान परियेसि । भक्तनाथा ।। ४४ ।।
वेदे कैसे जन्ममरण लाविले । हे जाण तु वहिले ।
जेणे तुझे चित्त मावळे । महा निःशुन्यी ।। ४५ ।।
जनिजनार्दन ह्मणे । हे श्रीकृष्णाचे बोलणे ।
ते परिसावे संतजने । निर्मळचित्ते करोनिया ।। ४६ ।।
ईति श्रीनिर्विकल्पग्रन्थ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संताचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासि ।। ४७ ।।

---

## अध्याय आठवा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

देव ह्मणे राजप्रधान जैसा । अर्धराज्य भोगी अनायासा ।
जनी दावी राजभय तैसा । धाक वाटे जनासी ।। १ ।।
जो जो भय दावी । तों तों जन अधिक लवी ।
प्रधान मानी युक्ति बरवी । निरोपम ही आसे ।। २ ।।
ऐसे प्रधानें कष्टविले । जन सर्व भिवो लागले ।
तेथें निधडेपण केलें । सद्गुरु कृपेनें ।। ३ ।।
जन पडले विचारीं । आपण जाऊं राजमंदिरीं ।
मग जावोनि हाकारी । राजयालागीं तये वेळीं ।। ४ ।।
राजानीं सन्मानिले । कौलपत्रे तया दिधले ।
जन्ममरण खंडिले । युगायुगी ।। ५ ।।
जो प्रधानासी भ्याला । तो जन्ममरण भय पावला ।
तयासी सुदीन उगवला । नाहीं गा उद्धवा ।। ६ ।।
तैसा वेदाचा विस्तार । तो ऐक विवेकाकार ।
अज्ञानअंधःकार । निरसे तुझा ।। ७ ।।

सृष्टि आरंभितां माया वेदें । बडिवारिली सखया ।
ह्मणोनि वेदमर्यादा वाया । केली आसे ॥ ८ ॥
वेदवाक्यें कर्म केलें । तें देवासी अर्पिलें ।
आशाबंधनीं राहिले । फललोभें ॥ ९ ॥
वेदकर्म ते सगुण । सगुणासीच केले अर्पण ।
त्यावरि घेती असिर्वचन । जन्मफल भोगाया ॥ १० ॥
उद्धवा किती सांगो ऐसे । वेदमार्ग तो पिपीलिक आसे ।
विहंगम मार्गें सिद्ध पुरुष । जाणती मनीं ॥ ११ ॥
पिपिलिका हिंडे मूलाग्रें । पत्रोपत्रिं विचरे ।
फळीं जाउनी फिरे । वेरझार मात्रचि ॥ १२ ॥
फळ देखिलें तिणें । अंतरींचा गर्भ नेणे ।
काय आसे अदेखणे । तिये लागीं ॥ १३ ॥
फळ देखिलें तिणें । फळ गोडी न जाणे ।
कर्मवेशें भ्रमणें । तिये लागीं ॥ १४ ॥
जरी जाणती फळगोडी । तरि तिचें कर्म अति चोखडी ।
फळगर्भ न कळतां परवडी । वृथा हुरपडी तियेचि ॥ १५ ॥
जया पाहातां भास । तया रूप ना वेष ।
निरामय स्वयंप्रकाश । ते केवीं प्राप्त होय ॥ १६ ॥
वेद तो रजोगुण । ब्रह्मया पासोन जाला उत्पन्न ।
एक चि द्वैत जाला जाण । रचावया सृष्टी हे ॥ १७ ॥
आतां उद्धवा चित्त द्यावें । गुणविवरण ऐकावें ।
मन सावधान करावें । लाउनी शब्दासी ॥ १८ ॥
मन माया जाली । तिजपासोनि इच्छा उपजली ।
मग ते चि जाली । त्रिगुणमाया ॥ १९ ॥
त्या मनापासोन । त्रिगुण जाले उत्पन्न ।
रज तम सात्विक जाण । जाले चि ते ॥ २० ॥
मनापासोन त्रिगुण जाले । गुणेंकरोन मन शोभले ।
त्रिगुणात्मक कर्म जाले । येणें प्रकारें ॥ २१ ॥
येणें गुणें रे सखया । माया विस्तारली भक्तराया ।
परी मुख्य कोणती माया । ते नेणती सकळ जन ॥ २२ ॥

मनाचा चाळक तो असे । मन तें त्यामाजीं वसे ।
जैसें सूर्यतेजें होतसे । सृष्टिकर्म ॥ २३ ॥
मन चाले माझिया सत्ते । मन वर्तवी प्रकृतीतें ।
प्रकृति वर्तवी इंद्रियातें । ऐसे जाणी उद्धवा ॥ २४ ॥
मी निरंजन निराकारु । मज नाहीं अकारु ।
ऐसे चि मन साचारु । जाणावे ॥ २५ ॥
माझे सत्तेनें वर्ते मन । मन सत्तेनें शरीर वर्ते जाण ।
शरीरसंगें इंद्रियकर्म पूर्ण । होत आसे उद्धवा ॥ २६ ॥
यावरी उद्धव बोलिला । देवें जो जो पदार्थ सांगितला ।
तो तो ऐकोनि संतोष जाला । माझिया मनीं ॥ २७ ॥
आतां ऐसें वाटतें मनीं । तूं अकर्ता सर्व करूनि ।
फेडिली पृच्छेचि शिराणी । माझी स्वामिया ॥ २८ ॥
तूं करोसि अकर्ता । ऐसें भासलें जी कृष्णनाथा ।
पुढें पृच्छेची वार्ता । कुंटित जाली ॥ २९ ॥
यावरी बोले वनमाळी । तुवां पुसिलें मंजुळी ।
ह्मणोनि निजज्ञानाची खोली । दाविली तुज ॥ ३० ॥
हें ज्ञानाचें ही निजज्ञान । बुद्धीसी हा बोध जाण ।
चित्त अहंकार हरपोन । जाती येणे ॥ ३१ ॥
चांडाळासी होय बोध । येणें नासती भेदाभेद ।
ज्ञानियासी उपजे प्रबोध । ऐसे सांगितलें उद्धवा ॥ ३२ ॥
ज्याचे गाठीं पूर्वपुण्य । त्यासीच हा ग्रंथ होय श्रवण ।
चांडाळ ते ही तरोन । जातील येणें ॥ ३३ ॥
वेदांत तो जनाचारु । त्यासी पिपीलिकां विवरु ।
विहंगम तो सिद्ध साचारु । मूळ पावे ॥ ३४ ॥
ते कथन सांगो जरी । तरी ग्रंथ जाईल विस्तारीं ।
स्वल्पाचि सांगतो सावरी । मन आपुले ॥ ३५ ॥
जेणें आपणियातें जाणितलें । त्या स्वसुख हाता आलें ।
मग तयासी सर्व कळलें । समदृष्टी ह्मणोनियां ॥ ३६ ॥
सर्वमय ब्रह्म येक । ऐसा जयाचा विवेक ।
साम्राज्य पावे रंक । गुरुकृपे जैसा ॥ ३७ ॥

या ग्रंथापुढें बोलणें । कुंठित जालें उद्धवा जाण ।
या ग्रंथीं ज्याचें अवलोकन । तो धन्य मानवी येकू ॥ ३८ ॥
ऐसे देवो बोलिला । तेणें उद्धव संतोषला ।
मौन्य पदार्थ बोलणें पडिला । उद्धवा कारणें ॥ ३९ ॥
जनीजनार्दन ह्मणे । हें श्रीकृष्णाचें बोलणें ।
परिसावे संतजनें । निर्मळचित्तें करोनियां ॥ ४० ॥
इति श्रीनिर्विकल्प ग्रंथ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासी ॥ ४१ ॥

---

## अध्याय नववा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

मग ह्मणे दातार । उद्धवा का जालासी निसूर ।
पुढिले विचाराचा विचार । बोला वेगीं ॥ १ ॥
न पुसतां उगा राहासी आतां । तरी तूं अंतरसि रे भक्तनाथा ।
याकारणें तत्वतां । बोल कांहीं ॥ २ ॥
उद्धव ह्मणे कृष्णनाथा । तूं त्रिलोकीचा भर्ताभोक्ता ।
ऐसे मानले दृढचित्ता । समाधान जाह्लें ॥ ३ ॥
परी येक पुसी उपजली । ते पुसतो कृष्णमाउली ।
तूं सांगावे ये वेळीं । जावें आता स्वस्थळा ॥ ४ ॥
देवा मागे सांगितलें मज । त्रिलोक हे मायेचे चोज ।
हे नासतील सहज । ऐसे बोलिलेती देवा तुह्मी ॥ ५ ॥
आतां मन माया सांगितली । तेणें चित्तवृत्ति भांबावली ।
ते सांगा करोनि वेगळी । क्षीरनीरा सारखी ॥ ६ ॥
मागें हा भूगोल सांगीतला । तो हि नाशवंत तुह्मि केला ।
या बोलें कोण बुझाला । उद्धवा जाणा ॥ ७ ॥
मग देव बोले उद्धवासी । श्रोता ऐसाचि पाहिजे वक्त्यासी ।
तेणें संतोष मानसीं । होत आसे ॥ ८ ॥
वक्ता चतुर जाला जरी । श्रोता अज्ञान अंतरीं ।
तेणें होत नाहीं पुरी । मनोरथाची ॥ ९ ॥

वक्त्यापरीस श्रोता पाहिजे सावध । तेव्हांचि पूर्ण होय बोध।
ते वार्तेचा अनुवाद । संतोष संगे ॥ १० ॥
या कारणें उद्धवा शिरोमणी । धन्य येक तूं त्रिभुवनीं ।
कां जे बोलणें तुझे मनीं । मानिले आसे ॥ ११ ॥
आतां तुझे भ्रांतीचें निरसन । तें मी करितों जाण ।
तें ऐक देवोनि श्रवण । भावबळें ॥ १२ ॥
मनमाया हे अविनाश । ईस नाहीं रूपरेष ।
हे स्वरूपाचे हृदयास । होती सत्वगुणें ॥ १३ ॥
ऐसी सत्वगुणे वर्तता । काळ क्रमिले रे भक्ता ।
मग जाला बोलता । करुणावचनीं ॥ १४ ॥
त्या बोलण्याची कूसरी । मार्कंडेय बोलिला नानापरी ।
तें सांगतों तुज जरी । न सांगसी कवणातें ॥ १५ ॥
मार्कंडेय तोचि गा उद्धवा । साक्षी ह्मणोन जन दावा ।
निर्वाण बोलाच्या भावा । भक्तराया ऐके गा ॥ १६ ॥
मन ते त्रिगुणरहित । अशक्तपणें होते वर्तत ।
मग कारणातें करीत । अकारु ॥ १७ ॥
मग उद्धवें केली पुसी । देवा प्रळयीं कोठे होतासी ।
ते सांगिजे हृषिकेशी । कृपा करोनि दातारा ॥ १८ ॥
मग ह्मणे वनमाळी । मी न दिसे कवणीय काळीं ।
स्थळ पुसिले समूळीं । तरी ते ऐक आतां ॥ १९ ॥
जैसे अलंकार आटिले । गोळ करोनि ठेविले ।
तैसे येकपणें राहिले । प्रयागपत्रावरी ॥ २० ॥
प्रयाग तो चि परलोकु । ऐसा धरी रे विवेकु ।
ते आसे सदोदित येकु । युगायुगीं ॥ २१ ॥
सर्व नाशेल रे माया । अविनाश जी भक्तराया ।
हे खुण जाणोनियां । जाती प्रयागदर्शनीं ॥ २२ ॥
प्रयागवृक्ष जेणें देखिला । तो मजसमान जाला ।
ऐसें देव बोलिला । उद्धवाप्रतीं ॥ २३ ॥
या कारणें भक्ता । मार्कंडेय ठेविला साक्षितार्था ।
ते सांगतो तुज कथा । चित्त देउनी ऐकें पां ॥ २४ ॥

अकार करायाचें कारण । तें सांगतों तुजलागोन ।
समूळ कथेचें निरूपण । श्रवण करी ॥ २५ ॥
जैसें स्वप्नीं कर्म केलें । नाना विचारी वर्तले ।
परी इंद्रिय नाहीं कष्टले । येणें कर्मीं ॥ २६ ॥
सुषुप्तीनें व्यापिले । तेणें शरीर जडत्व पावलें ।
शरीरावीण कर्म केलें । नाना बुद्धि करोनि ॥ २७ ॥
स्वप्नामध्यें रचिले ग्राम । कीं नाना प्रकारें दानधर्म ।
तीर्थ यात्रा हवन नेम । केले जैसे ॥ २८ ॥
जें जें कर्म शरिरें केलें । तें तें समई खरें चि भासलें ।
खोटें ह्मणोनि आटले । जागृति होतां ॥ २९ ॥
हवन केलें स्वप्नामधीं । कीं ग्राम रचिले नानाबुद्धि ।
कीं द्रव्य खर्चिलें कोट्यावधी । ऐसे देखे ॥ ३० ॥
कर्म करितो मजुरी । स्वप्नीं द्रव्याचा व्यापार करी ।
ऐसी मनमायेची कुसरी । रचिली आसे ॥ ३१ ॥
जो जातीचा होता मजुर । स्वप्नांत जाला मायापसार ।
परंतु ते नाहीं खर । ऐसे जाणिजे उद्धवा ॥ ३२ ॥
या प्रकारें भक्तराया । पसारलीरे मनमाया ।
परी लटिका विस्तारु सखया । विस्तारला आसे ॥ ३३ ॥
या ज्ञानाची कुसरी । उद्धवा पाहे आपले शरीरीं ।
मन आसे हृदया माझारी । येत ना जात ॥ ३४ ॥
मन ते अंतःकर्ण इंद्रिय जालें । तेणें शरीर वर्तविलें ।
परंतु शरिरानिराळे । मन आसे ॥ ३५ ॥
मागें तूतें सांगितलें । तें मनाचे कर्तृत्व जालें ।
ते ही लया जाईल वेळे । कोणे ही ॥ ३६ ॥
जे स्वप्नीं कर्म केलें । ते जागृति लटिकें बोलिले ।
तैसे मनाचे वर्तविले । लटिके की रे उद्धवा ॥ ३७ ॥
मनें जो जो विस्तार केला । तो तो नासोन जाईल बहिला ।
परी मनाचा नाश नाहीं जाला । कोणिये काळीं ॥ ३८ ॥
जैसें स्वप्न खोटें जालें । त्याचें कर्तृत्व नासोन गेलें ।
परी ज्यानें देखिले । तो लटिका नव्हे गा ॥ ३९ ॥

जैसा तो आला न गेला । नाहीं द्रव्याचे व्यापारीं वर्तला ।
तो येकेठायीं पहुडला । आसे मंदिरीं ॥ ४०
सुषुप्तीनें पहुडला । मग स्वप्नावस्था पावला ।
जाग्रतींत सांगो लागला । स्वप्नकर्म आपुलें ॥ ४१ ॥
स्वप्नीं कर्मे जाले । ऐसे शरीर वर्तले ।
परी शरीर नाहीं गेलें । तया संगे रे उद्धवा ॥ ४२ ॥
तैसे मन तें मजमधीं होय । स्वप्नन्यायें कर्म करितो पाहे ।
कर्म तें पावलें विलय । मन तें अविनाश ॥ ४३ ॥
जैसा कुळंबी कृषिकर्म करी । नानापरीचे बीजे पेरी ।
तो चि इच्छेनें संहारी । कर्म केलें ॥ ४४ ॥
तो चि बीजाकारणें पेरी । तो चि त्याचा प्रतिपाळ करी ।
सेवटी संहार करी । तो चि त्याचा ॥ ४५ ॥
त्या प्रकारें उद्धवभक्ता । विवेकें समजावें कर्तृत्वा ।
नाना प्रकारें बुद्धिहेता । पाहिजे तेथें ॥ ४६ ॥
मन येत ना जात चोख । शरीर वर्तविते देख ।
परी उद्धार तो लेख । मनापासोनि जाला ॥ ४७ ॥
ह्मणोनि मनाचे केलें साच न मानी । राहे मनाचा साक्षी होउनी ।
तेणें तूं निर्वाणीं । पावन होसी ॥ ४८ ॥
नाहं कर्ता नाहं भोक्ता । ऐसें मानिजे उद्धवभक्ता ।
येणें पावसी तत्वतां । स्वरूपाचा पारु ॥ ४९ ॥
देहसंगें कर्म करावे नाना । त्याची अहंकृती नाणवी मना ।
अहंकृतीफळाशा त्यजोन जाणा । स्वकर्मसाक्षीपणा करावें ॥ ५० ॥
जो कर्माचा साक्षी राहिला । तो सर्वांसी मुकला ।
तो चि स्वसुख पावला । स्वरूपाचें ॥ ५१ ॥
करावा बुद्धिचा प्रकाशु । अवघा देव हा उपदेशु ।
परंतु वर्णावर्ण कर्माचा नाशु । करो नये ॥ ५२ ॥
ज्या कर्मासी भोक्ता जाला । त्यासी त्या कर्माचा भोग लागला ।
कर्म सांडितां वहिला । कर्मचांडळ ह्मणिजे ॥ ५३ ॥
ज्या ज्या कर्मासी यावें । तैसें आचारें विचारें वर्तावे ।
तेणें मुक्त व्हावें । सर्व काळ ॥ ५४ ॥

जो आचारविचार भंगला । तो कर्मचांडाळ जाला ।
तो रौरवीं पडला । चंद्रार्कवरी ॥ ५५ ॥
आत्मवत् सर्व जाणावे । परंतु आचाराते न भंगावे ।
आचारवर्तणुकी पावावे । परमपद ॥ ५६ ॥
जो आचारासी भंगला । तो चांडाळांत बोलिला ।
यमपुरीचा जाला । भोक्ता अकर्मे ॥ ५७ ॥
या प्रकारें देव वचन । बोलिला उद्धवालागुन ।
तेणें बुझित जालें मन । उद्धवाचें ॥ ५८ ॥
जनीजनार्दन ह्मणे । हे श्रीकृष्णाचें बोलणें ।
तें परिसावें संतजनें । निर्मळचित्तें करोनियां ॥ ५९ ।
इति श्रीनिर्विकल्प ग्रंथ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासी ॥ ६० ॥

---

## अध्याय दहावा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

उद्धव देवासि बोलिला । स्वामी जो जो पदार्थ सांगीतला ।
अवघा देव ऐसा भासला । सर्वांघटि ॥ १ ॥
सर्वांघटि भगवान । नांदताहे परिपूर्ण ।
तयासि द्वैतपण । कैसे धरावे ॥ २ ॥
अवघाचि देव जाला । तेथें विटाळ कोणासि लागला ।
आचार तरि वहिला । कोणासि धरावा ॥ ३ ॥
ऐकता उद्धवाचे वचन । कंटाळले श्रीभगवान ।
ऐसे बोलो नको रे वचन । उद्धव अज्ञाना ॥ ४ ॥
उद्धवासि देव बोलिला । सर्वांठायि भगवान जाणितला ।
भूतदयेनें वहिला । प्रऱ्हाद एकु ॥ ५ ॥
शत्रुमित्र सम मानिले । विश्वासे प्रचितिस आले ।
परि काय तेणे लापले । आचारपण ॥ ६ ॥
ब्रह्मा आणि विष्णु । तिसरा रुद्र अति गहनु ।
ऋषिकुळे सर्वजनु । कोणे आचार सांडिला ॥ ७ ॥

जोवरी शरिरी प्राण असे । तोवरि विटाळला भासे ।
आचारासि जो वसे । तो चि धन्य ॥ ८ ॥
आचार ह्मणिजे देव । आचार तो चि शिव ।
आनाचार हे माव । नासोनिया जाईल ॥ ९ ॥
उद्धवासि देव बोलिला । जेणें आचार सांडिला ।
तो नाहि पावला । सात्विकज्ञान माझें ॥ १० ॥
स्वरुपि न मिळे आचार सांडिता । न मिळे तिर्थयात्रा करिता ।
नाना मते विचारिता । न कळे पारू वस्तुचा ॥ ११ ॥
उद्धवासि बोले चक्रपाणि । आता हे ज्ञान ऐके श्रवणी ।
ते भ्रांतिचि कडसनि । निघोनि जाईल ॥ १२ ॥
तुज ऐसा भास जाला । अवघा देव चि विस्तारला ।
परंतु देव निराळा । कर्माहुनि ॥ १३ ॥
देवा अंगि नाहि कर्म । देवासि नाहि विचारवर्म ।
तो सदोदित अकर्म । करोनि निराळा ॥ १४ ॥
त्याचे कर्तृत्व न कळे कवणा । त्याचे स्वरूप न दिसे जना ।
तेथे कैसे कर्म जाणा । विवेक धरि रे उद्धवा ॥ १५ ॥
या कारणे पुर्विंच सांगितले तुज । जे ज्ञानाचे निजगुज ।
ते ज्ञान अचारे चोज । राहो न शके ॥ १६ ॥
ऐसे उद्धवा तुते । पुर्वि सांगितले होते ।
ते सांडोनि परते । मनासि भ्रांति पडलि असे ॥ १७ ॥
तरि आता सावध होय । शब्दी शब्द भेदोनि पाहे ।
तेणे तुझे स्वहित होय । निजहिताचे ॥ १८ ॥
निजहित जरि चोरिजे । तरि आपुले पारके वोळखिजे ।
ते सांगतो ते वोजे । जतन करि शब्दासि ॥ १९ ॥
उद्धवा सकळ जन मिच जालो । होवोनि निराळा राहिलो ।
कर्मबंध नाहि जालो । सकळासि अलिप्त ॥ २० ॥
आता अलिप्ताचि वार्ता । ते ऐक गा उद्धवभक्ता ।
तेणें भ्रांतिचा पडदा तत्वता । फिटेल पै ॥ २१ ॥
उद्धवा परिस तो मिच जाण । इतर पाषाण मिच मान ।
तेथे भिन्नपण जाण । कैसे वर्तले ॥ २२ ॥

परिस तो हि पाषाण । इतर ते हि ते चि जाण ।
तयासि भिन्नपण । कैसे आसे ॥ २३ ॥
का कल्पवृक्ष पुरवि कल्पना । इतर वृक्षि नव्हति खुणा ।
ऐसा जातिचा आचारु जाणा । गुणगणा वेगळाले ॥ २४ ॥
गुण वेगळाले जाले । पंचभूति विस्तारले ।
परि जातिविचारे शोभले । ठायिचे ठायि ॥ २५ ॥
जाति अचारु करावा । कर्मसागरु शोभवावा ।
अंतरि हेत ऐसा धरावा । बहुरूपियापरी ॥ २६ ॥
बहुरूपिया खेळ खेळे । शोभा दावि सकळ कळे ।
खेळ खेळुनि निराळे । होउनि जाय जैसा ॥ २७ ॥
ऐसे ब्रह्मज्ञानी जे नर । ते कर्माचा करिति विचार ।
दधि मंथोनि सार । काढिति नवनित जैसे ॥ २८ ॥
ऐसे चौदेहाचे करि मथन । सार निवडे आपणा आपण ।
तेणे वाणे समाधान । दृष्टि अज्ञान मावळे ॥ २९ ॥
अज्ञान ते कैसे ह्मणसि । ते हि सांगतो अनुभवेसि ।
ते विचारिता मानसि । अज्ञान निरसे ॥ ३० ॥
रजके केले वस्त्रशुद्ध । डाग मार्जने नानाविध ।
परंतु युक्तिचा विचार विनोद । न कळे आणिका ॥ ३१ ।
ऐसा श्रीसद्गुरुरावो । दुर करि भवभेवो ।
बोधे ब्रह्मानुभवो । क्षणामाजी ॥ ३२ ॥
यालागि श्रवण करावे । गुणे निर्गुण वोळखावे ।
मनने निजध्यासित जावे । गुरुकृपेनें मोक्षपद ॥ ३३ ॥
जैसे वस्त्र मळकटले फार । रजके केले शुद्ध शुभ्र ।
तैसे हे शरीर सार । मळे अमंगळ भासतसे ॥ ३४ ॥
जैसा लोखंडाचा आरसा । मळे जाला अनारिसा ।
पाहो जाता मुखाचा ठसा । शुद्ध सहसा न दिसे ॥ ३५ ॥
ऐसि हे अज्ञानभ्रांति । ह्राचि मळ आसे चित्ति ।
याकारणे निवृत्ति । नये मानसि ॥ ३६ ॥
ज्यास पाहिजे हे ज्ञान । त्याने सेवावे साधुचरण ।
वृत्ति करावी समाधान । संतचरणि ॥ ३७ ॥

त्याने शोधावी हे काया । आणिक पुसो नये वाया ।
तेणे होय भक्तराया । निवृत्तिज्ञान ॥ ३८ ॥
निवृत्तिचे ज्ञान । न मिळे पाहाता शास्त्रपुराण ।
जपतप करिता जाण । नोहे प्राप्त ।। ३९ ॥
जेणे केले आत्मशोधन । वंदावे तयाचे चरण ।
तेणे प्राप्त निवृत्तिज्ञान । होइल आपैसे ॥ ४० ॥
जोवरि अज्ञान असे शरिरी । तोवरि वृत्ति गुंतली अविचारी ।
तेथे शुद्ध विचार तरी । न मिळे पाहाता ॥ ४१ ॥
जैसि मृगनाभि कस्तुरी । आसोनि हिंडे अरण्यांतरी ।
परंतु सुगंध जाय दुरी । क्षण येकु ।। ४२
ऐसे हे अज्ञानवृत्तिचे बळ । फिरतसे नाना सैल ।
परि नाभिसुगंध ऐसा न कळे । अज्ञानवृत्ति ह्मणोनिया ॥ ४३ ॥
ऐसे उद्धवा जाण मनी । अज्ञान ते ऐसे प्राणि ।
तेणे गुणे मि सर्वजनी । परिपूर्ण आसे ॥ ४४ ॥
जनिजनार्दन ह्मणे । हे श्रीकृष्णाचे बोलणे ।
ते परिसावे संतजने । निर्मळ चित्ते करोनिया ॥ ४५ ॥
ईति श्रीनिर्विकल्पग्रन्थ । श्रक्रिष्ण उद्धव संवादत ।
तो संताचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासि ॥ ४६ ॥

---

## अध्याय अकरावा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

ऐसा मि रोमरोम सर्व शरिरी । संचलो आसे नानापरी ।
त्याचि शुद्धि नाहि अंतरि । मृगापरि जाणपा ॥ १ ॥
अज्ञान अनहित जन्माचे । ज्ञान ह्मणिजे कैवल्य साचे ।
तेथे मित्र लोकीचे । निजबीज ऐसे ॥ २ ॥
जैसे अंधकार रात्रीं । मार्गि चालताना नेत्री ।
रज्जू देखे सर्पापरी । वक्रलंबित ॥ ३ ॥
तो उभा राहिला तेथे । मनी सर्प दंशील माते ।
ह्मणोनि धोंडा हाणि तयाते । घेवोनि करी ॥ ४ ॥

धोंडा टाकिला तयावरी । पळता जाला झडकरी ।
तव पायी गुंतली दोरी । एकाएकी ॥ ५ ॥
तेणे केले किलाण । खडे कंटकी पडति चरण ।
त्या काळी काहि च भान । नव्हते तया ॥ ६ ॥
पळत गेला आपले घरि । दिप आणविला बाहेरी ।
पाहो लागला शरिरी । उजेड संगे ॥ ७ ॥
तव चरणि देखिले रुधीर । मग घाबरला फार ।
ह्मणे मज सर्प निर्धार । झोंबला असे ॥ ८ ॥
धावाधाव करिति जन । तो देह जाला विसर्जन ।
मेले मढे होऊन । पडले असे ॥ ९ ॥
न झोंबता सर्प तयासि । न विष चढले शरिरासि ।
शरीर गेले विलयासि । धाके तयाचे ॥ १० ॥
ऐसा हा अंधकार । निरसावा साचार ।
मग शोभा सुंदर । निवृत्ति चि तया ॥ ११ ॥
उजेड ऐसा बोलिजे ज्ञान । तेणे बाणे समाधान ।
खरे खोटे हे ज्ञान । होय तया ॥ १२ ॥
जरि उजेड आसता । तरि दोरिचा सर्प का भासता ।
वृथा मृत्यु का पावता । कारणेवीण ॥ १३ ॥
शयनिश्चय तो आहे । तो अज्ञान अंधःकार पाहे ।
तोवरि नोहे । निवृत्तिसि पावत ॥ १४ ॥
जव अज्ञान असे शरिरी । तव वृत्ति गुंतालि अविचारि ।
उजेड पडलियावरी । शयनिश्चय दुरि पळताती ॥ १५ ॥
ऐसे अज्ञान जे प्राणी । तेणे केलि स्वाहित हाणी ।
वृथा गेला जाणी । ठावहि येक नसे ॥ १६ ॥
आरे उद्धवा भक्तराया । नृदेह उत्तम रे सखया ।
ह्मणोनि पाहावे आपणिया । जो मि कोण आसे ॥ १७ ॥
आला कोठोनिया या ठाया । कोणे युक्तिने जालि काया ।
जाईल कोणातिया ठाया । विचारि मनि ॥ १८ ॥
ऐसे जेणे विचारिले । ते जिताचि मुक्त जाले ।
ते करोनि अकर्ते बोलिले । समदृष्टि तयाचे ॥ १९ ॥

कि दधिमध्ये नवनीत । ते आसे दधिवत् ।
मथन करिता सत्य । होय वेगळे ॥ २० ॥
नवनीत जाले वेगळे । मग दधिसि न मिळे ।
ऐसे जेणे शरीर शोधिले । ते दोषादोष वेगळे ॥ २१ ॥
कीं लोखंडासी लागला परीस । जाले ते चि हे रस ।
मग ते लाविता लोखंडास । कैंचि सरी ॥ २२ ॥
सोनेपण जडले अंगि । मग ते न पालटे या मार्गी ।
ऐसा जो नर जागी । स्वसुखाते ॥ २३ ॥
ऐसे ज्ञान ते परिस ह्मणिजे । तेणे पालट होय सहजे ।
मग पावे निजवस्तु तेजे । निवृत्तिज्ञानाचे ॥ २४ ॥
जरि शोधिलि हे काया । तरि भक्ति न टाकावी वाया ।
भक्ति ज्ञान वैरागिया । तो चिं साधू ॥ २५ ॥
ऐसे नसे जे शरिरी । तो आपणाआपण जाला वैरी ।
तेणे टाकिले दुरी । स्वहित आपुले ॥ २६ ॥
दाता भोक्ता इश्वर । ऐसे कळले साचार ।
परंतु अंतरिचे विकार । सांडिचना ॥ २७ ॥
ऐसे मज नोळखता गेले । ते चौऱ्यायसिचे भरि पडले ।
मग फिरो लागलो । चक्र जैसे ॥ २८ ॥
ऐसि ऐकोनि देववाणि । मग उद्धव बोलिला वचनि ।
देवा एक पृछेचि सिराणि । फेडि माझि ॥ २९ ॥
देवा पुर्वि सांगितले । अवघा मी ऐसे भासवले ।
शरीरदोष निरसले । न बाधे ह्मणोनिया ॥ ३० ॥
बहुरूपियानें सोंग धरिले । तेणें काय बद्धत्व त्यासि आले ।
ऐसे मज सांगितले । आता हे काईसे आसे ॥ ३१ ॥
तरि मज आता उगवुनि । सांगा जी चिंतामणी ।
जे ऐकोनि माझे मनि । संतोष वाटे ॥ ३२ ॥
जनिजनार्दन ह्मणे । हे श्रीकृष्णाचे बोलणे ।
ते परिसा संतजने । निर्मळचित्ते करोनिया ॥ ३३ ॥
इति श्रीनिर्विकल्पग्रंन्थ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासि ॥ ३४ ॥

# अध्याय बारावा.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

उद्धव ह्मणे देवासि । अवघा तुचि परियसि ।
तरी कैसे हे जि ऋषिकेसि । सांगा मज ॥ १ ॥
मग ह्मणे श्रीकृष्णनाथ । उद्धवा ऐके देवोनि चित्त ।
जेणे होसिल तूं स्वस्थ । ते मत्त तुज सांगो ॥ २ ॥
धन्यासि जावोनि भेटावे । मग सेवकाने काय करावे ।
भेटोनि मुक्त व्हावे । संसारयातनेसि ॥ ३ ॥
जो प्राणि नाहि भेटला । तो चाकरि कष्टविला ।
मग यातना तयाला । करिते जाले ॥ ४ ॥
उद्धवा चित्त देई माझे वचनि । शब्दे शब्द घे पारखोनि ।
करि कर्मांचि धुनि । येणे ज्ञाने ॥ ५ ॥
संसार ह्मणिजे दुःखमूळ । येणें बद्धत्व जाले केवळ ।
याते करील निर्मूळ । सद्गुरुरावो ॥ ६ ॥
सद्गुरु न भेटता पुरता । तो गेला योनिपंथा ।
तयाचिया चित्ता । बोधचि नसे ॥ ७ ॥
अबोधयोनि तया प्राणिया । जन्म जाला रे सखया ।
मग हिंडो लागले वाया । जन्मांतरिची सुकृते जैसी ॥ ८ ॥
जैसा सरितेसि आला पूर । उतरो लागला अज्ञान नैर ।
सांगडिविण पैलपार । पावे पाहे ॥ ९ ॥
नये तरावयाचि कळा । जळि होताति अवकळा ।
मग उदकाचिया कल्लोळा । वाहो लागे ॥ १० ॥
यासाटी ज्ञानमटि असावे । सद्गुरूसि शरण जावे ।
तरोनि पार पावावे । कास तयाचि धरोनिया ॥ ११ ॥
ऐसा तो ज्ञानतारु । तोचि उतरील भवसागरु ।
क्षणामाजि पैलपारु । करील ऐसा ॥ १२ ॥
ऐसे जे का ज्ञानतारु । त्याहि मोडिला जन्माचा अंकुरु ।
त्यासि कर्माकर्माचा विचारु । दोषादोष न बाधिती ॥ १३ ॥
जेणे सारांश शोधिला । तो जिताचि मुक्त जाला ।
विवेके विचारे जाणितला । भवसिंधूचा पारु ॥ १४ ॥

तयाचि भावना ऐसि जालि । द्वैताचि भुलि पडली ।
एकपणे धावली । वृत्ति भावना ॥ १५ ॥
ऐसे जे पूर्ण आसति । ते चि हा खेळ जाणति ।
जे अत्मज्ञाने दाटती । ते न फिरति योनिमाळिका ॥ १६ ॥
यासाटि उद्धवभक्ता । पूर्ण आसावा ज्ञाता ।
सांडोनि मीपणाची अहंता । तो न लिंपे शरीरदोषा ॥ १७ ॥
जोवरी भ्रांतिपडदा नाहि फिटला । तोवारि अंधकार राहिला ।
कामक्रोधे वेडावला । काहि नुमजे तया ॥ १८ ॥
ज्याचे सत्तेने वर्ते शरीर । त्याचा पडला विसर ।
सेवटि अपपर विचार । हा नसेचि तया ॥ १९ ॥
यासाटि शोध कारिता होय बोध । बोध होता जाला शुद्ध ।
शुद्ध होता जाला निबंध । ऐसे भासे तया मनीं ॥ २० ॥
ऐसे ज्ञाने जे तृप्त जाले । ते च भवसागर तरले ।
इतर ते भांबावले । संसारसागरी ॥ २१ ॥
संसार दुर्घट सागर । याचा कोणासि न कळे पार ।
येथे तरावयाचा विचार । ज्ञानदृष्टी ॥ २२ ॥
ऐसे आसे जी भक्तराया । तुवा पुसिले सखया ।
तरि ज्ञानि तो न जाय वाया । अज्ञाना ऐसा ॥ २३ ॥
आता आसो ज्ञानअज्ञान । तुज सांगतो जे खूण ।
ते तूं मनि धरोनि आपण । पार होये ॥ २४ ॥
कर्ता हर्ता तो चि समावता । ऐसा तर्क मानि चित्ता ।
उगवोनि राहे तत्वता । सावधपणे ॥ २५ ॥
सावध होउनि राहासी । तरि च स्वसुख पावसी ।
अविश्वासे जासी । येमलोकी ॥ २६ ॥
उत्पन्न जाला प्राणि । तेव्हा दिधलि पेटवणी ।
नाम आणि वाणी । दिधली तया ॥ २७ ॥
तो शब्द सोहं विसरला । मि कर्ता ऐसा भांबावला ।
मायामोहे पिसाटला । वैकल्यापरी ॥ २८ ॥
ऐसा वैकल्य जाला । मूळस्थान विसरला ।
मग तो प्राणि वाहावला । भवनदिमाजि ॥ २९ ॥

अज्ञान ऐसे पिसे जाले । मग तो फिरे सर्वकाळें ।
तया नुमजे काय जाले । आत्मभूलि ह्मणोनिया ॥ ३० ॥
ऐसा या देहासि आला । सेवटि अज्ञान राहिला ।
तो जन्ममरणासि जाला । वाटेकरी ॥ ३१ ॥
यासाटि सद्गुरु सेविजे । तो चि दीपप्रकाश शरिरि किजे ।
त्या प्रकाशे पाहिजे । शरिरशोध ॥ ३२ ॥
सारासार खरे खोटे । ऐसे पाहावे निकटे ।
तेणे चलावे निटवाटे । अडमार्ग सोडोनि ॥ ३३ ॥
जेथोनि आले तेथे चि लावणे । आपआपणा मुक्तमाने ।
करी न करणे दोन्हि जाणे । साक्षित्वपण पै ॥ ३४ ॥
ऐसे जेणे जाणितले । ते सहजस्थितिने पार पावले ।
त्याचे जन्ममरण खंडिले । ज्ञानशस्त्रे ॥ ३५ ॥
ज्ञानशस्त्र घेतले करी । कामक्रोधाचि केली बोहरी ।
आशामनसाचि दोरी । कापिली जाणा ॥ ३६ ॥
तेणे तो जाला उदास । मनाने तोडिले आशपाश ।
ऐक्य असे तयाचे मानस । गंगाजळापरी ॥ ३७ ॥
गंगेमाजि करिता स्नान । तेणे पातके जालि नासोन ।
तैसे चि संतजन । जना पावन करिताती ॥ ३८ ॥
जैसा नदीमाजि तारु । आपण तरूनि दुजियासि करि पारु ।
ऐसा जन्मोनिया नरु । संत तो चि जाणिजे ॥ ३९ ॥
ऐसे ज्ञान जया शरिरी । तोचि तरे भवसागरी ।
ईतराते हि तारि । काय करि येम तया ॥ ४० ॥
त्याचे भय गेले निघोनि । निर्भय जाला जनी ।
संसारकर्माचि सिराणि । फिटलि तयाचि ॥ ४१ ॥
ऐसा तो निर्भय जाला । भवसमुद्राचा टाव घेतला ।
मग उतरो लागला । आपण आणिकासि ॥ ४२ ॥
ऐसे आसे जी भक्तशिरोमणी । भेदबुद्धिचि जालि धुनि ।
धन्य धन्य त्याचि जननि । व्यालि त्याते ॥ ४३ ॥
यावरि बोले उद्धवभक्त । देवा सांगीतले ते सत्य ।
उमजु नसे तयाचे हित । कवणिया प्रकारे होय पै ॥ ४४ ॥

उद्धवाचा प्रश्न ऐकिता । देव जाला हरुषे बोलता ।
तयाचे स्वहिताची वार्ता । सांगो तूज ॥ ४५ ॥
तया स्वहित पाहिजे । तेणे ममता सोडिजे ।
संतासि शरण जाइजे । तरि पाविजे स्वहित ॥ ४६ ॥
आणिक श्रवण करावे । खरे खोटे जाणित जावे ।
ऐसे हारपण सिकावे । तरि स्वहित होय ॥ ४७ ॥
सद्गुरु किजे पूर्ण ज्ञाता । जो गुरवी अंतरिच्या अर्ता ।
तयाच्या चरणि टेवि माथा । तरि स्वहित होय ॥ ४८ ॥
पूर्ण गुरु न भेटता । तरी भाव धरोनि चित्ता ।
संतसंगतीनें तत्वता । स्वहित होय आपुले ॥ ४९ ॥
संतसज्जनासि तत्परु । जो जाला साचारु ।
मग होय निर्भरु । तरि स्वहित होय ॥ ५० ॥
नित्याध्यात्मवाचे । भाव मनि सर्वांचे ।
ऐसे मानस जयाचे । तरि स्वहित होय ॥ ५१ ॥
का सर्वभूति दया समान । नित्य करि भजनश्रवण ।
संतसज्जनाचे मानि वचन । तरि स्वहित होय ॥ ५२ ॥
देहाचा न धरि अभिमान । परधनदारा मानि तृण ।
अंतरि वैराग्य असावे जाण । तरि स्वहित होय ॥ ५३ ॥
की करिसि तीर्थयात्रा । द्रव्य वेचिसि भूतमात्रा ।
ते ब्रह्मार्पण करी त्वरा । तरि स्वहित होय ॥ ५४ ॥
जे जे कर्मं अंगे केली । ते मी केले ऐसे न बोलि ।
इश्वरसत्तेने जालि । तरि स्वहित होय ॥ ५५ ॥
ऐसा हेत धरि मनि । समज धरि अंतःकर्णि ।
ऐसा जालिया प्राणि । तरि स्वहित होय ॥ ५६ ॥
भजनि होय तत्परु । विचारेविण न चाले नरु ।
जाला विद्येचा सागरु । तरि स्वहित होय ॥ ५७ ॥
ऐशा उपाये तरि भवसागरि । कामक्रोधादि दूर करी ।
सद्गुरुचे चरण धरि । तरि स्वहित होय ॥ ५८ ॥
ऐसा उपाय सांगितला । जेणें सद्गुरु सेविला ।
तो भवसागरि तरला । येर अवतरले मूर्ख ते ॥ ५९ ॥

जो न जाणे ज्ञानध्यान । तो जाणा पशुसमान ।
हिंडता जाला जन्म । चौऱ्यायशि योनी ॥ ६० ॥
तयासि यमाचा धाक । त्या नेति येमलोक ।
जाचिति तया अनेक । जे रुजु नसताति ॥ ६१ ॥
याकारणे उद्धवा । निजस्वरूपाचा पार घ्यावा ।
जन्म वाया का वेचावा । अकारण ॥ ६२ ॥
जन्मोजन्मी हिंडता । स्वाहित न ये गा हाता ।
येणे जन्मे तत्वता । वोळखि माझि ॥ ६३ ॥
याजन्मि नाहि वोळखिले । नाहि सत्यस्वरुप जाणितले ।
वासनेने वाहविले । ते गेले येमलोकी ॥ ६४ ॥
यासाटि सद्गुरुचरण । नित्य सेवावे जाण ।
ते सांगेला खूण । निजस्वरूप दावि डोळा ॥ ६५ ॥
आता उद्धव आणिक पुसतिल । ते श्रीकृष्णनाथ सांगतिल ।
तेणे बोध होइल । उद्धवासी ॥ ६६ ॥
उद्धव ह्मणे देवासि । निर्विकल्पग्रन्थ चित्ति मानसि ।
धरिलासे ऋषिकोशि । पुण्यपावन ॥ ६७ ॥
जनिजनार्दन ह्मणे । हे श्रीकृष्णाचे बोलणे ।
ते परिसावे संतजने । निर्मळचित्ते करोनि ॥ ६८ ॥
इति श्रीनिर्विकल्पग्रन्थ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संताचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासि ॥ ६९ ॥

## अध्याय तेरावा

॥ श्रीगणेशाय नमः ॥

उद्धव ह्मणे देवाशी । अवघा तूचि परियेसी ।
तरी येक नरकी येक तारिसी । हे कैसे जी देवराया ॥ १ ॥
यावरी बोले भगवान । उद्धवा ऐक माझे वचन ।
जेणे कल्पनेचे निरसन । होय तुझे ॥ २ ॥
मजपासुनी सर्व जाले । निर्गुणी सगुण शोभले ।
मायाभ्रांतीने व्यापिले । ह्मणोनी नेणती मज ॥ ३ ॥

मी असे सूर्यन्याये । माझे सत्तेने जनकर्म होय ।
परंतु मी कर्ता नोहे । विचारी मनी ॥ ४ ॥
हे सर्वस्व मजपासुन। पारि आसे मायेअधीन ।
करणे मरणे जाण । मायाच करवी ॥ ५ ॥
ऐसि माया ते कोणती । ते तुझी फेडितो भ्रांती ।
सावध होई चित्ती । पुढिले गोष्टीसी ॥ ६ ॥
मन ह्मणे चोरी करु । ऐसा जाला विचारु ।
येणे दोन प्रकारु । घडले तया ॥ ७ ॥
चोरी करोनि घराधि आला । तेणे फार सुखिया जाला ।
मागुता जन्मायोग्य जाला । चोरी ऋण फेडावया ॥ ८ ॥
ऐसा एका व्यभिचारु घडला । दुजे धरिले तयाला ।
मग विरषा शरिराला । राहिली वासना मूळ ॥ ९ ॥
ऐसे वासनेचे बळे । ते धावे सबळ ।
तेणें जडे मळ । अज्ञान भ्रांतीचा ॥ १० ॥
नाना शुभाशुभ कर्मे । करिता होय मनोधर्मे ।
ते मी करिता हे बोले वर्मे । योनिमाळा फिरावया ॥ ११ ॥
ज्ञाने जे नर तृप्त जाले । ते वर्तती विचारबळे ।
आपुले अंग जाळविले । जन्ममूळ उपडावया ॥ १२ ॥
जे मायाभ्रांतीनें व्यापिले । मूळ ठाव नाही शोधिले ।
ह्मणोनी वाहाविले । निसांगडिया ऐसे ॥ १३ ॥
जे अविवेकी जाले । ते जन्मोजन्मी हिंडो लागले ।
परंतु ठाव नाही गवसले । कवणिये काळी ॥ १४ ॥
नाना योनीचे भरी । जीव भ्रमती अपारी ।
कोण ते जन्मी तरी । वोळखिती माते ॥ १५ ॥
उद्धवा मज वोळखाया । अनेक जन्म नव्हे भक्तराया ।
ह्मणोनी नृदेही आलिया । उत्तम आसे ॥ १६ ॥
नर तो चि नारायण । ऐसे असे महिमान ।
तेथे अज्ञाने जाला हीन । नाही मज वोळखिले ॥ १७ ॥
नृदेहा गेला वृथा । फिरो लागला योनिपंथा ।
तो गेला वाहता । अज्ञानपणें ॥ १८ ॥

आसो आता ज्ञान अज्ञान । जो सद्गुरुचे सेवी चरण
तेणें होईल पावन । जीवन्मुक्तपणें ॥ १९ ॥
जीवन्मुक्ती जरी पाविजे । तरी समदृष्टी सर्व जाणिजे ।
गुरुमुखे लाहिजे । गुरुखुणा ॥ २० ॥
यावरी बोलिले उद्धव । देवा कैसा तरावा भव ।
त्याचा मज उपाव । कृपा करोनी सांगिजे ॥ २१ ॥
जनीजनार्दन ह्मणे । हे श्रीकृष्णाचे बोलणें ।
ते परिसावे संतजने । निर्मळचित्ते करोनिया ॥ २२ ॥
इति श्रीनिर्विकल्पग्रंथ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संताचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासी ॥ २३ ॥

---

## अध्याय चवदावा.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

उद्धवा ऐके सावध । पुढे होइल महाबोध ।
तेणे होसील शुद्ध । भक्ता माझे ॥ १ ॥
जेणे जाणितली कळा । ते नकळे गा सकळा ।
ह्मणोनी योनिमाळा । फिरे प्राणी ॥ २ ॥
उद्धवा तू निजभक्तसखा । शोध करिता जालासी चोखा ।
आता नको धरू शंका । या या च कीं ॥ ३ ॥
आता तुज भवसागराचा । निवाड सांगतो साचा ।
तेणे तुझिया मनाचा । निघेल धाक ॥ ४ ॥
अवघा विस्तारु मजपासुनी । ऐसे बोले चक्रपाणी ।
हे वचन धरि मनी । भावबळे ॥ ५ ॥
अंतःकर्णि हेत जाला । तो मनामाजि आला ।
मग करि कर्माला । नानाबुद्धिते ॥ ६ ॥
अंतःकर्णाचा उद्गारु । मने केला विस्तारु ।
विस्तार भंगता मन अंकुरु । मोडला काय ॥ ७ ॥
जैसे धान्य पेरिजे इच्छेने । काम निघे तो माया जाणने ।
कोमाचा विस्तारु करि पेणे । बीजापर्यंत ॥ ८ ॥

बीजापासोनी निघाली माया । सेखी बिजी च आटली गा सखया ।
माया विस्तारूनिया । जाला नाशु ॥ ९ ॥
जैसे सूर्यबिंब दिसे जळी । परि ते असे रविमंडळी ।
जळ आटले गा पाताळी । काय सूर्य गेला तया संगे ॥ १० ॥
की दर्पणी पाहिले रूप । तेथे दिसे आपुले स्वरूप ।
ते नेले गा वेगळे आप—। स्वरूप गेले काइसे ॥ ११ ॥
ऐसा मायेचा आरसा । तेथे इश्वर भासे साचा ।
परंतु कामक्रोधाचा फासा । नुमजे च काही ॥ १२ ॥
कामक्रोधे वेडावला । ह्मणोनि मज नाही गवसला ।
तेणे अज्ञाने विसरला । मी कोण ऐसे नेणे ॥ १३ ॥
आता एक सांगतो तुज । ते विचारिता सहज ।
ते जाणता निज । सर्वकाळ मुक्त व्हावे ॥ १४ ॥
बेटकी वरूनि विस्तारु । कथेचा जाला साचारु ।
तेणे केला पवित्रु । भक्तसखा ॥ १५ ॥
हे गुह्यज्ञान सांगो तुज । तेणे अत्मज्ञ होसि सहज ।
माया विस्ताराचे चोज । श्रवण करी ॥ १६ ॥
सर्व मायामय ब्रह्म । ब्रह्ममय माया निसिम ।
तेथे कैचे उत्तम मध्यम । ते वर्म जाण ऐके आता ॥ १७ ॥
मायेस माया अंगिकारी । मायेचि शोभा माया करी ।
नाना कळाकुसरी । माया चि करितसे ॥ १८ ॥
मायेसि माया भक्षी । माया चि सर्व लक्षी ।
माया चि सर्व साक्षी । मायाकारणे ॥ १९ ॥
मायेसी माया बोध करी । मायेसि माया विस्तारी ।
माया चि करी बोहरी । मायेचि गा ॥ २० ॥
मायेसि माया पाळी । माया मायेसी जाळी ।
माया चि पोकळी । अभ्र जेवी ॥ २१ ॥
मायेसी माया उपजवी । माया चि सर्वकळा दावी ।
माया चि लोपवी । मायेसि गा ॥ २२ ॥
खाणे पिणे देणे घेणे । हे मायेसी माया चि जाणने ।
ऐसा विचार धरणे । मनामाजी ॥ २३ ॥

ऐसि हे सर्वमाया । हे बोलिली भक्तराया ।
जेणे तुझे हृदया । संतोष वाटे ॥ २४ ॥
उद्धवासी ह्मणे अधोक्षज । मायाब्रह्म हे चोज ।
ते सांगतो तुज । गौप्य करी ॥ २५ ॥
ब्रह्म ते गुह्य बीज । विस्तारले ह्मणोनिया चोज ।
परी ब्रह्म ते अवघे चि सहज । सगुण निर्गुण ॥ २६ ॥
निर्गुण ते निराभास । सगुण ते साभास ।
दोहि दळाचा भास । परब्रह्म एक ॥ २७ ॥
सगुण ते ब्रह्म ह्मणावे । निर्गुण ते गुणे वोळखावे ।
सगुणनिर्गुण ते एक जाणावे । श्रीगुरुकृपे ॥ २८ ॥
नेटकी आणी काउळा । याते भगंवत काय निराळा ।
परंतु मायेची लीला । माया चि करवी ॥ २९ ॥
सर्वाभूती साक्षि मी एक । भक्ष भोज्य हे माया देख ।
माये वाचुनि किंचित् चोख । कार्य होत हे लटिके ॥ ३० ॥
माया आणि ब्रह्म जाण । ते तू एक करोनी मान ।
येणे येईल मुक्तपण । तुझिये वृत्तिसी ॥ ३१ ॥
माया ब्रह्म एक का ह्मणसी । हेही सांगतो तुजसी ।
जतन करी शब्दासी । बहु तजविजे ॥ ३२ ॥
बाहेरी पसरली ह्मणोनि माया । अंतरी कोंदले ते ब्रह्म सखया ।
ह्मणोनी अंतर्बाह्य ऐसि बोलिया । बोलती संत ॥ ३३ ॥
याकारणे ब्रह्म आणि माया । हे बोलि जाली भक्तराया ।
परि माया आणि ब्रह्म सखया । एक चि असे ॥ ३४ ॥
मायेसी च ब्रह्म जाणिजे । ब्रह्मी माया निपजे ।
मायाब्रह्म ऐक्य मानिजे । संतजनी ॥ ३५ ॥
मायाशब्द उभारिला । सेवटी ब्रह्मी मिश्र जाला ।
जैसा तरंग निमाला । सागरामाजी ॥ ३६ ॥
जैसा मेघ वर्षे पृथ्वीवरी । थेंबु टाकुन गर्जना करी ।
एकत्र होउन सागरी । मिळंती जैसे ॥ ३७
समुद्राचे उदक । मेघ शोषिती देख ।
ते पसरीती देख । देशांतरी ॥ ३८ ॥

उदक वर्षते जाले घन । तेणे मेदिनीचे तृप्त जाले मन ।
सेवटी ते जीवन । सागरी च मिळाले ॥ ३९ ॥
ऐसि हे स्वसौख्यकळा । याचा जाणता विरळा ।
जरी गुरुकृपा प्रबळा । तरी च प्राप्त हे ज्ञान ॥ ४० ॥
जीवशिव हे भावना । नाशाते पावेल जाणा ।
मायाब्रह्म द्वैतपणा । मानो नये ॥ ४१ ॥
कळाहुनी सूर्य वेगळा । की सूर्यकळा निराळा ।
ऐसि माया ब्रह्माला । जडली असे ॥ ४२ ॥
बाह्यांतरी कोंदले । ते मायाब्रह्म ऐसे बोलिले ।
शब्द जतन करी वाहिले । उद्धवा तू बा ॥ ४३ ॥
चंदनाचा परिमळु । उगाळिता न होय वेगळु ।
तैसा हा ब्रह्मगोळु । भिन्नाभिन्न आसे ॥ ४४ ॥
जळामाजी लवण । ते जलरूप जाले जाण ।
तेसे लक्षिता द्वैतपण । हरपले पै ॥ ४५ ॥
ऐसे असे जी भक्तनाथा । अभंगी आली असे कथा ।
पूर्णबोध उद्धवाचे चित्ता । जाला आसे ॥ ४६ ॥
इति श्रीनिर्विकल्पग्रंथ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासी ॥ ४७ ॥

---

## अध्याय पंधरावा.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

उद्धव ह्मणे जी चक्रपाणी । मी हीन बोलिलों वचनीं ।
क्षमा करावी जननी । बाळकावरी ॥ १ ॥
तुझे हे लाघवो । हे कवणा न कळे मावो ।
आह्मी सर्वही भावो । तुज चि देखो ॥ २ ॥
बीजापासोनि वृक्ष जाला । सेवटीं बीजीं समावला ।
ऐसा एक कळों आला । भूगोल सर्व ॥ ३ ॥
ऐसा हा देवभक्तांचा संवाद । कथा चालिली अति विनोद ।
ऐसा हा प्रेमबोध । जाणती संत ॥ ४ ॥
सगुण निर्गुण एक । ऐसा विचार देख ।
तेणें जाला हारिख । जनार्दनासी ॥ ५ ॥

जनामध्यें जनार्दन । जनजनार्दन ऐक्य जाण ।
हे जाणती संतसज्जन । जे का पूर्ण ज्ञानसिंधु ॥ ६ ॥
ऐसा देवभक्ताचा बोधु । तेणें जनार्दन जाला शुद्धु ।
अति प्रेमाचा विनोद । सांगतां नये ॥ ७ ॥
श्रोता वक्ता श्रीजनार्दन । तेणें ग्रंथ केला निर्माण ।
येथें ठेवो नये दूषण । कविराजे ॥ ८ ॥
ग्रंथीं न्यूनपूर्ण बोलणें । तें सांभाळावें श्रोतेजने ।
अज्ञानपणाचें बोलणें । क्षमा कीजे ॥ ९ ॥
समस्ताची कृपा जाली मज । तेणें बोल बोलिलों सहज ।
ते सांभाळावे निजगुज । संतजनीं ॥ १० ॥
मी निमित्यासी कारण । कर्ता हर्ता जनार्दन ।
करणें करविणें जाण । समर्थ तो चि आसे ॥ ११ ॥
यमुनानदीचे तीरीं । कालिनी नामें महानगरी ।
तेथें ग्रंथकथा श्रीहरी । उद्धवाप्रति सांगत ॥ १२ ॥
या ग्रंथानाम निर्विकल्प । पठणें श्रवणें नासती विकल्प ।
तीर्थदाने जप तप । प्राप्त होति निःसंदेह ॥ १३ ॥
हे श्रीकृष्णकथा । श्रवण आणि पठण करितां ।
तयाचि भवव्यथा । पावे तत्वता नाशाते ॥ १४ ॥
श्रीकृष्णे बोधिला उद्धव । तेणे तयाचे फळले दैव ।
या ग्रंथि धरिति भाव । तयाते देव भेटि देई ॥ १५ ॥
या अज्ञानरजनिचा सविता । उगवला पूर्वपंथा ।
तो विचारिता चित्ता । अंधकारभ्रांति फिटे ॥ १६ ॥
ऐसा देवभक्तांचा संवाद । उद्धवासि जाला पूर्ण बोध ।
तो भावे विचारिता विनोद । भेदाभेद नासती ॥ १७ ॥
निर्गुण ते चि बोलिले । ते चि सगुणाते देखिले ।
सगुणनिर्गुण ऐक केले । श्रीजनार्दने ॥ १८ ॥
ग्रन्थ बोला बाळबोध । याचा पहातां [illegible] द ।
तेणें संतोषाचा आनंद । साधुज[illegible] ॥
या ग्रंथासी देऊं बडिवारु [illegible]
हा भवनदीमाजी ता[illegible]
[illegible]

हा ग्रंथ वाचितां । एकांतीं मनन करितां ।
समाधान तयाचे चित्ता । होतसे जाण ॥ २२ ॥
बोलणें बोल प्रगटले उघडे । त्याचे गर्भी आसे वाकुडे ।
संतीं विचारावें वाडे कोडें । बोबडे बोल ॥ २३ ॥
तुमची केली पुजा । ती अंगिकारावी माहाराजा ।
दीन जाणोनि आत्मजा । जनार्दनासी ॥ २४ ॥
जनीजनार्दन । ऐसे ह्मणताती जाण ।
अज्ञानपणाचें बोलणें । अंगिकारिजे ॥ २५ ॥
जे जे श्रीकृष्ण बोलिला । तेथें उद्धवें भाव ठेविला ।
तेणें तो जीवन्मुक्त जाला । देहातीत ॥ २६ ॥
हा निर्विकल्प ग्रंथ । आसे गीतेचा मथितार्थ ।
जनीजनार्दन एकनाथ । बोलिले आसे ॥ २७ ॥
कार्तिक शुक्ल एकादशी । स्नान केलें यमुनेसी ।
ग्रंथ पावला अभंगासी । तृतीय प्रहरी ॥ २८ ॥
भावें करिती श्रवण । ते जीवन्मुक्त होतील जाण ।
त्याचे वृत्तीचें समाधांन । करील देव ॥ २९ ॥
श्रीकृष्ण ह्मणे उद्धवराया । तुज जें सांगितलें रे सखया ।
हे ज्ञान भक्तराया । दुर्जनश्रवणीं न पडो ॥ ३० ॥
जनिजनार्दन ह्मणे । हें श्रीकृष्णाचें बोलणें ।
ते परिसावें संतजनें । निर्मळचित्तें करोनियां ॥ ३१ ॥
इति श्रीनिर्विकल्पग्रंथ । श्रीकृष्ण उद्धव संवादत ।
तो संतांचा विनोद अद्भुत । अर्पण त्यासी ॥ ३२ ॥

॥ पंचदशोध्यायः संपूर्णमस्तु ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

यादृशं पुस्तकं [illegible] तादृशं लिखितं मया ॥
शु[illegible] दोषो न दीयते ॥

वस्ती भुसावळ.

[illegible]